करदर्शन

अर्थात्

सुलभ सामुद्रिक

[सुप्रसिद्ध डॉ. रा. ह. भडकमकर, एम्. ए., एम्. डी.
यांच्या हस्तरेषांचें सचित्र वर्णन व इतर ८८ आकृत्या यांसह]

लेखक

लक्ष्मण केशव तांबे

[प्रस्तावना लेखक–ज्योतिषाचार्य दाजी नागेश आपटे,
बी. ए., एल्एल्. बी.,
अध्यक्ष ज्योतिषसंमेलन, पुणें.]

प्रथमावृत्ति]   किंमत ३॥ रुपये   [जून १९४४

मॉडर्न बुक डेपो, प्रकाशन.

मुद्रकः—
दामोदर त्र्यंबक जोशी,
बी. ए. (टिळक)
चित्रशाळा प्रेस, १०२६
सदाशिव पेठ, पुणें २.

प्रकाशकः—
ना. त्र्यं. भिडे, बी. ए.,
मॉडर्न बुक डेपो, पुणें २.

परिचय.

परिचायक–ज्योतिषाचार्य दा. ना. आपटे, बी. ए., एलएल्. बी.,
हायकोर्ट वकील, बडोदें.

रा. तांबे यांनीं हें पुस्तक प्रसिद्ध करून मराठी शास्त्रीय वाङ्मयांत एका नवीन प्रकाराची भर टाकली आहे. त्यांनीं आपल्या पुस्तकाचें नांव 'कर-दर्शन' असें ठेविलें आहे व तें इंग्रजींतील Palmistry (Palm=करतल) या अर्थाचें दर्शक आहे. प्राचीन काळापासून आपल्याकडे 'सामुद्रिकशास्त्र' प्रसिद्ध आहे. पण त्या शास्त्राचें क्षेत्र केवळ करतलापुरतें मर्यादित नसून तें सर्व मानवशरीरव्यापी आहे. परंतु या पुस्तकाचा विषय तितका व्यापक नसल्यानें, रा. तांबे यांनीं आपल्या पुस्तकाचें नांव अतिव्याप्त न ठेवतां अन्वर्थक ठेविलें आहे तें योग्यच आहे.

नुसत्या करतलाचा विचार केला, तरी आपल्या प्राचीन पौरस्त्य व अर्वाचीन पाश्चात्य शास्त्रांतील या विषयाचीं गमकें भिन्नभिन्न आहेत, हें या दोन्ही पद्धतींची वरवर माहिती असणारांच्याहि ध्यानांत येईल. उदाहरणार्थ, या दोन्ही पद्धतींतील आयुष्यरेषा, द्रव्यरेषा, बुद्धिरेषा इत्यादि रेषा भिन्न आहेत. आपल्या सामुद्रिकांतील चिन्हें नेहमीं शंख, चक्र, इत्यादि सादृश्यात्मक स्थूल वस्तूंच्या नांवानें वर्णिलेलीं असतात; पण पुष्कळ वेळां त्या वस्तूंचें आकारसादृश्य हें आकाशांतील ढगांच्या आकारां-प्रमाणें कल्पनागम्यच राहतें. उलटपक्षीं तारा, चौकडी, बेट इत्यादि पाश्चात्य संकेत–संज्ञा सहजप्रतीत असतात. या दृष्टीनें पाहतां पाश्चात्य पद्धति अधिक सुगम वाटते.

रा. तांबे यांनीं आपल्या पुस्तकांत पाश्चात्य पद्धतीचाच स्वीकार केला आहे व तिच्यांतील बहुतेक नियम आपल्या पुस्तकांत संग्रहित केले आहेत. मराठींत अशा प्रकारचें हें जवळजवळ पहिलेंच अथवा फार तर

दुसरें पुस्तक असल्यानें, या विषयाच्या विद्यार्थ्यांना तें उपयुक्त होईल, यांत शंका नाहीं.

इंग्रजींत या विषयावर अनेक पुस्तकें आहेत. त्यांत Cheiro याचा ग्रंथ हा सर्वश्रेष्ठ आहे. तितका मोठा प्रयत्न द्रव्याच्या अभावीं मराठींत जरी होऊं शकला नाहीं, तरी 'अल्पारंभः क्षेमकरः' या न्यायानें रा. तांबे यांचा उपक्रम स्तुत्य आहे.

या पुस्तकांत बहुतांशीं नियम दिलेले असून, प्राथमिक ज्ञान मिळविणारास आवश्यक ती सर्व माहिती यांत आहे. तसेंच दिलेल्या नियमांच्या आधारें सुप्रसिद्ध डॉ. रा. ह्. **भडकमकर** यांच्या करतलाचें छायाचित्रासह जें स्पष्टीकरण केलें आहे, त्यामुळें प्रस्तुत ग्रंथ अत्यंत उपयुक्त ठरेल ह्यांत शंका नाहीं.

माझें या शास्त्राचें ज्ञान फारसें खोल नाहीं; म्हणून या ग्रंथाचा परिचय करून देण्यास मजहून दुसरा एखादा तज्ज्ञ गृहस्थ अधिक अधिकारी झाला असता; पण रा. तांबे यांच्या इच्छेमुळेंच हें काम मीं केलें आहे.

विषयाचें क्षेत्र व सामर्थ्य कितीही असो, जें आहे त्याचा पूर्ण अभ्यास करून व्यासंगपूर्वक अशा प्रकारचें हें पुस्तक लिहून प्रसिद्ध केल्याबद्दल, रा. तांबे यांचें मनःपूर्वक अभिनंदन केल्यावांचून मात्र माझ्याच्यानें राहवत नाहीं. माझ्या या 'परिचया' नें या विषयाच्या जिज्ञासूंनीं या पुस्तकाचा पूर्ण परिचय करून घ्यावा, हीच माझी इच्छा आहे.

रावपुरा, बडोदें.
ता. ५ मे १९४४

दाजी नागेश आपटे.



ज्यांच्या करद्वयांवरील अद्वितीय रेषा व असाधारण चिन्हें
पाहून **करदर्शन** पुस्तक लिहून पुरें करण्याची व तें
जनताजनार्दनापुढें ठेवण्याची कार्यक्षमता माझ्या
अंगीं आली त्या परमपूज्य
तीर्थस्वरूप,

डॉ. रामकृष्ण हरी ऊर्फ दादासाहेब भडकमकर

यांना ही माझी पहिलीवहिली कृति मनोभावानें
मी सादर समर्पण करीत आहे.

लक्ष्मण केशव तांबे



हृद्गत

पुष्कळ वर्षे ह्या शास्त्राच्या अध्ययनांत घालविलीं. उपलब्ध असणारीं बहुतेक इंग्रजी व मराठी पुस्तकें वाचलीं. अनेक व्यक्तींचे हात प्रत्यक्ष पाहिले. वैशिष्ट्य आढळून आलेल्या कैक करद्वयांचे ठसे घेतले. अशा नानाविध रीतीनें मिळविलेल्या ज्ञानाचा परिपाक म्हणजे प्रस्तुत पुस्तक होय हें प्रारंभींच सांगणें उचित आहे.

वस्तुतः हस्तसामुद्रिक हें भारतीय शास्त्र. सुमारें दोन हजार वर्षांपूर्वी ह्या शास्त्राची उत्पत्ति आपल्या भरतखंडांत झाली; आणि नंतरच्या कालांत ह्या शास्त्राचा प्रसार सर्व देशांत झाला. तथापि आजची स्थिति अगदीं उलट आहे. आपलें हें अमोलिक शास्त्र पाश्चिमात्य लोकांनीं हातीं धरलें. गेल्या पन्नास वर्षांत लहानमोठीं पुस्तकें त्यांनीं वेळोवेळीं प्रसिद्ध करून, इतकी उपयुक्त माहिती स्वच्छ रीतीनें व आकर्षक स्वरूपांत अखिल जनतेपुढें मांडली आहे कीं, क्षणभर हें शास्त्र पौर्वात्य कीं पाश्चिमात्य अशी शंका साहाजिकच उद्भवते. ह्या विधानाची सत्यता ज्याला त्याला पडताळून पहावयाची असेल, त्यानें बाजारांत ह्या विषयावर उपलब्ध असणारें कोणतेंही लहान वा मोठें परकीय भाषेंतील पुस्तक चाळून स्वतःची खात्री करून घ्यावी.

मराठी भाषेंत ह्या विषयावर लिहिलेलें एकही पुस्तक उपलब्ध नाहीं असें मात्र नव्हे. पण जीं तीनचार पुस्तकें आहेत त्यांत निव्वळ हस्तसामुद्रिक विषयापेक्षां आणखी कितीतरी सामुद्रिक लक्षणांचा ऊहापोह केला असल्याचें आढळून येईल. शिवाय ह्या विषयाची मांडणीही आकर्षक व आधुनिक पद्धतीनें व्हावयास हवी. त्यामुळें सदरहू पुस्तकें माहितीच्या दृष्टीनें जरी समृद्ध असलीं तरी सामान्य व्यक्तीस उपयोगी पडेल, त्याच्या बुद्धीच्या आटोक्यांत बसेल व एकंदरीनें त्याला परवडेल असें सुटसुटीत पुस्तक ह्यांपैकीं एकही नाहीं असेंच कोणीही म्हणेल. हस्तसामुद्रिक विषयासंबंधीं थोडक्यांत अभिनव पद्धतीनें, पुरेशा आकृत्या स्वस्थळीं देऊन अद्यावत् माहिती देणारें पुस्तक मराठी भाषेंत अद्याप एकही नाहीं, अशीच वस्तुस्थिति आहे.

रेल्वेनें प्रवास करतेवेळीं आपण स्टेशनवर व्हीलर स्टॉलला भेट देतों. अथवा मुंबई, मद्रास, कलकत्ता आदिकरून प्रमुख शहरीं गेलों असतां, आपण त्या त्या ठिकाणच्या प्रमुख ग्रंथविक्रेत्यांच्या दुकानांत खरेदीसाठीं पाऊल टाकतों. त्या ठिकाणीं कीरोची (Cheiro) अथवा अन्य परकीय लेखकांचीं ह्या विषयावरील पुस्तकें आपलें लक्ष्य तत्काळ वेधून घेतात. चित्ताकर्षक कव्हर, पानापानावर विखुरलेल्या आंतील सूचक आकृत्या, पुस्तकाची सुंदर बांधणी, मनोहर छपाई व पुस्तकाचा एकंदर ' गेटप् ' पाहून आपली जिज्ञासा अनावर होते. विशेषतः आंतील विषयप्रतिपादन सुगम व स्पष्ट व्हावें म्हणून वापरण्यांत आलेली सोपी व अत्यंत मनमोकळी भाषा वाचून आपणांस अचंबा वाटतो. पण हें सर्व समाधान ज्याला इंग्लिश भाषा येते त्याला! मराठी भाषा एकाकी येत असेल त्याची काय सोय ?

मराठी भाषेंत ह्या विषयावर अशा विशिष्ट पद्धतीनें पुस्तक लिहून आजपर्यंत भासणारी उणीव नाहींशी करावी ह्याच हेतूनें प्रस्तुत पुस्तक लिहिलें आहे. अर्थात् हा हेतु कितपत सफल झाला हें ज्याचा तो व्यक्तिशः ठरवीलच.

मात्र प्रस्तुत पुस्तक वर उद्धृत केल्याप्रमाणें हुबेहूब कोणत्याही पाश्चिमात्य पुस्तकाच्या धर्तीवर अंतर्बाह्य चित्ताकर्षक काढण्याचा जो आमचा संकल्प होता, त्यांत चालू युद्धजन्य बिकट परिस्थितीपायीं बऱ्याच गोष्टींना नाइलाजास्तव फाटा देणें अगदीं अपरिहार्य ठरलें. आर्ट पेपर, प्रोसेस ब्लॉक, छपाई, बांधणी इत्यादि एकूणएक गोष्टी दिवसेंदिवस इतक्या भरमसाट महाग होत गेल्या आहेत कीं, आतां ह्यापुढें त्या वस्तु पूर्ववत् स्वस्त होतील म्हणून वाट पहात बसणें अखेर निरर्थक वाटलें.

नव्हें ! ह्या पुस्तकाचें प्रकाशन श्री. ना. त्र्यं. भिडे यांनीं स्वखुषीनें स्वतःचे जबाबदारीवर पार पाडलें म्हणूनच त्याला इतक्या त्वरेनें व आहे ह्या स्वरूपांत प्रसिद्धि मिळाली. मोठ्या धडाडीनें मिळेल ती सामग्री मिनतवारीनें मिळवून, त्यांनीं पुस्तकाची ही पहिली आवृत्ति ह्या दारुण महर्घतेच्या कालांतही छापून काढली; एरवीं लेखकाच्या आशा-

आकांक्षा त्यानें लिहिलेल्या ह्या सर्व पृष्ठांसह कालाच्या ओघांत यथावकाश विलीन झाल्या असत्या ह्यांत शंका नाहीं.

माझ्या ह्या पहिल्या छोट्याशा ग्रंथाचा परिचय जनतेस करून देण्याची महत्त्वपूर्ण कामगिरी ज्योतिषाचार्य दा. ना. आपटे यांनीं अत्यंत आपुलकीनें व यथार्थपणें पार पाडली, याबद्दल मी स्वतःस धन्य समजतों. दाजीसाहेबांनीं सुचविल्याप्रमाणें आहे ह्यापेक्षां अधिक विस्तृत व व्यापक ग्रंथ, खऱ्या व्यक्तींच्या करतलांच्या छायाचित्रांसह आणि त्या छायाचित्रांच्या प्रत्यक्ष वर्णनासह तयार करण्याचें प्रस्तुत लेखकानें मनाशीं पक्कें योजलें आहे. अर्थात् ह्या पहिल्या कृतीस जनतेकडून जी सक्रिय सहानुभूति व मनःपूर्वक उत्तेजन मिळेल, त्यावर पुढील पुस्तकाचें प्रकाशन अवलंबून राहील ही गोष्ट उघड आहे. परिचायक ज्योतिषाचार्य दाजीसाहेब यांचे, त्यांनीं या पुस्तकासाठीं लिहून दिलेल्या समर्पक ' परिचया '-बद्दल मी अन्तःकरणपूर्वक आभार मानतों.

तसेंच या पुस्तकांत ठिकठिकाणीं ज्या आकृत्या घातल्या आहेत त्यांचीं स्केचेस् तयार करून देण्याचे कामीं माझे मावसबंधु श्री. रा. के. कानेटकर ह्यांनीं मला बहुमोल साहाय्य केलें. कव्हरवर घालण्यासाठीं चित्ताकर्षक पण बोधपूर्ण चित्र माझे स्नेही श्री. वि. म. गोखले यांनीं फार थोड्या अवकाशांत काढून दिलें. श्री. बापूसाहेब भडकमकर यांनीं वेळोवेळीं उत्तेजन दिले. हस्तलिखित कॉपी श्री. म. ना. अदवंत, एम्. ए. ह्यांनीं प्रथम तपासली आणि प्रुफें तपासण्याचें अत्यंत क्लिष्ट काम श्री. त्र्यं. रा. दामले यांनीं स्वखुषीनें पत्करलें. श्री. नाना विद्वांस यांनींही डॉ. दादासाहेबांच्या फोटोचा ब्लॉक व त्यांच्या हाताचा प्रिंट मिळवून देण्याचे कामीं मदत केली. ह्या सर्वांचे, तसेंच ज्यांच्या अलोट साहसामुळें माझी ही ग्रंथरचना वाचकांसमोर येते आहे त्यांचे म्हणजे प्रकाशक श्री. ना. त्र्यं. भिडे ह्यांचे मनःपूर्वक आभार मानून माझें हें हृद्गत मी पुरें करतों.

४०४ शनवार पेठ, पुणें.
ता. ५ मे १९४४

लक्ष्मण केशव तांबे.

अनुक्रमणिका

करदर्शन
अर्थात्
सुलभ सामुद्रिक

विषय–प्रवेश

कराग्रे वसते लक्ष्मीः करमध्ये सरस्वती ।
करमूले तु गोविन्दः प्रभाते करदर्शनम् ॥

वरील काव्यपंक्ति फार पुरातन असून सुविख्यात आहेत. सूर्यास्तानंतर सांजवात होतांच ' शुभं करोति कल्याणम् ' म्हणावयाचें आपणांस वडिलधाऱ्या मंडळींनीं सुरवातीपासून पढाविलें. ह्या पंक्ति मात्र त्यांच्या उदाहरणान्वयें आपण ध्यानांत ठेवल्या. ध्यानांत ठेवल्या असें लिहिण्याचा आशय हा कीं, आज निजून उठतांक्षणीं आपण आपापले करद्वय दृष्टीपुढें धरून सकाळीं वरील श्लोक नित्यनियमानें म्हणत नाहीं. पुढच्या पिढीचे कोंब म्हणून आज जो बालसमूह घरोघरीं वाढत आहे, त्यांपैकीं कांहींजणांना दिवेलागणी झाल्यावर अद्यापही ' शुभं करोति ' चा पूर्वापार पाठ मिळत असेल. तथापि प्रातःकाळीं स्वतःचें करद्वय (तळहात) पहाण्याचा आचार आपण तर पाळीत नाहींच, पण घरांतील बाळगोपाळांना देखील तळहातावरील लक्ष्मी–सरस्वतींचें अधिष्ठान आपण माहीत करून देत नाहीं. अशा रितीनें पुढच्या पिढीपर्यंत ह्या प्राचीन आचारास आपण पूर्णांशानें मूठमाती दिली, तरी तळहातांवर पूर्वाचार्यांनीं अनुभवानें कायम केलेली लक्ष्मी, सरस्वती अथवा गोविंद ह्यांचीं स्थानें केव्हांही अढळच राहतील.

वरील काव्यपंक्ति जुन्या काळच्या खऱ्या. तथापि लक्ष्मी–सरस्वतींचीं तळहातांवर कायम करण्यांत आलेलीं स्थानें व तद्विषयक उपपत्ति त्यापेक्षांही जुनी नव्हें काय ? आपले पूर्वज सकाळीं उठतांक्षणीं करद्वय

अवलोकून मोठ्या भक्तिभावानें लक्ष्मी–सरस्वतींस नमस्कार करीत. एवढ्या गोष्टीवरून त्या काळीं प्रत्येकास हस्तसामुद्रिक विषय पूर्णपणें अवगत होता, ह्या विषयावर त्यांचा सर्वस्वीं दृढविश्वास होता असा निष्कर्ष निघत नसला, तरी ह्या शास्त्राबद्दल त्यांना खास श्रद्धा वाटत असावी. वरील श्लोक नित्य आचरणांत मोठ्या खुबीनें गोंवून प्रातःकाळीं न चुकतां नित्यनियमानें श्लोकाचा भावार्थ विचारांत घेण्याचा परिपाठ एरवीं त्यांनीं व्यर्थ पत्करला नसता !

आणि वस्तुस्थिति अशीच आहे. लक्ष्मीदायक चिन्हें तळहातांवर अग्रभागीं आहेत. धनरेषा तळहातावर ऊर्ध्वगति घेऊन मधल्या बोटाचे मुळाशीं वरच्या भागांत विराम पावते. बोटांची लांबीजाडी व आंखूड-पणा यांवरून व्यक्तीच्या आयुष्यांतील धनाचें प्रमाण अजमावतां येतें. सरस्वतीची गोष्ट अशीच आहे. मस्तकरेषा तळहातावर मधोमध आडवी पसरली आहे. बुद्धिदर्शक ग्रहांचे उंचवटे चार बोटांच्या पायथ्याशीं अत-एव हातावर मध्यभागीं आहेत. गोविन्दः ह्या शब्दप्रयोगानें मनुष्याच्या ठायीं जात्याच असणारी धार्मिक भावना, त्याची परमेश्वरासंबंधीं निष्ठा, आचरणांत त्याची दिसून येणारी वृत्ति इत्यादि गोष्टी सूचित होतात. ह्यासंबंधींचें ज्ञान शुक्र-चंद्र ग्रहांचे तळहातांवरील उंचवटे आणि मणिबंध-रेषा ह्यांवरून होतें. हा विभाग (आकृति १) हाताचे अधोभागीं आहे. अर्थात् 'कराग्रे वसते लक्ष्मीः' इत्यादि कल्पना शास्त्र माहीत नस-णारानें स्वतःच्या डोक्यांतून काढलेली नसून तिला शास्त्रशुद्ध पाया आहे असेंच नाहीं का ह्यावरून सिद्ध होत ?

सारांश, लक्ष्मी, सरस्वती व गोविंद ह्या प्रवृत्ति असून अनादि कालापासून दरएक व्यक्तीच्या तळहातावर विशिष्ट ठिकाणीं त्या वास करीत आहेत. आपले भाविक पूर्वज त्यांना मानीत व कोणतेंही कार्य हातीं घेण्यापूर्वीं रोज प्रातःकाळीं त्यांना प्रथम अभिवादन करीत. प्रवृत्ति–निवृत्तींच्या झगड्यां-तून शीरसलामत पार पडावयाचें आहे ह्या गोष्टीची जाणीव सतत असावी, लक्ष्मी किंवा सरस्वतीच्या पायीं गोविंदाची विस्मृति न व्हावी, किंबहुना उगवणारा प्रत्येक दिवस आधींच्या दिवसाप्रमाणें हुशार


पहिले
अथवा
टोकाकडचें
पेरें
दुसरे
किंवा
मधलें पेरें
तिसरे
अथवा
खालचें
पेरें
पहिली
गांठ
दुसरी
गांठ
बौद्धीक
जीवन
व्यावहारीक
जीवन
सामान्य
जीवन
मध्यम वर्ग
मागासलेला
वर्ग
पहिला
विभाग
इच्छाशक्ती
मधला
विभाग
तर्कशक्ती
तिसरा विभाग
गुरू
शनी
रवि
बुध
अंतःकरण रेषा
मस्तक रेषा
आयुष्य रेषा
पहिला
मंगळ
शक्ती.
मंगळ–प्रदेश
समतोलपणा.
दुसरा
मंगळ
युक्ती.
शुक्र
प्रीति. मनोविकार.
वात्सल्य, सौजन्य,
आकर्षक.
चंद्र
पहिला विभाग : बुद्धिमत्ता : सत्वगुणी
मधला विभाग : व्यवहार : रजोगुणी
तिसरा विभाग : सामान्य : तमोगुणी

आकृति १.

राहून निर्विघ्नपणें जावा ह्याबद्दलची खूणगांठ म्हणून ते तसें करीत. आपल्याला हें माहीत नाहीं; अथवा माहीत असून रोजच्या आचरणांत आपण ह्या कृतीची अंमलबजावणी करीत नाहीं. आपण विसाव्या शतकांतले पुढारलेले लोक. त्यामुळें कोणत्याही सनातन आचरणाबद्दल तसाच कांहीं तात्काळ फायदा होत असल्याची खात्री पटल्याशिवाय त्याला आपण कुठला थारा देणार ? आपल्यांपैकीं बहुतेक म्हणतील, " सकाळीं उठतांक्षणीं आपलाच हात आपण काय म्हणून पहायचा ? त्यापेक्षां आपला ' हात दुसऱ्यास दाखवणें ' किंवा दुसऱ्या ' कोणाचा ' हात सुप्रभातकालीं आपल्या हातांत घेऊन अंथरुणावर लोळत पडणें अधिक उपयुक्त नव्हें काय ? वाडवडिलांनीं हें व्रत अंगीकारलें होतें म्हणतां तर त्यांना ह्या व्रतापासून फायदा झाल्याचा दाखला कुठें उपलब्ध नाहीं ? बरें; आम्ही हा आचार सोडला म्हणून आमचें कधीं नुकसान झालें आहे असेंही घडलें नाहीं. असें असतां स्वतःचा हात रोज सकाळीं निजून उठतांक्षणीं बघण्याची ही उठाठेव करा कशाला ? ".


जीव, प्राण अथवा चित् म्हणून जी शक्ति देहाचे ठायीं आहे असें आपण मानतों ती हृदयांत, मेंदूजवळ अथवा कोणत्याही एका विशिष्ट स्थानीं सर्वांशानें नसते. तर ती शक्ति विद्युत्शक्तीप्रमाणें देहाचे ठायीं नसानसांतून व अणुपरिमाणूंतून खेळवली गेली आहे. शरिरांत सर्वत्र स्नायूंचीं जीं सूक्ष्म वेष्टनेंच वेष्टनें दिसतात त्यांतून ह्या शक्तींचा प्रवाह वहात असावा; कारण त्याशिवाय शरिराचा एकूणएक विभाग इतक्या समप्रमाणांत संवेदनाक्षम रहाता ना. देहाचे सर्व व्यापार सुरळीत चालूं शकतात, ह्याचें कारण प्रत्येक गोष्टीचें ज्ञान प्रथम मेंदूस होतें. तहान लागो, भुकेची वेळ होवो, अंगास कुठें खरचटलें गेलें असो अगर पायाला मुंगीसारखा क्षुद्र कीटक कुठें डसलेला असो; ह्या सर्वांची दखल मेंदूस नाहीं, असें घडणें कदापि अशक्य. मेंदूस क्षणाक्षणाचें ज्ञान ह्या संवेदनात्मक स्नायुद्वारां घडतें; आणि स्नायूंत वरील विशिष्ट प्रकारची विद्युत्प्रवाहशक्ति वसत असल्यानें सर्व देहाचा एकंदर व्यापार सुरळीत चालतो. तथापि ह्या सर्व व्यापारांत दोन्हीं हातांचें महत्त्व अग्रेसर आहे. मेंदूस अगणित तक्रारी व तगादे स्वस्थानीं अनायासें लाभले, तरी त्या सर्वांचें निराकरण

करावयास करद्वयांनाच तयार व्हावें लागतें. एखाद्या शहान्शहानें साम्राज्यांतील सर्व ठिकाणच्या तक्रारी स्वस्थानीं बसून लक्ष्यपूर्वक ऐकायच्या व त्यांवर योग्य तें फर्मान गादी न सोडतां सोडायचें, अशीच वस्तुस्थिति मेंदूची आहे. तैलबुद्धीच्या मनुष्याच्या मनांत निमिषार्धांत अनंत कल्पना प्रत्यहीं उद्भवूं शकतात. तथापि कोणतीही कल्पना प्रत्यक्ष कृतींत आणावयाची झाली तर करद्वयांनाच सिद्ध व्हावें लागतें. हाताला कर हें नांव प्राप्त झालें तें देखील 'कार्यं करोति इति करः' ह्या उपपत्तीमुळेंच होय. ही गोष्ट लक्ष्यांत घेतली असतां हस्तद्वयांचा संबंध मेंदूशीं किती निगडित स्वरूपाचा आहे, हें वेगळें सांगण्याची आवश्यकता नाहीं.

करद्वयांचा आंतील छेद घेतल्यानंतर असेंही आढळून आलें कीं, मेंदूजवळ हिरव्या रंगाचा लिबलिबीत पदार्थ (Green substance) असतो, त्याबरहुकूम हातांच्या बोटांच्या अग्रांजवळही ह्या पदार्थाचें अस्तित्व दिसून येतें. म्हणूनच बोटांच्या टोकांजवळ तीव्र स्पर्शज्ञानशक्ति वसत असावी. अंधारांतही वस्तूचा स्पर्श बोटांना घडतांक्षणीं अनुमान-पद्धतीनें ठोकळ वस्तुज्ञान होऊं शकतें. दृष्टि नसलेल्या माणसाचें स्पर्श-ज्ञान डोळस माणसापेक्षांही प्रभावी असल्याचें दिसून येतें. उघड्या डोळ्यांनीं जें आपण ओळखूं शकत नाहीं, तें आंधळा मनुष्य वस्तु चांचपून सरावानें सहज बरोबर सांगूं शकतो. कारण बोटांच्या ठायीं असणाऱ्या ज्ञानशक्तीचा उपयोग डोळ्यांच्या अभावीं त्यांना अधिक करावा लागतो. मेंदू व तळहात ह्यांमधील विद्युत्प्रवाह त्यांचे बाबतींत इतरांपेक्षां अधिक वापरले जातात. त्यामुळें डोळे काम करणार नाहींत एवढी प्रभावी शक्ति त्यांच्या बोटांच्या ठिकाणीं असूं शकते.

ही चेतनाशक्ति, प्राणस्फुल्लिंग अथवा विद्युत्प्रवाह मनुष्याच्या देहांत प्रारंभीं बोटांच्या अग्रांतून प्रवेश करतो ही महत्त्वाची गोष्ट आहे. टोंक-दार, निमुळता व प्रवाह वाहून नेण्यास योग्य अशा मार्गाचा अवलंब विद्युल्लता विशेषेंकरून करते हा नियम ज्यांना माहीत आहे, त्यांना ही शक्ति बोटांतूनच कां प्रवेश करते ह्या गोष्टीचें गूढ वाटणार नाहीं. मूल जन्मास येतें म्हणजे काय होतें ? तर हाडामांसांनीं आधींच

सांधलेल्या त्याच्या त्रिगुणात्मक जड शरिरांत दिव्य, चैतन्यमय, चलनवलन उत्पन्न करणारी अशी शक्ति प्रवेश करते. बोटांतून प्रवेश करणाऱ्या ह्या विद्युतप्रवाहाचा संचार त्यानंतर तळहातांमध्यें होतो; आणि त्यानंतर मेंदूकडे हा प्रवाह वेगानें खेचला जाऊन तेथून पुनश्च सर्व शरीरावयवांत ही प्राणशक्ति खेळविली जाते. अंगठ्याला हस्तसामुद्रिकशास्त्रांत स्वतंत्र वैशिष्ट्य असल्यानें त्याला वगळल्यास तर्जनी हें प्रारंभीचें बोट आहे. त्याला गुरु ही अतिमोठी सार्थ संज्ञा देण्यांत आली; कारण ह्या बोटांतून



आकृति २

विद्युत्प्रवाह प्रथम प्रवेश करतो. अन्तःकरणरेषा, मस्तकरेषा व आयुष्यरेषा ह्या तिन्ही प्रमुख रेषा तर्जनीखालीं व गुरूच्या उंचवट्याचे आसपास म्हणूनच उगम पावतात (आकृति २). तर्जनीच्या मुळांतून अन्तःकरणरेषेंत ह्या प्रवाहाचा ओघ सुरूं होतांच अन्तःकरणाची धडपड प्रथम सुरूं होते. नंतर आयुष्यरेषा हा प्रवाह आकर्षून घेते. ह्याच रेषेच्या नजीक मस्तकरेषेचा उगम होत असल्यानें प्रथम अन्तःकरण-जागृति, नंतर जीवितास प्रारंभ व शेवटीं जगण्यासाठीं अत्यावश्यक असणारी बुद्धीची प्रक्रिया ह्या गोष्टी निमिषार्धांत सुरूं होतात. जन्म झाला असें आपण म्हणतों त्या जन्म होण्याचें हस्तरेशांशीं व तळहातांवरील चिन्हांशीं असें अविभाज्य नातें आहे.

अन्तःकरणरेषा, मस्तकरेषा व आयुष्यरेषा ह्या तीन प्रमुख रेषा आधिदैविक शक्तीच्या निदर्शक होत. ह्या शक्तीचें लोण मिळवून कोणतीही व्यक्ति आपल्या आयुष्यास सुरवात करते. जोंपर्यंत ह्या शक्तीची उणीव भासत नाहीं—म्हणजेच तिन्ही रेषा निर्दोष असतात,—तावत्कालपर्यंत व्यक्तीचा इहलोकींचा प्रपंच अप्रतिहतपणें चालूं शकतो. विद्युत्प्रवाह ह्या तिन्ही प्रवृत्तीपर प्रमुख रेषांतून वहात खालच्या दिशेनें मेंदूकडे गेला व नंतर सर्व शरीरावयवांतून फिरून पुनः तळहात व बोटें ह्यांकडे आला कीं, तळहातांवर ऊर्ध्वरेषा अवतीर्ण होतात (उगमापासून विरामस्थानाकडें जाणाऱ्या रेषांना ऊर्ध्वरेषा म्हणावें). विद्युत्प्रवाहाच्या नंतरच्या उलट गतीमुळें ह्या ऊर्ध्वरेषा निर्माण होत असल्यानें त्यांचा उगमबिंदु खालीं मनगटांशीं व विराम पावण्याचीं स्थळें वर बोटांच्या मूलप्रदेशांत कुठेंतरी असूं शकतात. मध्यमा, अनामिका, करांगुलि इत्यादि बोटांचे मुळाशीं खालून वर येऊन थांबणाऱ्या रेषा (आकृति २) कर्तृत्वाच्या, सांपत्तिक, बौद्धिक व लौकिक यशाच्या मानण्यांत येतात त्यांतील मथितार्थ हाच; आणि विद्युत्प्रवाह उलटविणें, परताविणें व निर्दोष, सरळ व अखंडितपणें पुनः तो बोटांच्या अग्रांकडे खेंचला जाणें, ही गोष्ट प्राक्तन नीट असेल तरच व्हावयाची, असें आपण नेहमीं म्हणतों त्यांतील इंगितही पण हेंच. ह्या ऊर्ध्वरेषा सुस्पष्ट व निर्दोष असतील तरच मनुष्याचें कर्तृत्व

फळास येतें, त्याच्या जीविताचें थोडेंफार साफल्य होतें व आयुष्यांत त्याला विशेषेंकरून कशाची ददात पडत नाहीं, असें आजपर्यंतच्या अनुभवानें ठरलें आहे.

प्रवाहाच्या ह्या उलट–सुलट गतीमुळें एक गोष्ट अशी घडते, कीं चारी बोटांच्या पायथ्यांशीं व मनगटांचे दोहों बाजूंस तळहातांवर जे उंचसखल विभाग आहेत त्यांचें महत्त्व दुप्पटीनें वाढतें. ह्या उंचसखल विभागांना उंचवटे अशी संज्ञा आहे. तळहातांवर आंतील मांसल भागांत स्नायूंचीं लंबवर्तुळ वलयें पुंजक्यापुंजक्यांनीं शेजारीं शेजारीं आहेत. ह्या वलयाकार पुंजक्यांचा आकार जेवढा कमी वा अधिक असेल त्या मानानें विद्युत्प्रवाह त्या वलयांतून सतत चक्राकार फिरत राहील ही गोष्ट उघड आहे. विद्युत्प्रवाह ज्या ठिकाणीं अधिक कार्यक्षम होईल असा तळहातांवरील विभाग शोधून काढण्यास उंचवट्याचा उपयोग अचूक होतो तो ह्यामुळेंच. तळहातावर हे उंचवटे आठ आहेत ही गोष्ट लक्ष्यांत घेऊन, मनुष्यस्वभावाचें पृथक्करण वेगवेगळ्या आठ प्रकारांत केलें आहे. प्रत्येक प्रकारांतील व्यक्तीचा गट एका विशिष्ट उंचवट्याचा निदर्शक समजण्यांत येतो. येणेंप्रमाणें उंचवटे हे तळहातांवर विद्युत्प्रवाह कोठें व किती प्रमाणांत आहे हें अजमावण्याचें साधन आहे.

उपरिनिर्दिष्ट ह्या आठ उंचवट्यांना त्यांच्या विशिष्ट गुणधर्मांनुसार गुरु, शनि, रवि इत्यादि नांवें देण्यांत आलीं. आकाशस्थ ग्रहांचीं नावें देण्यांतील आशय एवढाच कीं, फलज्योतिषशास्त्रांत सप्तग्रहांचीं जीं सामान्य वर्णनें आहेत, तींच थोड्याफार फरकानें तळहातांवर असणाऱ्या दरएक उंचवट्यास लागू होतात असें प्रदीर्घ अनुभवावरून दिसून आलें. उदाहरणार्थ मंगळ हा ग्रह शौर्य, पराक्रम, अग्नि व शस्त्रें ह्यांच्याशीं संबंध असणारा, शरिरांतील रक्तावर अम्मल गाजवणारा आहे. हें वर्णन तळहातांवर जो विभाग पुष्ट असतां तंतोतंत लागू होतें असें निश्चित ठरलें, त्याच उंचवट्याला मंगळाचा उंचवटा असें नामाभिधान प्राप्त झालें. ह्याप्रमाणें चार बोटांखालीं चार, मनगटांचे दोहों बाजूंस दोन व हाताच्या मधल्या चिंचोळ्या पट्टींत सरसकट एक ह्या योजनेनें सात ग्रहांच्या वेगवेगळ्या

गुणधर्मास अनुसरून सात उंचवटे तळहातांवर निश्चित करण्यांत आले (आकृति १). असें न होतें तर गुरु, शनि, रवि, बुध, मंगळ, चंद्र व शेवटीं शुक्र असा ग्रहउंचवट्यांचा विचित्र अनुक्रम जो तळहातांवर मानण्यांत येतो, त्याऐवजीं रवि, चंद्र, मंगळ, बुध, गुरु, शुक्र व शनि असा सोईचा व राजमान्य अनुक्रम कां अवलंबिला जाऊं नये हा प्रश्न शिल्लक उरतोच नव्हें काय ?

सारांश, तळहातांवरील प्रमुख रेषा, सप्तग्रहांचे उंचवटे व इतर सामुद्रिक चिन्हें ह्यांचा इतिहास अशा महत्त्वपूर्ण व पायाशुद्ध तत्त्वांवर आधारलेला आहे. सुप्रभातकालीं करदर्शन नित्यनियमानें घ्यावयाचें ह्या साध्या क्रियेंत अत्यंत गूढार्थ भरलेला आहे हें आतां ध्यानीं आलेंच असेल. सतत निरीक्षण व पूर्ण अनुभव ह्यांच्या कसोटीवर ज्या शास्त्राची उभारणी करण्यांत आली, तें हें हस्तसामुद्रिकशास्त्र आपण यथानुक्रमें समजावून घेऊं.

इषारा

१. हस्तरेषा पाहून व्यक्तीची आयुर्मर्यादा सांगणें अनर्थकारक आहे.

२. डावा-उजवा हात पाहून त्यांतील फेरफार विचारांत घेतल्याशिवाय फलें वर्तविणें अशास्त्रीय आहे.

३. उजवा हात स्वयंकर्तृत्व दर्शवितो.

४. डावा हात परावलंबी व दैवाधीन जिणें व्यक्त करतो.

५. स्त्रियांचा डावा व पुरुषांचा उजवा हात प्रामुख्यानें पहावयाचा तो एवढ्यासाठींच.

६. यद्यपि स्त्री कर्तृत्ववान, स्वावलंबी वा नित्याच्या व्यवहारांत पुरुषाशीं स्पर्धा करणारी असेल,तर तिच्या उजव्या हातास प्राधान्य देणें आवश्यक आहे.

७. आणि पुरुष जर कर्तृत्वशून्य, पराधीन अथवा प्रवाहपतित असेल, तर त्याच्या डाव्या हातास प्राधान्य देणें आवश्यक आहे.

८. तसेंच कांहीं माणसें जात्याच डावखोरीं असतात. अधिक कार्यक्षम म्हणून उजव्याऐवजीं त्यांच्या डाव्या हातांचा विचार अशा वेळीं सूक्ष्मपणें करावा लागतो.

९. फलें वर्तविण्यापूर्वी व्यक्तीचें वय जरूर विचारून घ्यावें. चालू वयोवर्ष हस्तरेषांवरून कळणें सोपें नाहीं, व तें समजल्याखेरीज आपला अंदाज प्रकट करणें हास्यास्पद ठरूं शकेल.

१०. फार तर पांच–सात वर्षांतील परिस्थितीचें अनुमान हातांवरून सूक्ष्मतः सांगतां येतें. पैकीं कांहीं चिन्हें मागील तीन साडेतीन वर्षांचें दिग्दर्शन करतात; तर कांहीं चिन्हांवरून पुढच्या तीन साडेतीन वर्षांतील घडामोडींबद्दल स्थूल अभिप्राय व्यक्त होतो.

११. तळहातांवरील दुय्यम प्रतीच्या रेषा व इतर बारीक बारीक अगणित रेषा (Chance Lines) परस्परांशीं संयोग करून नित्य नवीं चिन्हें निर्माण करीत असतात. ह्या नवीन चिन्हांवरून भावी घटनांबद्दल अंदाज बांधतां येतो.

१२. कोणतेंही कार्य आटोपलें कीं, तद्दर्शक चिन्ह अस्पष्ट होतां होतां कालांतरानें तें संपूर्ण नाहींसें होतें. ह्या मावळत्या खुणा गतकालची माहिती पुरवतात.

१३. तळहातांवरील प्रमुख रेषा (आकृति २), अंगठ्यांवरील व बोटांवरील सूक्ष्म वलयें आणि ग्रहांचे उंचवटे (आकृति १) ह्या व्यक्तीच्या आयुष्यांत आमरण न बदलणाऱ्या गोष्टी आहेत.

१४. तळहातांचा रंग आणि हातांवरील आडव्यातिडव्या, वेड्यावांकड्या, लहान-मोठ्या, दुय्यम किंवा तिसऱ्या प्रकारच्या रेषा, ह्या सर्वांनीं साधणारीं त्रिकोण, चौकोन, षट्कोन, फुल्या इत्यादि वेगवेगळीं चिन्हें वारंवार बदलणारीं आहेत.

१५. न बदलणाऱ्या चिन्हांवरून व्यक्तीच्या आयुष्याचा सर्वसाधारण स्थूल आढावा घेतां येतो.

१६. तथापि वारंवार बदलणाऱ्या चिन्हांचा आशय जमेस धरल्याशिवाय कोणत्याही अतिसूक्ष्म फलांबद्दल निश्चित मत देतां येत नाहीं.

१७. म्हणूनच चार–पांच वर्षांनंतरच्या फलितांबद्दल व्यक्त केलेला अंदाज हटकून चुकीचा ठरतो.

१८. आग्रह केला तरी व्यक्तीच्या खाजगी जीवनांतील नाजूक बाबींचा उल्लेख चार–चौघांत बोलून दाखविणें अनिष्ट होय.

१९. त्याचप्रमाणें सदाभिरुचीस न रुचणारी गोष्ट केवळ तळहातांवरील चिन्हांवरून निश्चित समजली म्हणून पटकन सांगण्याचा मोह सार्वजनिक अथवा खाजगी बैठकींत टाळणेंच जास्त हितावह आहे.

२०. विद्यार्जनाचा काल संपेपर्यंत अथवा स्थूल मानानें व्यक्ति स्वतःचा चारितार्थ स्वतःच्या मिळकतीनें करूं लागेपर्यंत तळहातांवरील रेषांना वा चिन्हांना स्थैर्य प्राप्त होत नाहीं.

२१. म्हणून अशा व्यक्तींना त्यांच्या आवडीनिवडी, उद्योग-धंद्याची दिशा अथवा स्वभावांतील ठळक गुणदोष सांगण्यापलीकडे अधिक जबाबदारी शक्यतों पत्करूं नयें.

प्रकरण १ लें : हातांची घडण वा ठेवण

ज्या करद्वयांच्या आधारावर हस्तसामुद्रिकशास्त्राचा इमला आपण उभारणार त्यांचा विचार प्रथमतः केला पाहिजे. हात घडवितांना विधात्यानें जी सामग्री वापरली ती कोणत्या दर्जाची आहे व त्यावरून कोणता बोध होतो तें आपण पाहूं.

ज्यांचें निरीक्षण करावयाचें तें करद्वय हातांत घेण्यापूर्वी क्षणभर दुरूनच पहावेत. विशेषतः हातांची मागली बाजू न्याहाळावी.

चटकन आपणांस त्वचेचा बोध होईल. आकर्षक, मऊ, तुकतुकीत, गौरवर्णाची, स्वच्छ व सुंदर त्वचा आपलें लक्ष्य तात्काळ वेधून घेईल.

उलट निःसत्त्व, खडबडीत, काळपट, सुरकुतलेली व अस्वच्छ त्वचा पहाणाराचे मनावर तावडतोब प्रातिकूल परिणाम करील.

आकर्षक त्वचा असणाऱ्या व्यक्तीचे ठायीं जात्याच पुरोगामी मनोरचना अधिष्ठित असते. अशी व्यक्ति सुसंस्कृत, मनमिळाऊ, प्रेमळ, उदार व उच्च अभिरुचीची असते. दुसऱ्यांना आपल्यापासून उपद्रव न व्हावा, आपलीं मतें इतरांवर न लादलीं जावीं एतदर्थ अशी व्यक्ति बहुधा जागृत राहते.

आणि निःसत्त्व, खडबडीत इत्यादि वर्णनास जुळणारी त्वचा ज्या व्यक्तीच्या हातावर आढळून येईल, ती व्याक्ति दुराग्रही, संस्कृतिहीन, आंतल्या गांठीची, निर्दय व तुसड्या स्वभावाची असते. स्वमतापुढें तिला कशाचीही पर्वा वाटत नाहीं. स्वार्थ हेंच तिचें ध्येय ठरतें. त्यामुळें इतरांना ह्या व्यक्तीपासून सतत उपद्रव होतो.

अर्थात् हीं दोन परस्परविरुद्ध टोंकें झालीं. ह्या दोन टोंकांमध्यें त्वचेचे अनंत प्रकार दृष्टीस पडतात. ज्या प्रमाणांत त्वचा आकर्षक अथवा निकृष्ट प्रतीची दिसेल त्या प्रकारचें स्वभावचित्र रेखाटावें.

ह्या बाबतींत एक खूणगांठ मनाशीं बांधावी. ती ही कीं, आपण ज्या हस्तद्वयांचा विचार करीत आहों तें हस्तद्वय म्हणजे त्यांच्या पाठीशीं असणाऱ्या अदृश्य मेंदूचीच साक्षात् ती प्रतिमा होय. त्यामुळें तळहातांचा आकार साधतांना जर विधात्यानें फारशी काटकसर केली नसेल, तर मेंदू-बद्दल–म्हणजेच आचारविचारांत–विशेष विकृति सहसा आढळून येणार नाहीं.

त्वचेनंतर हातांची घडण पहावी. वेगवेगळ्या ठिकाणीं कमीअधिक प्रमाणांत असणाऱ्या स्नायुग्रंथींनीं हातांची घडण बनते. ही घडण पहातांना व्यक्तीचा हात आपल्या हातीं घ्यावा.

निरीक्षणासाठीं आपल्या हातीं धरलेला हात जाडजूड, दगडासारखा कठीण व राकट असेल तर व्यक्ति रगेल, निर्बुद्ध व उन्मत्त असते. असा हात आपल्या हातांत दबला जाण्याऐवजीं आपल्या हातावरच जरा 'बेतानें' घेण्याचा प्रसंग ओढवतो.

तोंच रबराप्रमाणें स्थितिस्थापकत्व असणारा हात असेल तर व्यक्ति

बुद्धिमान्, उद्योगी व कर्तव्यदक्ष असते. बोलण्यापेक्षां कृतीवर अधिक भिस्त असण्याचें हें एक चिन्ह आहे.

क्वचित् एकाद–दुसरा हात असा पहावयास सांपडतो कीं, तो आपल्या हातीं धरून किंचित् दाबतांच, जणूं कांहीं दबला गेलेला मांसल भाग आपल्या बोटांच्या फटींतून बाहेर निघून जातो कीं काय, असा आपणांस भास होतो. हाताची घडण मांसल, भरघोस, फुगीर पण भुसभुशीत असल्यानें असें घडतें. अशी व्यक्ति बुद्धिमान् व सुसंस्कृत खरी; तथापि कमालीचा आळस व स्वास्थ्यप्रिय मनोवृत्ति ह्यांच्या आहारीं गेल्यानें अमुक एक कार्य त्या व्यक्तीचे हातून शेवटास जाईलच, असें इतर अनुकूल चिन्हें तळहातांवर असल्याखेरीज निश्चयानें सांगतां येणार नाहीं.


त्यानंतर व्यक्तीचा मिटलेला हात सहजासहजीं उघडण्याचा प्रयत्न करून पहावा. कांहीं ठिकाणीं हात व बोटें ह्यांची रचना अशी आढळून येते कीं, बोटें उघडणाऱ्या तिऱ्हाइतास थोडेफार आयास पडतात. आपणांकडे लग्नसमारभांत नूतन वधूवरांना मुठींत वा चिमटींत धरलेली सुपारी सोडविण्यास सांगतात त्यांतील भावार्थ हाच कीं, मिटल्या हाताची पकड जितकी कठीण तितकी ती व्यक्ति स्वमतास चिकटून रहाणारी, खोल, कांहींशी कठोर, दुराग्रही पण कणखर व चिवट वृत्तीची असते.

उलट सहजासहजीं पकड सुटेल तर ती व्यक्ति चंचल, मनमोकळी, एकही कार्य तडीस न नेणारी, दुर्बल व भेकड असते.

मात्र कोणताही नियम लावतांना दोन्हींकडील दोन टोंकांत मध्यंतरीं बऱ्याच प्रतवारी असतात हें कधींही विसरूं नयें. व्यक्ति तितक्या प्रकृति ह्या ढोबळ पण सर्वसामान्य तत्त्वास अनुसरून, दरएक हाताबद्दलचा अभिप्राय नीट विचारपूर्वक प्रकट करावा, म्हणजे सहसा चूक होणार नाहीं.

प्रकरण २ रें : : हातांचे प्रकार

मागील प्रकरणांत आपण हातांची घडण व ठेवण थोडक्यांत पाहिली. त्यानंतर बोटांची निरनिराळ्या तऱ्हेची अग्रें व त्यांना अनुसरून हातांच्या विशिष्ट ठेवणीमुळें पंजांचे दिसून येणारे वेगवेगळे आकार ह्यांचा विचार करणें अगत्याचें आहे. बोटांच्या वा पंजांच्या आकारानुरूप हातांचे भिन्न भिन्न प्रकार होऊं शकतात. मात्र ज्या आकाराचीं बोटें त्याच विशिष्ट आकाराचा पंजा असतो असें नव्हें. तथापि बोटें अथवा पंजा ह्यांचे प्रकार व त्यांचीं प्रत्येकीं भिन्न फलवर्णनें एकदां अवगत झालीं कीं, त्यांवरून वेळोवेळीं त्या माहितीचा उपयोग कसा करावयाचा हें ध्यानांत येणें सहज शक्य आहे. द्विरुक्ति न व्हावी म्हणून प्रत्येक फलवर्णन ज्या तऱ्हेचीं बोटें त्याच प्रकारचा पंजा आहे असें गृहीत धरून खालीं दिलें आहे. दरएक प्रकाराचें वैशिष्टय नीट ध्यानांत ठेवून, नंतर पंजा वा बोटें कितीही मिश्र स्वरूपाचीं अवलोकनांत आलीं तरी त्यांवरून योग्य तो निष्कर्ष प्रत्यक्ष अनुभव जसजसा येत जाईल तसतसा अचूक निघूं शकेल.




आकृति ३

चौरस हात (आकृति ३):— ह्यांत तळहाताची (बोटें सोडून) लांबी व रुंदी सम असते. बोटांचा आकार देखील बहुधा तीं मागून-पुढून सपाट असल्यानें चौरस दिसतो. तळहात व बोटें ह्यांची लांबी समसमान असते. अंगठा तळहाताला वरच्या बाजूस, पुऱ्या लांबीचा व सुबक आकारांचा असतो. असा तळहात पहातांच ही व्यक्ति अत्यंत समतोल वृत्तीची

असल्याची खूणगांठ मनाशीं बांधावी. समतोलपणा हेंच ह्या व्यक्तीचें वैशिष्ट्य असतें. हीं माणसें दीर्घ परिश्रम करणारीं, सतत उद्योगी, तर्कशुद्ध विचारसरणीचीं पण सामान्य प्रतीचीं असतात. नित्याच्या चाकोरींत स्वतःस हीं इतकीं जखडून घेतात कीं, अवांतर उलाढाली करण्यास ह्यांना फुरसतच नसते. रम्य कल्पनाविलास, नवेनवे शोध, कुणाचें नफानुकसान अथवा जागतिक कल्याण इत्यादि विषयांत लक्ष्य घालण्यापेक्षां आंखून घेतलेला विशिष्ट कार्यक्रम बिनचूक पार पाडणें ह्यांतच अशा लोकांना समाधान लाभतें. हा कार्यक्रम पार पाडीत असतां बुद्धीची शर्थ झाली, परिश्रमांचा कडेलोट झाला अथवा वेतन अपुरें मिळालें तरी त्याबद्दल हे लोक कधींही खळखळ करणार नाहींत. ह्यांची वर्तणूक अत्यंत टापटिपीची, वक्तशीर व शिष्टाचारास अनुसरून असते. त्यामुळें इतर लोकांत ह्या वृत्तींचा अभाव असल्यास ह्यांना मुळींच सहन होत नाहीं. त्यांचे बाबतींत हे फार कडक भासतात. कारकून, अकौंटंट, दुय्यम प्रतीचा अधिकारीवर्ग, शिक्षकांचा समुच्चय इत्यादि लोक—म्हणजेच ज्यांना ज्यांना ठराविक तऱ्हेचींच कामें नित्य बजावावीं लागतात असे उद्यमशील, सोशीक, निष्कपटी व अत्यंत भीरु लोक ह्या सदराखालीं येतात. एकाद्या क्षेत्रांतील फार जबाबदारीची मोठी जागा जात्याच ह्यांना नको असते; आणि योगायोगानें जर यदाकदाचित् ह्यांना कोणी मुद्दाम, हेतुपूर्वक अव्वल दर्जा बहाल करून " बनविलेंच " तरी त्यापासून व्हावा तितका फायदा अगर यावें तसें यश न मिळतां उलट ह्यांची नालायकी मात्र लवकरच सिद्ध होते. जनतेंत चौकोनी हातांचें वा चौरस बोटांचेंच प्रमाण संख्येनें अधिक आहे; व हा प्रकार इतर सर्वांपेक्षां अधिक उपयुक्त असल्यानें ह्याला अग्रेसरत्व देणें योग्य आहे.

चौरस हातानंतरचा प्रकार अर्धचंद्राकृति अथवा अर्धवर्तुळाकार हाताचा (आकृति ४). ह्यांत तळव्याच्या चार बाजूंपैकीं कोणती तरी एक बाजू अर्धवर्तुळाकार दिसते. अर्थात् विशिष्ट बाजूच्या दोन टोंकांशीं असणारे ग्रहांचे उंचवटे इतर तीन बाजूंच्या उंचवट्यांपेक्षां कमी आंत गेलेलें व मधला ग्रहउंचवटा जास्त उठावदार असलेला, अशी वस्तु-

स्थिति जेव्हां आढळून येते तेव्हांच असा प्रकार दृष्टीस पडतो. उदाहरणार्थ, तळव्याच्या बाजूस उजवीकडे गुरु व डावीकडे बुध असे उंचवटे आहेत; आणि खालच्या म्हणजे मनगटाच्या बाजूस उजवीकडे शुक्र व डावीकडे चंद्र असे उंचवटे आहेत. तळहातावर मधला प्रदेश मंगळाच्या उंचवट्याचा असल्यानें, ज्या वेळीं मंगळ अधिक उठावदार असतो अथवा वरील भागांत रवि व शनि यांचे उंचवटे ज्यावेळीं अधिक बलवान् असतात, तेव्हां दोन्ही टोकें निमुळतीं व मधला भाग पुढें आलेला दृगोचर होतो. तसेंच टोंकाचे दोन उंचवटे अधिक बलवान पण पसरट असतील व मधला उंचवटा निर्बल असल्यानें तो भाग आंत गेलेला असेल, तर वरच्या उलट अर्धवर्तुळाचा आकार होऊं शकेल. ज्या उंचवट्यांच्या कमीजास्त वाढीमुळें तळहातास अर्धचंद्राकृति [उलट वा सुलट) ( ] आकार प्राप्त झालेला दिसून येईल, त्या ग्रहउंचवट्यांचे गुणधर्मांप्रमाणें ह्या अर्धवर्तुळाकार प्रकाराचें जें सर्वसाधारण वर्णन खालीं दिलें आहे त्यांत भर घालावी.



आकृति ४

अर्धवर्तुळाकृति हात असणारी व्यक्ति जबरदस्त उत्साह अंगीं असणारी, सतत नव्या नव्या उपक्रमांत दंग असणारी, चळवळ्या वृत्तीची व अत्यंत हिकमती असते. अधिकाराची लालसा ह्या व्यक्तीला उत्कटपणें असते. प्रत्यक्ष अधिकार प्राप्त न झाला तरी आजूबाजूच्या भाबड्या–निष्कपट लोकांवर निष्कारण दाब ठेवण्याची दादागिरी आरंभापासून ही व्यक्ति करीत असते. अंगच्या ह्या जन्मजात स्वभावामुळें कालांतरानें ह्या तऱ्हेच्या लोकांना अधिकार प्राप्त होतो हें वेगळें सांगावयास नकोच. जबाबदारी

स्वीकारून अवाढव्य कार्य अंगीकारायचें व सत्तेच्या जोरावर इतरांकडून शिस्तींत—अगर सुलतानशाही गाजवून—तें तडीस न्यावयाचें हाच ह्यांच्या आवडीचा उद्योग. त्यामुळें अधिकाराच्या वरवरच्या दर्जाच्या जागा ह्यांना मिळतात. ह्या लोकांना विश्रांतीचें वावडें असतें. प्रमुख कार्याची धुरा तर हे अक्षय संभाळतातच, पण तें चालूं असतां आणखी चार—सहा उपक्रम अन्यत्र चालूं ठेवण्याची धडपड हे लोक करीत असतात; आणि हा सर्व खटाटोपही अपुरा वाटल्यानें पुनश्च कांहीं अभिनव कार्यक्रम आंखण्याच्या योजनेंत ही मंडळी गढून जातात तें वेगळेंच. अडाखेबंद कार्यक्रम व भरगच्च वेळापत्रकें ह्यांच्याजवळ हव्या त्या क्षणीं तयार असतात. तथापि ह्या लोकांतही विशेष लक्षांत ठेवण्यासारखा एक ढिलेपणा असतो. कोणतीही गोष्ट नव्यानें सुरूं करतांना ही मंडळी जी धावपळ करतात, जो गाजावाजा वाजवतात, अथवा जें उसनें अवसान धारण करतात तें सारें वारें दीर्घ काल कधींही टिकत नाहीं. कारण दुसऱ्या क्षणीं दुसरी गोष्ट अंमलांत आणावयासाठीं ह्यांनीं तीच त्वरा आरंभली कीं, लगेच पहिल्या गोष्टीच्या संबंधींचा नेट हळूं हळूं ओसरूं लागतो. अर्थात् ह्यांच्या अमदानींत ढीगभर गोष्टी प्रत्यहीं प्रसृत होत रहातात. तथापि त्यांतील एकही गोष्ट चिरकालीन टिकणारी अथवा वरवरचा दिखाऊपणा दृष्टिआड केल्यास ज्यांत कांहीं भरीव तत्त्व सांपडेल अशी आढळून येत नाहीं. हाताखालीं काम करणाऱ्या अथवा सभोंवतालच्या लोकांना ह्या मंडळीपासून नित्य उपद्रव होतो तो ह्यामुळेंच. ह्यांचें कोणतेंही फर्मान अरेरावीचें, अत्यंत तांतडीपूर्वक पण तितकेंच अविवेकी वृत्तीचें सुटत असतें. पुन्हां एकामागोमाग चार दोन विलक्षण गोष्टी ह्यांच्या तोंडावाटें अशा पडत असतात कीं, नंतरच्या हुकमाचा मेळ आधीच्या हुकमाशीं सहसा बसत नाहीं. एवंच हे लोक इतरांना अप्रिय व शेवटीं अयशस्वी ठरतात. ह्यांच्या अविश्रांत कारकीर्दींत प्रत्येकाचा जीव वैतागून जातो. इतरांच्या परिश्रमाबद्दल व सहकार्याबद्दल यत्किंचितही सहानुभूति न बाळगण्याच्या त्यांच्या वृत्तीपायीं अखेर ह्यांची मानहानि न झाली तर मिळवलें येथवर मजल येते. नोकरपेशांत गुंतलेल्या असंख्य जीवांना निर्दयपणें राबवून घेऊन वेळीं अवेळीं त्यांना अर्धचंद्राची धमकी बेगुमानपणें देणारे जे लोक, ते सर्व अर्ध-

वर्तुळाकार हात वा बोटें असणारे होत, असें एका वाक्यांत म्हणावें लागेल.

मात्र कोणता उंचवटा बलवान् असल्यानें तळव्यास अर्धवर्तुलाकृति प्राप्त झाली आहे तें नीट पहावें. उदाहरणार्थ, वर असणारे उंचवटे–रवि व शनि–प्रबल असतील तर व्यक्ति व्यवहारचतुर, कडक शिस्तीची व मनोनिग्रही असते. खालचा म्हणजे शुक्र व चंद्र ह्या उंचवट्यांचा भाग अधिक पसरट दिसेल तर व्यक्ति उतावळ्या स्वभावाची, संशयी वृत्तीची, पूर्वग्रहदूषित, शिस्तहीन, लहरी व चंचल असते. मनोविकार फार तीव्र असल्यानें त्यांच्या आहारीं जाऊन ही व्यक्ति स्वतःवर वा दुसऱ्यावर कोणत्या वेळीं कसा प्रसंग आणील ह्याचा नेम नसतो. उलट मंगळाचा प्रदेश अथवा तळहाताचा मधला भागच अधिक रुंद असल्याचें दृष्टोत्पत्तीस येईल तर ती व्यक्ति विलक्षण तापट, साहसी, चिवट, धीर-गंभीर वृत्तीची, निःस्पृह पण कर्दनकाळाप्रमाणें बेफाम भासणारी असते. ग्रह-उंचवट्यांच्या गुणधर्मांप्रमाणें येणेंप्रमाणें तीं तीं वर्णनें बदलतात ही गोष्ट ह्या प्रत्यक्ष विवेचनावरून ध्यानांत आलीच असेल.

चौरस हात वा बोटांच्या संख्येच्या खालोखाल ह्या प्रकाराचें आधिक्य दिसून येतें; म्हणून ह्याला दुसरा प्रकार समजणें योग्य होय.



आकृति ५

निमुळत्या आकाराचा वा निमुळत्या बोटांचा हात हा तिसऱ्या नंबरचा हात आहे. कारण पहिल्या दोन प्रकारांच्या संख्येच्या खालोखाल ह्या सदरांतील लोक भरतात. ह्यांत चित्रकार, शिल्पकार, गायन–वादन वा नृत्यप्रवीण लोक, अभिनयपटु नट, सिनेस्टार्स आणि इतर कलाभिज्ञ लोक ह्यांचा समावेश होतो. हाताची लांबी अधिक पण रुंदी कमी असते (आकृति ५). हा हात मनगटाकडून वरच्या दिशेने निमुळता होत जातो.

अंगठा बहुधा लहान व लवचीक असतो. मात्र कलानिर्मितीच्या दृष्टीनें हात कठीण असणें आवश्यक असतें. मऊ हात असेल तर अंगीं फक्त कलाभिरुचि व रसिकता असूं शकते. कलावंत आणि कलोपासक ह्या व्यक्ति अगदीं भिन्न भिन्न होत. तेव्हां हात मऊ असून अंगठा, रवि-उंचवटा व मस्तकरेषा निर्बल ठरतील तर तीं माणसें कृतींपेक्षां विकृतींनींच नटलेलीं आढळून येतात. स्वतःच्या झोकनोकांत नेहमीं गर्क असणें, पोशाखांत नटवेगिरीपणावर अधिक भर देणें, वेगवेगळ्या फॅशन्स प्रत्यहीं प्रसवणें, कृत्रिम साधनांनीं, अभिनयांनीं आणि लाघवी शब्दांनीं इतरांवर छाप पाडणें इत्यादि विशिष्ट गोष्टी ह्यांच्या ठिकाणीं हटकून संभवतात. प्रत्यक्ष जीवनांत मूर्तिमंत कला उतरवण्याच्या गप्पा ह्यांना फार आवडतात. ह्यांची लहर वा तब्येत संभाळणें मोठ्या भानगडीचें ठरतें.



आकृति ६

अफाट कल्पनाशक्ति लाभल्यानें अचाट विचार ह्यांना सुचतात. तथापि सारासार विचार प्रत्यक्ष व्यवहारांत ह्यांच्या वांट्यास क्वचितच येतो. त्यामुळें ह्यांचे विचार जर यदाकदाचित् कृतींत उतरले तर इतरांना तो आचरटपणाच वाटतो. कोणत्याही गोष्टीचें गांभीर्य ह्यांच्या ठिकाणीं जात्याच नसतें. रूढीचीं बंधनें ह्यांच्या हातून सहसा पाळलीं जात नाहींत. वक्तशीरपणाशीं तर ह्यांची तोंडओळखही नसते. तथापि कोणतीही कला वृद्धिंगत होत होत तिला जें आजचें स्वरूप प्राप्त झालें आहे तें ह्या लोकांमुळेंच होय, ही गोष्ट विसरून चालणार नाहीं.


निमुळत्या हातांच्या वा बोटांच्या प्रकारांची परिसीमा असणारा म्हणजेच टोंकदार हात होय (आकृति ६). ह्यांत तळव्याचा आकार बोटांच्या मानानें फारच लहान व सुबक, हात मृदु, नाजूक व एकदम

चिंचोळा, बोटें लांब, शेवटांकडे नितळ होत गेलेलीं व निमुळतीं दिसण्यापेक्षांही टोंकदार अशीं असतात. ह्या हाताचें दृश्य अतिआकर्षक असलें तरी हा हात 'दिसतें तसें नसतें' ह्या म्हणण्यांतील सत्यता पटवून देतो. जितका चित्तवेधक तितका उपयुक्त हात हा खास नव्हे; व सुदैवानें ह्या प्रकारचा हात वा बोटें असणाऱ्यांची संख्याही पण फार थोडी आहे. अशा प्रकारचा हात असणारी व्यक्ति हवेमध्यें मनोरे बांधून सतत रहाते. दृष्टि वर अस्मानाकडे असल्यानें आजूबाजूची परिस्थिति ह्यांना दिसत नाहीं. ह्यांची बुद्धि अतिमानुष, कल्पनाविलासांत गढून गेलेली व अस्तित्वांत न येणाऱ्या हरतऱ्हा शोधण्यांत गुंतल्याकारणानें, ह्यांना स्वतःची हुरहुर स्वतःसच नीट समजत नाहीं. त्यामुळें मनांत एक, कृतींत दुसरें तर जनांत कांहीं तिसरेंच, असें वेडेवांकडें त्रांगडें ह्यांच्या बाबतींत वारंवार हटकून आढळून येतें. प्रत्येक बाबतींत स्वतःचें उदाहरण इतरांनीं आदर्श म्हणून उचलावें अशी ह्यांची अंतरींची तळमळ असते. व्यवहारांतील तारतम्य ह्यांच्या ठिकाणीं फार कमी. हीं माणसें कांहींशीं गूढ, आंतल्या गांठीचीं, खोल वृत्तींचीं पण मनकवडीं असतात. भोंवतालच्या व्यक्तींच्या मनांतील घडामोडींचा अंदाज ह्यांना सहजासहजीं अचूक लागतो. वशीकरणाचें साधन ह्यांना हां हां म्हणतां उपलब्ध होतें. मनांत आणलें तर हव्या त्या माणसाला ह्या व्यक्ति कब्जांत घेऊं शकतात. नैसर्गिक अंतर्ज्ञानशक्तीच्या आधारावर ह्याच प्रकारांतील एकाददुसरी व्यक्ति 'महात्मा' पद मिळवूं शकते. कारण ह्यांना भविष्यकालाबद्दल थोडेफार अंदाज बांधतां येतात. आजच्या परिस्थितीवरून भावी परिणामाबद्दल त्यांच्या तोंडून प्रकट होणारा उद्गार बहुधा खरा ठरतो. मग ही व्यक्ति शिक्षित, निरीक्षर, पुढारलेल्या अथवा मागासलेल्या जातींतील कशीही असो.

वर सांगितलेल्या निमुळत्या व टोंकदार ह्या दोन प्रकारांत सर्वसाधारणपणें स्त्रियांचा भरणा संख्येनें तीन-चतुर्थांश ह्या प्रमाणांत होतो असें म्हणण्यास हरकत नाहीं. स्त्रिया जात्याच बुद्धीपेक्षां भावनाप्रधान जास्त असतात. त्यांचें जीवित वासनामय अधिक असतें. वस्तुस्थिति विसरून कल्पनेच्या

मनोमय वातावरणांत यथेच्छ विहार करण्याचा चाळा त्यांना अगदीं बाल्यावस्थेपासून जडलेला असतो. त्या मनकवड्या असतात. म्हणूनच पति, पुत्र वा संबंधित असणाऱ्या इतर कोणाही व्यक्तीचें मत स्वतःविषयीं शक्यतों अनुकूल ठेवण्याची क्रिया त्यांना साधते. केवळ दृष्टिक्षेपानें परपुरुषाच्या ' आंतरः कोऽपि हेतू ' ची त्या परीक्षा करतात व त्यामुळें खलपुरुषांपासून पुढें कधींकाळीं पोहोंचणारा उपसर्ग त्यांना ह्या नैसर्गिक देणगीमुळें अगाऊ टाळतां येतो. गायन–वादन–संगीत–नृत्य–नाट्य–अभिनय इत्यादि कलाक्षेत्रांत प्राचीन कालापासून स्त्रीजाति हीच एक आदिशक्ति म्हणून मशहूर ठरली आहे. देवेंद्राच्या स्वर्गीय प्रासादापासून तों मर्त्य भूतलावरील आजकालच्या कोणाही राजा–महाराजांच्या विलासमंदिरांतील कथा आठवल्या असतां ह्याची साक्ष पटेल. स्त्री जर सुस्वरूप, शिक्षित व पुढारलेल्या मनोवृत्तीची असेल तर प्रश्नच नाहीं. तथापि जिच्या हाताचा तळवा लहान, बोटें निमुळतीं अथवा टोंकदार पण तळहातापेक्षां लांबीनें जास्त इत्यादि वरील वर्णनाप्रमाणें असतील, अशी स्त्री जरी अशिक्षित किंवा मागासलेली असेल अथवा दिसावयास जरी ती सामान्य प्रतीची दिसेल, तरी तिच्या ठिकाणीं आतांपर्यंत वर्णन केलेल्या गोष्टींनुरूप असा कांहींतरी ' स्पार्क ' असल्याचा भास होईल, अथवा तिजबद्दल इतकें कांहीं विलक्षण आकर्षण पहाणारास वाटेल कीं, नंतर त्याची त्यालाच लाज वाटावी. सारांश, निमुळता आणि टोंकदार हा हातांचा प्रकारच असा आहे कीं, त्यांत कलावंत, कलोपासक, भावनेवर जीवित कंठणारा जनसमूह, सर्वसाधारण स्त्रीवर्ग व हळुवार वृत्ति, संथपणा, धिमीवृत्ति व कमालीचा सोशिकपणा धारण करणाऱ्या व्यक्ति ह्यांचाच समावेश प्रामुख्यानें होतो. ह्या व्यक्ति सर्वसाधारण असतात खऱ्या, पण ह्यांच्याबद्दल इतरांना विलक्षण आकर्षण वाटतें; ते इतकें कीं, लोक ह्यांच्या एवढ्या–तेवढ्या कृतीचें अवडंबर माजवून ह्यांच्या सभोंवतीं वेळीं अवेळीं कां रुंजी घालतात तेंच ह्यांना समजत नाहीं. बुवाबाजीची प्रथा ह्यांतूनच पुढें अवतरत असावी.

ह्यानंतरचा हात अभ्यासजड माणसांचा होय. जनतेंत ह्या हाताचें प्रमाण




आकृति ७

चौकोनी, अर्धचंद्राकृति अथवा निमुळत्या हातांचे मानानें कमी आहे. हा हात लांबीनें अधिक, निरुंद, हाडांची वाढ उंचवट्यांच्या बरोबरीनें आणि बोटांच्या पेऱ्यांमधील सांधे उघडे पडलेले अशा स्वरूपाचा असतो. ज्ञानपिपासु वृत्ति ज्यांच्या ठिकाणीं दिसून येते. अशा माणसांचा हा हात होय कोणत्या ना कोणत्या विषयाचें अध्ययन करण्यांत हे लोक स्वतःचें जीवित घालवितात. तो विषय शास्त्रीय असो, संशोधनाचा असो अथवा वेदांताचा असो. विरागी वा संन्यस्त वृत्तीनें राहून, गहन वा कूट प्रश्नांची छाननी करणें, त्यांवर स्वतंत्ररीत्या चर्चा करून अथवा तत्संबंधीं ग्रंथ प्रसृत करून बहुजनसमाजाला सुलभतेनें ज्ञान करून देण्याचा कार्यक्रम ह्या लोकांपुढें असतो. सामान्य जनतेस धर्माचें रहस्य, ईश्वरोपासना, विधिपूर्वक आचरण, पारलौकिक रहस्य इत्यादि समजावून देण्यांत ह्यांपैकीं कांहीं लोक गुंतलेले असतात. गहन विषयांचें अध्ययन, शास्त्रीय संशोधन, त्यांतील तत्त्वांची चिकित्सा, जनहितासाठीं त्यांची व्यवस्थित पुनर्घटना इत्यादि सामान्य लोकांना क्लिष्ट वाटणारीं व त्यांना न झेपणारीं कामें हीं माणसें स्वखुषीनें पत्करतात. हरिदास, पुराणिक, यजमान कृत्य करणारा पठित भिक्षुकवर्ग ह्यांपासून तों पुराणवस्तुसंशोधक, व्याकरण–मीमांसा–न्यायशास्त्र–तत्त्वज्ञान ह्या विषयांत प्रावीण्य मिळविणारे शास्त्री, प्रोफेसर वा वेदांती इत्यादि विद्वद्वर्यांपर्यंत सर्वांचा समावेश ह्या प्रकाराखालीं होतो. हे लोक सर्व-

सामान्यतः निरुपद्रवी, अभ्यासजड व सनातनी बाण्याचे असतात. गबाळी वृत्ति, प्रपंचाबद्दल औदासीन्य, जगांतील नित्य घडामोडींबद्दल अनास्था व स्वतःच्या अंगीकृत विषयाबद्दल नित्य निदिध्यास असें ह्यांचें वर्णन थोडक्यांत करावें लागेल.

आतांपर्यंत आपण वेगवेगळ्या पांच प्रकारांचे हात पाहिले. ह्या पांच प्रकारांच्या मिश्रणानें तयार होणाऱ्या हातांची एक सहावी तऱ्हा आहे. ह्या प्रकारांत चारीं बोटें तरी वेगवेगळ्या आकारार्चीं असतात (आकृति ८). अथवा तळवा एका तऱ्हेचा तर बोटें अन्य प्रकारार्चीं अशी वस्तुस्थिति दृष्टीस पडते. तर्जनी अर्धगोलाकृति, मध्यमा चौकोनी, अनामिका गांठाळ (सांध्याजवळील अस्थि उठावदार असणारी) व करांगुलि टोंकदार वा निमुळती असा तरी प्रकार दिसून येतो; किंवा तळवा अर्धगोलाकृति तर बोटें चौरस असल्याचें तरी दृष्टोत्पत्तीस येतें. एका



आकृति ८

हातावर असे जेवढे अधिक प्रकार समुच्चयानें दिसून येतील, तितकी बुद्धिमत्ता अष्टपैलू वा विविधगामी असूं शकते. तथापि हीं माणसें एकाही विषयांत नांव घेण्यासारखें प्रावीण्य मिळवीत नाहींत हा त्यांच्यांतील प्रमुख दोष आहे. एकाच विषयावर जर ह्यांनीं बुद्धिसर्वस्व वेंचलें तर ह्या माणसांनीं केलेलें कार्य चार–दोन पिढ्यांपेक्षांही अधिक भरेल. तथापि कोणत्याही वेळीं अनेक विषयांत लक्ष्य घालून दरएक गोष्ट अर्धवट स्वरूपांत सोडण्याची खोड ह्यांना आरंभापासून असते. गाणें गातां येतें, चित्रें काढतां येतात, सारंगीवादन अवगत असतें, लघुकथा वा काव्य लिहिण्याचा

छंद असतो, आणि एवढ्या सर्व विषयांतील अर्धेकच्चें ज्ञान असतांही ह्यांपैकीं कोणताही एक विषय चिकाटीनें पुरा करावयाचें सोडून हीं माणसें रेडिओ-रिपेअर, फोटोग्राफी, मोटार-मेकॅनिक इत्यादि नव्या नव्या विषयांकडे वळतात. त्यामुळें बुद्धि व हुन्नर अंगीं असूनही द्रव्य व काल निष्कारण खर्ची पडतो आणि त्याचा मोबदला स्वतःला वा इतरांना कांहींच मिळत नाहीं; असें दुहेरी नुकसान अप्रत्यक्षरीत्या सतत होत असतें. मात्र हीं माणसें हजरजबाबी असतात. दुसऱ्याच्या मदतीस न बोलवतां धावून जाण्याची ह्यांची तयारी असते. वेळप्रसंगीं अपमान झाला तरी त्याकडे हे काणाडोळा करतील. पण कोणाची कुठें तक्रार आहे असें कानीं पडतांच हीं माणसें तिथें प्रथम हजर होतील. कारण असें करण्यांत त्यांच्या बुद्धीला हवें असणारें नित्य नवें खाद्य मिळतें व म्हणून ह्यांना स्वस्थ बसवतच नाहीं. ज्यांना आपण विक्षिप्त, अर्धवट, तर्कटी, हरकामी, बहुश्रुत, अष्टपैलू अथवा सर्वज्ञ समजतों त्यांपैकीं बहुतेक लोकांचा हात अशा प्रकारचा असतो असें दिसून येईल.

शेवटचा प्रकार ओबड–धोबड वा आकारविहीन हातांचा होय (आकृति ९). तळव्याची ठेवण जाडजूड, ओबड–धोबड, रांकट व कठीण असते. बोटें आंखूड आणि जाड असतात. अंगठा भला लठ्ठ व तळव्यास बऱ्याच खालच्या बाजूस जोडलेला असतो. सारांश हात, बोटें अगर अंगठा ह्यांना आकार अथवा सुबकपणा असा कुठेंच दिसून येत नाहीं. ह्या आकाराचा हात असणारीं माणसें अर्थात् अतिनिर्बुद्ध, मागासलेलीं, अडाणी व भावनाशून्य असतात. मात्र हुकमाची अंमलबजावणी चोख रीतीनें अक्षरशः करणें ह्या लोकांना उत्तम प्रकारें



आकृति ९


साधतें. सारासार विचार, न्याय–अन्याय अगर दयामाया ह्यांना आयुष्यांत कधींही शिवत नाहीं. लष्करी बाण्याचे लढाऊ लोक, पोलीस खात्यांतील खालचा बराचसा वर्ग, नित्य व्यवहारांत साध्या पेशांतील पण क्षणोक्षणीं फुकट हडेलहप्पी अथवा अरेरावी गाजविणाऱ्या वृत्तीचे पाषाणहृदयी लोक आणि अमानुष कृत्यें करून जनतेंत खळबळ उडवून देणारे इसम ह्या सर्वांचा समावेश ह्या सदराखालीं होईल. यथेच्छ खाणेंपिणें, मनसोक्त चैन उपभोगणें, उद्यांच्या योगक्षेमाची फिकीर न बाळगणें, दुसऱ्याच्या सुखाची वा जिवाची हवीतशी विल्हेवाट लावणें, स्वतःच्या राक्षसी कृत्यांबद्दल व स्वतःच्या जीविताबद्दल बेदरकार असणें इत्यादि वर्णन ह्या सातव्या प्रकाराच्या हाताचें करावें लागेल. ह्या लोकांची बुद्धि जात्याच कोती, निकृष्ट व तारतम्याचा अभाव असलेली अशी असते. त्यामुळें शिक्षण त्यांना झेपत नाहीं आणि सुसंस्कार त्यांना शिवत नाहींत. ह्या लोकांशीं संबंध येणें विशेषतः ह्यांच्या ताबेदारींत रहाण्याचा प्रसंग ओढवणें म्हणजे असंगाशीं संग व प्राणाशीं गांठ ह्या उक्तीप्रमाणें ठरत असल्यास त्यांत नवल नाहीं.

प्रकरण ३ रें : नखें

बोटांच्या नखांवरून विशेषतः आरोग्याची कल्पना करतां येते. रुधिराभिसरण व शरिरास होणारा रक्ताचा पुरवठा ह्या गोष्टींचें प्रतिबिंब नखें पहातांच दिसतें. नखांचें महत्त्व डॉक्टरी विद्येंत फार आहे.

नखें मुख्यत्वेंकरून पांच प्रकारचीं आहेत. (१) लांब, (२) आंखूड, (३) पसरट, (४) चिंचोळीं, (५) कवडीच्या आकाराचीं.


१. अतिलांब नखें (आकृति १०) केव्हांही वाईटच. छाती व



आकृति १०

बरगड्या ह्यांतील दुखणें लांब नखांवरून समजतें. प्रमाणांत लांब असणारीं नखें घशांतील किंवा श्वासनलिकेंतील बिघाड दर्शवितात.

२. आंखूड नखें हृदयविकार दर्शवितात. नखांवर पांढऱ्या वर्णाची अर्धचंद्राकृति स्पष्ट दिसत असेल तर मानसिक दौर्बल्य वा मज्जातंतूंत बिघाड झाल्याचा बोध होतो. नखांवर लहानमोठे पांढरे ठिपके दिसणें, हें मानसिक स्थिति खालावल्याचें द्योतक होय.



आकृति ११

अतिअरुंद नखें असतील तर पाठीच्या कण्यांत दोष आहे असें आढळून येतें. नखें पातळ व कमानदार असतील तर पाठीच्या कण्यांत बिघाड वा बांक येतो व त्यामुळें शरीरप्रकृति ढासळते.

३. नखें पसरट व मांसल भागापासून वर उचललेलीं दिसतात त्या वेळीं अर्धांगवायूची भीति असते (आकृति ११).

४. चिंचोळीं नखें दिसल्यास मनुष्यांतील सामर्थ्य दिखाऊ व वरवरचें आहे असा बोध होतो. असा मनुष्य उसन्या अवसानावर कालक्रमणा करीत असतो.

५. पाठीकडून कवडी दिसावी, तशा आकाराचीं नखें क्वचित् आढळतात. हीं नखें दीर्घवर्तुळाकार, पांढऱ्या रंगाचीं व मांसांत सभोंवतीं चिकटल्याप्रमाणें दिसतात. अशीं नखें क्षय अथवा दीर्घ काल झिजून झिजून ज्यानें शेवट होतो, असा आजार दर्शवितात. विशेषतः पांढरा व निळसर वर्ण धोक्याचा असतो. नख चिवट असावें. वांकलें तरी मोडूं नये. आपोआप नखाचा तुकडा पडणें तर भयसूचक आहे.

नखांचा रंग गुलाबी असणें आरोग्यदर्शक होय. पांढरा रंग थंड स्वभाव व सहानुभूतिशून्य वृत्ति दर्शवितो.

तांबडा रंग रंगेल वृत्ति व वाजवी सामर्थ्य दर्शवितो. निळ्या रंगावरून रुधिराभिसरण व्हावें तसें योग्य होत नसल्याचें दिसून येतें.

प्रकरण ४ थें : अंगठा

हस्तसामुद्रिकशास्त्रांत अंगठा ही स्वयंपूर्ण व महत्त्वाची बाब आहे. तळहातावरील उंचवटे व प्रमुख रेषा ह्यांसंबंधीं कितीही ज्ञान मिळविलें तरी अंगठ्याची माहिती संपूर्ण असल्याखेरीज त्या ज्ञानाचा उपयोग अचूक करितां येणार नाहीं. रोजच्या व्यवहारांत अंगठ्याची उपयुक्तता किती आहे याचा विचार करावा. इतर असणाऱ्या चारी बोटांना प्रति-रोध करण्याचें सामर्थ्य अंगठ्याच्या ठिकाणीं आहे. म्हणूनच अंगठ्याला बोटांच्या वर्गांत न घालतां हाताला बोटें चार व पांचवा अंगठा असें स्वतंत्र वर्गीकरण शास्त्रज्ञांनीं केलें आहे. सारीं कलाकुसरीचीं हस्त-

छंद असतो, आणि एवढया सर्व विषयांतील अर्धेकच्चें ज्ञान असतांही ह्यांपैकीं कोणताही एक विषय चिकाटीनें पुरा करावयाचें सोडून हीं माणसें रेडिओ-रिपेअर, फोटोग्राफी, मोटार-मेकॅनिक इत्यादि नव्या नव्या विषयां-कडे वळतात. त्यामुळें बुद्धि व हुन्नर अंगीं असूनही द्रव्य व काल निष्कारण खर्ची पडतो आणि त्याचा मोबदला स्वतःला वा इतरांना कांहींच मिळत नाहीं; असें दुहेरी नुकसान अप्रत्यक्षरीत्या सतत होत असतें. मात्र हीं माणसें हजरजबाबी असतात. दुसऱ्याच्या मदतीस न बोलवतां धावून जाण्याची ह्यांची तयारी असते. वेळप्रसंगीं अपमान झाला तरी त्याकडे हे काणाडोळा करतील. पण कोणाची कुठें तक्रार आहे असें कानीं पडतांच हीं माणसें तिथें प्रथम हजर होतील. कारण असें करण्यांत त्यांच्या बुद्धीला हवें असणारें नित्य नवें खाद्य मिळतें व म्हणून ह्यांना स्वस्थ बसवतच नाहीं. ज्यांना आपण विक्षिप्त, अर्धवट, तर्कटी, हरकामी, बहुश्रुत, अष्टपैलू अथवा सर्वज्ञ समजतों त्यांपैकीं बहुतेक लोकांचा हात अशा प्रकारचा असतो असें दिसून येईल.

शेवटचा प्रकार ओबड–धोबड वा आकारविहीन हातांचा होय (आकृति ९). तळव्याची ठेवण जाडजूड, ओबड–धोबड, रांकट व कठीण असते. बोटें आंखूड आणि जाड असतात. अंगठा भला लठ्ठ व तळव्यास बऱ्याच खालच्या बाजूस जोडलेला असतो. सारांश हात, बोटें अगर अंगठा ह्यांना आकार अथवा सुबकपणा असा कुठेंच दिसून येत नाहीं. ह्या आकाराचा हात असणारीं माणसें अर्थात् अति-निर्बुद्ध, मागासलेलीं, अडाणी व भावनाशून्य असतात. मात्र हुक-माची अंमलबजावणी चोख रीतीनें अक्षरशः करणें ह्या लोकांना उत्तम प्रकारें



आकृति ९


साधतें. सारासार विचार, न्याय–अन्याय अगर दयामाया ह्यांना आयुष्यांत कधींही शिवत नाहीं. लष्करी बाण्याचे लढाऊ लोक, पोलीस खात्यांतील खालचा बराचसा वर्ग, नित्य व्यवहारांत साध्या पेशांतील पण क्षणोक्षणीं फुकट हडेलहप्पी अथवा अरेरावी गाजविणाऱ्या वृत्तींचे पाषाणहृदयी लोक आणि अमानुष कृत्यें करून जनतेंत खळबळ उडवून देणारे इसम ह्या सर्वांचा समावेश ह्या सदराखालीं होईल. यथेच्छ खाणेंपिणें, मनसोक्त चैन उपभोगणें, उद्यांच्या योगक्षेमाची फिकीर न बाळगणें, दुसऱ्याच्या सुखाची वा जिवाची हवीतशी विल्हेवाट लावणें, स्वतःच्या राक्षसी कृत्यांबद्दल व स्वतःच्या जीविताबद्दल बेदरकार असणें इत्यादि वर्णन ह्या सातव्या प्रकाराच्या हाताचें करावें लागेल. ह्या लोकांची बुद्धि जात्याच कोती, निकृष्ट व तारतम्याचा अभाव असलेली अशी असते. त्यामुळें शिक्षण त्यांना झेपत नाहीं आणि सुसंस्कार त्यांना शिवत नाहींत. ह्या लोकांशीं संबंध येणें विशेषतः ह्यांच्या ताबेदारींत रहाण्याचा प्रसंग ओढवणें म्हणजे असंगाशीं संग व प्राणाशीं गांठ ह्या उक्तीप्रमाणें ठरत असल्यास त्यांत नवल नाहीं.

प्रकरण ३ रें : नखें

बोटांच्या नखांवरून विशेषतः आरोग्याची कल्पना करतां येते. रुधिराभिसरण व शरिरास होणारा रक्ताचा पुरवठा ह्या गोष्टींचें प्रतिबिंब नखें पहातांच दिसतें. नखांचें महत्त्व डॉक्टरी विद्येंत फार आहे.

नखें मुख्यत्वेंकरून पांच प्रकारचीं आहेत. (१) लांब, (२) आंखूड, (३) पसरट, (४) चिंचोळीं, (५) कवडीच्या आकाराचीं.


१. अतिलांब नखें (आकृति १०) केव्हांही वाईटच. छाती व



आकृति १०

बरगड्या ह्यांतील दुखणें लांब नखांवरून समजतें. प्रमाणांत लांब असणारीं नखें घशांतील किंवा श्वासनलिकेंतील बिघाड दर्शवितात.

२. आंखूड नखें हृदयविकार दर्शवितात. नखांवर पांढऱ्या वर्णाची अर्धचंद्राकृति स्पष्ट दिसत असेल तर मानसिक दौर्बल्य वा मज्जातंतूंत बिघाड झाल्याचा बोध होतो. नखांवर लहानमोठे पांढरे ठिपके दिसणें, हें मानसिक स्थिति खालावल्याचें द्योतक होय.



आकृति ११

अतिअरुंद नखें असतील तर पाठीच्या कण्यांत दोष आहे असें आढळून येतें. नखें पातळ व कमानदार असतील तर पाठीच्या कण्यांत बिघाड वा बांक येतो व त्यामुळें शरीरप्रकृति ढासळते.

३. नखें पसरट व मांसल भागापासून वर उचललेलीं दिसतात त्या वेळीं अर्धांगवायूची भीति असते (आकृति ११).

४. चिंचोळीं नखें दिसल्यास मनुष्यांतील सामर्थ्य दिखाऊ व वरवरचें आहे असा बोध होतो. असा मनुष्य उसन्या अवसानावर कालक्रमणा करीत असतो.

५. पाठीकडून कवडी दिसावी, तशा आकाराचीं नखें क्वचित् आढळतात. हीं नखें दीर्घवर्तुळाकार, पांढऱ्या रंगाचीं व मांसांत सभोंवतीं चिकटल्याप्रमाणें दिसतात. अशीं नखें क्षय अथवा दीर्घ काल झिजून झिजून ज्यानें शेवट होतो, असा आजार दर्शवितात. विशेषतः पांढरा व निळसर वर्ण धोक्याचा असतो. नख चिवट असावें. वांकलें तरी मोडूं नये. आपोआप नखाचा तुकडा पडणें तर भयसूचक आहे.

नखांचा रंग गुलाबी असणें आरोग्यदर्शक होय. पांढरा रंग थंड स्वभाव व सहानुभूतिशून्य वृत्ति दर्शवितो.

तांबडा रंग रंगेल वृत्ति व वाजवी सामर्थ्य दर्शवितो. निळ्या रंगावरून रुधिराभिसरण व्हावें तसें योग्य होत नसल्याचें दिसून येतें.

प्रकरण ४ थें : अंगठा

हस्तसामुद्रिकशास्त्रांत अंगठा ही स्वयंपूर्ण व महत्त्वाची बाब आहे. तळहातावरील उंचवटे व प्रमुख रेषा ह्यांसंबंधीं कितीही ज्ञान मिळविलें तरी अंगठ्याची माहिती संपूर्ण असल्याखेरीज त्या ज्ञानाचा उपयोग अचूक करितां येणार नाहीं. रोजच्या व्यवहारांत अंगठ्याची उपयुक्तता किती आहे याचा विचार करावा. इतर असणाऱ्या चारी बोटांना प्रति-रोध करण्याचें सामर्थ्य अंगठ्याच्या ठिकाणीं आहे. म्हणूनच अंगठ्याला बोटांच्या वर्गांत न घालतां हाताला बोटें चार व पांचवा अंगठा असें स्वतंत्र वर्गीकरण शास्त्रज्ञांनीं केलें आहे. सारीं कलाकुसरीचीं हस्त-

व्यवसायात्मक कामें, यांत्रिक शोध, लेखनकार्य इत्यादि गोष्टी अंगठ्याच्या अस्तित्वाशीं निगडित आहेत; एवढेंच नव्हें तर अंगठ्याच्या अभावीं खाद्य पदार्थांचे तुकडे बोटांऐवजीं दांतांनीं करण्याचा प्रसंग वन्यपशूप्रमाणें मनुष्यजातीवर ओढवला असता.

अंगठ्याचे तीन विभाग पडतात. अंगठ्याला पेरीं दोनच आहेत. त्यामुळें पेऱ्यांनीं होणारे दोन व खालीं असणारा शुक्रटेकडीचा तिसरा मिळून तीन विभाग मानण्याचा प्रघात आहे.

अंगठ्याचे हे विभाग कमीजास्त असतात. अंगठा हाताशीं खालीं अथवा वर जोडला जाईल त्यावर अथवा अंगठाच लहान अथवा मोठा असेल तर त्यावर, ह्या तीन विभागांचा कमीजास्तपणा अवलंबून असतो.

अंगठ्याच्या पहिल्या म्हणजे नखानें युक्त असणाऱ्या पेऱ्यावरून इच्छाशक्ति, प्रामाणिकपणा, सचोटी, पात्रता, दरारा व व्यक्तिमत्व ह्या गुणांचा बोध होतो. हे गुण मानवी जीवितास आधार देणारे आहेत. जीवनकलहास ह्यांपैकीं एकाची तरी आवश्यकता आहे. अंगठ्याच्या ह्या विभागावर व्यक्तीची जन्मजात प्रवृत्ति दिसून येते हें एक व ह्या भागावरील सूक्ष्मरेषाकृति आमरण टिकतात हें दुसरें; अशा दोन गोष्टींनीं अंगठ्याच्या पहिल्या पेऱ्यास विशिष्ट महत्त्व प्राप्त होतें. ही गोष्ट ओळखून अंगठ्याची निशाणी वा अंगठ्याचे ठसे घेण्याची पद्धति प्रचारांत आली आहे. गुन्हेगार व वाहिमी लोकांच्या अंगठ्यांचे ठसे संग्रहीं असल्यानंतर त्यांचा गुन्हा पुन्हां शाबीत करणें अथवा त्यांना हव्या त्या वेळीं गिरफदार करणें म्हणूनच शक्य ठरतें.

अंगठ्याच्या दुसऱ्या पेऱ्यावरून सारासार विचार, कोणत्याही विषयाचें आकलन, बुद्धीचें जडाजडत्व, निर्णयपद्धति व तर्कशक्ति इत्यादि बुद्धिजन्य गुणांचें ज्ञान होतें. पहिल्या व तिसऱ्या विभागांना जोडणारा हा मधला दुवा होय. त्या दोहोंचा योग्य समन्वय होऊं न देणें ह्या मधल्या विभागावर अवलंबून आहे.

शुक्रटेकडीचा उंचवटा हा अंगठ्याचा तिसरा भाग होय. त्यावरून मनोविकारांची तीव्रता, प्राणिमात्रांविषयीं वाटणारी सहानुभूति, भूतदया, प्रीतीचें स्वरूप, भावनाप्राधान्य इत्यादि गोष्टी समजतात.

वरील तिन्ही विभाग समप्रमाणांत असणें हें प्रमाणशीर अंगठ्याचें लक्षण आहे.प्रमाणशीर अंगठा ओळखण्याच्या खुणा अशाः—अंगठ्याच्या खालचे दोन विभाग सम असतात व नखाचें पाहिलें पेरें त्यांहून किंचित् कमी असतें. अंगठा हाताशीं फार वर अथवा एकदम खालीं जोडला गेलेला नसतो. तर्जनी व अंगठा ह्यांत रहाणारें अंतर बेतशीर असतें. त्याचप्रमाणें अंगठा अतिलहान अगर फार मोठा नसावा. त्याची लांबी तर्जनीच्या तिसऱ्या म्हणजे सर्वांत खालच्या पेऱ्याच्या मध्यबिंदूइतकी असावी. अंगठा ढिला, लिबलिबीत, खडबडीत अथवा राकट असूं नये.

प्रमाणशीर अंगठा असणें हें समतोलपणाचें उत्कृष्ट गमक आहे. स्वतःचें नुकसान वा इतरांची अवकृपा हा मनुष्य सहसा संपादन करीत नाहीं. सर्वांशीं तो खेळीमेळीनें वागतो. बहुतेकांचा विश्वास तो संपादन करतो. ह्याला मदत करण्यास लोक सदैव तयार असतात.

नखाचें पाहिलें पेरें मोठें व खालचे दोन्ही विभाग त्या मनानें लहान अशी वस्तुस्थिति असेल, तर मनुष्यास वारंवार पश्चात्ताप करण्याची पाळी येतें. उतावीळपणा, प्राप्त परिस्थितीचें अज्ञान, वर्तनाच्या परिणामाबद्दल बेफिकिरी इत्यादि गोष्टी प्रामुख्यानें आढळतात.

पहिला व तिसरा विभाग लहान आणि मधलें पेरें मोठें असेल तर बुद्धिमत्ता तीव्र पण शहाणपण वाजवी असतें. अशीं माणसें तोंडपाटिलकींत तरबेज, बडेजावी स्वभावाचीं, बढाईखोर, वावदूक वृत्तीचीं आणि तर्कदुष्ट असतात. हव्या त्या विषयांवर अचाट बडबडणें हेंच ह्यांचें वैशिष्ट्य होय.

पहिलीं दोन्ही पेरीं लहान ह्याचा अर्थ अंगठाच लहान असा होतो. एतदर्थ अंगठा लहान व तिसरा शुक्रटेकडीचा भाग त्यामानानें मोठा, असें दिसून आलें तर मनुष्य भोगलोलुप, विकारवश, ख्यालीखुशाली-

प्रिय असतो. नटणें-मुरडणें व इतरांच्या डोळ्यांत भरणें ह्यांकडे त्याचें लक्ष्य विशेष असतें. वासना जागृत झाल्याखेरीज त्याची बुद्धि कार्यप्रवृत्त होत नाहीं. त्यामुळें कोणत्याही कृतीचा उगम विचार, कल्पना अथवा तर्क ह्यापासून होण्याऐवजीं विकारांतून अथवा भावनेचें उद्दीपन झाल्यानंतर होतो. मात्र वासना निर्माण झाली कीं, तिच्या पूर्ततेसाठीं ह्या माणसाची विलक्षण धडपड सुरू होते.

तळहाताला अंगठा फार वरच्या बाजूस असणें चांगलें नव्हें. अशानें अंगठा व तर्जनी ह्यांत असणारें अंतर कमी होतें. त्यामुळें मनुष्य मतिमंद, तर्कहीन, मतलबी, सहवासास नालायक बनतो. तशांत अंगठा अति लहान असेल तर व्यक्तीच्या हातून पशुतुल्य वर्तन घडतें.

अंगठा तळहाताशीं खालचे बाजूस असणें इष्ट होय. अशा मनुष्याचे ठायीं सहानुभूति, दयालुत्व, परहिततत्परता हीं वास करतात. स्वभाव उदार पण बाणेदार असतो. मात्र हा अंगठा लवचीक नसावा; कारण वरील गुणांचा आतिरेक होण्याचा संभव असतो.

अंगठा व तर्जनी ह्यांमध्यें एका काटकोनाइतकें अंतर कमींत कमी असेल तर स्वभाव आनंदी, निःस्पृह, मनमोकळा असतो. समतोलपणाचें हें एक चिन्ह आहे. अंतर ह्यापेक्षां कमी असेल तर मनुष्य आंतल्या गांठीचा, संशयी, धीम्या वृत्तीचा व समजण्यास कठीण असा असतो.


आतांपर्यंत अंगठ्यासंबंधीं सर्वसाधारण विवेचन झालें. ह्यानंतर अंगठ्याचे जे प्रमुख प्रकार आहेत त्यांची माहिती घेऊं.

१. मूलभूत अंगठा (आकृति १२):—हा अंगठा आकारविहीन असतो. पाहिलें पेरें संपतें कोठें, मधला सांधा जोडला कोठें व दुसरें पेरें असतें केवढें ह्या गोष्टी जवळून सूक्ष्म पाहिल्या तरच कळतात. स्पर्श केल्यास हा अंगठा टणक, जाडजूड व राकट लागतो. ह्या अंगठ्याचा मनुष्य धश्चोट आचाराविचारांचा असतो व ह्याचें वर्तन पाशवी आहे असें दिसून येतें. मनुष्यजातीच्या प्रथमावस्थेंतील रानटीपणा ह्याचे ठिकाणीं दृष्टीस पडतो.



आकृति १२

२. हलुवार अंगठा (आकृति १३):—मांसल, मृदु पण प्रदीर्घ दडपणाखालीं ठेवल्याप्रमाणें चपटका व रुंद असा हा अंगठा असतो. जाडी कमी व पोंचटपणा फार हेंच ह्या अंगठ्याचें वैशिष्ट्य असतें. हीं माणसें मनोविकाराच्या दडपणाखालीं इतकीं भारावलीं जातात कीं रोजचा व्यवहार उरकतांना त्यांची त्रेधा उडते. असा अंगठा असतां तळहातावर रेषांचें दाट जाळें असलेलें आढळून येतें. एवढ्यातेवढ्या गोष्टीचा परिणाम मनावर करून घ्यावयाचा व वारंवार फुरंगटून बसावयाचें ही खोड अशा लोकांना उत्कट असते. हीं माणसें स्तुतीनें हुरळून जातात व जरा उणें अवाक्षर काढतांच क्षणांत गारठतातही.



आकृति १३

३. पसरट अंगठा (आकृति १४):—वरील हलुवार अंगठ्याची ही सुधारलेली आवृत्ति आहे. पहिलें म्हणजे नखाचें पेरें पोंचट असण्याऐवजीं वरील दोन्ही पेरीं (म्हणजे सबंध अंगठा) चापटक्या आकाराचीं असतात व अंगठ्याचा तळहाता-कडील दर्शनी भाग दिसावयास पसरट रुंद दिसतो. ह्या माणसाचें आरोग्य चांगलें असतें, व बहुतेक गोष्टी मन-गटाच्या बळावर हा पार पाडीत असतो. ह्याचे अंगीं क्वचित् हेकेखोरपणा असू शकतो. योग्य मार्गदर्शक व्यक्ति लाभेल तरच ह्या माणसाचें जीवित यशस्वी होतें.



आकृति १४

४. पसरट सांध्याचा अंगठा (आकृति १५):—ह्या अंगठ्याच्या दोन्ही पेऱ्यांतील संधीजवळचा भाग तेवढाच पसरट वा रुंद दिसतो. त्यामुळें अंगीं निश्चयाची तीव्रता व चिकाटी खूप वाढते. आरोग्य मात्र समाधानकारक नसतें. आणी-बाणीच्या वेळीं अथवा कसोटीच्या क्षणीं तसेंच मानसिक ताण अवास्तव सहन करण्याची पाळी आली असतां, त्यांतून निभावून जाण्याइतका जोम निर्माण करणें, हें या अंगठ्याचें वैशिष्ट्य होय. मात्र तेवढा क्षण उलटतांच



आकृति १५

मनोधैर्य नाहींसें होतें व मनुष्य दुपटी-तिपटीनें निष्क्रिय–निकामी–होतो. थोडक्यांत हें उसनें अवसान प्रसंगापुरतें अधेंमधें संचारतें व नंतर लगेच नाहींसें होतें.

५. प्रभावी अंगठाः–दोन्हीं पेऱ्यांची जाडी सारखी असते. अंगठा साकार, सुबक आणि अंगठ्याचें अग्र चौकोनी अथवा निमुळतें असतें. ह्या लक्षणांवरून मनुष्य सुसंस्कृत, सदाभिरुचीचा व कार्यकुशल असल्याचें दिसून येतें. हा मनुष्य दृढनिश्चयी असतो. आकर्षक व गोड भाषणानें कोणाचीही मर्जी प्रथम संपादावयाची व त्याच्या लक्षांत येण्याआधीं स्वतःचा कार्यभाग उरकावयाचा, ह्या क्रियेंत ह्या माणसाची बरोबरी कोणीही करणार नाहीं.

६. लवचीक अंगठा (आकृति १६):–प्रयत्नांतीं ह्या अंगठ्याचा बांक पाठीमागच्या बाजूस जवळजवळ अर्धवर्तुळ होण्याइतका दिसून येतो. ह्या माणसांची बुद्धि हरकामी व हजरजबाबी असते. पण ह्यांची वर्तणूक दरएक बाबतींत बाजवी असते. कोणतें तरी एक टोंक गांठावयाचें हेंच जणूं कांहीं ह्या लोकांनीं ठरविलें असावें अशी शंका येते. दूरदर्शित्वाचा अभाव, उथळपट्टी, थिल्लरपणा, चांचल्य इत्यादि गोष्टींमुळें आयुष्यांत ह्यांचा जम कधींच बसत नाहीं. हव्या त्या परिस्थितीशीं समरस होऊन जीवित कंठण्याची तयारी सतत असते.



आकृति १६

७. ताठ अंगठा (आकृति १७):–लवचीक अंगठ्याच्या उलट स्थिति ह्या अंगठ्याची आहे. अशा अंगठ्याचा मनुष्य एकमार्गी, दूरदर्शी, बुद्धि मर्यादित पण स्वक्षेत्रांत निपुण, अबोल व काटकसरी असतो. दहापांच गोष्टींचा हव्यास असण्यापेक्षां एकच उद्योग परिश्रमपूर्वक अखेरपावेतों धीरगंभीरपणें करीत रहाणें ह्याला आवडतें. रोजच्या व्यवहारांत हा कधीं फसायचा नाहीं. इतरांच्या भोळ्या वृत्तीबद्दल व खर्चिक स्वभावाबद्दल ह्याला अचंबा वाटतो.



आकृति १७

' Make hay while the sun shines ' अशा बाण्याची ह्याची वर्तणूक दृष्टीस पडते.



आकृति १८

८. खुंटीचा अंगठा (आकृति १८):-ह्या अंगठ्याचें पहिलें पेरें टोंका-जवळ खुंटीच्या आकाराप्रमाणें जाड टेंगळासारखें असून दुसरें पेरें किंचित् अरुंद व वाटोळें असतें. अंगठ्याचें नख आंखूड आणि खडबडीत दिसतें. असा मनुष्य शरिरानें घटिंगण, वर्तनानें आडदांड व बुद्धीनें आडमुठा असतो. न्याय-अन्याय, दया-क्षमा, समेट-सामोपचार इत्यादि शब्द ह्याला ठाऊकच नसतात. जिथें विरोध, हरकत, अडथळा येईल तिथें चवदावें रत्न सरसहा अमलांत आणायचें हें ह्याचें तत्त्व. क्वचित् प्रसंगीं प्रतिस्पर्धी आडमुठा, नमतें न घेणारा भेटेल तर हा त्याला देहान्त प्रायश्चित्त देऊन इहलोकचा कायमचा निरोप देण्यासही मागेंपुढें पहात नाहीं. त्याच्या ह्या अतिमानुष घृत्तीमुळें ह्या अंगठ्यास " खुनी अंगठा " असें संबोधण्याचा प्रघात पडला आहे.

मात्र खुंटीच्या आकाराच्या अंगठ्याचा मनुष्य दिसतांच त्याला ' भयंकर ' वा ' खुनी ' समजणें चूक ठरेल. बेफामपणापासून त्याला परावृत्त करणारीं चिन्हें त्याच्या हातावर अन्यत्र असूं शकतात. शिवाय वंशाची खूण म्हणूनही अशा आकाराचा अंगठा एकाद्या घराण्यांत पिढ्यान् पिढ्या चालत आला असल्याचें दिसून येतें. अशा वेळीं त्याच्या आई-बापांतील अथवा आजा–पणजांतील दोष त्याला स्वतःला चिकटविणें अन्यायकारक होय. म्हणून हातांवरील यच्चयावत् चिन्हें व रेषा सूक्ष्म रितीनें पहाव्यांत आणि कोणत्याही गोष्टीचा निर्णय नंतर द्यावा.

प्रकरण ५ वें : हाताचीं बोटें

कोणत्याही एका हाताच्या बोटांची संख्या बहुधा पांच असली तरी अंगठा हा स्वयंपूर्ण असा महत्त्वाचा विभाग मानण्यांत येत असल्यानें, हस्तसामुद्रिकशास्त्रांत बोटें ह्या सदराखालीं चार बोटांचाच विचार केला जातो. त्यामुळें ह्या चार बोटांसंबंधीं सर्वसाधारण माहिती व त्यांवरून होणारा बोध ह्याचा आपण विचार करूं.

दरएक बोटास त्याच्या मुळाशीं असणाऱ्या ग्रहउंचवट्याच्या नांवानें संबोधण्याचा प्रघात आहे; आणि बोटांचीं लक्षणें देखील त्या त्या उंचवट्यास अनुरूप आहेत. येणेंप्रमाणें अंगठ्याशेजारचें पहिलें बोट तर्जनी होय. ह्या तर्जनीला गुरु, मधल्या बोटास शनि, अनामिका वा तिसऱ्या बोटास रवि आणि करांगुलीस बुध अशा संज्ञा अनुक्रमें प्राप्त होतात. बोटांच्या ठेवणीनुसार बरावाईटपणा खालीं असणाऱ्या उंचवट्यास तारक किंवा मारक ठरतो.

चारीं बोटें उघडलीं असतां त्यांचीं अग्रें कधीं आंतल्या बाजूस तर कधीं मागल्या बाजूस झुकत असल्याचें दिसून येतें. हात स्वतःसमोर उघडा धरावा व बोटांना विशेष ताणा न देतां ही गोष्ट पहावी; अशा वेळीं बोटें शेवटांकडे बांक यावा तशीं आंतील बाजूस म्हणजे पाहणाराच्या मुखाकडे झुकतीं असतील तर मनुष्य साशंक व धीम्या वृत्तीचा असतो, आणि बोटांचीं अग्रें मागील बाजूस झुकतीं असतां मनुष्य भावनाप्रधान, परिवर्तनशील व हळुवार स्वभावाचा असतो.

बोटें लांब वा आंखूड अशा दोन प्रकारांचीं असतात. बोटें लांब किंवा आंखूड कशीं ओळखावीत ह्याबद्दल असणारा आडाखा असा. तळहातांवर बोटें मिटलीं असतां त्यांचीं टोंकें मनगटाजवळ येणें हा झाला बोटांचा प्रमाणशीरपणा. अर्थात् मनगटाचे अलीकडे म्हणजे चंद्र-शुक्र टेकडीस बोटांचीं अग्रें मुष्किलीनें पोहोंचणें हें बोटें आंखूड असल्याचें द्योतक होय, आणि मनगटाची सीमा ओलांडून बोटांचीं अग्रें पलीकडे पोहोंचतील तर तीं निःसंशय लांब बोटें समजावींत.

लांब बोटें असणारा मनुष्य (आकृति १९) सूक्ष्म दृष्टीचा, संशयी, थंड स्वभावाचा, मतलबी व अप्रामाणिक असतो. कोणत्याही गोष्टीचा जेवढा कीस काढतां येईल तेवढा काढणें ह्याला फार प्रिय असतें. निष्कर्ष काढून थोडक्यांत मिटतें घेणें ह्याला कधींच साधत नाहीं. क्षुल्लक गोष्टीला अवास्तव महत्त्व देऊन तिचा पिच्छा पुरवीत असतां, ढोबळ वा महत्त्वाच्या गोष्टींत होणाऱ्या अक्षम्य चुका ह्याचे ध्यानांतून निसटतात हे विशेष होय. हातीं धरलेल्या प्रश्नाबाबत पूर्ण समाधान झाल्याखेरीज हा इतर कोणत्याही गोष्टीकडे पहात नाहीं. वेळप्रसंगीं दुसऱ्याच्या उपयोगी पडण्याचे



आकृति १९

कामींही हा असाच संथपणा दर्शवितो. कार्य अर्धवट स्थितींत ठेवणें, निर्णय अनिर्णीत राहणें, मतें निश्चित नसणें, पसारा मांडल्याशिवाय कोणतीही गोष्ट न होणें हीं सर्व लांब बोटांचीं लक्षणें होत. त्यामुळें लांब बोटें असणारीं माणसें चिकाटीची आवश्यकता असेल त्या ठिकाणीं अत्यंत उपयुक्त ठरतात. आंकडेमोडीचीं हिशेबाचीं कामें, यांत्रिक दुरुस्तीचीं, कलाबुतीचीं, नक्षीचीं, पेंटिंगचीं, तंतु-वादनाचीं, कलाकुसरीचीं व संशोधनासारखीं छांदिष्ट कामें इत्यादि त्याचप्रमाणें ज्यांत तासचे तास उरस्फोड करणें आवश्यक असतें अशीं सर्व कामें लांब बोटें असणारीं माणसें आवडीनें करतात.

वरच्यापेक्षां उलट स्थिति आंखूड बोटांची (आकृति २०) आहे. तडकाफडकी निकाल लावणें हें आंखूड बोटांचें वैशिष्ट्य होय. हेंगल घालणें, पाल्हाळ लावणें, अथवा भिजत घोंगडें ठेवणें ह्या लोकांना कधींच खपत

नाहीं. ता म्हणतां ताकभाताची खूणगांठ हें मनाशीं बांधतात. कोण-



आकृति २०

त्याही तत्त्वांतील मर्म ध्यानीं येतांच बाकीचें सारें शब्दावडंबर ह्यांच्या दृष्टीनें कुचकामी ठरतें. स्वतःचा हेतु मोकळ्या शब्दांत इतरांपुढें मांडणें हा तर ह्यांच्या हातचा मळ होय. दुसऱ्यांना कंटाळा न यावा, त्यांचीं मनें स्वतःच्या हेतूंबद्दल विपरीत बनूं नयेत, म्हणून माफक भाषणाची सजावट विनोदगर्भ व अर्थपूर्ण रितीनें करण्यांत ह्यांचें जें चातुर्य दिसून येतें तें अत्यंत आश्चर्य-कारक होय. ह्या लोकांना मोठ्या मोठ्या गोष्टी करणें व अधिकाराच्या जागा संभाळणें प्रिय असतें. ह्यांच्यांतील दोष हाच कीं, तडकाफडकी निर्णय लावण्याच्या ह्यांच्या उतावळ्या स्वभावापायीं हीं माणसें पुष्कळ वेळां चुकीचीं अनुमानें काढतात. काढलेलें अनुमान चूक असल्याचें दुसऱ्या कोणीं दाखवलेलें ह्यांना सुळींच खपत नाहीं. अखेर व्हायचें तेंच होतें. ज्या वेळीं ह्यांना पश्चात्ताप होतो व हीं माणसें पेचांत सांपडतात. त्यावेळीं किंकर्तव्यमूढ बनून लांब बोटें असणाऱ्या आपल्या सहकाऱ्यांची मदत ह्यांना घ्यावी लागते. हीं माणसें फार कडक असतात. ह्यांच्या रागास डिवचणें अनर्थकारक ठरतें. संतापाचे भरांत ह्यांचे हातून अनन्वित कृत्यें घडतात. अशा वेळीं स्वतःचें नुकसान होण्याची पाळी आली तरी ह्यांना त्याची पर्वा नसते.

लांब व आंखूड ह्या प्रकारांप्रमाणेंच गांठीची व नितळ असे आणखी दोन प्रकार बोटांत संभवतात.

गांठींचीं बोटें:–(आकृति ७) ह्या गांठी म्हणजे दोन पेऱ्यांमध्यें उघडा पडणारा अथवा टेंगळाप्रमाणें दिसणारा सांध्याजवळील हाडाचा

टणक भाग होय. प्रत्येक बोटास दोन ह्या हिशेबानें दरएक हाताला अशा आठ गांठी दिसणें शक्य आहे. तथापि त्या पहिल्या व दुसऱ्या पेऱ्यांमधील म्हणजे वरच्या अथवा दुसऱ्या आणि तिसऱ्या पेऱ्यांमधील म्हणजे खालच्या येणेंप्रमाणें कुठल्याही असूं शकतील. वरच्या सांध्याजवळच्या गांठी व खालच्या सांध्याजवळील गांठी ह्या दोहोंचीं फळें भिन्न आहेत व म्हणूनच ह्या संधीलगतच्या सर्व गांठी एकाच व्यक्तीचे ठायीं संभवतील असा नेम नसतो.

वर असणाऱ्या संधीजवळच्या गांठी दृगोचर होतील तर मनुष्याच्या विचारांत व कृतींत निश्चितपणा असतो. पुष्कळ कामें एकाच वेळीं करायचीं असतां अथवा दहा पांच उलट–सुलट प्रश्नांची वासलात तावडतोब योग्य रितीनें लावण्याचा प्रसंग ओढवला असतां मनुष्य गोंधळून जात नाहीं. तर त्या वेगवेगळ्या विचारांचा अथवा कामांचा अनुक्रम प्रथम तो मनाशीं नीट ठरवील आणि नंतर एकेकाची विल्हेवाट तो क्रमवार लावील. बोटांच्या पहिल्या पेऱ्यांवरून बौद्धिक गुणांचें प्रमाण मनुष्यांत जास्त असल्याचें दिसून येतें. अर्थात् वरच्या सांध्याजवळ असणाऱ्या गांठीवरून आचारा–विचारांतील सुसूत्रता समजावी हें साहजिकच आहे.

दुसऱ्या म्हणजे बोटांच्या मधल्या पेऱ्यांवरून व्यवहारज्ञानाचा बोध होतो. अतएव खालचीं म्हणजे दुसरीं पेरीं जेथें संपतात त्या ठिकाणच्या गांठी हातांवर दिसतील तर अशा मनुष्याचे आचरणांत चोखपणा, वक्तशीरपणा, स्वच्छता, नीटनेटकेपणा व टापटीप दिसून येते. घरीं, दारीं, कचेरींत अथवा कोठेंही पहा; त्या त्या ठिकाणीं स्वतःचें व्यक्तिमत्व वरील गुणसमुच्चयाचे योगें इतरांच्या प्रत्ययास हा मनुष्य आणून देईल.

दोन्ही संधीलगतच्या गांठी एकाच व्यक्तीचे ठिकाणीं दिसून आल्यास अशा मनुष्याची बुद्धि विचक्षणात्मक व अति तीव्र असते. हा मनुष्य हुषार, तत्त्ववेत्ता व कोणत्याही गोष्टीची पद्धतशीर छाननी करणारा असतो.

एकंदरींत बोटें गांठीचीं असणें बुद्धिमत्तादर्शक होय. सांध्यांजवळ असणाऱ्या हाडांच्या वाढीमुळें बोटांच्या बाह्यरेषा वक्र होतात व आंतून वाहणारी विद्युत्शक्ति संधीजवळ घोंटाळते; त्यामुळें स्वभाव सखोल बनतो.

बोटांच्या समांतर रेषा सांध्यांतील गांठींच्या वाढीनें ज्याप्रमाणें बिघडतात, त्याप्रमाणें बोटेंच जर वक्र असतील, एक बोट दुसऱ्या बोटाकडे झुकतें वळलें असेल तरीही ही बाह्यरेषा बिघडूं शकते. अशा वेळीं मात्र विद्युत्प्रवाहांत व्यत्यय येतो. जें बोट सरळ असेल अथवा ज्या विशिष्ट बोटाकडे एक अथवा अधिक बोटें झुकतील त्या बोटाखालचा ग्रहउंचवटा अधिक प्रभावी असतो. उलट एकादें बोट मूळ सांध्याभोंवतीं वाजवी अथवा चक्राकार फिरण्याइतकें शिथिल असेल, तर त्या बोटाखालीं असणारा ग्रहउंचवटा अशुभ आहे असें मानावें.

बोटें नितळ म्हणजे लांब, सडक व गांठीविरहित असतील, तीं वक्र नसतील तर मनुष्य स्वार्थी, भावनाप्रधान, लहरी व संकुचित वृत्तीचा असतो. अशा मनुष्याची प्रेरणाशक्ति अतिप्रभावी असते. त्यामुळें कोणत्याही बाबतींत प्रथमदर्शनीं घेतलेला ह्याचा निर्णय अचूक ठरतो. मात्र निसर्गतः प्राप्त झालेल्या ह्या देणगीचा उपयोग ह्याला स्वतःला फारसा होत नाहीं. तर्कपद्धति सदोष असल्यानें व कोणतीही गोष्ट बेमुदत रेंगाळत ठेवण्याच्या ह्याच्या स्वभावामुळें अखेर परिणामीं कांहींतरी अनपेक्षित प्रकार घडून येतो. पूर्वग्रहदूषित दृष्टीनें पहाण्याची संवय असल्यामुळेंही हातून पुष्कळदां चुका घडतात. ह्या माणसाला फक्त स्वहित व पैसा दिसत असतो. खर्चाचीं सदरें शक्यतों कमी करून वित्तसंचयाकडे ह्याची दृष्टि असते. दुसऱ्यापुढें हात पसरण्याची वेळ ह्याच्यावर सहसा येत नाहीं व कोणत्याही गोष्टीचा दूरवर विचार केल्याशिवाय पुढचें पाऊल हा टाकीत नाहीं.


बोटें उघडलीं असतां तीं परस्परांपासून विरळ, गांठीचीं अथवा वक्र असतील—दोन बोटांमध्यें फटी दृष्टीस पडतील—तर मनुष्याचा स्वभाव दिलदार, खर्चिक, मनमिळाऊ व बडबड्या असतो. ह्याच्याशीं स्नेह जमण्यास विलंब लागत नाहीं. उलट बोटें परस्परांशीं खेटून (नितळ व सरळ) असतील, चारी बोटांत यत्किंचितही फट दिसत नसेल तर मनुष्य मतलबी, कृपण, कोत्या मनाचा, रूढिप्रिय, संशयखोर व मितभाषी असतो. त्याच्या स्वभावाचा थांगपत्ता चटकन लागत नाहीं.

त्याच्याशीं स्नेह जमणें वा जमून तो टिकणें मोठें मुष्किलीचें ठरतें. आपणांत अशी समजूत आहे कीं, विरळ बोटें असणें हें पैसा घालवण्याचें चिन्ह असून, घुनेगची दर्जा (फटी) भरल्याप्रमाणें परस्परांना जवळजवळ खेटून असणारीं बोटें लक्ष्मीदायक होत. ह्या समजुतीचा उगम आतां लक्षांत आलाच असेल.

चारी बोटें एका पातळींत असणें शुभ मानण्यांत येतें. (आकृति २१).



आकृति २१




आकृति २२

जें बोट इतरांपेक्षां खालच्या पातळींत असेल त्या बोटाची शक्ति अगर त्या बोटाखालीं असणाऱ्या उंचवट्याचें शुभफल कमी होतें. उलटपक्षीं जें बोट इतरांपेक्षां वरच्या पातळींत असेल, त्या बोटानें दिग्दर्शित होणारी गोष्ट व्यक्तीचे ठिकाणीं उत्कटपणें वसत असते. करांगुलि बहुधा तीन बोटांपेक्षां खालच्या पातळींत असलेली आढळून येते (आकृति २२). आयुष्यांतील प्रारंभीचे दिवस खडतरपणें गेल्याचें हें चिन्ह होय. आयु-



आकृति २३



आकृति २४



आकृति २५

ष्यांत कोणतीही गोष्ट अट्टहास धरून झगडल्याशिवाय सहजासहजीं साध्य होत नाहीं, ती देखील ह्या करांगुलीमुळेंच. अनामिका खालच्या पातळींत असेल (आकृति २३) त्यानें नांवलौकिक मिळविण्याची गोष्ट मनांत कधींही आणूं नये. मध्यमा खालीं असतां (आकृति २४) मनुष्याचा तोल क्षणभर देखील स्थिर राहणें कठीण; आणि तर्जनी खालीं दिसेल तर (आकृति २५) त्या मनुष्याची महत्त्वाकांक्षा सफल होणें सर्वथा अशक्य. ह्यामुळें जें बोट उंच पातळीवर असतें तें अधिक जोरदार समजावें. त्या बोटाखालीं असणाऱ्या उंचवट्याच्या गुणधर्मांनुसार तीं तीं उत्कट फलें त्या मनुष्यांत आढळून येतील ह्यांत शंका नाहीं.

दरएक बोटाच्या भिन्न फलांचा विचार आतां आपण करूं.

पहिलें बोट तर्जनी. तर्जनीवर गुरूचा अम्मल आहे. अंगठ्याखालोखाल महत्त्वाचें असें हेंच बोट होय. विद्युत्प्रवाह प्रथम ह्या अंगुलींतून प्रवेश करतो. धनरेषा वगळली तर बाकीच्या तीन प्रमुख रेषा—अंतःकरणरेषा, मस्तकरेषा व आयुष्यरेषा—गुरुउंचवट्याचे आसपास थेट तर्जनीखालीं उगम पावतात. सत्ता, अधिकार, जबाबदारी, स्वामित्व, महत्त्वाकांक्षा इत्यादि प्रमुख गुण गुरुउंचवट्याचे होत. हे गुण तर्जनींत समाविष्ट असतात. दुसऱ्याला दटावण्यासाठीं आपण ह्या बोटाचा उपयोग अगदीं बाल्यावस्थेपासून करीत असतों. ' चूप बैस ' अशा संकेतानें चटकन् आपली तर्जनी आपण नाकाशीं समांतरानें धरतों. तर्जनीचा बांक मध्यमेकडे जात्याच दिसेल, तर अधिकार प्राप्त होऊनही त्याचा दुरुपयोग करण्याची प्रवृत्ति बळावते. असा मनुष्य तेव्हांच चढेल व अहंमन्य बनतो. आकांक्षा फलद्रूप होण्याइतकी हुषारी त्याचे ठिकाणीं असते व त्यांत अखेर तो यश मिळवतोहीं; परंतु त्याला लोकप्रियता मिळत नाहीं. तर्जनीचें पहिलें पेरें खालच्या दोहोंपेक्षां अधिक लांब असणें जबर महत्त्वाकांक्षेचें चिन्ह होय. अशांतच पीहल्या संधीजवळची गांठ दृग्गोचर झाली तर महत्त्वाकांक्षेची पूर्ति तो आपल्या बुद्धिमत्तेनें करतो.

दुसरें म्हणजे मधलें बोट शनीच्या गुणधर्मांचें आहे. हें बोट इतर तीन बोटांपेक्षां उंचीनें मोठें, सरळ व प्रमाणशीर असणें अत्यंत आवश्यक

आहे. इंग्रजींत ह्या बोटाला 'Balance wheel' असें म्हटलें आहे. हें बोट वक्र, ठेंगणें अथवा खालच्या पातळींत असेल तर आटोपलेंच. समतोल वृत्ति संभाळण्याच्या छांदिष्टपणापायीं अशा मनुष्याचें अपरिमित नुकसान होतें. पुढारी होण्याइतकी गाढ विद्वत्ता अंगीं असतांही त्याचें जीवित व्हावें तितकें यशस्वी होत नाहीं. स्वतःचीं प्रामाणिक मतें तो स्वच्छ बोलून दाखवीत नाहीं. प्रत्येकाचें म्हणणें ऐकून घेऊन कोणालाही नाखूष न करण्याची त्याची पद्धत असते. त्यामुळें त्याच्याबद्दल हळूंहळूं अविश्वास उत्पन्न होतो. थोडक्यांत ज्याला उज्ज्वल यश संपादावयाचें त्याचें हें मधलें बोट किंवा शनीचा उंचवटा अनुकूल हवा. मध्यमा फार लांब असेल तर मनुष्यांत धडाडी नसते. आलेली संधि सर्वतोपरी साधण्याइतकी चपळाई त्याच्या अंगीं नसते; त्यामुळें समाजांत तो पुढें कधींच येत नाहीं. उलट हें बोट आंखूड असेल तर दूरदर्शित्व कमी असतें. मागचा पुढचा विचार न करतां हव्या त्या ठिकाणीं बिनदिक्कत उडी टाकण्यांत हा मनुष्य पटाईत असतो व शेवटीं पश्चात्ताप पावतो.

तिसऱ्या बोटास 'अनामिका' अशी संज्ञा आहे. ह्या बोटाखालीं रवीचा उंचवटा असल्यानें सांपत्तिक भरभराट, मानसन्मान, जागतिक प्रसिद्धि व विशेषतः निष्कलंक यश ज्याला हवें त्याची अनामिका व रवीचा उंचवटा बिघडतां कामा नये. देवाला गंध लावण्यासाठीं आपण हें बोट उपयोगांत आणतों. कारण ह्या बोटासंबंधीं पवित्रता अतिप्राचीन व शास्त्रसम्मत आहे. हें बोट मध्यमेइतकें लांब असणें अनिष्ट होय. मनुष्यास जुगार, शर्यती, लॉटरी, बेटिंग इत्यादि नाद त्यायोगें जडतो. येनकेन प्रकारेण खूप पैसा मिळवून आकस्मिक पुढें येण्याचीं मनोराज्यें त्याला सुचतात. प्रमाणशीर बोट, विशेषतः वरचीं दोन पेरीं अनुकूल असतील त्याला धन व कीर्ति मिळूं शकते. रवीच्या उंचवट्याचा आणखी एक प्रमुख गुण म्हणजे कलाप्रियता. ह्या गुणाचें अस्तित्व देखील अनामिका निर्दोष असेल तरच संभवतें. मात्र कलानिर्मिति हातून प्रत्यक्ष व्हावयास ही अंगुलि अर्धवर्तुळाकार वा चौरस टोंकाचीं असणें आवश्यक आहे. निमुळतें अथवा टोंकदार अग्र असेल तर अशा मनुष्याच्या ठिकाणीं फक्त कला-

भिरुचि दिसून येईल. अनामिका वक्र असणें हें उथळ ज्ञानाचें द्योतक आहे. केवळ पैशाकडे पाहून कलेच्या नांवाखालीं जो बीभत्स प्रकार वा सावळागोंधळ चालू असतो, त्याला कारण हीन अभिरुचि व कोतें ज्ञान होय.

शेवटचें बोट म्हणजे करांगुलि. हें बोट सर्वांत लहान खरें, तथापि ह्या बोटाची कीर्ति फार मोठी आहे. वक्र, मुळाभोंवतीं चक्राकार फिरणारी, खालचीं दोन पेरीं लांब व पहिलें पेरें टोंकदार अशी करांगुलि असणारे लोक चोर, दरोडेखोर, खिसेकापू, खोट्या साक्षी देणारे, बनावट नाणीं अथवा कागदपत्र तयार करणारे असे असतात. इतरांना विस्मयाचा धक्का बसेल अशा अनेक प्रकारच्या भानगडी व घोटाळे हे लोक निर्माण करतात. बुधाचा उंचवटा ह्या बोटाचे पायथ्याशीं आहे. हा उंचवटा ज्यावेळीं अशुभ फलें दर्शवितो, त्याच वेळीं करांगुलि बिघडलेली म्हणजे वरील लक्षणांनीं युक्त अशी असते. ह्याचाच अर्थ हीं माणसें विलक्षण बुद्धिमान् असतात. पण ह्यांना बुद्धीचा विनियोग असनदशीर वा अशिष्ट मार्गांनीं केल्यावांचून चैनच पडत नाहीं. केवळ स्वतःच्या समाधानासाठीं इतरांवर अनर्थकारक परंपरा हे आणतात व स्वतः शिक्षेस पात्र होतात. करांगुलि निर्दोष असणें म्हणूनच महत्त्वपूर्ण आहे. करांगुलि प्रमाणशीर, सरळ, चौरस वा अर्धवर्तुळाकार असेल तर लेखन, वक्तृत्व, समयसूचकता, सभाधीटपणा इत्यादि गुण दृष्टीस पडतात. निमुळती व टोंकदार करांगुलि मिठ्ठास भाषण, दुटप्पी वर्तन, संधिसाधुपणा इत्यादि दर्शविते. त्यामुळें व्यापारीवर्ग, वकील, बॅरिस्टर्स, मुत्सद्दी किंवा राजकारणांत पुढें आलेले लोक, त्याचप्रमाणें विविध क्षेत्रें संभाळण्याचें जबाबदार कार्य करीत असणारा अधिकारीवर्ग ह्या सर्वांची करांगुलि निमुळती अथवा टोंकदार असल्याचें बहुधा आढळून येतें.

प्रकरण ६ वें : ग्रह व उंचवटे

ग्रह–उंचवट्यांचीं भिन्नभिन्न फलवर्णनें त्या त्या ग्रह-उंचवट्याच्या नांवें स्वतंत्र प्रकरण लिहून थोडक्यांत दिलीं आहेत. तथापि त्यापूर्वी कोणत्याही ग्रह–उंचवट्यास लागूं पडतील असे सर्वसाधारण नियम ध्यानांत ठेवणें आवश्यक आहे. अमुक एक उंचवटा इतरांपेक्षां अधिक बलवान् आहे ही गोष्ट निश्चित समजावयास हवी. हात पुढें येतांच त्यावरील ग्रहउंचवट्यांचें बलाबल न समजलें, गुणानुक्रमें त्यांचा फलादेशाच्या कामीं कसा उपयोग करून घ्यावयाचा ह्याबद्दल आपण माहिती न मिळवली, तर ग्रह-उंचवट्यांचीं निव्वळ गुणधर्मवर्णनें वाचून काय उपयोग ?

व्यक्ति वर्णानें काळी, गोरी, निमगोरी अथवा हव्या त्या रंगाची असो. त्या व्यक्तीच्या तळहाताचा रंग ग्रहउंचवट्यांच्या प्राधान्यावर अवलंबून असतो. प्रत्येक ग्रहउंचवट्याचा रंग भिन्न असा प्रकार मात्र नाहीं. तर चार रंग प्रामुख्यानें सात ग्रहउंचवट्यांत मिळून वांटले गेलेले दिसून येतात. पांढरा रंग चंद्राचा, तांबूस वर्ण शुक्र, गुरु व रवि ह्यांचा, रक्तवर्ण मंगळाचा, पीतवर्ण किंवा निळसर–काळपट छटा शनि आणि बुध ह्या ग्रहउंचवट्यांची. येणेंप्रमाणें रंगांची वांटणी झाली आहे. सामान्य व्यक्तींचे हातांवर संमिश्र ग्रहउंचवट्यांचें आस्तित्व बहुधा आढळून येतें. उंचवट्यांच्या अशा संयुक्त उपस्थितीमुळें अर्थात् तळहातांवर दोन वा तीन रंगांच्या सूक्ष्म छटा सर्वत्र दिसून येतात. निव्वळ गुरुउंचवटा प्रधान अथवा फक्त मंगळउंचवटाच बलिष्ठ अशी व्यक्ति सांपडणें अतिदुर्मिळ आहे. तेव्हां रंगांच्या ह्या मिश्रणांत अधिक छटा पांढऱ्या रंगाची असेल, तर चंद्रउंचवटा विशेष बलवान् आहे असें समजावें. पिवळा रंग जास्त प्रमाणांत आढळून येईल तर शनि किंवा बुध ह्या ग्रहांपैकीं एकादा उंचवटा बालिष्ठ असल्याचा निष्कर्ष काढावा आणि तांबूस वर्ण विशेषत्वानें दिसल्यास गुरु, रवि अगर शुक्र ह्यांपैकीं कोणत्या तरी एका ग्रहउंचवट्याचें प्राधान्य मानावें. हाच तांबूस वर्ण जास्त गडद – तांबडा लाल – झाला तर व्यक्ति पूर्णपणें मंगळाच्या गुणधर्माखालील आहे असें बिनधोक समजावें.

रंगांचा उपयोग उंचवट्यांचें बलाबल ठरविण्याचे कामीं अशा रितीनें करून घेतल्यानंतर साहजिकच एक नवा प्रश्न उद्भवतो तो हा कीं, हातावरील रंगाची छटा तांबूस असेल तर रवि–गुरु–शुक्र ह्यांतून नेमका कोणता एक विशिष्ट ग्रहउंचवटा प्रभावी मानावयाचा? तसेंच पीतवर्ण शनि आणि बुध ह्या दोन ग्रहउंचवट्यांचा असल्यानें, ह्या दोहोंतून नेमका बलवान् ग्रहउंचवटा कसा ओळखायचा? एवढेंच नव्हें तर रंगांवरून ग्रहउंचवट्यांचें बलाबल ओळखणें सर्वच ठिकाणीं शक्य नसतें. तर रंगांपेक्षांही ग्रहउंचवट्यांचा सरस–निरसपणा ज्यायोगें दृग्गोचर होईल अशीं आणखी कांहीं साधनें नाहींत काय?

ग्रहउंचवट्यांचें बलाबल चटकन ओळखतां येईल अशीं लक्षणें पुढील होत.

ज्या ग्रहउंचवट्यावर एक वा अधिक ऊर्ध्वरेषा असतील तो ग्रह-उंचवटा बलवान् समजावा.

ह्या ठिकाणीं आणखी एक असाही प्रश्न संभवतो! ऊर्ध्वरेषा ज्या भागावर असतील तो तळहाताचा विभाग फुगीर कसा असूं शकेल? आणि तो फुगवटा आल्यासारखा दिसत नसेल तर त्याला उंचवटा म्हणून संबोधणें तरी वस्तुस्थितीस सोडून नव्हे काय?

उलट वस्तुस्थिति अशी आहे कीं, ऊर्ध्वरेषा उपस्थित झाल्याकारणानें ज्या ठिकाणीं उंचवटा असावयाचा तो प्रदेश अधिक खोलगट दिसतो. नदीचें पात्र उंचसखल भूभागांतून मार्ग काढीत गेल्यामुळें, दुथडीचा भागच ज्याप्रमाणें फुगवटा आल्यासारखा दिसतो, तद्वत् ग्रहउंचवट्यावर ऊर्ध्वरेषा निर्माण होतांच, फुगीर प्रदेश त्या त्या विशिष्ट बोटाच्या पायथ्याशीं मधोमध दृग्गोचर होण्याऐवजीं अलीकडे वा पलीकडे तो सरकला गेल्याचें दिसून येतें. तथापि असें जरी घडलें तरी ग्रहउंचवटा ऊर्ध्वरेषेनें छेदला जाणें ह्याचा अर्थच त्या विशिष्ट ग्रहउंचवट्याच्या गुण-धर्मांप्रमाणें व्यक्ति स्वतःचें जीवित व्यतीत करणार, विशिष्ट आवडी–निवडी ह्यातींत स्वतःच्या हृदयाशीं बाळगणार आणि विशिष्ट तऱ्हेचे सुखोपभोग त्या व्यक्तीच्या वांट्यास अधूनमधून हमखास येणार असा आहे हें निश्चित समजावें.

दोन शेजारीं शेजारीं असणारे उंचवटे ऊर्ध्वरेषांनीं युक्त व बलवान् असतील तर ग्रहउंचवटा त्या त्या बोटाखालीं दिसण्याऐवजीं दोन बोटांच्या मधोमध कां दिसतो हें आतां सहज समजेल. अशा वेळीं एकच ग्रहउंचवटा बलवान् समजून दुसऱ्याकडे दुर्लक्ष्य होण्याचा संभव जास्त. तरी दोन्ही ग्रहउंचवटे बलवान् असल्याची नीट खात्री करून घ्यावी. तसेंच दोन बोटांच्या मध्यें तळहातावर ग्रहउंचवटा दिसला कीं, तो विशिष्ट उंचवटाच अस्थानीं आहे असें समजणें चुकीचें कसें आहे ही गोष्टही ध्यानांत आलीच असेल. कोणत्याही ग्रहउंचवट्यावर ऊर्ध्वरेषा नसतील व जर तो स्वस्थान सोडून अलीकडे वा पलीकडे सरकला असल्याचें दृष्टीस पडेल, तर स्वस्थान सोडणाऱ्या अशा ग्रहउंचवट्याची फलें उत्कटपणें देण्याची शक्ति कमी होते व ज्या अन्य ग्रहउंचवट्याकडे तो आकर्षिला जाईल, त्याच्या गुणावगुणांची भेसळ मूळच्या उंचवट्याच्या गुणधर्मांत साहजिकच होते ही गोष्ट विसरूं नये. उदाहरणार्थ, गुरूचा उंचवटा तर्जनी व मध्यमा ह्या दोन बोटांच्या मधल्या विभागांत म्हणजे शनीच्या उंचवट्यांकडे खेंचला गेलेला दिसेल, त्या वेळीं गुरुउंचवट्याच्या अस्तित्वानुसार व्यक्ति महत्त्वाकांक्षी असेल, लौकिक वा यश मिळविण्याची उमेद बाळगील, सत्ता वा अधिकारपद कर्तबगारीनें मिळवील हें सर्व खरें. तथापि हाच गुरूचा उंचवटा शनिअंगुलीकडे आकर्षिला गेल्यानें शनीच्या उंचवट्यानुसार ती व्यक्ति मतलबी, गूढ स्वभावाची, मानासाठीं हपापलेली व महत्त्वाकांक्षापूर्तीसाठीं हव्या त्या उपायांचा अवलंब करणारी असूं शकते. अशा रितीनें अस्थानीं असणाऱ्या उंचवट्याचीं फलें नीट विचारपूर्वक ठरवावींत.

हाताचें जें बोट सर्वांपेक्षां लांब, सरळ, पुष्ट, वरच्या पातळींत, ज्याचें पहिलें पेरें अधिक लांबीचें व अग्र टोंकदार असतें, त्या बोटाच्या तळाशीं असणारा उंचवटा सामान्यतः प्रभावी असतो. तसेंच ज्या एका विशिष्ट बोटाकडे बाकीचीं तीन बोटें झुकतीं दिसतील, त्या बोटाखालचा उंचवटाही बलवान् असतो. उलट जें बोट आंखूड, वांकडें-तिकडें निःसत्त्व व इतर कोणत्याही बोटाकडे आकर्षिलें गेलें असेल, त्याखालीं असणारा ग्रहउंचवटा बलहीन समजावा.

जी गोष्ट बोटांची तीच रेषांसंबंधीं. जो ग्रहउंचवटा प्रभावी असतो त्या विभागाकडे तळहातावरील प्रमुख वा दुय्यम रेषा कधीं कधीं आकर्षिल्या जातात असें दिसून येतें. उदाहरणार्थ, गुरु-उंचवटा अति अप्रतिम असेल तर अन्तःकरणरेषा, मस्तकरेषा व आयुष्यरेषा ह्या तिन्ही रेषा गुरु-उंचवट्यासन्निध उगम पावतील ह्यांत शंका नाहीं. तथापि धनरेषा, मंगळरेषा (आयुष्यरेषेच्या आंत असणारी समांतर रेषा) व आयुष्यरेषेंतून निघणाऱ्या ऊर्ध्वरेषा ह्या सर्व गुरु-उंचवट्याचे अनुरोधानें जाऊन तेथें आसपास विराम पावतात.

शेवटीं एकच महत्त्वाची बाब सांगावयाची उरली. कोणताही ग्रह-उंचवटा शुभ वा अशुभ असूं शकतो. तो कसा ओळखायचा हें आपण पाहूं.

उंचवट्याचे गुणधर्मांव्यतिरिक्त व्यक्तीच्या आयुष्यांत अन्य फलानुभव दुसरे कोणतेच असूं शकत नाहींत. उदाहरणार्थ, मंगळ-उंचवटा जर बलवान् (शुभ) असेल तर व्यक्तीच्या आयुष्यांत मंगळाच्या गुणधर्मांशीं निगडित अशा प्रसंगांचीच लयलूट होईल हें उघड आहे. मंगळ-उंचवटा प्रभावी असतां व्यक्ति तडफदार, करारी बाण्याची, संकटाला कधीहीं हार न जाणारी, धीरोदात्त अशी असायचीच. त्या व्यक्तीच्या ठायीं शनि-उंचवट्याचा भेंकडपणा, खुनशी प्रवृत्ति, संकुचित आचार किंवा चंद्र-उंचवट्याची एकांतप्रियता, वाजवी सहनशीलता इत्यादि अवांतर गुणधर्म जात्याच नसतात. फरक एवढाच कीं, ग्रहउंचवटा जर शुभफलप्रद असेल, तर त्या उंचवट्याचे गुणधर्म व्यक्तीच्या प्रगतीस अत्यंत पोषक असे असतात; आणि त्याच गुणधर्मांचा अतिरेक झाला अथवा त्या गुणधर्मांची उणीव व्यक्तीच्या ठायीं सतत दिसून आली तर तो विशिष्ट ग्रहउंचवटा अशुभ मानावा. जसें, मंगळ-उंचवटा तळहातावर दिसत असतांही तो जर अशुभ असेल तर व्यक्ति निष्ठुर, संतापी व क्रूर असते; आणि मंगळ उंचवट्याची उणीवच जर तळहातावर दिसून येईल, तर उपरोक्त मंगळग्रहाचे गुणधर्म व्यक्तीच्या ठायीं अजिबात नसतील हें उघड आहे.


कोणताही ग्रहउंचवटा हातावर वाजवी क्षेत्र व्यापील, फार उंचच उंच दिसेल, स्पर्श केला असतां हाताला दगडाखारखा कठीण अगर रूं भरलेल्या उशीप्रमाणें त्राणहीन लागेल, त्या वेळीं तो उंचवटा दृग्गोचर होत

असतांही अशुभ फलें निर्माण करतो तीं विशिष्ट ग्रहगुणधर्मांच्या अति-रेकामुळें होत. तसेंच उंचवट्याची जागा जेव्हां सपाट, खोलगट अथवा अशुभ चिन्हांनीं युक्त असते, तेव्हां त्या विशिष्ट ग्रहउंचवट्याचे गुणधर्म व्यक्तीच्या ठायीं जात्याच संभवत नाहींत म्हणून तो अशुभ ठरतो. जसें, मंगळ-उंचवटा सपाट असेल अथवा त्या ठिकाणीं खोलगटपणा दृष्टीस पडेल तर व्यक्ति दुर्बल, धक्काधक्कीच्या जिण्यास सर्वस्वीं अपात्र, नेभळट, गुळमुळीत स्वभावाची, थोडक्यांत मंगळाच्या गुणधर्मांपासून चार पावलें दूर अंतरा-वर राहणारी असते.

सारांश, तळहाताच्या एकंदर ठेवणीस साजेल असा, किंचित् उठावदार, स्पर्शाला रबराप्रमाणें गुबगुबीत लागणारा, ऊर्ध्वरेषा व निर्दोष अंगुली धारण करणारा ग्रहउंचवटा शुभ होय. वाजवी वाढलेला, ठिसूळ, आडव्या–तिडव्या रेषांनीं छेदित, खोलगट, वक्र अंगुलि आणि अशुभ चिन्हें धारण करणारा ग्रहउंचवटा अशुभ होय. हे ध्यानांत ठेवूनच पुढील प्रकरणें चाळावींत.

प्रकरण ७ वें : गुरु-उंचवटा

तर्जनीखालीं असणारा उंचवटा गुरूचा आहे (आकृति २६). हा उंच-वटा प्रभावी असेल तर व्यक्तीच्या ठिकाणीं मुख्य गोष्ट जी उत्कटपणें वसत असते ती महत्त्वाकांक्षा ही होय. ही महत्त्वाकांक्षा पैसा वा सुख मिळ-विण्याची नसून सत्ता अथवा मानमरातब मिळविण्याची असते. गुरु-उंचवटा प्रधान असणारीं माणसें कनक अथवा कांता ह्या दोहोंविषयीं फारसा विचार करीत नाहींत. अर्थात् ह्या दोन गोष्टींची त्यांना आव-श्यकता नसते किंवा ह्या गोष्टी आपसुख चालत आल्या तर त्यांना नको असतात असा ह्याचा अर्थ नव्हे; तर ह्या बाबी त्यांच्या दृष्टीनें दुय्यम स्वरूपाच्या ठरतात. ह्या लोकांची सारी दृष्टि मोठेपणा, सत्ता, अधिकार-



पहिले अथवा टोकांकडचें पेरें
दुसरे किंवा मधले पेरे
तिसरे अथवा खालचे पेरे
पहिली गांठ
दुसरी गाठ
बौद्धीक जीवन
व्यवहारीक जीवन
सामान्य जीवन
सन्मान्य बुद्धिमान उच्च वर्ग
मध्यम वर्ग
मागासलेला वर्ग
पहिला विभाग इच्छाशक्ती
मधला विभाग तर्कशक्ती
गुरू
महत्वाकांक्षा, नेतृत्व, सत्ता, धर्मपरायणता, मानसन्मान.
शनी
सावधानता, समतोल, गूढ.
उदासीन, निराशा, रूढी व एकांतप्रिय.
रवि
यशस्वी, प्रसिद्ध, कलावंत, प्रसन्नचित्त,
बुध
रसायन शास्त्र, संशोधन, ठक,
अन्तःकरण रेषा
पहिला मंगळ
मस्तक रेषा
मंगळ प्रदेश
समतोलपणा
आयुष्य रेषा
दुसरा मंगळ
शुक्र
प्रीति, मनोविकार,
वात्सल्य, सौजन्य, संगीत, विलासी.
चंद्र
कल्पकता,
उदासीन

आकृति २६

संपन्नता ह्या विषयांवर केंद्रित झालेली असते. त्यामुळें ह्यांचा बहुतेक वेळ घराबाहेरच्या कार्यक्षेत्रांत व्यतीत होतो. ह्यांच्या हातून सामाजिक कार्यें घडतात, मोठमोठया संस्थांशीं ह्यांचे संबंध जोडले जातात, नवीन धर्तीवर कोणी कसलीही योजना आंखतांच ह्यांचा प्रवेश तेथें हटकून होतो. हीं माणसें ऐपतीप्रमाणें देणग्या देतील, कष्ट करतील, व्याख्यानें देऊन हवी ती संस्था नांवारूपास आणतील; सत्याग्रह, अनेक प्रकारच्या चळवळी ह्यांत सामील होऊन तुरुंगांत जातील; काय हवें तें करतील पण स्वतःचें व्यक्तिमत्त्व सतत गाजतें ठेवतील हें निःसंशय.

गुरुउंचवटाप्रधान लोकांना सार्वजनिक महत्त्व मिळविण्याची आकांक्षा असते. त्याप्रमाणें ह्या लोकांची देहयष्टि विशेषतः ह्यांचा चेहरा ह्यांच्या महत्त्वाकांक्षेस पोषक असा असतो.. ह्यांच्या दृष्टीस दृष्टि भिडविण्याचें सामर्थ्य सामान्य व्यक्तीच्या ठायीं क्वचितच उरेल असा ह्यांचा दरारा, नांवलौकिक व ह्यांच्याविषयीं इतरत्र असणारा बोलबाला जनतेंत पहावयास सांपडतो. ह्या लोकांचा आवाजही जात्याच घोगरा, शब्द मोठ्यानें ध्वनि करीत उमटणारा व हुकमी असतो. हीं माणसें न्यायी, समतोल बुद्धीचीं व धार्मिक प्रवृत्तीचीं असतात. ह्यांना दर्जा प्राप्त होवो वा न होवो, हीं स्वतःस शिष्ट वा अहंमन्य समजतात. क्षुल्लक गोष्ट सांगते वेळींही कांहींतरी नवीनच ज्ञान स्वतःपासून दुसऱ्यास प्राप्त करून देत असल्याचा आविर्भाव हे आणतात. इतरांशीं बोलणें, संबंध ठेवणें, त्यांच्या नौकरींत रहाणें हें त्यांचें परमभाग्य होय अशी ह्यांची ठाम समजूत असते. हीं माणसें स्तुतिप्रिय असतात. ह्या अस्त्रानें गुरुप्रधान लोकांना हवेंतसें राबवून घेतां येतें. ह्यांच्याशीं ताठरपणा ठेवला, शिस्तीच्या साचांत ह्यांना हुकमी छाप वागवूं म्हटलें तर हे लोक बिथरलेच असें पक्कें समजावें. उलट ह्यांचीं स्तुति केली, ह्यांना चढवलें अथवा वेळोंवेळीं ह्यांना उत्तेजन दिलें, तर पदरचें खाऊन हीं माणसें इकडचा डोंगर तिकडे नेऊन ठेवतील यांत शंका नाहीं.

तळहातावर अन्यत्र बुद्धिमत्तादर्शक चिन्हें आणि सर्वसाधारण रेषा अनुकूल असतील, तर गुरु-उंचवटा-प्रधान माणसें राजकारण, कायदे-कानू,

समाजशास्त्र, तर्कशास्त्र, धर्मशास्त्र वा वेदान्त इत्यादि विषयांत पारंगत असतात. त्यामुळें न्यायाधीश, धर्मोपदेक, राजकारणपटु, मुत्सद्दी, देशभक्त, लोकनायक, सुधारणावादी, वेदान्ती किंवा मीमांसक इत्यादि नात्यांनीं समाजांत ह्यांना प्रसिद्धि मिळते.

गुरु-उंचवट्यावर फुलीचें चिन्ह असणें हें आयुष्यांत इच्छापूर्ति आज ना उद्यां हटकून पुरी होण्याचें द्योतक आहे. गुरु-उंचवट्यावर नक्षत्रचिन्ह असेल तर सन्माननीय दर्जा प्राप्त होतो. त्रिकोण चिन्ह ह्या उंचवट्यावर असणें पुढारीपणास आवश्यक असणाऱ्या पात्रतेचें निदर्शक असतें. गुरु-उंचवट्यावर चौकोन असतां कोणत्याही प्रसंगांतून वा अतिरेकांतून नुकसान होण्याचा योग टळतो.

गुरु-उंचवटा अजिबात नसेल अथवा त्याची वाढ वाजवी झाल्यानें तो पोकळ भुसभुशीत झाल्याचें दिसून येईल, तर वरील सर्व सद्गुणांचें रूपांतर अवगुणांत होतें. असा मनुष्य जुलमी, अरेरावी, उद्धट, आडमुठा, आप्पलपोटा व पाखंडी असतो. लौकिकाचा, आचार-विचाराचा, न्याय-अन्यायाचा विचार ह्याला कधींच शिवत नाहीं. ह्याचे हातीं सत्ता येणें म्हणजे पिशाच्याच्या हातीं कोलीत देणें होय. खुर्ची मिळायचा अवकाश; चटकन् इतरांना त्राहि भगवान् करावयास लावणारा उन्मत्त अधिकारी-वर्ग ह्या सदराखालीं येतो. तसेंच धेनुवल्लभछाप निर्बुद्ध, निराकार, निर्विकार पण प्रामाणिक सुप्रतिष्ठितांचा समावेशही ह्यांतच करावा लागेल.

सारांश, नांवाप्रमाणें मोठी लब्धप्रतिष्ठा मिळवून देणारा असा हा गुरु-उंचवटा आहे. ह्या सद्गुणांचा जो सदुपयोग करील तो गुरु म्हणून जगतांत वंद्य ठरेल आणि गुरूं बनून लाथा झाडीत स्वतःची स्वयंभू जाति जो जगाच्या निदर्शनास आणील, तोही जगतांत तावत्काल वाजत-गाजत कालक्रमणा करील ह्याबद्दल कोणाचें दुमत होणें असंभवनीय आहे.

प्रकरण ८ वें : शनि-उंचवटा

जगतांत केवळ रवि, गुरु अगर शुक्र उंचवटा-प्रधान लोक नाहींत. तसें होतें तर कदाचित् नंदनवनाची कविकल्पना मानवास एवढी रिझवती ना. एवढेंच नव्हे तर स्वर्गसुखाची आस देखील इहलोकापुढें तुच्छ वाटली असती. पण तसें न व्हावें म्हणूनच कीं काय परमेश्वरानें मनुष्यप्राण्याच्या तळहातांवर शनि व बुध-उंचवट्यांना स्थान दिलें. ह्या दोन ग्रह-उंचवट्यांच्या गुणधर्मांचें प्रमाण अंगीं असणारे लोक सर्वत्र आहेत म्हणूनच आनंदाचा अतिरेक होऊन जग एका टोंकास जाईल ही भीति कायमची नष्ट झाली आहे. जेथें जेथें ह्या लोकांचा संचार वा प्रवेश होईल, तेथें तेथें समाधानासही दुसरी बाजू असूं शकते ह्याचें प्रत्यंतर इतरांना ह्यांच्यामुळें येतें. सद्‌गुणांतूनही दुर्गुण निपजतात; नव्हें चांगल्यांतच वाईटाचीं बीजें सूक्ष्म रूपानें वसत असतात, ही नवी विचारसरणी लोकांत रुजवत असते ती ह्यांच्या सान्निध्यामुळेंच. मुळांत गुरु, रवि व शुक्रउंचवटाप्रधान माणसें प्रसन्न, प्रेमळ व उदारचरित. पण ह्यांच्या संगतींत राहून त्यांच्यावर गंभीर बनून साशंकवृत्ति बाळगण्याची व स्वतःचा तोल न जावा म्हणून खबरदारी घेण्याची पाळी वारंवार येते. शनि व बुध ह्या दोन उंचवट्यांची तुलनात्मक माहिती पुढें बुध-उंचवट्याखालीं दिली आहे.

एवंगुणविशिष्ट अशा शनिउंचवटा दुसऱ्या म्हणजे मधल्या बोटाचे खालीं आहे (आकृति २६).

शनि वा बुधउंचवटाप्रधान लोक इतर जनसमूहांतून निवडून काढणें फार सोपें आहे. शनिउंचवटा बलवान् असेल तर माणूस शरिरानें उंचच उंच असतो; तर बुधउंचवटा प्रमुख असणारा मनुष्य अतिठेंगणा—खुजा असतो. हवी तेवढी चिक्कार गर्दी जमलेली असो; त्यांत सर्वांपेक्षां उंच अथवा इतरांपेक्षां ठेंगू असणारे लोक चटकन दृष्टींत भरतात नव्हे ! आणि हातांचीं बोटें पाहून तरी आपणांस काय दिसून येतें ? कोणाच्याही डाव्या वा उजव्या हाताचें मधलें बोट अधिक लांब आणि करांगुलि तिन्ही बोटांपेक्षां खूप लहान अशीच सर्वसाधारण वस्तुस्थिति नाहीं का दृष्टीस

पडत ? हाच न्याय एकंदर देहाचे ठेवणींत दृष्टीस पडावा हें साहजिकच होय. शनिउंचवटा प्रभावी असतां मनुष्य उंच, सडपातळ असतो, चेहराही उभट व गाल बसके असतात. ठिकठिकाणचे सांधे, हाडें व शिरा उठावदार दिसतात. जेवणी पुढें आलेली, रुंद, ओठ जाड व जबड्याचा खालचा भाग नजरेंत प्रामुख्यानें भरणारा असा असतो.

शनिउंचवटा प्रधान असेल तर बुद्धिमत्तेबद्दल शंकाच घ्यावयास नको. गणित, भूगर्भशास्त्र, रासायनिक शोध, गूढ व प्राचीन विद्या ह्यांची आवड, पुराणवस्तुसंशोधन, शेतकीशास्त्र, मेकॅनिझम्, मेस्मेरिझम्, हिप्नॉटिझम् आणि मानसशास्त्र इत्यादि स्थिर गंभीर विषय ह्या ग्रहउंचवट्याच्या गुणधर्मांत समाविष्ट होतात.

तथापि शनिउंचवटाप्रधान माणसें कितीही विद्वान् असलीं तरी त्यांच्या विद्वत्तेचा इतरांना उपयोग होईलच असें निश्चित सांगतां येत नाहीं. किंबहुना ह्या माणसांचा कल जन्मतःच अनिष्ट प्रवृत्तीकडे असल्याकारणानें ह्यांच्या हातून जें थोडेंफार कार्य घडतें त्यामुळें झालें तर अनर्थच बहुधा अधिक संभवतात. हीं माणसें तुसडीं, माणूसघाण्या वृत्तीचीं व एकलकोंडीं असतात. ह्यांचा स्वभाव अत्यंत संशयी असतो. स्वतःचें अंतरंग हीं कोणासही खुलें करून दाखविणार नाहींत. दुसऱ्याला विश्वासांत घेतल्याचा बहाणा करतील, त्याचा मतलब हरप्रयत्नानें माहीत करून घेतील व एवढें साधून त्याला नंतर केव्हां दगा देतील ह्याचा नेम नसतो. हीं माणसें खुनशी असतात. वरून दिसावयास थंड व गंभीर, पण आंत कोणत्या विषयासंबंधींचा अग्नि धुमसत असेल तें कधींही समजून यावयाचें नाहीं. दुसऱ्याचा उत्कर्ष देखील ह्यांच्या मनांत त्यांच्याबद्दल घर करून वाढीस लागतो. मंगळउंचवटाप्रधान माणसाशीं एकवेळ वैर पुरवतें; कारण तो माणूस राग अनावर झाला तर चटकन प्राण घेईल अथवा चार दणके देऊन पुनः त्याचें मन निर्विकल्प होईल. पण शनिउंचवटाप्रधान लोकांचा स्नेह त्याहून भयंकर असतो. गोड गोड बोलतील व शेवटीं असा फांसा टाकतील कीं; त्यांतून जीव जगवावा तरी कठीण वा मरावें तरी पंचाइतीचें. ह्या माणसांचें संशोधनकार्य देखील अनर्थकारक

स्वरूपाचें असतें. थोडे पैसे खर्च करून निमिषार्धात अधिक संहार कसा होईल ह्यासंबंधीं रासायनिक वा यांत्रिक शोध लावणेंच ह्यांना अधिक प्रिय. लांब पल्ल्याच्या तोफा, चिलखती रणगाडे, आवाज न होणारीं गतिमान विमानें, वेगवेगळ्या प्रकारचे बॉंबगोळे इत्यादि विध्वंसक शोधांचा उगम म्हणजे शनिउंचवटाप्रधान लोकांच्या वा बुधउंचवटाप्रधान लोकांच्या मेहनतीचेंच फल होय. प्राणघातक विषारी वायु, युद्धोपयोगी नानाविध प्रकारचीं स्फोटक द्रव्यें ह्यांचें संशोधनही बव्हंशीं ह्या दोन ग्रहउंचवट्यांशीं निगडित आहे. अशा रीतीनें हे लोक बुद्धीचा उपयोग अस्थानीं करून, स्वतःच्या अस्तित्वानें एकंदर मनुष्यजातीवर अनर्थकारक परंपरा लादतात ह्याला काय नांव द्यावें ?

तथापि वाईटांतूनही चांगलें निघतें. ह्या लोकांतही कांहीं व्यक्ति जगतांत ललामभूत ठरल्या आहेत. एकांतिक, एकाग्र व संशोधनप्रिय वृत्तीमुळें ज्यांनीं स्वतःच्या आयुष्यांतील सारसर्वस्व वेंचून आजच्या आश्चर्यकारक यांत्रिक युगास व अलोट प्रकारच्या सुखसोईंना जन्म दिला त्यांत न्यूटन, एडिसन, स्टिफन्सन् ह्यांसारखे अतिरथी, महारथी, महाभाग ह्यांचाही समावेश होतो हें विसरून कसें चालेल ? रेल्वे, तारायंत्र, विद्युत्, दूरध्वनिक्षेपक यंत्रें इत्यादि साधनें निर्माण करून ह्या लोकोत्तर बुद्धिमतांनीं निसर्गावर मात करून दाखविण्याची करामत केली. अखिल जग ह्यांच्याशीं सदैव कृतज्ञ राहील हें सांगावयास नकोच. तथापि शनि-उंचवट्याचें माहात्म्य ह्यामुळें वाढतें, कीं वरील नतद्रष्टांमुळें कमी होतें हें मात्र ज्याचें त्यानें परिश्रमपूर्वक नीट ठरवणें बरें.

प्रकरण ९ वें : रवि–उंचवटा

तळहातांवरील सर्व ग्रहउंचवटे आपापल्यापरीनें उपयुक्त खरे; तथापि त्यांतही सरस-निरसता पाहून वर्गवारी लावूं म्हटलें तर रवि-उंचवटा पहिल्या प्रतीचा ठरेल (आकृति २६). आकाशस्थ ग्रहांत सूर्यापासूनच बाकी सर्व उपग्रहांची उत्पत्ति झाली असल्याचें आपणांस माहीत आहे. सूर्यापासून आपणांस प्रकाश व उष्णता लाभते, पाऊस पडतो, लतावृक्ष वाढतात, धान्य पिकतें इत्यादि नित्य गोष्टी आपण सर्वजण जाणतों. सर्व चराचर वस्तूंचें आदिकारण पाहूं गेल्यास शेवटीं ह्या देदीप्यमान तेजोगोलावरच दृष्टि खिळवून आपण दिङ्मूढ बनतों नव्हें? फलज्योतिषशास्त्रांतही प्रथम जन्मकुंडलींतील रवीचें स्थान निश्चित झाल्याखेरीज बाकीच्या उपग्रहांची बैठक स्थिर ठरत नाहीं. अर्थात् आपल्या ह्या हस्तसामुद्रिकशास्त्रांत देखील रवीचें–रविउंचवट्याचें–महत्त्व पहिल्या प्रतीचें मानलें जातें हें साहजिकच होय.

आणि खालीं दिलेले रविउंचवट्याचे गुणधर्म पाहतांच ह्या उंचवट्याच्या महतीची यथार्थता कोणालाही चटकन मान्य होईल.

तळहातावरील कोणताही अन्य प्रभावी ग्रहउंचवटा अथवा भाग्यशाली इतर सुचिन्ह रविउंचवट्याची थोडीफार अनुकूलता असल्याशिवाय पूर्णांशानें फलप्रद होत नाहीं. ज्याच्या हातावर रविउंचवट्याचा मागमूस नाहीं, अशी व्यक्ति अंगीं पात्रता असूनही जगतांत सामान्य तऱ्हेचें अज्ञात जीवित कंठीत असतें. पुढें येण्यासाठीं जों जों धडपड करावी तों तों अशा व्यक्तीची भोंवतालची परिस्थिति अधिकाधिक गुंतागुंतीची होते. उलटपक्षीं रविउंचवटा बलवान् असणारीं माणसें लायकीपेक्षां अधिक मानमान्यता मिळवतात, त्यांच्या एवढ्यातेवढ्या गुणाचा सर्वत्र बोलबाला होतो, पैशाची तीव्र टंचाई त्यांना सहसा भासत नाहीं, अडीअडचणींतून सुटण्यासारखे हवे तेवढे क्षण त्यांच्या जीवितांत वारंवार उद्भवतात. मानमान्यता, आर्थिक सुबत्ता व उद्योगधंद्यांत यश ह्या गोष्टी रविउंचवट्याखेरीज सहसा प्राप्त होत नाहींत; आणि मनुष्याला ह्या गोष्टी रविउंचवटा

व रविरेषा ह्यांच्या अनुकूलतेमुळें लाभल्या तर त्याच्या सुदैवास पारावार उरत नाहीं; म्हणूनच हा ग्रहउंचवटा इतरांपेक्षां विशेष भाग्यदायक आहे.

रविउंचवटाप्रधान लोक कलाभिज्ञ व हरहुन्नरी असतात. शिल्पशास्त्र, चित्रकला, पेंटिंग, फोटोग्राफी, तंतुवादन, अभिनय, नाट्य इत्यादि कलाविषयांत हे ख्याति मिळवितात. ह्यांची दृष्टि सौंदर्यशोधक असते. कोणत्याही वस्तूंतील सौंदर्यगुण इतरांच्या निदर्शनास आणण्यांत ह्यांचा हातखंडा असतो. जीवितांत आनंद कसा निर्माण करावा व त्याचा आस्वाद कशा रीतीनें घ्यावा, हें दाखविण्याचें कार्य रविउंचवटाप्रधान लोक करीत असतात असें दिसून येईल.

मात्र कलाभिरुचि व कलानिर्मिति ह्या गोष्टी भिन्न भिन्न होत हें विसरतां कामा नये. रविउंचवटा विशेष बलवान् असेल तर व्यक्तींत वरीलपैकीं कोणते ना कोणते तरी कलागुण अंगभूत असतात. पण प्रत्यक्ष कला निर्माण करण्याची किमया ह्या सर्वांच्या अंगीं ईश्वरदत्त असतेच असें नव्हे. कांहीं लोक कला प्रसवणारे व बाकीचे सारे लोक त्या कलाविलासांत रममाण होणारे असतात ही गोष्ट विसरूं नये.

प्रत्यक्ष कलानिर्मिति हातून व्हावयास इतर अनुकूल चिन्हांची आवश्यकता असते. अनामिका लांब, ह्या बोटाचें पहिलें पेरें व अंगठा सबळ, अग्र चौकोनी अथवा अर्धवर्तुळाकार, निर्दोष रविरेषा आणि रविरेषेवर नक्षत्रचिन्ह वा त्रिकोण, ह्यांपैकीं चारदोन गोष्टींची जोड बलवान् रविउंचवट्यास अवश्य हवी. रविउंचवट्यावर एका रेषेऐवजीं तीन–चार ऊर्ध्वरेषा जवळजवळ असतील तर तितक्या कलाविषयांचा छंद जडतो; पण एकाही गोष्टींत विशेष प्राविण्य मिळत नाहीं; अगर प्रत्यक्ष कलानिर्मिति हातून होत नाहीं. मात्र असे लोक बहुश्रुत असतात. विविध विषयांचें अल्पस्वल्प ज्ञान मिळवून ह्यांची बुद्धि संग्रही बनते. वाटेल त्या विषयावर हव्या त्या ठिकाणीं हे चर्चा करूं शकतात. त्यामुळें ह्यांच्या विद्वत्तेचा निश्चित अंदाज कोणालाच करतां येत नाहीं. म्हणूनच ह्यांच्याशीं संबंध येणारा मनुष्य ह्यांची तैलबुद्धि पाहून— How one small

head could carry all he knew ह्या सुविख्यात उक्तींतील खेडवळाप्रमाणें स्तिमित बनतो.

रविउंचवटाप्रधान लोक प्रसन्नमुख, दिलदार व दुसऱ्यांना संतुष्ट ठेवण्यांत वाकबगार असतात. हे कोणाविषयीं द्वेषबुद्धि बाळगणार नाहींत, किंवा एखाद्याबद्दल ह्यांच्या मनांत चटकन किल्मिष यावयाचें नाहीं. सहवासाला हे लोक अतिउत्तम; तथापि ह्यांच्यांतही एक वैशिष्ट्य आहे. ह्यांचा स्वभाव अक्षरशः आकलन होण्याइतपत स्वतःचा स्नेह हें इतरांना लाभूं देत नाहींत. दुसऱ्यांना दिलदारपणें वागविणें निराळें व त्यांना स्वतःच्या विश्वासांत घेणें वेगळें. लोकांना हवी ती मदत हे केव्हांही करतील; पण स्वतःच्या अंतःकरणाचा कानाकोपरा देखील इतरांना हे दिसूं देणार नाहींत. त्यामुळें चहात्यांची संख्या उत्तरोत्तर हवी तेवढी फुगत चालली तरी ह्यांचा अंतरींचा स्नेही त्यांत एकही नसावयाचा. इतरांना चार पावलें दूर ठेवण्यांतील ह्यांचा इरादा स्वतःचें खाजगी, उद्वेगजनक वा निराशापूर्ण जीवन इतरांच्या दृष्टीस पडूं नये असाही कदाचित् असूं शकेल.

रविउंचवटाप्रधान लोक पैसा व मानमरातब ह्यांचे बाबतींत कितीही नशीबवान् असले तरी ह्यांना गृहसौख्य मनाप्रमाणें लाभत नाहीं असेंच सर्वत्र दिसून येतें. ह्यांचें वैवाहिक जीवन तर पूर्ण निराशामय असतें. ह्यांच्या कलाविकासांस परिपोषक, ह्यांच्या आचार–विचारांशीं समतोल, ह्यांच्या ध्येयास साहाय्यक व ह्यांची प्रसन्न वृत्ति सतत द्विगुणित करील अशी पत्नी ह्यांना सहसा लाभत नाहीं. त्यामुळें ह्यांचें खाजगी आयुष्य बहुधा अत्यंत उदासवाणें व क्वचित् शब्दशः खडतर असतें.

रविउंचवटा शुभ असेल तर काय दर्शवितो ह्याचा विचार येथपर्यंत झाला. हा उंचवटा अशुभ असेल तर मनुष्य उधळ्या, अहंमन्य व बढाईखोर असतो. अनामिका वक्र, तिचें पाहिलें म्हणजे अग्राचें पेरें लहान, निमुळतें वा टोंकदार आणि तिसरें पेरें जाड असेल तरीही हीं अशुभ फलें अनुभवास येतात. कलात्मक वृत्तीचा अंगीं लवलेश नसतो; तथापि अनुकरणप्रियतेच्या बळावर पोकळ ऐट आणण्याची अनिवार हौस असते.

चार वेडीं-विद्रीं चित्रें काढून त्यांचें प्रदर्शन मांडणें, चित्रकार असल्याबद्दल स्वतःचा गाजावाजा स्वतःच करणें, अव्वल दर्जाच्या चित्रकारांचे गुण (व अवगुणही) बळेंच स्वतःचे अंगीं चिकटवून घेऊन त्यांचा डांगोरा अभिमानपूर्वक पिटणें, हीं फलें अशुभ उंचवट्याचीं होत. तसेंच नटणें, मुरडणें, पोशाखानें दिपवणें, कलाविषयावर उलटसुलट विवाद माजवून स्वतःची जाहिरात करणें इत्यादि गोष्टींचा समावेशही ह्या यादींत अवश्य केला पाहिजे.

सारांश, रविउंचवटा प्रमाणशीर व शुभ चिन्हांनीं युक्त असणें ह्यासारखें महद्भाग्य दुसरें क्वचितच असूं शकेल. मनुष्याच्या प्रगतीस आवश्यक असणाऱ्या गोष्टी म्हणजे संपत्ति, बुद्धिमत्ता व यश ह्या होत. ह्या तिन्ही गोष्टी रविउंचवट्यामुळें पदरीं तर पडतातच; पण दिलदारपणा, प्रसन्नवृत्ति, कलानैपुण्य व रसिकता ह्या गुणांची जोड लाभल्यानें नांवलौकिकही अनायासें लाभतो. ह्या लोकांना उणें पडत असेल तर एकाच गोष्टीचें. वैवाहिक सौख्य ह्यांना मनाप्रमाणें लाभत नाहीं. कला—विलासांत रात्रंदिवस रममाण होणारें ह्यांचें मन सौंदर्यवस्तुदर्शनासाठीं सदैव आधाशी बनतें. स्त्रीसौंदर्याच्या ह्यांच्या कल्पनाही उत्तरोत्तर स्वर्गीय—अशक्य कोटींतील—ठरत जातात. अर्थात् हवें असतें इंद्रलोकांतील कांहीं तरी (!) पण मिळतें मात्र मृत्युलोकींचें सर्वसाधारण सुख. शेवटीं असल्या सुखास वैतागून हे लोक कधीं कधीं बाहेरचा रस्ता स्वीकारतात. चित्रकला, नृत्य, नाट्य, तंतुवाद्य, फोटोग्राफी, शिल्प इत्यादि विषयच असे आहेत कीं, त्या विषयांतील सौंदर्याचा आविष्कार पूर्णांशानें व्हावयास स्त्रीजातीचा संबंध—आणि तोही सौंदर्यसंपन्न वा विशिष्ट मनोवृत्तींच्या स्त्रियांचा संबंध—कुठें ना कुठें येणें अगदीं अपरिहार्य ठरतें. मग होतें काय ? तर ह्या लोकांनीं कायावाचा-मनेंकरून आमरण, सत्त्वशील रहावयाचें म्हटलें तर ती एक तारेवर नृत्य करण्यापैकीं कसरतच ठरते. त्यांत बहुतेकांचा तोल ह्या ना त्या कारणानें कुठें तरी जावयाचा व एखाद्यासच निष्कलंक यश लाभावयाचें हें निःसंशय !

प्रकरण १० वें : बुध--उंचवटा

करांगुलीखालीं असणारा उंचवटा बुधाचा आहे (आकृति २६). ह्या ग्रह-उंचवटा-प्रधान असणाऱ्या लोकांतील ठळक गुण म्हणजे वक्तृत्व-कला व ह्यांच्या बुद्धीचें सर्वगामित्व. ह्या लोकांना कोणताही विषय कठीण नसतो. ह्यांची आकलन–शक्ति इतकी प्रभावी असते कीं, अमुक एक विषय शिकायचा असें ह्यांच्या मनांत येण्याचा अवकाश; अल्पा-वधींतच हे त्या विषयांत प्रावीण्य मिळवितात. विशेषतः विषय जितका किचकट, क्लिष्ट, गुंतागुंतीचा, धोक्याचा अथवा जबाबदारीचा तितकी ह्यांची बुद्धि अधिक तरतरीत व कार्यक्षम ठरते. त्यामुळें गणिती, अकौंटंट, कायदेपंडित, शास्त्रज्ञ, डॉक्टर, संशोधक, रसायनशास्त्रांत पारंगत असणारे इत्यादि लोक ह्या ग्रह-उंचवट्याखालीं येतात. सामान्य बुद्धीस न पेलणारीं चिवट क्षेत्रें हे लोक स्वखुषीनें पत्करतात. मग ह्यांचा विषय त्यांपैकीं एकादा असो अथवा उपजीविकेसाठीं हवा तो अन्य धंदा पत्करणें ह्यांना भाग पडो. ज्यांचा बुध-उंचवटा प्रभावी आहे अशा लोकांना वाक्‌सिद्धि व व्यापक बुद्धिमत्ता जात्याच लाभलेली असते. स्वतःचा हेतु साधण्यासाठीं हे लोक जिव्हालालित्याचा उपयोग फार कुशलतेनें करतात. कैक वेळां ह्यांना द्व्यर्थी बोलण्याचा अथवा वागण्याचा अवलंब करावा लागतो. बोलतील एक, वागतील अन्य तऱ्हेनें; तथापि इष्ट हेतु साधण्यांत हे यत्किंचित् चुकणार नाहींत. ह्यांच्या नेहमींच्या बोलण्यांतही कांहीं तरी कावा असायचा. अघळपघळ बोलतील व वरवर अशी साखर पेरतील कीं ऐकणारा किंचि-त्काल सर्दच व्हावा. एकदां–दोनदां ह्यांच्या दुटप्पी वर्तनाचा बोध झाला कीं, भोंवतालचीं माणसें ह्यांच्याशीं जपून वागण्याचा निश्चय करतात. तथापि हीं माणसें आपलें मोहनी–अस्त्र टाकून त्याच लोकांचीं मनें स्वतःच्या कारणीं पुन्हां लावतात हें विशेष.

बुध किंवा शनि ह्या दोन उंचवट्यांचीं फलें वर्तविणें फार कौशल्याचें काम आहे. ह्या दोन ग्रहउंचवट्यांचीं माणसें ज्ञान वा वाणीच्या संपत्तीवर जगतात, नव्हे ललामभूत होतात; पण विश्वांतील स्वास्थ्य बिघडविणारांत

ह्याच लोकांची संख्या अधिक असते. स्वतःच्या असाधारण बुद्धीचा वा ज्ञानाचा उपयोग जर इतरांवर नाहक आक्रमण करण्याकडे ह्यांनीं केला तर दे माय धरणी ठाय असे उद्गार काढण्याची पाळी इतरांवर यावी हें उघड आहे. जें मनांत आणतील तें पदरीं पाडण्यासाठीं हीं माणसें अपूर्व क्लृप्त्या योजतील. विशेषतः हे ग्रह-उंचवटे आणखी इतर अशुभ चिन्हांनीं युक्त असतील तर त्या माणसाच्या हिकमती व चळवळी स्वभावाची थोरवी काय वर्णावी ! कांहीं ना कांहीं उचापत करण्याचा चाळा अखंड चालू ठेवण्यांतच अशा माणसाला समाधान लाभायचें हें निश्चित. कोणाची चहाडी करील, कोणावर तोहमत आणील, कोणास अद्वातद्वा बोलेल, कोणाची वस्तु लांबवील, कोणास पेंचांत आणील, अगदीं कांहींच करतां न आलें तर निष्कारण थापा तरी मारील; असा प्रकार ह्यांचे बाबतींत सर्वत्र आढळून यावयाचा. ह्या सर्व हिकमतीपायीं स्वतःचें नुकसान होतें कीं फायदा होतो एवढी साधीदेखील गोष्ट ह्याला समजत नाहीं. त्यामुळें ह्याला स्वतःला कांहीं साधायचें असतें म्हणूनच हा प्रत्येक चळवळ अंगीकारतो असें सरसि मानणें चूक ठरेल. ह्याचें कार्य प्रारंभीं निर्हेतुक असतें. 'हातीं पायीं चाळा' अशी आपणांत एक म्हण आहे. ह्या म्हणीनुसार कांहींतरी उद्योग सतत चालू ठेवणें एवढीच भावना ह्याच्या ठिकाणीं सदैव जागृत असते. कारण क्रियेनंतर जी प्रतिक्रिया घडते, त्या प्रतिक्रियेस तोंड देतेवेळीं इतरांना ह्याची कृति सहेतुक वाटत असतांही ह्याला स्वतःला विस्मयापलीकडे कांहींच वाटत नाहीं. हा निराकार, निर्विकार व थंड असतो. लोक ह्याच्यावर आरोप करतात, चिडतात, संतापतात, नांवें ठेवतात, ह्याच्याशीं तुटक वागतात, वेळप्रसंगीं ह्याला बेदम चोपतातही. तथापि अशा वेळीं ह्याची मात्र विस्मयानें त्रेधा उडते, हा गोंधळून जातो; इतरांची समजूत घालण्यासाठीं जिवाचें रान करून पाहतो व शेवटीं शेवटीं पस्तावतोही.

अलम दुनियेंत असणाऱ्या कोणत्याही ठिकाणच्या तुरुंगांत जाऊन तिथें डांबून ठेवलेल्या कैद्यांचे हात पहावेत. फौजदारी अथवा राजकीय कोणत्याही सदरांत मोडणारा गुन्हेगार असो; त्याच्या तळहातावर प्रामु-

ख्यानें शनि किंवा बुध ह्यांपैकीं एकादा ग्रह-उंचवटा विशेष स्वरूपाचा दिसेल. अंतःस्फूर्ति अनावर झाली कीं, काव्यपंक्ति कागदावर लिहून काढणें कवीला भाग पडतें. ह्या लोकांनाही वासना प्रबल झाली कीं, सद-सद्विवेकबुद्धि झूट वाटूं लागते. चांगल्या सुसंस्कृतींत वाढलेलीं, उच्च शिक्षण संपादन केलेलीं व संभावित दिसणारीं माणसें सुस्थितींत असून देखील नाहीं नाहीं त्या फंदांत पडतात व अनन्वित गोष्टी करतात. मग ज्ञातिहीन वा निरक्षरांची गोष्ट काय वर्णावी ! दरोडे, लूटमार, जाळपोळ, खून इत्यादि अतिमानुष प्रकार, तसेंच राज्यक्रांति अथवा समाजक्रांति घडवून आणण्याच्या इराद्यानें सामाजिक स्वास्थ्य वारंवार बिघडविणारे लोक ह्या सर्वांची नैसर्गिक प्रवृत्तीच त्यांना तसें करावयास भाग पाडत असावी असें म्हणणें शेवटीं भाग ठरतें.

सारांश, अट्टल बदमाषापासून तों अव्वल दर्जाच्या राजकारणी मुत्सद्या-पर्यंत बुद्धि निर्ढावल्याप्रमाणें बरें-वाईट, सत्य-असत्य, यश-अपयश, दया-माया, न्याय-अन्याय इत्यादिकांची काडीइतकीही क्षिति न बाळगतां, ह्या ना त्या योजनेंत जे अखंड व्यग्र असतात अशा लोकांचा संबंध शनि अथवा बुध-उंचवट्याशीं येतो. फरक इतकाच कीं, बुध-उंचवटा-प्रधान मनुष्य गोड गोड बोलून, सांगूनसवरून राजरोसपणें कार्यभाग साधील तर शनि-उंचवटा प्रमुख असणारा मनुष्य खुनशीपणानें, डाव धरून, कळूं न देतां, अप्रत्यक्ष उपायानें, आकस्मिकपणें कार्य उरकून टाकील. दोघांचीही बुद्धि-मत्ता विलक्षण यांत शंका नाहीं; पण तिचा सदुपयोग वा दुरुपयोग करणें ह्यावरच जीविताची दिशा सर्वस्वीं अवलंबून असणें स्वाभाविक नव्हे काय ?

आणि म्हणूनच बुध-उंचवटा-प्रधान माणसाची वर्गवारी अचूक करणें अथवा त्याच्या हातांवरील इतर चिन्हांवरून आपले विचार तत्काळ प्रगट करणें सोपें काम नव्हे ! चोर साव ठरायचा आणि सावावर चोर ह्या अभिधानाची जबरी व्हावयाची. अतएव बुध किंवा शनि-उंचवटा प्रभावी दिसतांच, व्यक्तीचें पूर्वचरित्र व चालू परिस्थिति स्वच्छ माहीत करून घ्यावी हें बरें. तसेंच मिळणारी माहिती खरी असल्याचा पुरावा

तळहातावर प्रत्यक्ष पहावा. जात्याच हुलकावणी देण्यांत पटाईत असणारीं हीं माणसें हात पहाणारासच हात दाखवतील ह्यांत काय संशय ! म्हणून ज्या प्रमाणांत ह्यांचा विश्वास संपादन कराल तेवढ्यापुरतेंच सूचक शब्दांत ह्यांचें चित्र हळुवारपणें रेखाटणें इष्ट आहे. हीं माणसें बुद्धिवान् असल्यानें ह्यांचें समाधान लवकर व्हावयाचें नाहीं. कदाचित् ह्यांना स्वतःला प्रस्तुत शास्त्राची बरीचशी माहिती असण्याचा संभव असल्यानें, वेडेवांकडे प्रश्न विचारून हे तुमची कसून परीक्षा घेतील. घडलेली गोष्ट साफ घडली नसल्याचें सांगतील; अथवा घडून गेलेलीच गोष्ट पुन्हां केव्हां घडेल असें मुद्दाम उलटसुलट कांहींतरी प्रश्न विचारून तुमची पुरी दुर्दशा करतील. तथापि ह्या लोकांचें ज्ञान अगदीं उथळ व वरवरचें असतें. ह्या वर्गांत सर्वच अर्धवट असतात असा मात्र ह्याचा अर्थ नव्हे. पण जे खरे ज्ञानी असतील त्यांच्याजवळ तुम्हांला एक पळभर देखील थारा मिळणें मुष्किलीचें ठरेल हें निश्चित समजा. त्यामुळें अडवणूक करणाऱ्या मूठभर अर्धवट विरोधकांचें शक्यतों समाधान करणें तितकेंसें दुर्घट नाहीं; निदान ह्यांना डावलणें, ह्यांचा रोष ओढवून घेणें अनर्थकारक होय एवढें तरी ध्यानांत ठेवावें. कारण एकदां हीं माणसें वश झालीं, ह्यांचा विश्वास संपादन केला कीं, तुमची जाहिरात जगाच्या निदर्शनास यावी म्हणून आमरण हीं माणसें स्वतःचें जिव्हालालित्य व बुद्धिसामर्थ्य न सांगतां खर्ची घालतील, ही महत्त्वपूर्ण बाब नजरेआड करून कसें चालेल ?

प्रकरण ११ वें : मंगळ–उंचवटे

आतांपर्यंत आपण चार ग्रह–उंचवट्यांची माहिती घेतली. पैकीं रवि–गुरु उंचवटे शुभ, सद्गुणांची पैदास करणारे व उल्हसित वृत्ति प्रसृत करणारे होत आणि शनि व बुध उंचवटे अशुभ, दुष्प्रवृत्तीस उत्तेजन देणारे, उद्विग्नता, औदासीन्य निर्माण करणारे होत असें आपणांस सामान्यतः दिसून आलें. मंगळ–उंचवट्याची रीति ह्या चोहोंहून भिन्न आहे.

प्रथमतः मंगळाचे उंचवटे दोन आहेत व ते परस्परविरुद्ध अशा दोन टोंकांशीं वसले आहेत ही गोष्ट लक्ष्यांत ठेवली पाहिजे (आकृति २६). गुरु व शुक्र ह्या दोन उंचवट्यांमध्यें असणारा आपण ' पहिला ' मंगळ-उंचवटा म्हणूं व ' दुसरा ' मंगळ–उंचवटा बुध व चंद्र ह्या दोन उंचवट्यांमध्यें आहे हें ध्यानांत ठेवूं (आकृति २६). कारण ' पहिला उंचवटा ' कोणता व ' दुसरा उंचवटा ' कोणता ह्याची खूणगांठ बाळगल्याशिवाय पुढें ज्या ज्या ठिकाणीं मंगळ–उंचवट्यांचा नामनिर्देष ' पहिला ' व ' दुसरा ' ह्या विशेषणांनीं केलेला आढळून येईल, त्या त्या स्थळीं घोटाळा होण्याचा संभव आहे.

मंगळाच्या ह्या दोन उंचवट्यांना जोडणारी तळहातावर मधोमध असणारी चिंचोळी पट्टी अन्तःकरणरेषा व मस्तकरेषा ह्या दोहोंमध्यें आहे. हातावरील ह्या विभागास ' मंगळ-मैदान ' असें नांव आहे (आकृति २६).

मंगळाचे दोन्ही उंचवटे सामर्थ्यदर्शक होत. सामर्थ्य सर्वत्र दोन प्रकारांनीं दृग्गोचर होतें. एक प्रकार चढाईचा तर दुसरा बचावाचा. ह्या दोन परस्परांविरुद्ध असणाऱ्या वेगवेगळ्या धोरणांचा विचार मंगळाच्या दोन भिन्न भिन्न उंचवट्यांवरून होतो. पहिला मंगळ-उंचवटा प्रभावी असेल तर व्यक्ति चढाईच्या आक्रमक धोरणाचा पुरस्कार करणारी असते. गुरु-शुक्र-उंचवट्यांमध्यें असणारा व आयुष्यरेषा आणि मस्तकरेषा ह्यांना आसपास उगमस्थान देणारा मंगळाचा पहिला उंचवटा सदृढ शरीरप्रकृति, दणगट आचारविचार व निर्भीड मनोवृत्ति व्यक्तीच्या ठिकाणीं निर्माण करील

तर त्यांत नवल नाहीं. हा उंचवटा बलवान् असेल तर आयुष्यरेषेचे आंत तिला समांतर अशा आणखी एक वा दोन रेषा असतात. ह्या रेषांना मंगळरेषा असेंच म्हणतात. ह्या रेषा आयुर्मर्यादा अबाधित ठेवणाऱ्या व चढाईच्या प्रसंगीं व्यक्तीवर जी आकस्मिक संकटपरंपरा ओढवते तीपासून शक्यतों बचाव करणाऱ्या असतात. ही व्यक्ति शूर, लढवय्यी, सेनानी व रणधुरंधर असते. अशा माणसाजवळ सामोपचाराची भाषा नसते. अन्याय दिसला, पराक्रमाची ईर्षा जागृत झाली कीं, आडवें येईल तें कापून काढावयाचें एवढें ह्याला माहीत. शत्रु-मित्र, सगे-सोयरे, राव-रंक, हवे ते असोत; ह्याला त्यांची पर्वा असते तोंपर्यंत ठीक. एकदां का ह्याचे मनानें पलटी घेतली कीं, दोघांपैकीं एकाचा मृत्यु समीप यावयाचाच.

मंगळाचा दुसरा उंचवटा बुध–उंचवट्याचे खालीं आहे. वर असणाऱ्या बुध–उंचवट्यापासून बुद्धिमत्ता व खालीं असणाऱ्या चंद्र–उंचवट्यापासून कल्पनासामर्थ्य व थंड मनोवृत्ति ह्यांच्या सान्निध्यांत हा मंगळ-उंचवटा प्रातिगामी शक्ति अथवा बचावाचें धोरण दर्शवितो. ह्या मनुष्याच्या ठिकाणीं चिकाटी, प्रसंगावधान, निश्चयाचा कणखरपणा इत्यादि गोष्टी वास करतात. पहिला मंगळ–उंचवटा–प्रधान मनुष्य परक्षेत्रांत आक्रमण करील तर दुसरा मंगळ-उंचवटा-प्रधान मनुष्य दाराशीं चालून येणाऱ्या आपत्तींचेंच फक्त चिकाटी व मनोधैर्य ह्या गुणांवर निराकरण करील. पहिल्याचें सामर्थ्य मनगटांत उतरून नव्या नव्या मुलुखगिरीसाठीं अक्षय्य अधीर बनतें तर दुसऱ्याची शक्ति वर बुद्धीजवळ केंद्रित होऊन तो मनुष्य बसल्या ठिकाणाहून सारीं सूत्रें चातुर्यानें सतत हालवितो. येणेंप्रमाणें हे उंचवटे दोन खरे, तथापि बऱ्हंशीं परस्परपूरक स्वरूपाचे आहेत.

युद्धामहायुद्धांत, नित्य व्यवहारांत वावरतांना, अथवा स्वतःचें घरींदारीं जे दोन प्रतिस्पर्धी निर्माण होतात, ते अशा परस्परपोषक वृत्तीचे असावे लागतात. एकाचा पहिला मंगळ–उंचवटा बलिष्ठ असेल तर दुसऱ्याचा दुसरा मंगळ–उंचवटा प्रभावी असावा. तरच राष्ट्राचें, समाजाचें

वा व्यक्तीचें नुकसान कमीत कमी होतें. आपल्या देशांत स्त्रिया रणांगणावर जाण्यास सांप्रतकाल तरी अनुकूल नाहीं. त्यामुळें पहिला मंगळ-उंचवटा बलवान् असणाऱ्या स्त्रियांची शक्ति वारंवार मनगटांत संचारून घरांतील वातावरण गढूळ करते. बाप, भाऊ, नवरा अथवा पोटचें पोर ह्यांपैकीं हवें त्यावर वेळप्रसंगीं तुटून पडणारी स्त्री संसारांतच प्रत्यहीं समरप्रसंग निर्माण करीत असते. स्त्रीच्या ह्या उग्र स्वरूपापुढें ज्याचा दुसरा मंगळ उंचवटा बलवान् असतो असाच मनुष्य टिकाव धरूं शकेल ह्यांत काय संशय ! संतशिरोमणि श्रीतुकाराम महाराज व त्यांचें सुविख्यात कजाग कुटुंब हें उदाहरण सर्वांना माहीतच आहे. ऑफिसांतही हेडक्लार्क व अधिकारी साहेबमजकूर ह्यांच्या मंगळ–उंचवट्यांत पहिला व दुसरा अशी भिन्नता असणें अत्यंत इष्ट आहे.

मंगळ–उंचवटा-प्रधान लोक सदृढ, निरोगी व सामर्थ्यवान् असतात. त्यामुळें ह्यांच्यांत विषयवासना विशेषत्वानें असते. विशेषतः पहिला मंगळ–उंचवटा बिघडणें हें कामांधतेचें लक्षण आहे. ह्या पहिल्या मंगळ–उंचवट्यावर आडव्या रेषा असणें तापट स्वभावाचें व उतावीळपणाचें द्योतक आहे. मंगळ–मैदानावर बारीक व तुटक रेषा दृग्गोचर होतील, तर भांडखोर स्वभावापायीं व्यक्तीचें नुकसान होतें. हें मंगळ-मैदान ज्या प्रमाणांत रुंद असेल, त्या मानानें व्यक्तीचा स्वभाव उदार व उमदा असतो. मंगळ-मैदान अरुंद असणें मतलबी वृत्तीचें व निर्दय स्वभावाचें चिन्ह आहे.

सारांश, मंगळाचे उंचवटे पराक्रम, सामर्थ्य, जिवंतपणा, करारी वृत्ति व प्रतिकारशक्ति दर्शवितात. हे उंचवटे शुभ व इतर चिन्हें अनुकूल असतील तर श्रीछत्रपति शिवाजी महाराज, चक्रवर्ती नेपोलियन, झांशीची राणी देवी लक्ष्मीबाई ह्यांसारख्या राष्ट्रोद्धारक, जगद्वंद्य व अवतारी विभूति निर्माण होतात. हे उंचवटे सामान्य प्रतीचे असतील, तर स्वतःचें, इतरांचें वा देशाचें अन्यायापासून परिमार्जन करणारे पुढारी निपजतात आणि हे उंचवटे अशुभ असतां देशाचें, देशबांधवांचें व स्वतःचें अपरिमित नुकसान करणारे, देशद्रोही व आत्मघातकी प्रवृत्तीचे लोक आढळून येतात.

प्रकरण १२ वें : चंद्र--उंचवटा

मनगटाच्या खालच्या टोंकाशीं शुक्र–उंचवट्यासमोर असणारा उंचवटा चंद्राचा आहे (आकृति २६). हा प्रभावी असतो त्यावेळीं उंचवट्याची रुंदी मनगटाच्या बाजूस अथवा खालच्या टोंकाकडे वाढलेली दिसून येते. मस्तकरेषा व अन्तःकरणरेषा ह्या दोन्ही चंद्र–उंचवट्याकडे आकर्षिल्या जातात. धनरेषेचा उगम चंद्रप्रदेशांतून होतो. एवढेंच नव्हें तर आयुष्यरेषा देखील शक्यतों चंद्र–उंचवट्यानजीक विराम पावत असलेली आढळून येते. ह्या सर्व गोष्टी अर्थात् उंचवटा ज्या प्रमाणांत प्रभावी असेल त्या मानानें घडतात.

चंचल मनोवृत्ति, कल्पनारम्य जीवन, थंड, धीमा स्वभाव, निसर्ग-शोभा व जलाशयसान्निध्य ह्यांविषयीं आवड आणि अविश्रांत उद्योग इतक्या गोष्टींचा समावेश ह्या उंचवट्याचे ठिकाणीं केला आहे.

चंद्र–उंचवटा प्रधान व्यक्तीचें मन चंद्रासारखें अस्थिर व चंचल असतें. कोणताही विचार फार वेळ टिकणें ह्यांच्या बाबतींत कठीण. क्षणांत एक विचार, क्षण पालटतांच दुसरा विचार तर तिसऱ्या क्षणीं तिसराच प्रकार. सकाळचा बेत दुपारीं बदलेल, दुपारचा बेत संध्याकाळीं पालटेल, तर आज म्हटलेली गोष्ट उद्यांला हे सपशेल विसरून जातील.

कल्पनाविलासाची मनोरम शक्ति ह्या उंचवट्याचे ठायीं अंतर्भूत झाल्याकारणानें साऱ्या साहित्यिकांचा आणि साहित्यप्रेमी लोकांचा संबंध चंद्र–उंचवट्याशीं आहे. ज्या मनोमय गोष्टी आचारांत येऊं शकत नाहींत त्यांचा कल्पनामय प्रपंच मांडणें व अशा कथा लेखनद्वारां प्रसिद्ध करून त्यांचा लोकांत प्रसार करणें, ह्यालाच आपण ललित–लेखन म्हणतों नव्हें ! कवि अथवा कथालेखक स्वतःच्या अतृप्त वासना किंवा प्रत्यक्ष अवलोकन केलेले प्रसंग ह्यांच्या बैठकीवर चित्ताकर्षक शब्दचित्रें रेखाटतात व त्यालाच आपण काव्य, ललितकथा, नाट्य, कादंबरी इत्यादि नांवांनीं संबोधतों ही गोष्ट ध्यानांत घेतली कीं, चंद्र-उंचवटा थोड्याफार प्रमाणांत कां होईना

पण यच्चयावत् व्यक्तींच्या हातावर असतो असें जें आढळून येतें त्याबद्दल आश्चर्य वाटणार नाहीं. संस्कृत सुभाषितांत म्हटलें आहे कीं, "सुभाषितेन गीतेन युवतीनां च लीलया। यस्य न द्रवते चित्तं स वै मुक्तोऽथवा पशुः" त्याप्रमाणें ललितकला, संगीत वा प्रणय ज्याच्या हृदयास मोहवश करीत नाहीं असा मनुष्य सांपडणें अतिदुर्मिळ होय. जगांत सारा भरणा सामान्य लोकांचाच अधिक; त्यामुळें काव्य, कथा, कादंबरी वा नाट्य इत्यादि कल्पनारम्य वातावरणांत मनमुराद भटकून, प्रत्यक्ष वस्तुस्थितींत न मिळणारीं सुखदुःखें, अप्रत्यक्षपणें आंतल्याआंत यथेच्छ उपभोगावीं असा उपक्रम जो तो आपापल्या परीनें करीत असतो. कांहीं निर्माते असतात तर बरेचसे लोक निर्माण होणाऱ्या साहित्याचे निस्सीम उपासक असतात. मिळून साहित्यनिर्माते व त्यांचे उपासक ह्यांच्या संख्येइतकाच जगांत चंद्र-उंचवटा-प्रधान व्यक्तींचा भरणा आहे असें आपण म्हणूं या हवें तर. ह्या सर्वांची बुद्धिमत्ता व कल्पनाशक्ति वेगवेगळ्या परीची असते ही गोष्ट उघड आहे. म्हणूनच चंद्रउंचवटा दरएक व्यक्तीच्या हातावर सारख्या स्वरूपांत दृग्गोचर होणें असंभवनीय होय.

चंद्र-उंचवटा-प्रधान लोकांचें थोडक्यांत वर्णन असें.— ह्यांचें आयुष्य कल्पनामय असतें. मनाचे हे अतिचंचल असतात. कल्पिलेलें आयुष्य प्रत्यक्ष व्यवहारांत उतरत नाहींसें पाहून हे कष्टी बनतात. स्वतःचीं अभिनव मतें इतरांनीं झिडकारतांच ह्यांना फार राग येतो. ह्यांचे बेत क्षणाक्षणाला बदलतात. स्थलांतराची ह्यांना फार आवड असते. एवढ्यातेवढ्या क्षुल्लक गोष्टींचें महत्त्व एकादेवेळीं ह्यांना फार वाटतें; तर घरीं बायको अथवा पोर दुखण्यानें शेवटच्या घटकेपर्यंत येऊन ठेपलें तरी ह्यांना बिलकूल पर्वा वाटत नाहीं. उलट अशा क्षणीं तें साहित्योत्सवांत, नवीन ग्रंथविषयांत, एखाद्या विलक्षण कल्पनाविलासांत अगर चटकन् सुचलेला विचार लिहून काढून हातावेगळा करण्यांत गर्क होतील. त्यांच्या ह्या तऱ्हेवाईक स्वभावामुळें ह्यांच्याशीं जमणारें सूत दीर्घकाळ टिकेल अशी आशा कोणी धरूं नये. क्षणभर विरंगुळा म्हणून अथवा घटकाभर आपला श्रमपरिहार व्हावा ह्या हेतूनें अशा लोकांशीं

ओळखदेख ठेवणें अत्यंत सोईचें असतें. स्वतःच्या भाषाप्रभुत्वानें हीं माणसें दुसऱ्यास भुलवतात व डोलवतातही. विविध विषय ऐकून इतरांना सुलभतेनें ज्ञान देण्याचें कार्य फक्त ह्यांनाच साधतें. ह्यांचें व्यक्तिमत्त्व ह्यांच्या लेखनवाचनामुळें इतकें उठावदार बनतें कीं, अर्धीकच्चीं माणसें हां हां म्हणतां ह्यांच्या आहारीं जातात; पण अखेर त्यांना पश्चात्ताप होतो. ज्याला आपण मोठा 'अंशात्मा' समजत होतों तो आपल्यासारखाच सामान्य प्रतीचा मनुष्य आहे हें समजतांच तीं माणसें पळ काढतात. ह्यांना कल्पनाविलासांत व्यत्यय आलेला खपत नाहीं. ह्यांचीं अव्यवहार्य मतें स्वतःवर लादून घेण्यास कोणी तयार न झाल्याकारणानें नंतर हीं चिडखोर बनतात. अमलांत न आलेलीं मतें पुनः पुनः आठवून रवंथ करीत बसण्याचा छंद ह्यांना जडतो. दृष्टि क्वचित् अंतर्मुख बनते व अखेर समाधिसुख का कायसें म्हणतात त्या स्थितीचें व्यसन ह्यांना जडतें. त्याकारणानें जरा कोणी ह्यांच्या सन्निध त्या विलीनक्षणीं अजाणतेपणीं गेला तरी चटकन् हे त्याच्यावर खेकसतात. ह्या अनुभवाचा नांवलौकिक एकदां सर्वतोमुखीं झाला कीं, मग ह्यांच्या वाटेस जाण्याचें साहस कोण करील ! प्रत्यक्ष पत्नी देखील कधीं कधीं नाइलाज म्हणून आयुष्यांतील एक एक दिवस युगाप्रमाणें कंठीत असेल तर त्यांत नवल नाहीं. शेवटीं हीं माणसें व ह्यांची एकलकोंडी अवस्था हीच आमरण टिकली तर त्यांत आश्चर्य कोणतें !

चंद्र-उंचवट्याचीं शुभफलें मिळावयासाठीं उंचवटा प्रमाणशीर, अंगठ्याचें पहिलें पेरें जोरदार, मस्तकरेषा न बिघडलेली, बोटें चौरस, आणि रवि, गुरु अथवा शुक्र ह्यांपैकीं एखाद्या उंचवट्याचें सहकार्य इतक्या गोष्टी आवश्यक आहेत. तळहात फुगीर असला तरी पोकळ नसावा. तळहाताचा रंग अति पांढरा असणें हें चंद्र-उंचवटा वाजवी असल्याचें द्योतक आहे.

चंद्र-उंचवटा पोकळ असेल तर मनुष्य आळशी व आप्पलपोटी असतो. त्यांत अंगठ्याचें दुसरें पेरें कमजोर, बोटें नितळ, टोंकदार आणि आंखूड असतील तर हवेंत मनोरे बांधणारा, असंतुष्ट, जिकीरखोर, वारंवार त्याच

त्या चुका करणारा, अडाणी व चंचल असतो. त्याला सूचक स्वप्नें पडतात. ह्या सर्व दुश्चिन्हांचे जोडीस मस्तकरेषा अतिउतरती म्हणजे चंद्र–टेकडीवर येऊन थांबणारी असेल तर मनुष्य भ्रमिष्ट होतो. कल्पना अनावर बनली, अव्यवहार्य असतांही एखाद्या गोष्टीचा छंद जडला व तिच्या पूर्ततेसाठीं चोवीस तास निदिध्यास लागला, कीं डोकें फिरावयास आणखी काय हवें ?

तथापि इतक्या दुश्चिन्हांनीं परिप्लुत अशा व्यक्ति फार थोड्या. मस्तकरेषा अतिढळती असेल तर अंगठा मजबूत असतो. अंगठा व मस्तकरेषा दोन्ही दुर्बल असतील तर बोटें लांब, गांठीचीं, चौकोनी आणि पाहिलीं पेरीं प्रदीर्घ अशीं असतात; अथवा वरील सर्व दुश्चिन्हांचा परिपाक डोकें बिघडण्यांत व्हावा असा संकेत असूनही, रवि किंवा गुरु-उंचवट्याचें साहाय्य बलवत्तर ठरतें. त्यामुळें एवढी अनवस्था प्राप्त होत नाहीं. एरवीं प्रत्येक देशांत वेड्यांच्या इस्पितळांची संख्या खाजगी डॉक्टरांच्या दवाखान्यांच्या संख्येनुसार विस्तृत प्रमाणावर वाढली असती व शेंकडा पंधरा टक्के लोक ह्या इस्पितळांतून सतत डांबून ठेवण्याचा दुर्धर प्रसंग ओढवला असता ह्यांत शंका नाहीं.

—

प्रकरण १३ वें : शुक्र-उंचवटा

शुक्र-उंचवटा मनगटाचे खालचे टोंकाला अंगठ्याचे मुळाशीं असतो. वस्तुतः अंगठ्याचें तिसरें पेरें ज्या ठिकाणीं आपण संबोधतों त्याच भागास शुक्र-उंचवटा हें नांव आहे. त्या कारणानें ह्या उंचवट्याचे गुणधर्म अंगठ्याच्या पहिल्या दोन पेऱ्यांस तारक वा मारक ठरतात. शुक्र-उंचवट्याची माहिती करून घेतल्याखेरीज अंगठ्याचें संपूर्ण ज्ञान होणें अशक्य आहे. हा उंचवटा प्रभावी असेल तर एक ऊर्ध्वरेषा आयुष्यरेषेच्या आंतून समांतर जाणारी व ज्या रेषेस मंगळरेषा अथवा इंग्रजींत Inner Life Line असें नांव आहे ती असते. हात मनगटाचे बाजूस फुगीर, तळवा मऊ व

गुबगुबीत, तळहाताचा रंग तांबूस, अंगठा आंखूड आणि बोटाचीं अग्रें नितळ वा टोंकदार असतात.

शुक्र–उंचवटा शुभफलप्रद असेल तर देहसौंदर्य, कोमलता, गाणें–बजावणें, नृत्य, नाट्य, अभिनय, रासिकता, सुखोपभोग, ख्यालीखुशाली, प्रेमळपणा, वात्सल्य, स्तुतिप्रियता व रंगेलवृत्ति इत्यादि गोष्टी दिसून येतात. अशुभ फलदायी असेल तर उपरोक्त गोष्टींचा अतिरेक होतो. अशी व्यक्ति नखरेल, व्यसनाधीन, व्यभिचारी, बढाईखोर पण नेभळट असते. शुक्र–उंचवटा मुळींच नसेल तर मनुष्य हृदयशून्य, मत्सरी, संगतीस दुष्ट, अरसिक व 'न स्त्री स्वातंत्र्यमर्हति' असें प्रतिपादणारा असतो.

देहसौंदर्य व शरीरसौष्ठवता हा शुक्र-उंचवट्याचा प्रमुख गुण होय. हीं माणसें विलक्षण आकर्षक असतात. सर्वांना तीं प्रिय होतात. ह्यांच्याशीं स्नेह व्हावा अशी प्रत्येकास प्रथमदर्शनीं अभिलाषा उत्पन्न होते. त्यांच्या ह्या देखणेपणान्वयें इतरांना ज्या सवलती मिळत नाहींत त्या ह्यांना सहजासहजीं मिळूं शकतात. ह्यांच्या दुर्गुणांकडे बघण्याची जगाची रीती बव्हंशीं शिथिल असते. क्वचित् सरकार–दरबारीं अथवा न्यायालयांतूनही दैवाचा कौल ह्यांचा पक्षपाती होतो; एवढें त्यांचें सौंदर्य प्रभावी असतें. मात्र हें सौंदर्य झनानी स्वरूपाचें असतें. व्यक्ति स्त्री असो वा पुरुष असो, शुक्र–उंचवटा उत्कृष्ट असेल तर मर्दपणाऐवजीं तिच्यांत झनानी सौंदर्याची छटा अधिक प्रमाणांत आढळून येते. विशेषतः नाक, दोन्ही ओठ, जेवणी, हनुवटी, डोळ्यांतील तेज आणि एकंदर चेहेरेपट्टी ह्यांच्या ठेवणींत स्त्री व पुरुष ह्यांच्यांत विलक्षण साम्य दिसून येतें. हीं माणसें जात्याच तरतरीत व प्रेमळ असतात.

शुक्र–उंचवटा प्रधान लोक गायन–वादन–नृत्य–नाट्य वा अभिनय ह्यांत दर्दी असतात. ह्याचा अर्थ प्रत्येकास ह्यांपैकीं कांहीं ना कांहीं येतेंच असा मात्र नव्हें. एखाद्या गोष्टीचा शोक असणें वेगळें व तो विषय स्वतःस येणें निराळें. प्रत्यक्ष प्रावीण्य संपादण्यास रवि–उंचवट्याचें सहकार्य, अंगठ्याच्या पेऱ्यांची लांबी व पाठीमागें बांक आल्यानें अंगठ्याचा मनगटाशीं होणारा विशिष्ट कोन, बोटें लांब व नितळ इत्यादि गोष्टींची

आवश्यकता असते. ह्यांपैकीं कांहीं नसेल आणि शुक्र–उंचवटा तेवढाच प्रभावी असेल तर फक्त एतद्विषयक अभिरुचि व्यक्तीचे ठायीं आढळून येईल. सुवासिक तेलें–अत्तरें ह्यांचा शोक, कपड्या–लत्त्यांबद्दल आवड-निवड, फॅशन्सबद्दल अनिवार प्रेम, चैनीकडे प्रवृत्ति, भोगांबद्दल आसक्ति व ह्या सर्वांपायीं उधळणूक असा प्रकार ह्या लोकांचे बाबतींत दृष्टीस पडतो. हीं माणसें स्तुतीनें चटकन जिंकतां येतात. ह्यांना सुरूपतेचा अति अभिमान असतो व तो असणेंही रास्त आहे. कारण अष्टावक्र मनुष्य एवढा तेवढा बरेपणाचा अंश देहाचें ठायीं असेल, तर त्याचे दिमाखानें वारंवार अवलोकन करीत असतो. इतरांच्या नजरेंत तेवढा बरेपणाचा अंश प्रामुख्यानें भरावा ह्यासाठीं त्याची कोण धडपड चालू असते. हें लक्ष्यांत घेतलें म्हणजे रतिसारख्या सौंदर्याचें लेणें प्राप्त झालेली तरुणी अथवा मदनासारखी रूपसंपदा लाभलेला तरुण, आपापल्या परी अभिमान न बाळगील तरच नवल म्हटलें पाहिजे. तथापि असें असूनही हीं माणसें सहृदय असतात, प्रेमळ असतात, समाजांत खुल्या दिलानें वावरतात, सर्वांशीं हसून खेळून वागतात, कोणाबद्दल अकारण संशय बाळगीत नाहींत अथवा कोणाशीं दीर्घकाल टिकणारें वैर संपादीत नाहींत. उलट ह्यांच्या भलेपणाचा वाजवी फायदा घेऊन एकादवेळ आयुष्यांतून ह्यांना कायमचेच उठविण्याचा उपद्व्याप इतर लोक करीत असतात. नैतिक निष्ठा पुरेशी नसेल तर सौंदर्यापायीं हीं माणसें केव्हां गोत्यांत येतील ह्याचा नेम नसतो. शुक्र–उंचवटा शुभ व प्रभावी असणाऱ्या व्यक्तीचें पाऊल वांकडें पडलेंच तर ती व्यक्ति विषयासक्त असते म्हणून बहुधा नसते. इतर कोणी स्वरूपाचा भोक्ता मदांध बनून चलाखीनें अशी परिस्थिति निर्माण करीत असतो कीं, त्या आगंतुक आक्रमणाचें स्वरूप ध्यानांत येण्यापूर्वीच नको तो सर्व प्रकार होऊन बसतो; आणि बिचारी फशी पडलेली व्यक्ति मात्र समाजाच्या उपहासास पात्र होते. हा एक दैवदुर्विलासच आहे.

शुक्र-उंचवटा फार उंच, मनगटाजवळ अतिफुगीर असा असणें बरें नव्हें. अशा स्वरूपाचा उंचवटा आंतून पोकळ असतो. दाबून पाहिला

तर हा फुगवटा रुईच्या कापसाची उशी दडपणाखालीं आकुंचित व्हावी तसा दबला जातो. तशांत बोटें आंखूड व जाड, मस्तकरेषा ढळती, चंद्र-उंचवटा वाजवी वाढलेला व अंगठा लवचीक असेल तर व्यक्तीचा अधः-पात सहसा टळत नाहीं. अशीं माणसें व्यसनाधीन, रंगेल, आळशी व प्रवाहपतित असतात. अतिउंच असणाऱ्या ह्या उंचवट्यावर आडव्या रेषा असतात त्या वेळीं व्यक्ति भावनाप्रधान असते. फक्त ऊर्ध्वरेषा (म्हणजे आयुष्यरेषेचे आंत अंगठ्याचे मूलप्रदेशांतून वर गुरु-उंचवट्यानुरोधानें जाणाऱ्या रेषा) असतील तेव्हां व्यक्ति भावना व संमोह ह्यांच्या जंजाळांत जरी अक्षय गुरफटलेली असली तरी स्वतःची सुटका शिताफीनें करून घेते. एकाच वेळीं उभ्या व आडव्या रेषा असणें मात्र अनिष्ट होय. ह्या आकृतीस जाळ्यासारखा आकार येतो (आकृति २७). म्हणून ह्या चिन्हास जाळें म्हणण्याचा प्रघात आहे. नांवाप्रमाणेंच हें जाळें व्यक्तीला संमोहांत कायम गुरफटण्याचें कार्य करीत असतें. आडव्या रेषा पदोपदीं आसक्ति निर्माण करून व भुरळ पाडून चकविण्याचा यत्न करतात, तर ऊर्ध्वरेषा सद्सद्विवेक-बुद्धि जागृत ठेवून अधःपातापासून शक्यतों परावृत्त करीत असतात. अशा वेळीं अंगठा बलवान् असणें, मस्तकरेषा निर्दोष रहाणें व बोटा-खालचे बुद्धिप्रधान उंचवटे चंद्र–शुक्र ह्या भावनाप्रधान उंचवट्यांपेक्षां बल-वान् असणें इष्ट आहे. ह्यांची जोड असेल तरच शील सलामत रहातें. तथापि शुक्र-उंचवट्यावर जाळी असणाऱ्या माणसाचे हातून प्रत्यक्ष दुर्वर्तन घडो वा न घडो. ह्या व्यक्तींबद्दल समाजांत गैरसमज सहजासहजीं व फार झपाट्यानें पसरतात. ह्या व्यक्तींच्या चारित्र्याबद्दल लोक नाहीं नाहीं त्या गोष्टी पिकवून प्रसृत करतात असें दिसून येतें. ह्याचें कारण एकच. ह्या जाळ्यांतून निरपवाद सुटण्यासाठीं उपरोक्त शुभ चिन्हें ज्यांच्या हातावर नाहींत, अशाच व्यक्ति जगांत फार आढळतात. ह्या व्यक्ति विषयासक्त, स्वार्थी, मदोन्मत्त बनून समाजाची सुस्थिति वारंवार बिघडवतात. क्षणैक सुखाच्या पूर्ततेसाठीं इतरांच्या सोईस्वातंत्र्याचा विचार ह्या व्यक्ति कधीं करीत नाहींत. ह्यांच्या ह्या बेछूट–बेजबाबदार वर्तनामुळें वाळलेल्याबरोबर ओलेंही जळावें तद्वत् स्थिति होते. वडाची साल काढून लोक पिंपळास चिकटवतात आणि समाजांत ह्या दुश्चिन्हांकित व्यक्ति एकाच मापानें मोजल्या जातात असा अनुभव आहे.

शुक्र-उंचवट्यावर आयुष्यरेषेखेरीज अन्य कोणतीही रेषा वा चिन्ह नसणें देखील बरें नव्हें. अन्तःकरणरेषा शाखाहीन व एकसांधि असेल तर मनुष्यस्वभाव ज्याप्रमाणें एकांतप्रिय व गूढ बनतो, त्याप्रमाणें हा उंचवटा सपशेल उजाड व स्वच्छ असतां व्यक्ति केवळ स्वतःपुरतें पहाणारी, अंतर्मुख वृत्तीची, इतरांच्या भावनांबद्दल बेदरकार, हृदयशून्य व कठोर अशी असते. अशीं माणसें उद्दिष्ट पदरांत पाडून घेते वेळीं मात्र लाघवी व लाचार बनतात; आणि तो क्षण उलटतांच ह्यांची माणूसघाणी प्रवृत्ति पूर्ववत् जागृत होते.

सारांश, शुक्र-उंचवटा एवंगुणाविशिष्ट हा असा आहे. विश्वांतील अव्वल दर्जाचें देहसौंदर्य ह्या उंचवट्याचे अभावीं दृष्टीस पडतें ना. संगीत ही संजीवनी आहे. वादन हें मंत्रमुग्ध बनवणारें अमोघ अस्त्र आहे. नृत्यकला ही क्षणभर स्वर्गीय सुखाचा आभास इहलोकीं निर्माण करणारी अजब मोहिनी आहे. रंभेसारखी रूपसंपदा शुकासारख्या महामुनींलाही संभ्रमांत टाकणारी आहे. ह्या सर्व गोष्टींची उपपत्ति शुक्र-उंचवट्यापासून आहे. उत्तमोत्तम नट, त्यांच्या ठायीं असणारें गायन-नृत्य-अभिनयादि गुण, आधुनिक काळांत नित्य नव्या नव्या चमकणाऱ्या व इतरेजनांना स्वतःच्या अभिजात गुणांनीं चटका लावणाऱ्या नवोदित सिनेमातारका ह्या सर्व व्यक्तींचे शुक्र-उंचवटे प्रभावी असले पाहिजेत ह्यांत शंका नाहीं. एवढेंच नव्हें तर ताजमहालासारखीं जगद्विख्यात स्मृतिस्मारकें निर्माण कां झालीं असें कोणीं विचारलें तर शुक्र-उंचवट्याकडेच बोट दाखवणें समर्पक ठरेल, एरवीं संकुचित वृत्तीचा, भावनाशून्य व सौंदर्यदृष्टीचा पूर्ण अभाव असणारा मनुष्य शहाजहान बादशहाचे जागीं असता, तर ताजमहालासारखी अद्वितीय अमर कलाकृति कल्पनासृष्टींतही अवतरली नसती हें सांगावयास नकोच.

प्रकरण १४ वें : हातांवरील रेषा व चिन्हें


तळहातांवरील सर्व रेषा एकाच मापानें मोजणें अज्ञानमूलक होय. त्यांत फार थोड्या रेषा पहिल्या प्रतीच्या असतात, कांहीं दुय्यम स्वरूपाच्या असतात आणि बऱ्याचशा लहान लहान किरकोळ रेषा व अशा रेषांनीं सांधल्या जाणाऱ्या नानाविध प्रकारच्या सूक्ष्माकृति वारंवार हातांवर तयार होत असतात व कार्य आटोपतांच त्या आकृत्या नाहींशा होतात. आपण त्यांकडे लक्ष दिलें, त्यांचा संदेश समजावून घेण्याचा यत्न केला व त्याप्रमाणें आपली स्वतःची उन्नति साधली तर अर्थात् झालें तर आपलें हितच होईल. उलट हातांवरील चिन्हें वा रेषा ह्यांना महत्त्व न दिलें, त्यांची पूर्वसूचना न मानली अथवा दुसऱ्या एखाद्या श्रद्धावान् गृहस्थानें कळकळीनें जीव तोडून हातांवरील रेषा पाहून भावी आपत्तीबद्दल इषारा दिला असतां, त्याची गणना मूर्खांत करून स्वतः पांडित्याचा कितीही आव आणला तरी हातावर अगणित सूक्ष्मरेषा व त्यांनीं नित्य सांधल्या जाणाऱ्या विविधाकृति ज्या सतत निर्माण होत असतात, त्यांत कांहीं बाध येत नाहीं. मनुष्य आस्तिक वा नास्तिक कसाही असो; निसर्गाच्या व्यक्तिगत नियमांनीं तो बांधला जावा हें साहजिकच आहे. एरवीं निसर्गावरील विजयाच्या घमेंडींत तो कितीही गर्क होईना !

येणेंप्रमाणें आयुष्यरेषा, अंतःकरणरेषा, मस्तकरेषा, धनरेषा, विद्यारेषा, विवाहरेषा आणि आरोग्यरेषा ह्या सात रेषा पहिल्या प्रतीच्या होत. ह्या सर्व रेषा प्रत्येक हातावर असतात किंवा असल्याच पाहिजेत असें मात्र नव्हें. पण ह्यांतून दोन, पांच-सात कितीही रेषा जन्मकालीं हातावर अवतीर्ण झालेल्या असतील तर त्यांच्या संख्येंत वाढ वा स्वरूपांत फारसा बदल पुढें आमरण होत नाहीं. ह्या रेषा स्थिर असल्याकारणानें प्रवृत्ति-निवृत्ति निदर्शक होत. मंगळरेषा, अंतर्ज्ञानरेषा, गुरुवलय, शुक्र-कंकण, शनीचें कडें, संतानरेषा व प्रवासरेषा ह्या सात रेषा दुय्यम प्रतीच्या समजाव्या.

ह्या रेषा जन्मकालीं हातावर नसतात असें विधान करण्यापेक्षां ह्या रेषांचें निश्चित स्वरूप अथवा त्यांचें महत्त्व आयुष्यांत पहिलीं वीस पंचवीस वर्षें उलटल्यानंतरच हातावर सुलभ रीतीनें दृग्गोचर होतें. ह्यांना दुय्यम स्वरूपाच्या रेषा मानावयाचें आणखी एक कारण असें कीं, ह्या रेषा असून कार्य जेवढें यशस्वी होईल त्यापेक्षां ह्या नसतील तरच बरें असा प्रकार सर्वत्र दिसून येतो. कारण कोणतीही रेषा अवतीर्ण होणें म्हणजे त्या रेषेनें दिग्दर्शित होणारी प्रवृत्ति व्यक्तींत स्वयंभू असणें होय. आयुष्य, बुद्धिमत्ता, सत्-असत्, भावना, वित्त, बायकामुलें इत्यादि गोष्टी नकोत कोणाला? अर्थात् प्रत्येक व्यक्तीच्या हातावर पहिल्या प्रतीच्या रेषा असावयाच्याच हें उघड आहे. पण कोणत्याही एका भावनेचा वा प्रवृत्तीचा अतिरेक झाला कीं, आणखी त्यांतून नवीन नवीन सूत्रें अपरिहार्यपणें प्रसृत होत असतात. ह्या न्यायानें प्रत्येक उंचवट्याचे आसपास एक ह्या हिशेबानें सात उंचवट्यांनजीक सात रेषा उत्पन्न होऊं शकतात. उंचवट्याच्या बलाबलाप्रमाणें ह्या दुय्यम प्रतीच्या रेषा अशुभ वा शुभ फल आयुष्यांत उत्पन्न करतात. ह्या पाहिल्या प्रतीच्या वा दुय्यम स्वरूपाच्या रेषांची सर्व माहिती दरएक रेषेसंबंधीं स्वतंत्र प्रकरण लिहून पुढें क्रमशः दिली आहे; तथापि पाहिल्या, दुसऱ्या अथवा किरकोळ प्रतीच्या सूक्ष्मरेषा, त्यांची लांबी, रुंदी, त्यांचा खोलगटपणा, त्यांचा रंग, त्यांचें विविध स्वरूप, त्यांनीं सांधली जाणारीं चौकोन, त्रिकोणादि चिन्हें वगैरे सर्वसाधारण पण अत्यंत उपयुक्त माहिती प्रारंभीं असणें अवश्य आहे. तीच ती माहिती दरएक रेषेखालीं पुनः पुनः वाचून एकतर कंटाळा यावयाचा अथवा एखाद-दुसऱ्या स्थळीं द्विरुक्ति साफ विसरून जायची. असें न व्हावें म्हणून रेषा व चिन्हें ह्यासंबंधींचे सामान्य नियम प्रस्तुत प्रकरणांत एकत्र दिले आहेत. प्रत्येक रेषा वाचतांना व पहातांना ह्यांपैकीं दरएक नियम ध्यानांत ठेवावा. कारण ह्यांपैकीं एकही गोष्ट जरी नजरेंतून सुटेल, तर त्यायोगें वर्तविलेला अंदाज हटकून चुकेल ह्यांत शंका नाहीं.

समांतर वा जुळ्या रेषा (आकृति २७):—कोणत्याही प्रमुख वा दुय्यम प्रतीच्या रेषेबरोबर दुसरी समांतर रेषा असणें शुभ चिन्ह होय.

दोन्ही रेषा प्रारंभापासून शेवटपर्यंत निर्दोष व संपूर्ण असतील तर फल



आकृति २७ .

द्विगुणित होतें. उदाहरणार्थ, धनरेषा दोन व समांतर असतील तर दोन वेगवेगळ्या मार्गांनीं द्रव्यलाभ होईल, व तो सतत टिकणें दुहेरी रेषेच्या लांबीवर अवलंबून राहील. मस्तकरेषा दुहेरी असणें असाधारण बुद्धिमत्तेचें द्योतक तर आहेच; पण एकाच वेळीं दोन अथवा अधिक पण वेगवेगळ्या परस्परभिन्न कार्यक्षेत्रांत साहजिकरीत्या यश मिळवून देणारें असें लोकविलक्षण चिन्ह हें होय.

संधिरेषा (आकृति २७):—रेषा समांतर असण्याऐवजीं जर त्या एकत्र

सांधल्या जातील तर आकृति २७ त दाखविल्याप्रमाणें संधिरेषा तयार होते. मुख्य रेषेच्या उगमाजवळ किंवा तिच्या विरामस्थळीं बहुधा हा प्रकार दृष्टीस पडतो. प्रमुख रेषेला मिळणारी ही संधिरेषा उपकारक ठरते. ज्या उंचवट्यावरून अथवा ज्या उंचवट्याचे आसपासचे भागावरून ही दुसरी रेषा आलेली दिसेल, त्या उंचवट्याचे गुणधर्म ती प्रमुख रेषेच्या ठायीं बऱ्हंशीं निर्माण करते.

पल्लव वा शाखांकित रेषाः—प्रमुख रेषेमधून बाहेर पडून दूर जाणाऱ्या रेषा मात्र त्या रेषेच्या फलांत क्षीणता उत्पन्न करतात. आयुष्यरेषा अशा तऱ्हेनें संपेल तर व्यक्ति बऱ्याच दिवसांचा आजार भोगून, दिवसेंदिवस खंगून खंगून, निसर्गनियमानुसार आयुष्याच्या अंतीं मृत्यु पावते. उलट, आयुष्यरेषा शेवटपर्यंत शाखाहीन, एकाकी व निर्दोष असेल तर व्यक्तीचा अंत तडकाफडकी, चटकन, दीर्घकाल भोग भोगावयास न लागतां आकस्मिकपणें होतो. हाच नियम बाकीच्या प्रमुख रेषांचे बाबतींत लागू करावा.

ऊर्ध्वगामी रेषाः——प्रमुख रेषेंतून ऊर्ध्वगामी रेषा निघतील तर त्या प्रगतिकारक, भरभराटीच्या, भाग्यकारक व धनदायक होत. उलट अधोगामी रेषा मनुष्याची पिछेहाट करतात, त्याला नाउमेद करतात, त्याचें आर्थिक नुकसान होतें व त्याचा पाय अधिकाधिक खोल रुतला जातो. ऊर्ध्वगामी वा अधोगामी रेषा ओळखण्याचें मुख्य लक्षण एकच. ज्या रेषा बाहेर पडून बोटांच्या पायथ्याशीं असणाऱ्या बुद्धिप्रधान उंचवट्यांच्या अनुरोधानें वर गेलेल्या दिसतील त्या ऊर्ध्वरेषा होत आणि कोणत्याही रेषेपासून बाहेर पडून खालीं मनगटांशीं असणाऱ्या भावनाप्रधान उंचवट्यांकडे धांव घेणाऱ्या रेषा, अधोगामी प्रवृत्तीच्या दर्शक होत. तसेंच रेषा ज्या ठिकाणीं उगम पावते तेथें बहुधा पसरट स्वरूपाची दिसते व ज्या बिंदूजवळ थांबते तेथें शक्यतों सुईच्या अग्राप्रमाणें बारीक अथवा केंसासारखी दिसते ही गोष्ट लक्षांत ठेवावी.

सांखळीची रेषाः—सांखळीचे दुवे एकांत एक जोडावेत त्या प्रकारची रेषा अशुभसूचक होय (आकृति २७). मुख्य रेषा उगमाशीं, अर्धेमधें

कुठेंही अशा स्वरूपाची बनलेली दिसेल, तर आयुष्याचा तेवढा भाग खडतर, त्रासाचा, संकटांनीं परिपूर्ण व विवंचनेचा जातो. विशेषतः आयुष्यरेषा, अन्तःकरणरेषा, व आरोग्यरेषा ह्या तीन रेषा अशा स्वरूपाच्या असणें अत्यंत हानिकारक होय. ज्यावेळीं हेच सांखळीचे दुवे एकांत एक अडकविल्याप्रमाणें ओळीनें नसतात पण दूर अंतरावर, अधें-मधें कुठेंही, कोणत्याही रेषेवर असा एखादा दुसरा दुवा दृष्टीस पडतो तेव्हां त्याला रेषेवरील ' यवचिन्ह ' असें संबोधण्याचा प्रघात आहे. अर्थात् यवचिन्ह संकटसूचक मानतात तें यासाठींच. यवाचा आकार ज्या मानानें लहान अगर मोठा असेल, त्याप्रमाणें संकटकालाचें स्वरूप वा सातत्य टिकाऊ आणि अनर्थकारक ठरतें. उदाहरणार्थ, मस्तकरेषेवर यवाचें चिन्ह मध्येंच कुठेंतरी दृष्टीस पडलें, तर आयुष्याच्या त्या कालांत मानसिक स्वास्थ्य आकस्मिकपणें बिघडेल, उद्योगधंद्यांत नीट लक्ष्य लागायचें नाहीं. एवढेंच नव्हें तर लागोपाठ ज्या गोष्टी घडतील त्याही उद्वेगजनकच ठरतील. यवाचा आकार कळत न कळत असा असेल तर वर्षसहा महिन्यांत सर्व परिस्थिति पुनः पूर्ववत् सुधारेल असें निश्चित समजावें.

प्रमुख रेषा खंडित असेल त्यावेळीं क्वचित् ती रेषा थांबण्यापूर्वीं, अन्य रेषेचा तुकडा आसपास त्या खंडकालापुरता कधींकधीं तयार होत असलेला दृष्टीस पडतो. अशा वेळीं प्रमुख रेषा एकची एक अखंड स्थितींत दिसण्याऐवजीं दोन वा अधिक तुकड्यांनीं सांधली जावी तशी दिसते. हे वेगवेगळे तुकडे निर्दोष असणें मात्र आवश्यक असतें. त्यामुळें प्रमुख रेषा खंडित वा अपुरी असल्याकारणानें होणारी हानि कांहीं कालानंतर भरून काढतां येते. उदाहरणार्थ, धनरेषा अशा प्रकारची असतां वारंवार नौकरी सुटण्याचे वा धंदा बदलण्याचे प्रसंग आयुष्यांत उद्भवतात आणि मिळकतींत निश्चितपणा असा केव्हांच येत नाहीं. तथापि एक नौकरी सुटली, पहिला धंदा अंगलट आला तरी नंतर पुनः जम बसूं शकतो. निदान उद्योगच मिळत नाहीं अशी अवस्था दीर्घकाल टिकत नाहीं. दोन तुकड्यांत जेवढें अंतर दिसेल त्या मानानें कमजास्त काल असा विवंचनेचा जातो. तसेंच पहिल्या तुकड्यापेक्षां दुसरा नव्यानें सुरूं होणारा तुकडा

अधिक निर्दोष असेल, तर धंद्यांत वा नौकरींत होणारा बदल इष्ट वा अधिक किफायतशीर ठरेल. उलट पहिल्यापेक्षां पुढचा तुकडा अस्पष्ट, अशुभ-चिन्हांकित, छेदित अथवा कोणत्याही कारणामुळें बिघडलेला असेल, तर बुडत्याचा पाय खोलांत ह्या उक्तीप्रमाणें जो जो उद्योग नव्यानें फत्करावा त्यांत त्यांत अपयश, नुकसान व पिछेहाट होईल असें समजावें.

कोणतीही रेषा विघडण्यास सामान्यत: खालीं दिलेल्यापैकीं एक, दोन वा अधिक कारणें पुरेशीं होतात.

(१) प्रमुख रेषा अन्य स्वतंत्र रेषेनें छेदली जाणें. ह्या ठिकाणीं स्वतंत्र रेषेनें म्हणण्याचा आशय हा कीं, दोन प्रमुख रेषा परस्परांना छेदून जाणें (उदाहरणार्थ धनरेषा बहुतेकांच्या हातांवर मस्तकरेषा व अन्तः-करणरेषा ह्या दोहोंना छेदून वर जाते) अपरिहार्य असते. त्यामुळें किरकोळ रेषांचे (Chance lines) छेद ज्यावेळीं प्रमुख रेषेवर दिसून येतात त्यावेळीं प्रमुख रेषेच्या फलांत दोष उत्पन्न होतो.

(२) कोणत्याही प्रमुख रेषेवर काळा वा तांबडा डाग ज्याला तीळ, चामखीळ, मस इत्यादि म्हणतात तो असणें बरें नव्हें.

(३) प्रमुख रेषा नागमोडी आकाराची असणें फलाच्या दृष्टीनें कम-कुवतपणाचें द्योतक होय.

(४) क्वचित्,प्रमुख रेषा मध्येंच फार रुंद तर नंतर निरुंद, कुठें उथळ व पसरट आणि नंतर फार बारीक व खोल, कुठें सरळ व नंतर नाग-मोडी वळणें घेणारी अशा प्रकारची आढळून येते (आकृति २७). हीं सर्व लक्षणें परिस्थितींत वारंवार अनिश्चितपणा उत्पन्न करणारी व आयु-ष्यांत बरींच स्थित्यंतरें घडावींत असा आशय दाखविणारीं असतात.

(५) प्रमुख रेषेचे आसपास आणखी चार-दोन समांतर रेषा आढळ-तात व त्या सर्वांना छेदून जाणाऱ्या आणखी चार–दोन रेषा दृष्टीस पड-तात, त्यामुळें अशी आकृति जाळ्याप्रमाणें तयार होते (आकृति २७). हें जाळीचें चिन्ह बव्हंशीं शुक्र-उंचवट्यावर व क्वचित् बुधाचे उंचवट्यावर पहावयास सांपडतें. हें चिन्ह बुद्धिभ्रंश झाल्याचें निदर्शक असतें. बुद्धि-

भ्रंश होण्यास लोभ वा मोह ह्यांपैकींच एखादें कारण असूं शकतें हें निर्विवाद आहे. बुध उंचवट्यावर हें जाळीचें चिन्ह असतां व्यक्ति ठक, दांभिक, अप्रामाणिक, अतिकारस्थानी व अत्यंत मतलबी असते. लोभापायीं सत्य–असत्य, दयामाया, नांव-लौकिक ह्यांची चाड ती बाळगीत नाहीं. शुक्र-उंचवट्यावरील जाळीचें चिन्ह एवढें अनर्थकारक नसतें. विशेषतः इतरांना अशा व्यक्तीकडून निश्चयानें उपद्रव होतोच, असें आणखी इतर अशुभ लक्षणें हातावर असल्याशिवाय म्हणतां यावयाचें नाहीं. शुक्रउंचवट्यावरील जाळीचें चिन्ह व्यक्तीस विकारवश, विषयलोलुप, स्त्रैण व दुबळें बनवितें. यदाकदाचित् अशा व्यक्तीला अनुकूल संधि, काल व ऐपत प्राप्त झाली तरच अशा व्यक्तीचें पाऊल वांकडें पडण्याचा संभव. एरवीं मनांतलें मनांत शेख महंमदी मनोराज्य उभारून त्यांत गर्क होण्यापलीकडे ह्या व्यक्तीला गत्यंतरच नसतें अशी वस्तुस्थिति आहे.

वर सांगितलेल्या पांचांपैकीं एक अगर अधिक कारणामुळें प्रमुख रेषा ज्या वेळीं बिघडते, त्या वेळीं त्याच बिघडलेल्या ठिकाणीं एकादा चौकोन वा त्रिकोण तयार झालेला दृष्टीस पडेल तर विशेषतः बिघडलेली प्रमुख रेषा अशा चौकोनांतून अगर त्रिकोणांतून जाईल तर–तें शुभचिन्ह समजावें. मुख्य रेषा बिघडल्याकारणानें नुकसानकारक परिस्थिति येऊन ठेपते खरी; पण त्यांतून सहीसलामत बाहेर पडतां यावें अशा घटनाही सुदैवानें अचूक निर्माण होतात. चौकोन हें चिन्ह तळहातावर कोठेंही असो, त्यामुळें संरक्षण लाभतें. निकराचा क्षण प्राप्त झाला तरी त्यांतून सुखरूप निभावून व्यक्ति बाहेर पडते असा अनुभव आहे. त्रिकोणचिन्ह बुद्धिमत्ता दर्शवितें आणि चौकोन चिन्ह केवळ प्रारब्ध दर्शवितें. ह्याचाच अर्थ त्रिकोणामुळें मनुष्य स्वतःच्या महत्त्वाकांक्षेसाठीं साहसानें व धडाडीनें अडचणींत उडी घेतो व त्यांतून अक्कलहुषारीनें यशस्वी होऊन बाहेर पडतो. उलट चौकोन चिन्ह असेल तर आपत्काल ओढवणें अगर त्यांतून नंतर सुटका होणें ह्या सर्व घटना सर्वस्वीं परमेश्वरी इच्छेवर म्हणजेच त्या त्या व्यक्तीच्या आटोक्याबाहेरच्या ठरतात असें म्हणणें भाग आहे.

येणेंप्रमाणें रेषा, त्यांचें विविधस्वरूप व आसपास आढळणारीं चिन्हें ह्यांची माहिती आहे.

तळहात व त्यांवरील ग्रह-उंचवटे ह्यांवर दोन अथवा अधिक रंगांची संमिश्र छटा असलेली दिसून येते. तसेंच पहिल्या अथवा दुय्यम प्रतीच्या रेषांतूनही विशिष्ट रंगाची झाक दृष्टीस पडते. कोणताही रंग विशिष्ट ग्रह-उंचवटा बलवान् असल्याचें दर्शवितो. तांबूस रंग रवि–गुरु–शुक्र–उंचवट्यांचा, गडद तांबडा रंग मंगळ-उंचवट्याचा, पांढरा रंग चंद्र-उंचवट्याचा, पीतवर्ण शनि–बुध-उंचवट्याचा द्योतक असतो ही गोष्ट लक्ष्यांत ठेवली म्हणजे रेषांचें बलाबल रंगांच्या अनुक्रमानें म्हणजेच ग्रह-उंचवट्यांच्या गुणधर्मांनुसार कसें ठरवावयाचें तें सहज कळेल.

तळहातांवरील प्रमुख रेषा, त्यांची लांबी, रुंदी, खोली, रंग व एकंदर सामान्यस्वरूप हीं परस्पर समान असावींत. आयुष्यरेषा रुंद–पसरट तर धनरेषा खोल व बारीक, मस्तकरेषा तांबड्या रंगाची तर अन्तःकरणरेषा पीतवर्णी असा जमाना आढळून आल्यास फल वर्तवितांना फार खबरदारी ध्यावयास हवी.

कोणत्याही रेषेच्या फलाचें मान त्या रेषेच्या निर्दोष स्थितीवर अवलंबून असतें. बारीक, खोल, सुस्पष्ट, एकसांधी, तांबूस वर्णाची, इतर कोणत्याही दुय्यम रेषेशीं व चिन्हांशीं संबंध न ठेवणारी अशी रेषा निर्दोष होय. उलट अशुभचिन्हांकित, इतर रेषांनीं छेदित, मध्येंच रुंद तर पुढें अरुंद, उथळ, पांढऱ्या किंवा पिवळ्या रंगाची, खंडित वा अपूर्ण रेषा दूषित मानावी.

कोणतीही प्रमुख रेषा अतिलांब असणेंही अशुभ होय. मस्तकरेषा गुरु-उंचवट्यापासून चंद्र वा बुध-उंचवट्याच्या परिसीमेपर्यंत असेल, तर व्यक्ति दीर्घद्वेषी अथवा कुत्सित व अनुदार वृत्तीची असते. तसेंच धनरेषा शनि-उंचवटा ओलांडून मधल्या बोटावर चढणें, हें कृपण, हिमट्या व लोभी प्रवृत्तीचें द्योतक ठरतें. तेव्हां ह्या सर्व गोष्टी नीट ध्यानांत ठेवून मगच निर्णय द्यावा.

प्रकरण १५ वें : आयुष्य--रेषा

इतर कोणतीही रेषा व्यक्तीच्या हातावर असेल अथवा नसेल; तथापि आयुष्य–रेषेचा लवलेशही नाहीं असा हात पाहावयास मिळणें जवळ-जवळ अशक्य आहे. दोहोंपैकीं निदान एका हातावर आणि पूर्ण नसली तरी अपूर्ण स्वरूपांत ही रेषा प्रत्येक व्यक्तिमात्राचे ठायीं दिसून येते.

आणि समजा जर यदाकदाचित् आयुष्य–रेषा दोन्ही हातांवर नाहीं अशी व्यक्ति आढळलीच तर ती व्यक्ति जन्मतः लाभलेल्या नैसर्गिक सामर्थ्या-वर कालक्रमणा करील, स्वयंसंपादित भाग असा त्या व्यक्तीच्या आरोग्याचे बाबतींत मुळींच आढळून येणार नाहीं. अशा व्यक्तीचे हातावर आयुष्य-रेषेच्या अभावीं मस्तकरेषा वा अन्तःकरणरेषा वैशिष्टयपूर्ण स्थितींत आढळ-तील. बौद्धिक जीवनावरच प्रायः आयुरारोग्याची बैठक अशी व्यक्ति अधिष्ठित करीत असते. त्यामुळें सामान्य लोकांच्या आयुष्यरेषेवरून जो बोध घ्यावयाचा तो सर्व बोध वरील व्यक्तीच्या हातावरील अन्तःकरण-रेषा व विशेषेंकरून मस्तकरेषा पाहून होऊं शकेल. तथापि अशा व्यक्तींचें जीवित कधीं आकस्मिकरीत्या संपुष्टांत येईल हें ठरवितां येणार नाहीं. आयुष्यरेषा नसणें ह्याचाच अर्थ स्वतःची शरीर–प्रकृति, आरोग्य अथवा आयुष्यांबद्दल संपूर्ण बेफिकीर असणें हा होय. निसर्गतःच उत्तम बुद्धिमत्ता व सदृढ आरोग्य जेव्हां व्यक्तीच्या वांट्यास येईल व अशी लोकविलक्षण व्यक्ति केवळ ध्येयपूर्तीसाठीं स्वत्व विसरून लाभेल तेवढें आयुष्य त्या-कारणीं खर्ची घालील तेव्हांच हा अपूर्व दृष्टान्त नजरेस यावयाचा. पण कोट्यवधि लोकांत हें सद्भाग्य एखाद्यास तरी लाभेल असें म्हणणें देखील धाष्टर्याचें ठरेल.


आयुष्यरेषा तर्जनीखालीं गुरु व मंगळ ह्या उंचवट्यांचे संधिसीमेवर उगम पावून सामान्यतः शुक्र–उंचवट्यास वळण घालून थेट खालीं मनगटाजवळ येऊन थांबते (आकृति २८). अशी अर्धवर्तुळाकृति, संपूर्ण व निर्दोष रेषा आरोग्यप्रद व आयुष्यवर्धक समजावी. आयुष्यांतील

कोणताही झगडा अथवा आणीबाणीचा क्षण अखेरपर्यंत जिंकणें व जिंकल्यानंतर त्याचें फल स्वतः उपभोगणें ह्या गोष्टी केवळ निरोगी व कणखर शरीरप्रकृतीवर अवलंबून असणार हें उघड आहे. म्हणूनच ही रेषा निर्दोष असणें आवश्यक आहे.

जेव्हां आयुष्यरेषा गुरु–उंचवट्यावर उगम पावते व अखेरपर्यंत निर्दोष असते तेव्हां (आकृति २८) व्यक्तीचें आयुष्य महत्त्वाकांक्षापूर्ण, ध्येयनिष्ठ इत्यादि गुरु–उंचवट्याच्या गुणधर्मांप्रमाणें व्यतीत होईल. उलट आयुष्यरेषा मंगळ--उंचवट्यावरून निघालेली दिसेल (आकृति २८) तर हूड प्रवृत्ति, आडदांडपणा, भांडखोर व हट्टी स्वभाव, आक्रमक वृत्ति हीं दिसून येतील. गुरु–उंचवट्यावरून निघणारी आयुष्यरेषा संयमी स्वभाव व सोशिकपणा दर्शविते.

शुक्र–उंचवट्याला वळसा घालण्याऐवजीं आयुष्यरेषा तो उंचवटा थोडाफार छेदीत केव्हां केव्हां सरळ खालीं येते (आकृति २९). त्यावेळीं प्रकृतींत फारसा जोम नसतो. एवढया–तेवढ्या दुखण्यानें प्रकृति खालावते. उत्साहाचें प्रमाण सतत सारखें रहात नाहीं. स्वभाव चिक्कू, चिरचिरा व अनुदार बनतो.

आयुष्यरेषा व अंतःकरणरेषा एका बिंदूंतून अथवा जवळजवळ उगम



आकृति २८


आकृति २९


आकृति ३०

पावतील तर असा मनुष्य संकटाबद्दल नेहमीं बेफिकीर असतो. नाहीं


नाहीं त्या आपत्तींत स्वतः होऊन निष्कारण उडी घेतो. अर्थात् अशा आगंतुक उठाठेवींचे परिणाम भोगल्यावांचून त्याची सुटका होत नाहीं.

उलटपक्षीं आयुष्यरेषा व अंतःकरणरेषा परस्परांपासून दूर, योग्य अंतरावर उगम पावतात त्यावेळीं मनुष्य, येणाऱ्या संधीचा पूर्ण फायदा घेतो. साहसानें कोणतीही गोष्ट विचारपूर्वक हातीं घेऊन स्वपराक्रमानें तो उदयास येतो. आगंतुक विषयाकडे त्याचें लक्ष सहसा जात नाहीं.

आकृति ३० मध्यें दाखविल्याप्रमाणें अंतःकरणरेषा व आयुष्यरेषा ह्या दोहोंना सांधणारी रेषा एकादे वेळीं दृष्टीस पडते. त्यावेळीं मनुष्य अति धीम्यावृत्तीचा असतो. तो जरी बुद्धिमान् असला तरी आणी-बाणीच्या वेळीं त्याची त्रेधा उडते. शेवटीं विचार करण्यांत त्याचा इतका काल व्यर्थ जातो कीं, चालून आलेली संधि निघून जाते व नंतर हा पस्तावतो.

आयुष्यरेषेंतून ऊर्ध्वरेषा निघतील तर (आकृति ३१) त्या प्रगति-दर्शक होत. अशा रेषा बारीक व निर्दोष असाव्यात. ज्या ग्रह-उंचवट्या-वर जाऊन ह्या थांबतील त्या उंचवट्याच्या गुणधर्माप्रमाणें व्यक्तीची मनोरचना असते व ती सफल होते.


ऊर्ध्वरेषांऐवजीं अधोगामी रेषा (आकृति ३२) दिसून आल्या तर व्यक्तीची दिवसेंदिवस प्रगतीऐवजीं पिछेहाट होईल हें उघड आहे. आयुष्य-



आकृति ३१



आकृति ३२




आकृति ३३

रेषेंतून खालीं मनगटाकडे धाव घेणाऱ्या अशा रेषा संख्येनें जेवढ्या अधिक तितक्या वेळां अशा प्रसंगांची पुनरावृत्ति होते. ह्या अपेशाचें कारण त्या व्यक्तीची शरीरप्रकृति तिचा स्वभाव कीं तिचें दुर्दैव हें हातांवरील इतर चिन्हांवरून ठरवावें.

क्वचित् एका आंत एक अशा दोन आयुष्यरेषा असणारा हात पहावयास सांपडतो. त्या दोन्ही रेषा कधीं अखंड व निर्दोष असतात, अथवा कधीं आयुष्यरेषा संपूर्ण असून आंतील रेषा अर्धवट असते. ही आंतील रेषा मंगळाची होय. आयुष्यांत उद्भवणाऱ्या आपदांशीं झगडण्याचें सामर्थ्य ह्या मंगळरेषेच्या अस्तित्वानें व्यक्तीस प्राप्त होतें. दोन्ही रेषा संपूर्ण असतील तर सारी हयातभर जीवनमरणाचा प्रश्न सोडविण्यासाठीं झगडावें लागेल व शेवटीं साऱ्या बिकट परिस्थितींतून व्यक्ति यशस्वीरीत्या सुटेल असें समजावें. एका दृष्टीनें ही रेषा (आकृति ३३) तारक, संरक्षक, आधारदर्शक अशी असल्यानें आवश्यक खरी. तथापि मंगळाचे गुणधर्म हिच्यांत उतरतात व स्वभाव हट्टी, एककल्ली, साहसप्रिय, बेगुमान बनण्यांची भीति असते. ज्या भागापुरती ही रेषा आयुष्यरेषेशीं समांतर दिसेल, तेवढींच आयुष्यांतील वर्षें व्यक्तीला घडामोडीचीं जातील हें लक्ष्यांत ठेवावें.

खंडित वा तुकड्यातुकड्यांनीं सांधलेली आयुष्यरेषा आयुष्यांत विविध तऱ्हेचे चढउतार दर्शविते (आकृति ३३). शरीरप्रकृति वरचेवर बिघडल्यानें किंवा मस्तकरेषा, धनरेषा अगर अंतःकरणरेषा ह्यांत दोष उत्पन्न होऊन व्यक्तीचा उत्साह सतत टिकणें अशक्यच ठरतें. अशा वेळीं संरक्षण चिन्ह म्हणजे त्याच खंडित वा स्थित्यंतरदर्शक भागीं चौकोन असावा (आकृति ३३). कोणत्याही संकटांतून सहीसलामत सोडविणारें फक्त एक चौकोन चिन्ह आहे हें विसरूं नये. अर्थात् जिथें चौकोन दिसेल तो काल संरक्षित खरा, तथापि अडचणींचा व विशेषप्रकारच्या घडामोडींचा जाईल ह्यांत संशय नाहीं. ज्या रेषेवर, उंचवट्यावर अथवा चिन्हांभोंवतीं चौकोन दिसेल त्या स्वरूपाची ती अडचण वा घडामोड असूं शकेल.

अतिरुंद, उथळ व पसरट आयुष्यरेषा असेल (आकृति ३४) तर व्यक्तीचें आरोग्य केवळ वरवरचें दिखाऊ असें असतें. विशेषतः गुबगुबीत पण पोकळ तळहातावर तर अशी आयुष्यरेषा असणें अत्यंत अनिष्ट होय. ' देखनेमे ढब्बू और चलनेमे शिवराई ' ह्या उक्तीप्रमाणें दिसायला खूप गलेलठ्ठ पण शरीरप्रकृतीबाबत नित्य अनंत तक्रारी असल्यामुळें मेहनतीला सुस्त व निकामी अशी वस्तुस्थिति आढळून येते. तळहात भरीव आणि इतर प्रमुख रेषा व उंचवटे शुभ असतील तर एवढी अनावस्था ओढवत नाहीं. व्यक्ति आरोग्यानें कमकुवत असेल तथापि त्यायोगें होणारा परिणाम एवढा दुःसह ठरणार नाहीं.



आकृति ३४

शिडीच्या पायऱ्यांप्रमाणें आयुष्यरेषा असणें व्याधिग्रस्त शरीराचें द्योतक आहे (आकृति ३४).

सांखळीसारखी गुंफण असणारी आयुष्यरेषा (आकृति ३४) नाजूक शरीरप्रकृति असल्याचें दर्शविते. लवंग खाल्ली तर उष्ण आणि वेलदोडा खाल्ला कीं थंडी होणारीं माणसें ह्या सदराखालील होत. आहारविहाराचे बाबतींत मोजून मापून हीं माणसें अगदीं कांटेतोलपणानें वागत असतात. प्रत्यक्ष आजारापेक्षां त्याच्या चिंतेनेंच हीं माणसें अक्षय ग्रस्त झालेलीं दिसून येतात.


सांखळीचे दुवे एकांत एक गुंफल्याप्रमाणें इथूनतिथून सांधलेली रेषा असण्याऐवजीं आयुष्यरेषेवर मधूनच यवाच्या आकाराचीं एक वा अधिक चिन्हें दृग्गोचर होतात (आकृति ३४). शरीरस्वास्थ्य त्या वयांत खालावेल, आजार वा गंडांतर उद्भवेल अशा आशयाचें तें द्योतक होय. यवाचा आकार ज्या मानानें कमी अथवा जास्त असेल, त्या मानानें हा शारीरिक भोग किंचित् अगर दीर्घकाल टिकणारा ठरतो.

सामान्यतः उतारवयांत माणसाला दीर्घकाल टिकणारी एखादी उपाधि जडते. त्यामुळें त्याच्या प्रकृतीचें मान हळूहळू कमी होतां होतां शेवटीं अंतःकाल नैसर्गिकरीत्याच ओढवतो. हें नैसर्गिक मरण आयुष्यरेषा विराम पावतांना उलट्या ठेवलेल्या पिसाप्रमाणें तळहातावर संपते त्यावरून दिसून येते (आकृति ३४). अथवा आयुष्यरेषा विराम पावण्यापूर्वी अस्पष्ट होत होत मनगटाच्या खालच्या सीमाप्रदेशांत विलीन होईल तरीही म्हातारपणचें स्वाभाविक मरण वांट्यास येईल असें समजावें. मात्र बाकीच्या प्रमुख रेषा व हातांवरील इतर शुभाशुभ चिन्हें ह्यांची अनुकूलता पाहूनच हा निर्णय प्रगट करावा.

आयुष्यरेषेवर आडव्या छेद देणाऱ्या रेषा बहुधा तळहातावर पहावयास सांपडतात (आकृति ३५). ह्या आडव्या रेषा आयुष्यरेषेच्या आंत शुक्र उंचवट्यावर उगम पावून नंतर आयुष्यरेषा छेदतील तर संकोचित, लाजाळू, प्रेमळ वा स्वच्छंदी–स्वैर वृत्तीपायीं व्यक्तीचें नुकसान होतें; आणि हे छेद मंगळ-उंचवट्यावरून आलेले दिसून येतील, तर भांडखोर, हट्टी व अविवेकी स्वभावामुळें वारंवार अडचणी निर्माण होतात.

आयुष्यरेषेला छेदण्याऐवजीं ह्या आडव्या रेषा तींत मिसळतील तर (आकृति ३५) नुकसान अथवा अडचणी येणार नाहींत. तथापि मनुष्याच्या मनाची प्रसन्नवृत्ति एवढ्यातेवढ्या कारणानें नाहींशी होईल. मंगळ वा शुक्र-उंचवट्यावरील आडव्या रेषा व्यक्तीला विकारलोलुप अथवा भावनावश करीत असल्यानें, त्या शारीरिक वा मानसिक सुखांत वारंवार व्यत्यय आणतात असा अनुभव आहे.

ह्या आडव्या रेषांचा छेद आयुष्यरेषेप्रमाणेंच मस्तकरेषेलाही बसेल (आकृति ३५) तर मस्तकरेषा दूषित होईल. अर्थात् अविचाराचा परिणाम म्हणून भोगावयास लागणारी आपत्ति डोक्यांत काहूर उठवील व कोत्या, अदूरदर्शी आणि अपेशी कृत्यांमुळें शरीरप्रकृति त्या त्या कालीं खालावेल असें समजावें.




आकृति ३५

· आयुष्यरेषा, मस्तकरेषा आणि अन्तःकरणरेषा ह्या तिन्ही प्रमुख रेषांना अंगठ्याच्या मूलप्रदेशांतून निघणाऱ्या आडव्या रेषा छेदतील तर (आकृति ३५) त्या फारच अनिष्ट होत. ज्याच्या मृत्यूमुळें आपल्या जीवनास कलाटणी मिळेल अशा व्यक्तींच्या दर्शक अशा त्या असतात. आई–बाप–भावंडें–पति–पत्नी ह्यांचा कायमचा वियोग, बहुतेक लांबच लांब पण प्रमुख रेषांना तळहातावर तिरपा छेद देऊन, ह्या रेषा सूचित करतात. मात्र आयुष्यरेषेवर वयाच्या कोणत्या वर्षाला त्या छेद देतील तें लक्ष्यपूर्वक पहावें; आणि पुढेंही कोणत्या ग्रहाच्या उंचवट्यावर अथवा कोणती विशिष्ट प्रमुख रेषा छेदून विराम पावण्याचा तिचा इरादा आहे हें ध्यानांत घ्यावें. बुध-उंचवटा, त्यावरील विवाहरेषा, अन्तःकरणरेषेचा बुध-उंचवट्यानजीकचा प्रदेश ह्यांवरून पति-पत्नी, अपत्य अथवा जिवलग स्नेही ह्यांचा बोध होतो. मस्तकरेषा, रविरेषा, रवि-उंचवट्याखालचा अन्तःकरणरेषेचा टापू, शनि-उंचवटा अगर धन रेषा ह्यांमुळें पिता, घरांतील मिळवता, जबाबदार, वडीलधारा मनुष्य, आपला आश्रयदाता हीं ओळखतां येतात. तर आयुष्यरेषा चंद्र-उंचवटा, गुरु-उंचवट्याखालचा मस्तक वा अन्तःकरणरेषेचा भाग ह्यांवरून मातृसौख्याचा बोध होतो. येणेंप्रमाणें आडवा छेद नेमका कोठें बसतो तें पहावें व विचार करून मग निर्णय द्यावा.

सारांश, आयुष्यरेषेवरून शरीरप्रकृति, आरोग्य, काटकपणा, उत्साह व देहबल ह्यांचें दिग्दर्शन होतें. ही रेषा जितकी लांब, अर्धवर्तुळाकार, बारीक व खोल असेल त्या प्रमाणांत वरील गोष्टींची सुबत्ता लाभते. मात्र आयुर्मर्यादा अगर आकस्मिक तऱ्हेनें येणारें गंडांतर हे केवळ आयुष्यरेषेवरून सांगतां येत नाहीं; तर त्यासाठीं तळहातावरील इतर प्रमुखरेषा, ग्रहांचे उंचवटे, शुभ वा अशुभ चिन्हें हीं एकसमयावच्छेदेंकरून पहावीं लागतात. निर्दोष व संपूर्ण आयुष्यरेषा असलेलीं माणसेंहीं अल्पायुषी

ठरतात व वज्रासारख्या धडधाकट शरीराचा ह्या ना त्या प्रकारें अकालीं अंत होतो. अतएव आयुर्मर्यादा सांगणें सोपें नव्हें व त्या खटाटोपांत सहसा पडूं नयें हें उत्तम.

तथापि दुसऱ्याला आयुर्मर्यादा न सांगितली तरी भविष्य वर्तविण्या-साठीं त्याबाबतचा अंदाज स्वतःला चटकन करतां आला पाहिजे. सर्व प्रमुख रेषा, ग्रहांचे उंचवटे व दोन्ही हातांवरील सर्वसाधारण चिन्हें अनु-



आकृति ३६

कूल असतील तर सबंध आयुष्यरेषा सत्तर वर्षांची मानावी. त्यांत बुद्धिमत्तेचा, कर्तृत्वमान् काल किती ह्याचा अंदाज मस्तकरेषेच्या लांबीवरून आणि सांपत्तिक प्राप्तीचा हिशेब धनरेषेच्या हातावरील स्वरूपावरून करावा.

आयुष्यरेषा एकदां सत्तर, साठ, पन्नास वा अमुक एक विशिष्ट आयुमर्यादादर्शक अशी इतर शुभाशुभ लक्षणांवरून निश्चित ठरली कीं, नंतर तिचे पांच–पांच अथवा सात–सात वर्षांचे भाग कल्पावेत व अशा रीतीनें कोणतीही गोष्ट वयाच्या अमुकतमुक वर्षी होईल, असा अभिप्राय व्यक्त करावा.

उदाहरणार्थ, आयुष्यरेषा सत्तर वर्षांची आयुर्मर्यादा दर्शविते असें आपण मानूं. तिच्या मध्यबिंदूवर अर्थात् पस्तिसावें वर्ष येईल (आकृति २६). मध्यबिंदूपर्यंतचा एक एक तुकडा स्वतंत्र समजून त्यांचे प्रत्येकीं मध्यबिंदूजवळ आणखी दोन दोन भाग पाडले तर सुमारें सतरा वर्षांचा बोध दरएक तुकड्यावरून व्यक्त होतो. समजा, पहिल्या सतरा वर्षांच्या द्योतक असणाऱ्या आयुष्यरेषाविभागावर अंगठ्याच्या मूलांतून एक आडवा छेद येऊन तो शनि वा रविउंचवट्यावर जातो आहे. त्यावरून अर्थात् पहिल्या सतरा वर्षांच्या आंतच सर्व प्रपंचाचा योगक्षेम चालवण्याची जबाबदारी स्वतःवर अकालीं पडेल. दुसऱ्या सतरा वर्षांच्या टप्प्यांत प्रारंभींच आयुष्यरेषेंतून एक ऊर्ध्वरेषा निघून ती गुरु-उंचवट्यावर जाईल. त्यामुळें आणखी चार–पांच वर्षांतच म्हणजे वयाच्या २१–२२ व्या वर्षी परिस्थिति बरीचशी आटोक्यांत येईल, नौकरी मिळेल व सुस्थितीला सुरवात होईल. त्याच आयुष्यरेषाविभागांतून आणखी एक–दोन लहान लहान ऊर्ध्वरेषा निघतांना दृग्गोचर होतील तर त्या त्या वेळीं नौकरींत बढती मिळण्याचा, दर्जा उत्तरोत्तर वाढण्याचा व स्वतःची महत्त्वाकांक्षा चटकन आटोक्यांत येण्याचा योग, वयाच्या चौतीस वर्षांपूर्वींच आहे असें दिसून येईल. पुढें तिसऱ्या टप्प्याच्या मध्यबिंदूवर यदाकदाचित् यवाचें चिन्ह असेल अथवा चौकोन, फुली अगर शुक्र–उंचवट्यावरून येणारा छेद असेल

तर वयाच्या बेचाळिसाव्या वर्षी प्रकृति नादुरुस्त होईल. जसें यवचिन्ह असेल त्या प्रमाणांत आरोग्य खालावेल. विशेषतः त्या चिन्हानंतर आयुष्यरेषा पूर्ववत् बलवान्, निर्दोष न दिसतां अस्पष्ट, कमजोर, आणखी इतर अशुभ चिन्हांनीं युक्त अशी दिसेल तर एकदां बिघडलेलें आरोग्य त्यानंतर लवकर सुधारणार नाहीं. मात्र सर्वांत शेवटचा आयुष्यरेषेचा विभाग एवढेंच नव्हें तर हातांवरील एकूणएक प्रमुखरेषा विराम पावण्यापूर्वीची त्यांची अवस्था पूर्ण निर्दोष दिसेल, तर बेचाळीसनंतर कितीही दीर्घकालीन भोग वांट्यास आला तरी पुनः त्यांतूनही पन्नाशीनंतर आयुरारोग्य व सुस्थिति लाभेल आणि शेवट गोड म्हणजे नैसर्गिक रीतीनें यथावकाश होईल असा बोध घ्यावा.

सारांश, ही रीत केवळ आयुष्यरेषेवरील वयोवर्ष निश्चित करण्यापुरती वापरायची नाहीं, तर येणेंप्रमाणें हातावरील कोणत्याही प्रमुख रेषेचें काल-मापन ह्याच पद्धतीनें करावें. अंतःकरणरेषा व मस्तकरेषा तर्जनीखालून करांगुलीचे खालच्या प्रदेशाकडे जातात, आणि धनरेषा, रविरेषा, बुधरेषा, आरोग्यरेषा अथवा कोणतीही ऊर्ध्वरेषा खालून वर बोटांच्या मूलप्रदेशांतील ग्रहउंचवट्याकडे जातात. रेषांचीं हीं उगमस्थानें ध्यानांत ठेवावीं म्हणजे कालमापन करतांना करावयाचा हिशेब कुठून कोणत्या दिशेचे अनुरोधानें तळहातावर करायचा, ह्याबाबत अक्षम्य वा हास्यास्पद प्रमाद कोणाकडूनही घडणार नाहीं. कालमापनपद्धतीस केव्हांही उपयोगी पडणारी माहिती येणेंप्रमाणें.

मस्तकरेषा सर्वसामान्यपणें तळहातावर मधोमध आडवी गेलेली दृष्टीस पडते आणि अंतःकरणरेषा बोटांच्या मुळालगतचा सीमाप्रदेश व मस्तकरेषा ह्या दोहोंच्या मध्यावर बहुधा आडवी पसरलेली असते. दोन्ही रेषांच्या ह्या स्वाभाविक अवस्था होत हें विसरूं नये. कारण परमेश्वरी हेतूनेंच व्यक्ति-वैचित्र्य निर्माण होत असल्यानें, दरएक व्यक्तीच्या तळहातावर ह्या रेषा आपली स्वाभाविक जागा सोडून त्यापेक्षां वर अथवा खालीं अव-तीर्ण होतात असें दिसून येईल. ह्या रेषा स्वाभाविक असतील तर बरेंच झालें. मस्तकरेषा तळहातावर स्वाभाविक ठिकाणीं असेल त्यावेळीं ती

मधोमध असते; म्हणजे मनगटापासून वरचा काल मोजावयाचा झाल्यास मस्तकरेषेजवळ वयाचें पस्तिसावें वर्ष येतें व अन्तःकरणरेषा वर उरलेल्या भागांत मधोमध असल्यानें, तिथें आयुष्याचें अजमासें बावन्नावें वर्ष मानावें लागेल. पण ह्याच दोन रेषा जर अस्वाभाविक म्हणजे किंचित् खालीं–वर असतील, तर प्रथम पस्तीस व बावन्न ह्या वयोवर्षांचे बिंदु निश्चित ठरवून त्यावरून आणखी किती वर्षें पस्तीस–बावन्नांत मिळवलीं अगर कमी केलीं असतां त्या त्या मस्तक वा अन्तःकरण रेषेवरून वरील वयोवर्ष काढतां येईल हें समजणें सहज शक्य आहे. ह्या रीतीनें धनरेषा तळहातावर पहिल्या एक-तृतीयांश भागानंतर चंद्र–शुक्र-उंचवट्याच्या पुढच्या भागांत कुठेंतरी उगम पावेल व अन्तःकरणरेषेवर जाऊन विराम पावेल, तर तेवीस–चोवीस वर्षांपासून वयाच्या बावन्न–पंचावन्न वर्षांपर्यं-तचा आयुष्याचा भाग कर्तबगारीचा व अर्थपूर्ण जाईल असा आशय जाणावा.

मस्तकरेषा व अन्तःकरणरेषा ह्यांचें कालमापन करतांना बोटांच्या विभागाचें नैसर्गिक साहाय्य अवश्य घ्यावें. जर आयुष्यरेषेवरून आयुर्मर्यादा सत्तर वर्षांची असल्याचें दिसून येईल, तर दरएक बोटाखालील अन्तः-करणरेषेचा अथवा मस्तकरेषेचा विभाग सुमारें सतरा वर्षांचा पडेल हें स्वाभाविकच आहे. त्यामुळें ह्या रेषा मोजणें सुलभ होईल. तसेंच चंद्र–शुक्र-उंचवटे मनगटाजवळ तळहाताचा एकतृतीयांश भाग व्यापतात. मधला भाग मंगळ-उंचवट्याचा आणि वरील एकतृतीयांश भागांत बुध, रवि, शनि आणि गुरु हे उंचवटे असतात. ही गोष्ट ध्यानांत धरली म्हणजे निश्चित ठरवलेल्या आयुर्मर्यादेचे तीन विभाग खालून वरच्या दिशेनें पाडणें व त्यांचे प्रत्येकीं आणखी पोटविभाग पाडून, कोणतीही ऊर्ध्वरेषा आयु-ष्याच्या कोणत्या कालांत शुभाशुभ फल देईल ह्याचा अचूक निर्णय देणें सोईचें ठरेल.

कालमापनपद्धति कितीही क्लिष्ट, प्रारंभीं असाध्य व वारंवार दगा देणारी वाटली तरी ती प्रयत्नसाध्य आहे, हें विसरूं नये; आणि त्या पद्धतीला उपकारक असे उपरिनिर्दिष्ट आडाखे बसवून न डगमगतां, सतत परिश्रम-


पूर्वक संशोधन केल्यास कालांतरानें ती आत्मसात् होईल असा भरंवसा बाळगावा. ह्या शास्त्रांत चुका होणें कोणत्याही इतर शास्त्रांतील अभ्यासा-इतकेंच साहजिक आहे. एवढेंच नव्हें तर भेटणारीं भोंवतालचीं माणसें बहुतकरून बुद्धिपुरस्सर आपली दिशाभूल करण्याचा प्रयत्न करतात. आपण वर्तविलेली गोष्ट घडून आली असतांही, मुद्दाम नाकबूल करून आपली त्रेधा उडवून गंमत पहाण्याचा त्यांचा शोक सर्वत्र महशूर आहे. तेव्हां अशा मंडळींना अगर त्यांच्या विनोदी, कुत्सित अथवा प्रसंगविशेषीं अनुदार उद्गारांना बिलकूल थारा देऊं नये; तरच ही दुराराध्य गोष्ट साध्य होईल. एरवीं गल्लोगल्लींतून मोकाटपणें हिंडणारे सामुद्रिक हवेतेवढे आहे-तच. त्यांत आपली आणखी एक भर पडेल एवढेंच.

प्रकरण १६ वें : अंतःकरणरेषा

अंतःकरणरेषेवरून, सहृदयता, प्रेमळपणा, प्रणयवृत्ति, सहानुभूति इत्यादि स्निग्ध-भावनांचा विचार करतां येतो. त्याचप्रमाणें व्यक्तीच्या ठायीं असणाऱ्या दमदारपणाचें, उत्साहाचें व अंतःस्थ शक्तीचें स्वरूप प्रगट होतें. ही रेषा तांबूस वर्णाची, अखंड, अर्धवर्तुळाकार व शाखान्वित असणें हितावह असतें.


अंतःकरणरेषा अजिबात नसणें हृदयशून्यतेचें द्योतक होय. दोन्हीं हातांवर अंतःकरणरेषा नसणें तर अमानुषपणाचें चिन्ह आहे. असा माणूस दुसऱ्याचा घातपात करील पण स्वतःचें कार्य साधेल. उन्मत्तपणा, क्रौर्य, कामांधप्रवृत्ति व लोभ ह्यांवरच अशा माणसाचें जिणें सर्वस्वीं अवलंबून असतें.

अंतःकरणरेषा समान्यतः गुरु-उंचवट्यावर उगम पावते, व करांगुलीखालीं बुध-उंचवट्यावर थांबते (आकृति ३७). अशा तऱ्हेची संपूर्ण रेषा असेल तर व्यक्ति भावनाप्रधान असते. तिच्या प्रीतीच्या कल्पना क्वचित् अव्यवहार्य ठराव्यात अशा मनोरम व विशिष्ट असतात. विवाह व त्यापासून मिळणाऱ्या सुखाची अपेक्षा देखील ही व्यक्ति काव्यमय करीत असते. कलेसाठीं कला ह्या तत्त्वाप्रमाणें प्रेमासाठीं प्रेम करावयाचें तिचें धोरण दिसून येतें. वैषयिक गोष्टीचा उच्चार करणें देखील तिला रुचत नाहीं. सारांश, व्यवहारापासून अलिप्त रहाण्याचा खटाटोप हीं माणसें व्यर्थ करीत असतात. त्यामुळें नंतरच्या जीवनांत ह्यांची फसगत झाली तर त्यांत नवल नाहीं. मनांतल्या कल्पना मनांत जिरल्या व परिस्थिति अगदीं उलट स्वरूपांत दिसून आली कीं, ह्यांचें गृहसौख्य आटूं लागतें. हे उदासीन बनतात.




आकृति ३७

शनि-उंचवट्यापासून अंतःकरणरेषा निघेल (आकृति ३८) तर मनुष्य विषयलोलुप व कृतघ्न असतो. शारीरिक वा इंद्रियसुखाची तृप्ति झाली कीं भागलें. त्यापायीं कोणतीही जबाबदारी, स्वार्थत्याग वा धीरगंभीर विचार करण्याची आवश्यकता त्याला वाटत नाहीं. स्वसुखापलीकडे बायकापोरांची वा इतरेजनांची मातब्बरी तो कधींच जुमानीत नाहीं. तशांत शुक्रउंचवटा अशुभ असेल तर मग बघायलाच नको. असा माणूस बाहेरख्याली व छंदीफंदी असेल हें काय सांगावयास हवें !



आकृति ३८

तर्जनी व मध्यमा ह्या दोन बोटांमधून अंतःकरणरेषा उगम पावणें म्हणूनच इष्ट आहे (आकृति ३९). कारण गुरु-उंचवटा व शनि-उंचवटा ह्यांतील अत्यंत उपयुक्त गुण तेवढेच ह्या रेषेंत उतरतात असा अनुभव आहे. असा मनुष्य प्रेमळ, सहृदय व सर्वसामान्य खरा; तथापि तो समंजस व व्यवहारदक्ष असल्यानें, त्याच्या प्रीतीच्या कल्पना स्वर्गीय असणार नाहींत वा बायका-पोरांची उपेक्षाही तो कधीं करणार नाहीं.



आकृति ३९

ज्यावेळीं अंतःकरणरेषा वरील तिन्ही बिंदूतून एकाच वेळीं उगम पावते (आकृति ३९) त्यावेळीं बुद्धीपेक्षां भावनांचा जोरच व्यक्तीच्या ठिकाणीं अधिक प्रमाणांत आढळून येतो. असा माणूस हळव्या मनाचा असतो. एवढ्या तेवढ्या गोष्टीमुळेंही त्याच्या अंतःप्रवृत्तींत काहूर उठतें. विचार करण्याची त्याची पात्रता नाहींशी होते. त्याच्या कमकुवत बनणाऱ्या मनास स्थैर्य सहसा लाभत नाहीं.

उलट कांहीं वेळां उगम पावल्यानंतर अंतःकरणरेषा उतरत खालीं येऊन मस्तकरेषेंत विलीन होते (आकृति ४०). त्यावेळीं मनुष्य बुद्धिप्रधान पण भावनाशून्य बनतो. नित्याच्या व्यवहारांत प्रीति, दया, स्नेह, परोपकार इत्यादि स्निग्ध भावनांना थारा देणें त्याला लवमात्र खपत नाहीं. कर्तव्य करीत रहाणें हेंच त्याचें ध्येय. तें पार पाडतांना तो एखाद्या यमदूतासारखा, करारी, चोख वृत्तीचा, कडक शिस्तीचा आणि हिशेबी असा इतरांना भासतो. जगामध्यें हवा तो फेरबदल झाला, भोंवतालचें वस्तुजात उलटसुलट बनलें, स्वतःच्या




आकृति ४०

पायाखालची धरणी हादरून दुभंग झाली, तरी कर्तव्यापासून हे लोक यत्किंचितही विमुख व्हावयाचे नाहींत.


अन्तःकरणरेषेस जितक्या शाखा फुटतील तेवढी लोकसंग्रही वृत्ति अधिक असते. मित्रपरिवार, ओळखी वाढवण्याची आस्था व समाजांत मिळूनमिसळून वागण्याची जात्याच आवड असते. सार्वजनिक कार्यांत ह्या व्यक्ति तत्परतेनें मदत करतात; म्हणून फक्त ही एकच रेषा शाखाहीन वा एकसांधि नसावी. जर ती शाखाहीन असेल तर वरच्या उलट तऱ्हा असते. मनुष्य तुसड्या स्वभावाचा, माणूसघाणा, एकलकोंडा, कुढ्या वृत्तीचा आणि आत्मसंतुष्ट असलेला दिसून येतो.

अन्तःकरणरेषा तळहाताच्या एका टोंकापासून दुसऱ्या टोंकाच्या कडें-पर्यंत वाजवी लांब असणें बरें नव्हें. मनुष्याच्या स्निग्ध भावना अधिक जोरावतात व बुद्धि वाया जाते. त्याचप्रमाणें रवि अथवा बुध उंच-वट्यावर जेमतेम पोहोंचेल इतकी अतिलहान रेषाही वाईटच. अशी व्यक्ति एकतर भावनाशून्य असावयाची किंवा वयाच्या पंचेचाळीस वर्षा-नंतर तिला हृदयविकाराची व्यथा जडायची. शनीच्या उंचवट्यापर्यंत जाणारी आंखूड रेषा स्वल्प आयुष्याची भीति दर्शविते.

अन्तःकरणरेषेंतून निघणाऱ्या शाखा जर आडव्या बारीक बारीक



आकृति ४१



आकृति ४२

रेषांनीं छेदित असतील किंवा अन्तःकरणरेषा मध्यंतरीं खंडित असेल तर तितक्या वेळां प्रीतींत ठेचा लागण्याचे, प्रेमभंगाचे वा प्रेमनिराश होण्याचे प्रसंग उद्भवतात. मित्रांपासून अगर प्रणयदेवतेपासून ताटातूट होण्याचा संभव असतो. खंडित रेषेनंतरचा उरलेला दुसरा अर्धा विभाग अशा वेळीं निर्दोष असेल किंवा खंडित स्थलीं चौकोन, एखादी पूरक रेषा अथवा शुभचिन्ह असेल (आकृति ४२) तर विनाकारण उत्पन्न झालेले गैर-समज नाहींसे होतील, इतरांकडून होणारा विरोध अपुरा ठरेल, कांहींतरी चमत्कृति नित्य अशी घडेल कीं, ज्यायोगें प्रीतीचें बंधन तुटेपर्यंत ताणलें जाणार नाहीं; किंबहुना तुटलें तरी पुनश्च तें जोडतां येईल.

प्रकरण १७ वें : मस्तकरेषा

मनुष्याची नैसर्गिक बुद्धिमत्ता, त्याची ग्रहणशक्ति, त्याच्या अंगीं वसत असणारें कल्पनाचातुर्य, त्याचे आचारविचार, त्याच्या ठायीं असलेलें मनोधैर्य इत्यादि मानसिक गुणावगुणांचें दिग्दर्शन मस्तकरेषा पाहून करतां येतें. मस्तकरेषा तळहातावर अजिबात नाहीं असें सहसा आढळून येत नाहीं.

मस्तकरेषा आयुष्यरेषेपासून किंचित् दूर उगम पावून निर्दोषपणें बुध-उंचवट्याखालीं दुसऱ्या मंगळ–उंचवट्यानजीक थांबावी (आकृति ४३). तळहाताच्या अगदीं कडेपर्यंत भिडणारी लांबच लांब रेषा असूं नये. अशी सरळ व निर्दोष रेषा उत्तम बुद्धिमत्ता दर्शविते.

मस्तकरेषा आयुष्यरेषेपासून उगमस्थानीं अतिदूर असेल (आकृति४४) तर मनुष्य स्वतःबद्दल फाजील विश्वास बाळगणारा असतो. परिणामाबद्दल बेफिकिरी व वागतांना सतत घमेंडखोरपणा ह्यापायीं वारंवार नुकसान

ओढवतें. निदान अशा वेळीं मंगळाचा दुसरा उंचवटा बलवान् असावा.







आकृति ४३ आकृति ४४ आकृति ४५

कारण युक्तिबल न वापरल्यानें वाया गेलें तरी शक्तिबल त्याला प्रसंगांतून तारतें.

मस्तकरेषा गुरु–उंचवट्यावरून निघेल तर मनुष्यास सत्ता वा मोठेपणा सहजासहजीं मिळतो. असा मनुष्य जात्याच विलक्षण बुद्धिमान्, अष्टावधानी व कर्तृत्ववान् असतो. भोंवतालच्या लोकांवर छाप पडावी व त्यांनीं यदृच्छया ह्याचें नेतृत्व पत्करावें असा प्रकार घडतो. तळहातांवरील इतर प्रमुख रेषा व चिन्हें अनुकूल असतील तर ही व्यक्ति असामान्य, अलौकिक व क्वचित् जगद्वंद्य ठरते (आकृति ४५).

मस्तकरेषा आयुष्यरेषेंतून निघालेली पुष्कळ वेळां आढळते. आयुष्यरेषेंतच कांहीं अंतरापुरती गुरफटून (आ. ४६) नंतर वेगळी होणारी मस्तकरेषाही पहावयास सांपडते. आयुष्यरेषा व मस्तकरेषा एकत्रित असणें परावलंबी अवस्थेचें द्योतक आहे. अशा मनुष्याचे ठिकाणीं आत्मविश्वासाची उणीव असते. जबाबदारी म्हटली कीं त्याचें मन कच रतें. प्रत्येक गोष्ट चारचौघांना विचारून स्वतःची खात्री पटल्यानंतरच हा करीत असतो. कोणतेंही काम करण्यासाठीं कोणी परस्पर तिऱ्हाईत मनुष्य पुढाकार घेईल तर ह्याला हवें असतें.



आकृति ४६

त्यामुळें हा मनुष्य कधींच पुढें येत नाहीं

मस्तकरेषा कधीं आयुष्यरेषेच्या आंत मंगळाच्या पहिल्या उंचवट्यावर



आकृति ४७

उगम पावते व नंतर आयुष्यरेषेस छेदून बाहेर पडते (आ. ४७). त्यावरून मनुष्य फार उतावळ्या स्वभावाचा असल्याचें दिसून येतें. हा मनुष्य दहा–पांच गोष्टी एकदम हातीं घेतो व एक एक गोष्ट हळूंहळूं अर्धीमुर्धी सोडून देतो. कोणतेंही कार्य अविवेकानें चटकन अंगावर घ्यावयाचें व नंतर थोडीफार धावपळ वा ओढाताण करून नामानिराळें व्हायचें हेंच त्याचें काम. त्यामुळें हा मनुष्य उर्मट स्वभावाचा, घमेंडखोर, धरसोड वृत्तीचा पण अयशस्वी असतो.

मस्तकरेषेच्या उगमस्थानासंबंधीं एवढी माहिती मिळविल्यानंतर तिचीं विरामस्थानें विचारांत घेणें अवश्य आहे. मस्तकरेषा थांबण्यापूर्वी क्वचित् तिला एक वा दोन शाखा फुटतात. खालच्या बाजूची शाखा मंगळ-उंचवटयावर व वरील बाजूची शाखा बुध-उंचवटयाकडे वळते (आकृति ४८). शाखान्वित मस्तकरेषा विविध विषयांतील ज्ञान असल्याचें दर्शविते. असा मनुष्य हव्या त्या विषयांतील मर्म चटकन् ओळखतो; तथापि अशी शाखान्वित मस्तकरेषा असणारा मनुष्य अनिष्ट लक्षणांनीं युक्त असेल तर मात्र त्याची बुद्धिमत्ता अनर्थकारक ठरेल. समाजांत तो स्वतःच्या उपद्व्यापी वर्तनानें कहर करून सोडील हें निःसंशय.

मस्तकरेषा सरळ असणें हें प्रात्याक्षिक ज्ञानाचें द्योतक आहे (आकृति ४९). हा मनुष्य व्यवहारदक्ष, हिशेबी, सडेतोड स्वभावाचा व चोख वर्तणुकीचा असतो. ह्याचे आवडते विषय अथवा ह्याचा उद्योग-धंदाही ज्यापासून स्वतःला व इतरांना प्रत्यक्ष फायदा होईल, चार पैसे मिळतील, असा असतो.

उलटपक्षीं मस्तकरेषा ढळती असेल, तळहातावर खालीं उतरतां उतरतां ती चंद्र-उंचवटयावर येऊन थांबेल (आ. ५०) तर मनुष्याची वृत्ति कल्पनामय बनते. कल्पनाशक्तिद्वारां ललितवाङ्मय निर्माण करणें अथवा काव्य,

लघुकथा, नाटय, कादंबरी इत्यादि कविसृष्टींत सदैव रममाण होणें या



आकृति ४८



आकृति ४९



आकृति ५०

माणसांना जास्त आवडते. मनोराज्यांत डुंबत राहणें, मनाचेंच सुख वा दुःख उपभोगणें ह्यांना फार आवडतें. हीं माणसें कलापूर्तींसाठीं तनमनधनेंकरून हवातेवढा खर्च करतील व आपल्यापायीं स्वकीयांना अथवा इतर कोणाला नफानुकसान सोसावें लागलें तरी त्याचा विचार मुळींदेखील करणार नाहींत.

ही ढळती मस्तकरेषा चंद्र-उंचवटा ओलांडून मनगटाच्या खालच्या टोंकापर्यंत थेट येणें मात्र अनिष्ट आहे. त्यामुळें मज्जातंतूचे विकार, डोकें फिरणें, मस्तकशूळ उठणें, बुद्धिभ्रंश होणें वगैरेंची भीति असते. तशांत



आकृति ५१



आकृति ५२

अशा लांबच लांब, उतरत्या मस्तकरेषेवर, विरामस्थानीं नक्षत्रचिन्ह असेल (आकृति ५१) तर मनुष्याला वेड लागणार हें निश्चित समजावें.

मस्तकरेषा ऊर्ध्वगति घेऊन अन्तःकरणरेषेंत विलीन होईल (आकृति ५२) तर मनुष्याचें जीवित बुद्धीपेक्षां वासनामय अधिक बनतें. अन्तःकरणरेषेला अवास्तव महत्त्व प्राप्त झाल्याकारणानें हा मनुष्य वासनापूर्तीसाठीं कोणतीही गोष्ट नेटानें करीत असतो. तळहातावर इतरत्र आणखी दुश्चिन्हें असतील तर कोणत्याही भावनेच्या आहारीं जाऊन उन्मत्तपणें हा मनुष्य काय हवें तें करण्यास प्रवृत्त होईल हें उघड आहे.

नागमोडी वळणाची मस्तकरेषा (आकृति ५३) विचारांतील अनिश्चितपणा दर्शविते. अशा माणसाला कोणतेंही कार्य नेटानें करतां येणें कठीण. मनानें सदा साशंक बनून स्वतःचें वर्तन कुठें चुकत तर नाहीं ना असा भास त्याला होत असतो. ' संशयात्मा विनश्यति ' अशांतली त्याची गत होते.



आकृति ५३



आकृति ५४

एकीऐवजीं शेजारीशेजारीं दोन संपूर्ण मस्तकरेषा असणें अत्यंत भाग्याचें चिन्ह होय (आकृति ५४). अशी व्यक्ति विलक्षण बुद्धिमान् व जबर उत्साही असते. अनेक विषयांचें ज्ञान तिच्या ठायीं संभवतें. एकाच वेळीं भिन्न भिन्न व्यवसायांत लक्ष पुरवून उच्चप्रतीचा नांवलौकिक संपादन करणारीं माणसें ह्याच सदराखालीं येतात. महात्मा गांधी ह्यांच्या उजव्या

हाताचा ठसा म्हणून जो आराखडा मध्यंतरीं ' ब्लिट्झ् ' मध्यें प्रसिद्ध करण्यांत आला होता, त्यावरून त्यांच्या तळहातावर दोन वेगवेगळ्या मस्तकरेषा असल्याचें दिसून आलें आहे. तसेंच सुविख्यात डॉ. रा. ह. भडकमकर, एम्. ए., एम्. डी. ह्यांच्या दोन्ही हातांवर प्रत्येकीं दोन दोन बुद्धिरेषा स्वतंत्र व सुस्पष्ट आहेत. सारांश, स्वतंत्र दोन बुद्धिरेषा असणें लोकोत्तर गुण अंगीं असल्याचें चिन्ह आहे व म्हणूनच संपूर्ण दुहेरी मस्तकरेषा निर्दोष स्थितींत पहावयास सांपडणें ही सामान्य गोष्ट नाहीं !

प्रकरण १८ वें : धनरेषा

आयुष्यांतून धन वगळलें तर बाकी पूज्य उरतें असें समीकरण मांडण्या-इतकी अवस्था सांप्रत प्राप्त झाली आहे. ज्याच्याजवळ पैसा नाहीं त्याचें जीवित फोल आहे. चौदा विद्या व चौसष्ट कला अंगीं असणारां-जवळ पैसा नसेल तर त्याला अस्पृश्य समजून जो तो त्याच्यापासून चार पावलें दूर सरकतो. लायकी असूनही त्याला मानमान्यता मिळत नाहीं ही गोष्ट सर्वांना माहीत आहे.

कनक व कांता ह्या दोन गोष्टींवर जगाचा चक्रनेमिक्रम बव्हंशीं अवलंबून आहे नव्हें ? स्त्रीसुखाची लालसा व ती सर्वतोपरी परिपूर्ण व्हावी म्हणून लागणारें धन ह्या दोन्ही आमरण टिकणाऱ्या अभिलाषा होत. दोन्हीं आपापल्या परीनें मानवी जीवनास आवश्यक आहेत. त्यांच्या लालसेनेंच मनुष्य पराक्रमास प्रवृत्त होतो. स्त्रीसुखासाठीं अथवा ध्येयपूर्तीसाठीं जगणें आणि जगण्यासाठीं द्रव्य मिळविणें मनुष्याला भाग पडतें. अशी ज्या धनाची थोरवी त्या धनप्राप्तीसंबंधीं ज्या त्या व्यक्तीला जात्याच उत्कंठा असते हें काय सांगावयास हवें ?

तेव्हां धनभावाचा विचार हस्तसामुद्रिकशास्त्रांत कसा केला आहे तें आपण पाहूं.

धनरेषेस आणखीही अर्थपूर्ण नांवें आहेत. हिला उद्योगरेषा, कर्मरेषा, प्रारब्धरेषा, नशिबाची रेषा अथवा शनिरेषा असेंही म्हणतात. ह्या विविध नांवांवरून एक गोष्ट प्रगट होते ती ही कीं, केवळ पैशाचाच विचार ह्या रेषेवरून न होतां अर्थप्राप्ति कोणत्या साधनानें होईल, कोणत्या कालांत वाढेल व किती प्रमाणांत होईल ह्याचें दिग्दर्शन प्रायः ही रेषा करीत असते. मनुष्याची तडफ, त्याच्यांतील पुरुषार्थ, इयातींत त्याच्या हातून घडणारें कार्य इत्यादि गोष्टी धनरेषेद्वारेंच समजतात.

धनरेषा हातावर अजिबात नसणें हें कोणताही उद्योग निर्विघ्नपणें सतत चालू रहाण्याचें महत्त्वपूर्ण चिन्ह आहे. मनुष्य स्वतःचे कर्तबगारी-वर पुढें तर येतोच, पण जें मनांत आणील तें त्याच्या हातून पार पडेल. आयुष्यांत इतरांप्रमाणें त्यालाही विरोध होतो व आपत्तींशीं झगडावें लागतें. तथापि विरोध अथवा अडचणी हातांवरील धनरेषेवर ठाणें देऊन बसतील इतपत त्याच्या मेंदूवर त्या तीव्र परिणाम करीत नाहींत; आणि म्हणून माणसाचे हातावर धनरेषा अजिबात नसली तरी त्याला पैशाची वा उद्योगाची ददात नसते. ह्यासंबंधीं एक प्रमुख नियम ध्यानांत ठेवावा तो हा कीं, कोणतीही रेषा तळहातावर वेडी—वांकडी, दूषित अथवा अशुभ लक्षणांनीं युक्त अशी असण्यापेक्षां ती अजिबात नसणें हें त्या रेषेसंबंधीं प्राप्त होणाऱ्या सढळ व निर्भेळ फळाचें द्योतक आहे.

आरोग्य, आजार, गंडांतरें, शारीरिक व्याधि ह्या गोष्टी धनरेषेवर कधींच प्रत्यक्ष कळणाऱ्या नाहींत. आजार अथवा व्याधिनिदर्शक चिन्ह तळहातावर इतरत्र असेल, तर मात्र अप्रत्यक्षपणें कधीं कधीं तत्कालदर्शक विभागांवरून धनरेषा मार्गदर्शक ठरते असा अनुभव आहे. धनोत्पादन किंवा चालू उद्योगधंदा आकस्मिक रीतीनें बंद पडण्याएवढें स्थित्यंतर आयुष्यांत घडणारें असेल, तरीही धनरेषा एकदम बिघडलेली अथवा मध्येंच थांबलेली दिसून येईल. धनरेषेचा रंग व तिचें स्वरूप अर्थात् तळहातावर इतर असणाऱ्या प्रमुखरेषेप्रमाणेंच असावें.

धनरेषा तळहातावर मनगटाजवळ खालीं मधोमध प्रगट होते व मध्यभागांतून ऊर्ध्वगतीनें वर शनीच्या उंचवट्यापर्यंत जाते (आकृति ५५). तिचा आरंभबिंदु खालच्या बाजूस कुठेंही असूं शकतो. तथापि उगम पावल्यानंतर ह्या रेषेचा रोख मात्र शनि-उंचवट्याकडे प्रायः असतो असें दिसून येईल.



आकृति ५५

निरनिराळ्या उंचवट्यांवर धांवत जाणाऱ्या रेषांचा संबंध कधीं कधीं ह्या धनरेषेशीं येतो. धनरेषेंतून निघणारी शाखा शनि-उंचवट्यावर जाण्याऐवजीं एखादे वेळीं दुसऱ्या कोणत्या तरी उंचवट्यावर जाते व त्यामुळें धनरेषेचें विरामस्थान ह्या त्या उंचवट्यावर असूं शकतें, असा आपला समज होतो. वस्तुतः हातावर असणाऱ्या साऱ्या ऊर्ध्वरेषा धनदर्शक होत. त्या ज्या उंचवट्यावर आकर्षिल्या जातात त्या उंचवट्याच्या गुणधर्मानुरूप कार्यक्षेत्र व त्यांत फलनिष्पत्ति संभवते.

धनरेषेच्या भिन्न उगमस्थानांवरून दिसून येणारीं वेगवेगळीं फलें खालीलप्रमाणें होत.

मनगटाचे मधोमध पण आयुष्यरेषेचे बाहेर स्वतंत्रपणें उगम पावणारी धनरेषा असतां (आकृति ५५) मनुष्य स्वसामर्थ्यावर उदयास येतो. उद्योगाची पराकाष्ठा, प्रयत्नांची शिकस्त, बुद्धीची चिकाटी ह्यामुळेंच त्याला यश प्राप्त होतें. दुसऱ्यावर विसंबणें त्याला यत्किंचितही खपत नाहीं. त्याला नोकरी स्थिर मिळते, वेतन भरपूर असतें, अंगच्या सद्गुणांस वाव मिळतो, कर्तृत्वाचें चीज होतें वगैरे. मात्र त्याचें घराणें पिढीजात श्रीमंतीचें आहे किंवा त्याचा जन्म पूर्ण दरिद्री स्थितींत झाला आहे ही गोष्ट तळहातावरील इतर लक्षणांवरून ठरवावी लागते. कारण धनसंपन्न घराण्यांत जन्म घेतला काय किंवा एखाद्या भिक्षेकऱ्याच्या पोटीं जन्मास आला काय;

अभिजात सद्गुणांचा पूर्ण उपयोग करून उदयास येणारा मनुष्यच ही धनरेषा घेऊन जन्मास येतो.

मनगटाचे मधोमध पण आयुष्यरेषेंतून धनरेषा निघणें ह्याचेंच नांव



आकृति ५६



आकृति ५७

भाग्यरेषा (आकृति ५६). ही रेषा अतिशय महत्त्वाची असून खरोखर नशीबवान् म्हणून ज्याच्याकडे आपण बोट दाखवूं त्याच्या हातावर असते. आयुष्यरेषा व मस्तकरेषा ह्या दोन प्रमुख रेषांशीं ह्या धनरेषेचा त्रिकोण होतो. हा त्रिकोण अत्यंत शुभ होय. ह्याला धनत्रिकोण समजण्यास मुळींच हरकत नाहीं. मात्र धनसंचय मोठ्या प्रमाणावर होणें अथवा वडिलार्जित श्रीमंती लाभणें केवळ ह्या त्रिकोणावर अवलंबून नाहीं. अल्प बुद्धीच्या भांडवलावर कमींत कमी श्रम करून जास्तींत जास्त धन मिळविणाराच्या हातांवर हा धनत्रिकोण असूं शकतो. ह्यांचें शिक्षण चार बुकांपलीकडे झालेलें नसतें. पुढें येणाऱ्या कागदावर सही कोठें करायची एवढी क्षुल्लक गोष्ट स्मरणांत ठेवण्याइतका ताणही ह्यांच्या बुद्धीला झेपत नाहीं; तथापि ह्यांचा पगार अथवा दरमहाची प्राप्ति पहावी तों शें–दोनशें क्वचित् त्यापेक्षांही अधिक असते. मात्र ह्यांच्या हाताखालीं काम करणारी शेंपन्नास मंडळी ग्रॅज्युएट, उच्च विद्याविभूषित पण पन्नास–पाउणशें रुपयांवर रखडत असतात. एवंच धनरेषेनें सांधल्या जाणाऱ्या ह्या त्रिकोणाचीं फळें अपूर्व असतील, तर ज्या महाभागाच्या हातावर तो असेल, त्याला दैवशाली कां म्हणूं नये !

आयुष्यरेषेच्या आंत शुक्र-उंचवट्यावर कधीं कधीं धनरेषा उगम पावते (आकृति ५७). असें असतां व्यक्तीचें घराणें उच्च व नांवलौकिकाचें असतें. घरची सांपत्तिक स्थिति जन्मकालीं चांगली असल्यानें आयुष्याचीं सुरवातीचीं वर्षें निष्काळजीपणांत, सुखोपभोगांत पण पारतंत्र्यांत व्यतीत होतात. घराण्याचा पूर्वापार नांवलौकिकाचा वा घरांतील इतर स्वकीयांचा भावी उत्कर्षास बराचसा उपयोग होतो. चरितार्थास वडिलार्जित मिळकतीचा थोडाफार आधार असूं शकतो. आपत्काल ओढवला असतां कोणीतरी आप्त हटकून मदतीस पुढें येतो. सारांश, स्वतःच्या एकाकी प्रयत्नांपेक्षां आजूबाजूची परिस्थिति आणि भोंवतालचीं माणसें उपयोगी पडतील असें ही धनरेषा दर्शविते.


आयुष्यरेषेच्या बाहेर दूर चंद्रटेकडीवर धनरेषा उगम पावत असेल तर (आ.५८)वर सांगितलीं त्याच्या अगदीं उलट फळें अनुभवास येतात. वडिलार्जित मिळकतीचें नांव तर दूरच, पण हयातींत त्यांनीं करून ठेवलेल्या कर्जाचा बोजा मात्र कमी करतांना जीव अगदीं मेटाकुटीस येतो. मागील सात जन्मांचें पातक निस्तरण्यासाठींच जणूं कांहीं हीं माणसें जन्मास येतात. पैशाची ओढग्रस्त स्थिति, अंगावर कर्जाचा बोजा, पदरीं पांच सात माणसें त्यामुळें “ जन्मा आला हेला व पाणी वाहतां वाहतां मेला ” असा ह्यांचा शेवट होतो. नौकरी मुष्किलीनें मिळते. मिळते तीही खडतर. चौपट काम करून पावपट वेतन मुष्किलीनें मिळतें. वरिष्ठांची थुंकी झेलण्याचा प्रसंग वारंवार येतो. अधिकारप्राप्तीची आशा तर ह्यांनीं कधीं न केलेलीच बरी. चौघांच्या खांद्यावरून अखेरची यात्रा निघाली तरी प्रपंचांत ह्यांचा जम बसणें कठीण. मृत्यूशीं दाट संबद्दण ठेवूनच ह्यांचा जगण्याचा अट्टहास चालूं असतो असें आपण ह्यांचे बाबतींत समजूं या हवें तर !



आकृति ५८

धनरेषेचे हे प्रमुख प्रकार झाले. ह्यांखेरीज लहान लहान प्रकार दिसून येतात ते असे.

धनरेषा तळहातावर बऱ्याच वरच्या बाजूस मंगळाच्या प्रदेशांत उगम पावलेली दिसते (आ. ५९). त्यावेळीं पहिल्या विशींत आयुष्य खडतरपणें



आकृति ५९ आकृति ६० आकृति ६१

गेल्याचें दिसून येतें. हातावर धनरेषा जितकी वरच्या बाजूस उगवतांना दिसेल तितका भाग्यकाल दुरावतो.

धनरेषा आरंभापासून स्पष्ट असून क्वचित् मस्तकरेषेवर कायमची थांबते (आ. ६०). त्यावरून पहिल्या तिशींतच काय कर्तबगारी होईल तेवढी. आयुष्याच्या पूर्वार्धात जी कमाई करून ठेवली असेल त्यावरच पुढचा काल व्यतीत होतो. उत्तरार्धात नांव घेण्याजोगी अशी कोणतीच कृति मनाप्रमाणें घडत नाहीं.

मस्तकरेषेऐवजीं अन्तःकरणरेषेजवळ धनरेषा थांबेल, तर वयाच्या पंचेचाळीस वर्षांपर्यंत बोध होणारा तो टप्पा आहे. त्यापुढील आयुष्यांत नवी घडामोड न होण्याचें तें दर्शक आहे (आकृति ६१).


पुष्कळदां असें घडतें कीं, धनरेषा अन्तःकरणरेषेजवळ कायमची थांबते व वयाच्या पंचेचाळीस वर्षांनंतरचाच काल भरभराटीचा जातो. पैशाची चलती तर सुरू होतेच, पण नांवलौकिक सहजासहजीं मिळावा

असे सुवर्णक्षण नंतरच्या कालांत उद्भवतात. हें सगळें कां घडतें तर रवीचे उंचवट्यावर असणारी महत्त्वाची रेषा नेमकी अन्तःकरणरेषेनंतर तळहातावर दृग्गोचर होते; आणि ही रविरेषा धनरेषेची उणीव अखेरपावेतों अधिक यशस्वी रीतीनें भरून काढते हें होय (आ. ६१).


नंतरचा प्रकार म्हणजे मस्तकरेषा व अन्तःकरणरेषा ह्या दोहोंमधील



आकृति ६२



आकृति ६३



आकृति ६४

प्रदेशापुरतीच धनरेषा असलेली पहावयास सांपडते (आ. ६२). ह्याचा अर्थ वयाचीं तीस ते पंचेचाळीस वर्षें प्राप्तीच्या दृष्टीनें बरीं जातात. पहिल्या तिशींत आयुष्य ज्याप्रमाणें खडतर जातें त्याचप्रमाणें वय वर्षे पंचेचाळीस नंतर पुनश्च हलाखी प्राप्त होते. प्राप्ति स्वल्प पण संसार मात्र झपाट्यानें वाढत ह्या वयांत आवाक्याबाहेर गेलेला. अशी वस्तुस्थितीच सर्वत्र दिसत असल्यानें धनरेषेचा हा प्रकार मोठ्या प्रमाणावर पहावयास सांपडतो.

ह्यापुढचा धनरेषेचा प्रकार वरच्या प्रकारापेक्षां अगदीं उलट आहे. वयवर्षे पस्तीस ते पन्नासपर्यंत म्हणजे मधल्या पंधरा वर्षांपुरतीच धनरेषा अदृश्य होते (आकृति ६३). प्रारंभापासून मस्तकरेषेपर्यंत व अंतःकरणरेषेपासून पुढें शनि-उंचवट्यापर्यंत दोन वेगवेगळे विभाग दृष्टीस पडतात. अर्थात् मधलीं पंधरा वर्षें अशा मनुष्याला जिकीरीचीं जातात.

धनरेषा प्रारंभापासून थेट शनीच्या उंचवट्यापर्यंत अखंड असेल तर

आयुष्याचा बहुतेक भाग कर्तबगारींत व अर्थोत्पादनांत व्यतीत होतो. असा मनुष्य कधींही निमूट बसत नाहीं. जिशी विद्या तिशी धन ह्या उक्तीप्रमाणें वयाचीं तीस ते पंचेचाळीस वर्षें अत्यंत प्रगतीपर जातात. ही रेषा सांपत्तिक सुस्थिति दर्शविते. मोठाले लाभ न घडले तरी पैशाची तीव्र विवंचना सहसा भासत नाहीं (आकृति ६४).

शनीच्या उंचवट्याऐवजीं वळलीच तर क्वचित् धनरेषा गुरु-उंचवट्या कडे वळते (आकृति ६५) व तेथें विराम पावते. ह्या रेषेचीं फळें लोकोत्तर अशींच मिळतात. आयुष्याची बैठक जबर महत्त्वाकांक्षेवर अधिष्ठित असते. लोकनायक म्हणून जनता त्याला निवडते. मानसन्मान होतो. अनेक सामुदायिक कार्यांचें धुरीणत्व अंगावर पडतें. जबाबदार जीवन कंठावें लागतें. बहुजनसमाजावर प्रभावी सत्ता प्रस्थापित होते व अंतीं ही व्यक्ति जगतांत स्वतःचें नांव मागें ठेवूनच इहलोक सोडून जाते.




आकृति ६५

कांहीं ठिकाणीं हातावर धनरेषा अखंड असते खरी, तथापि तिची जाडी व खोली एकसारखी नसते. मध्यें जाड, मध्येंच खोल, नंतर अरुंद अशा क्रमानें ही रेषा प्रवास संपवितांना दृष्टीस पडते. असें असेल तर उद्योगधंद्यांत अशीच तेजीमंदी आलटून पालटून व्यक्तीस खेळवीत असते. इतर चिन्हें तशींच असतील तर मनुष्य आंकडे, रेस, सट्टे, लॉटरी अथवा दलाली, कमिशन-एजन्सी इत्यादीपैकीं एकाद्या साधनावर किंवा ज्यामुळें प्राप्तीचें मान सर्वस्वीं अनिश्चित राहील, अशा व्यवसायावर व्यक्तीचें जिणें अवलंबून असतें.

धनरेषा मध्येंच कोणत्याही अन्य रेषेशीं संबंध न येतां थांबणें अनिष्ट होय. कदाचित् शरीर-प्रकृति, स्वभाव अथवा दुसरें कांहीं कारण धंदा-नौकरी अर्धेमधेंच बंद पडण्याच्या मुळाशीं असूं शकतें.

एक उद्योग पूर्ण होऊन दुसरा नव्यानें सुरू व्हावयाचा असतां किंवा पहिल्यापेक्षां बऱ्या स्वरूपाची नौकरी दुसरीकडे लागावयाची असतां, धन-रेषा ज्या ठिकाणीं थांबते, त्या ठिकाणच्या बिंदूजवळूनच नवी ऊर्ध्वरेषा



आकृति ६६ आकृति ६७ आकृति ६८

सुरू होते. असे नवे तुकडे (आकृति ६६) हातावर जितक्या वेळां दिसून येतील तितक्या वेळां नौकरी वा धंदा बदलत जातो असें मानावें.


धनरेषा नागमोडी वळणाची असेल तर अनेक ठिकाणीं नौकरी करून स्थैर्य लाभत नाहीं. वरचेवर धंदा बदलूनही किफायत होणें मुष्किलीचें ठरतें.

अति तिथें माती ही म्हण धनरेषेचे बाबतींतही विचारांत घेणें अवश्य आहे. आरंभापासून स्पष्ट, अखंड प्रवास करीत धनरेषा शनीच्या उंचवट्यावर न थांबतां थेट मधल्या बोटाच्या दुसऱ्या किंवा टोंकाच्या पेऱ्यावर चढेल (आ. ६७), तर त्यासारखा दारिद्र्ययोग अन्य नाहीं. अशी रेषा धनाबद्दल सतत धुमसणारी अंतरीची तीव्र लालसा दर्शविते.

कांहीं तळहातांवर एकीऐवजीं दोन धनरेषा जवळजवळ असलेल्या आढळून येतात. त्यांतही प्रकार असतात. क्वचित् प्रारंभापासून शेवटपर्यंत ह्या दोन जुळ्या रेषा रेल्वे लाईन दिसते तशा समांतर दिसतात (आकृति ६८); तर कोठें मधूनच थोड्या अंतरापुरत्या त्या धनरेषेशीं सोबत करतात व नंतर अंतर्धान पावतात. ह्या समांतर रेषांचें फल त्या भागा-

आयुष्याचा बहुतेक भाग कर्तबगारींत व अर्थोत्पादनांत व्यतीत होतो. असा मनुष्य कधींही निमूट बसत नाहीं. जिथें विद्या तिथें धन ह्या उक्तीप्रमाणें वयाचीं तीस ते पंचेचाळीस वर्षें अत्यंत प्रगतीपर जातात. ही रेषा सांपत्तिक सुस्थिति दर्शविते. मोठाले लाभ न घडले तरी पैशाची तीव्र विवंचना सहसा भासत नाहीं (आकृति ६४).

शनीच्या उंचवट्याऐवजीं वळलीच तर क्वचित् धनरेषा गुरु-उंचवट्या



आकृति ६५

कडे वळते (आकृति ६५) व तेथें विराम पावते. ह्या रेषेचीं फळें लोकोत्तर अशींच मिळतात. आयुष्याची बैठक जबर महत्त्वाकांक्षेवर अधिष्ठित असते. लोकनायक म्हणून जनता त्याला निवडते. मानसन्मान होतो. अनेक सामुदायिक कार्यांचें धुरीणत्व अंगावर पडतें. जबाबदार जीवन कंठावें लागतें. बहुजनसमाजावर प्रभावी सत्ता प्रस्थापित होते व अंतीं ही व्यक्ति जगतांत स्वतःचें नांव मागें ठेवूनच इहलोक सोडून जाते.

कांहीं ठिकाणीं हातावर धनरेषा अखंड असते खरी, तथापि तिची जाडी व खोली एकसारखी नसते. मध्यें जाड, मध्येंच खोल, नंतर अरुंद अशा क्रमानें ही रेषा प्रवास संपवितांना दृष्टीस पडते. असें असेल तर उद्योगधंद्यांत अशीच तेजीमंदी आलटून पालटून व्यक्तीस खेळवीत असते. इतर चिन्हें तशींच असतील तर मनुष्य आंकडे, रेस, सट्टे, लॉटरी अथवा दलाली, कमिशन-एजन्सी इत्यादींपैकीं एकाद्या साधनावर किंवा ज्यामुळें प्राप्तीचें मान सर्वस्वीं अनिश्चित राहील, अशा व्यवसायावर व्यक्तीचें जिणें अवलंबून असतें.

धनरेषा मध्येंच कोणत्याही अन्य रेषेशीं संबंध न येतां थांबणें अनिष्ट होय. कदाचित् शरीर-प्रकृति, स्वभाव अथवा दुसरें कांहीं कारण धंदा-नौकरी अर्धेमधेंच बंद पडण्याच्या मुळाशीं असूं शकतें.

एक उद्योग पूर्ण होऊन दुसरा नव्यानें सुरू व्हावयाचा असतां किंवा पहिल्यापेक्षां बऱ्या स्वरूपाची नौकरी दुसरीकडे लागावयाची असतां, धनरेषा ज्या ठिकाणीं थांबते, त्या ठिकाणच्या बिंदूजवळूनच नवी ऊर्ध्वरेषा



आकृति ६६ आकृति ६७ आकृति ६८

सुरू होते. असे नवे तुकडे (आकृति ६६) हातावर जितक्या वेळां दिसून येतील तितक्या वेळां नौकरी वा धंदा बदलत जातो असें मानावें.

धनरेषा नागमोडी वळणाची असेल तर अनेक ठिकाणीं नौकरी करून स्थैर्य लाभत नाहीं. वरचेवर धंदा बदलूनही किफायत होणें मुष्किलीचें ठरतें.

आति तिथें माती ही म्हण धनरेषेचे बाबतींतही विचारांत घेणें अवश्य आहे. आरंभापासून स्पष्ट, अखंड प्रवास करीत धनरेषा शनीच्या उंचवट्यावर न थांबतां थेट मधल्या बोटाच्या दुसऱ्या किंवा टोंकाच्या पेऱ्यावर चढेल (आ. ६७), तर त्यासारखा दारिद्र्ययोग अन्य नाहीं. अशी रेषा धनाबद्दल सतत धुमसणारी अंतरींची तीव्र लालसा दर्शविते.

कांहीं तळहातांवर एकींऐवजीं दोन धनरेषा जवळजवळ असलेल्या आढळून येतात. त्यांतही प्रकार असतात. क्वचित् प्रारंभापासून शेवटपर्यंत ह्या दोन जुळ्या रेषा रेल्वे लाईन दिसते तशा समांतर दिसतात (आकृति ६८); तर कोठें मधूनच थोड्या अंतरापुरत्या त्या धनरेषेशीं सोबत करतात व नंतर अंतर्धान पावतात. ह्या समांतर रेषांचें फल त्या भागा-

पुरतें अर्थात् द्विगुणित होतें. अशा जुळ्या धनरेषा असणें धनप्रद होय. मात्र दोहोंपैकीं एक रेषा ह्या ना त्या कारणानें बिघडल्यामुळें दुसरी उगवली नसल्याची खात्री करून घ्यावी. दोन्ही रेषा निर्दोष असणें जास्त हितावह. एक व्यवसाय चालू राहून दुसऱ्या मार्गानें तात्काल भरपूर फायदा मिळवून देण्याचें कार्य ही जुळी रेषा उत्कृष्टपणें बजावीत असते. तो दुसरा मार्ग कोणता असेल हें हातावरील इतर चिन्हांवरून सहज शोधून काढतां येतें.

दोन जुळ्या व समांतर रेषांऐवजीं त्याच रेषा एकत्र होऊन ज्यावेळीं एकसंधी व जोमदार धनरेषा तयार होते, त्यावेळीं दुसऱ्या मार्गानें जें धन मिळावयाचें तें हप्त्याहप्त्यानें अथवा दीर्घकाल मिळत राहिलें असें न होतां आकस्मिक व एकदम मिळणारें असतें. चंद्रावरून येणारी एखादी रेषा जर धनरेषेस येऊन मिळेल (आकृति ६९) तर स्त्रीकडून अथवा घराबाहेरच्या अन्य व्यक्तींकडून पैसा मिळतो. शुक्रटेकडीवरून येणारी अशी एखादी रेषा धनरेषेस मिळाली तर




आकृति ६९

स्वकीयांपासून लाभ होतो. वारसाहक्कानें मिळणारें द्रव्य ह्याच चिन्हांवरून समजतें. 'शिंक्याचें तुटतें व बोक्याचें फावतें' ह्या न्यायानें भागीदारीच्या धंद्यांत बाकीचे पातीदार रसातळाला जातात व एखादा नवकोट नारायण बनतो. त्याचप्रमाणें सट्टा, लॉटरी, रेसेस इत्यादि मार्गांनीं पैसा अकल्पित मिळतो त्यावेळीं मुख्य धनरेषेस आणखी कांहीं ठिकाणांहून येणाऱ्या रेषा मिळतात असें आढळून येतें (आ. ७०). दोन अथवा अधिक रेषांचा संयोग होऊन निर्माण होणारी धनरेषा संयोगानंतर ज्या प्रमाणांत पुष्ट व अधिक जोमदार बनेल, त्या प्रमाणांत आर्थिक सुस्थिति टिकून रहाते. एरवीं संपत्तीची लाट वावटळीनें यावी तशी जितक्या बेफामपणें येते तशीच चटकन ओसरतेही.

धनरेषा दुसऱ्या कोणत्याही रेषेमुळें छेदली जाणें अनिष्ट होय. संप-

त्तिक ओढाताण, पैशाची हानि अथवा खर्चाचे प्रसंग व्यक्तीवर त्या त्या कालीं संभवतात.



आकृति ७०



आकृति ७१

शुक्र--टेकडीवरून येणारी आडवी रेषा जर धनरेषेस छेदीत असेल तर (आकृति ७१) आई, बाप, पति, पत्नी अथवा ज्याच्यामुळें आपल्या जीवितास जबरदस्त धक्का बसेल अशा एखाद्या सुहृदाचा मृत्यु संभवतो.

चंद्र--टेकडीवरून येऊन धनरेषेस छेदणारी रेषा घराबाहेरील व्यक्ति दर्शविते. ज्यांचा आपला प्रत्यक्ष ऋणानुबंध नाहीं पण ज्याच्या मृत्यूमुळें आपली अप्रत्यक्ष हानि घडते, अशा प्रकारचा बोध ह्या रेषेवरून होतो.

धनरेषा दुहेरी असणें अतिशय भाग्याचें लक्षण होय. ह्या रेषा प्रारंभापासून अखेरपर्यंत अखंड असतील तर फारच उत्तम. अशा रेषा अनेक तऱ्हेनें संपत्ति मिळवून देतात. मनुष्य जी गोष्ट करावयास हातीं घेईल त्यांत हटकून लाभ व्हावयाचाच. तथापि अशी दुहेरी रेषा संपूर्ण पहावयास मिळणें फार क्वचित्.

धनरेषा ही तळहातावरील ऊर्ध्वरेषा आहे. ह्या रेषेचें कालमापन करतेवेळीं ह्या रेषेचा प्रारंभ खालीं मनगटाजवळ होतो व ही रेषा शनिउंचवट्यावर विराम पावते ही गोष्ट विसरतां कामा नये. ही रेषा अखंड व संपूर्ण असेल तर सत्तर वर्षांची मानावी व येणेंप्रमाणें हिशेब करावा.

मस्तकरेषा तळहातावर स्वाभाविक स्थानीं म्हणजे मधोमध असल्यास धनरेषा मस्तकरेषेस ज्या ठिकाणीं छेदते त्या बिंदूजवळ आयुष्याचीं पहिलीं पस्तीस वर्षे स्थूलमानानें संपतात. त्याचप्रमाणें अन्तःकरणरेषा ही स्वस्थानीं असेल तर त्या संयोगबिंदूजवळ आणखी दहा वर्षे ह्या हिशेबानें पंचेचाळिसावें वर्ष येतें. अंतःकरणरेषेपलीकडे वरच्या भागांत धनरेषेचा जो विभाग शिल्लक उरतो तो दहा, फार तर पंधरा वर्षांचा उरतो. येणेंप्रमाणें कोणाही व्यक्तीच्या उत्पादनशक्तीचा, नवीन उपक्रमांचा आणि कष्ट करून होणाऱ्या कमाईचा काल पंचावन्न, फार तर साठ वर्षांचा (सद्यस्थिति लक्षांत घेतां) ठरतो. साठीनंतरही अंगमेहनतीनें अथवा बुद्धिबळानें अलोट द्रव्य मिळवणाऱ्या व्यक्ति आढळतात ही गोष्ट खरी; तथापि अशीं माणसें अपवादादाखल व फार थोडीं आढळतात. अशा कर्तृत्ववान् पुरुषांची गणना सामान्य व्यक्तींत करणेंच चुकीचें ठरेल. अशा असामान्य व्यक्तींच्या हातांवरील रेषा वा चिन्हें देखील उत्साहवर्धक, यशोदायक व अपूर्व असल्यानें त्यांचें जीवित इतरांपेक्षां दीर्घकाल उपयुक्त ठरल्यास त्यांत आश्चर्य कसलें ?


येणेंप्रमाणें आयुष्यांतील पस्तिसावें, पंचेचाळिसावें व पंचावन्नावें वर्ष धनरेषेवर अचूकपणें निश्चित झाल्यानंतर अंदाजानें हव्या त्या वर्षा—दोन वर्षांचा काल मुक्रर करतां येणें अगदीं सोपें आहे. तसेंच धनरेषा तळहातावर जितकी उशीरा सुरू होईल, तेवढ्या प्रमाणांत भाग्यकाल दुरावेल व धनरेषा जितक्या लवकर संपेल त्या कालीं आयुष्यांतील कर्तृत्वाचा व कमाईचा काल संपुष्टांत येईल हें उघड आहे.

प्रकरण १९ वें : रवि-रेषा

धनरेषेइतकी किंबहुना धनरेषेपेक्षां अधिक महत्त्वाची तळहातावरील रेषा रविरेषा ही होय. ही रेषा चंद्र-उंचवट्यावरून, आयुष्यरेषेंतून अथवा मंगळ मैदानांत कुठेंही उगम पावून वर जाते आणि रवि-उंचवट्यावर थांबते (आकृति ७२).

विद्या, कला, लौकिक, सन्मान, किताब, यश, हुन्नर इत्यादि गोष्टी ह्या रेषेवरून समजतात. परिणामीं यश येणें, फार दिवसांची आकांक्षा फलद्रूप होणें अथवा जीवनांतील अनुकूल कालाचा टप्पा शोधून काढणें हें केवळ रविरेषेवरून समजतें. आयुष्यांतील ज्या कालविभागाचा निर्देश ही रेषा करीत असेल, त्या कालांत आधीं केलेली तपस्या फळास येते असा अनुभव आहें. प्रतिस्पर्धी असतील तर त्यांचा नायनाट होतो. अधिकारी नमण्याइतपत आहारीं येतात व आजूबाजूंच्या मंडळींत थोडेंफार महत्त्व मिळूं लागतें. हातावरील इतर लक्षणें ज्या मानानें असतील त्या प्रमाणांत लौकिकही लाभतो.

धनरेषा आयुष्याच्या ज्या कालविभागापुरती अदृश्य होईल, त्याच विभागाचें संरक्षण करण्यासाठीं कधीं कधीं रवि-रेषा तळहातावर प्रगट झालेली आढळून येते (आकृति ७३). असें असेल तर नांव वा कीर्ती ऐवजीं अनुकूल कालाचें द्योतक एवढाच रविरेषेचा निष्कर्ष मानावा. धनरेषा सुस्पष्ट असून शिवाय रविरेषा संपूर्ण, निर्दोष व स्वतंत्र असणें फार महत्त्वाचें आहे.



आकृति ७२

रविरेषा अजिबात नसणें हें अपेशी, अप्रसिद्ध, मंदमति, कला वा रुचिहीन आणि निर्धनतेचें चिन्ह आहे. विशेषतः धनरेषा वा रविरेषा ह्यांपैकीं निदान एक तरी ऊर्ध्वरेषा असणें अत्यंत आवश्यक आहे. एरवीं व्यक्तीची हलाखी काय वर्णावी !

फक्त धनरेषा असेल तर व्यक्तीस सांपत्तिक हलाखी भासणार नाहीं. तथापि तिचें जीवित यशस्वी व्हावयास रवि-रेषेचें अस्तित्व अगत्याचें आहे. उदाहरणार्थ, एखाद्या डॉक्टर वा वकिलाच्या हातावर फक्त धनरेषा असेल तर त्याला पैसा पुरेसा मिळेल हें निःसंशय; पण शक्यतों अधिक प्रमाणांत केसेसमध्यें यश मिळविणें, उत्तरोत्तर ज्ञातगुणांबद्दल प्रशंसा होणें, अचूक तर्कपद्धति वा निदानांबद्दल ख्याति होणें आणि धनाच्या ओघा-बरोबरच नांवलौकिक वाढणें ह्या गोष्टी हातावर रविरेषा सुस्पष्ट असल्या-विना सहसा घडत नाहींत.

उलट फक्त रविरेषाच तळहातावर एकाकी असेल तर आयुष्य यशस्वी-रीतीनें जाईल, थोड्याफार प्रमाणांत नांवलौकिक मिळेल. आकांक्षापूर्ती-साठीं फारसा विरोध भासणार नाहीं. तथापि जमाखर्चाचीं दोन्ही टोकें सदैव मिळतीं रहाणें मुष्किलीचें ठरेल. उंबऱ्याबाहेर लौकिक गाजतां–वाजतां असतां घरांत मूठभर धान्याची वाण असेही प्रसंग उद्भवतात. बडें घर व पोकळ वासा असा प्रकार पहावयास मिळतो अशा ठिकाणीं ह्या गोष्टीचा पडताळा अवश्य पहावा.

धनरेषेप्रमाणेंच रविरेषेचें उगमस्थान निश्चित नाहीं. मात्र ह्या रेषेचें विरामस्थान रवि-उंचवट्यावर कुठेंतरी असणें अगत्याचें आहे. एरवीं ह्या रेषेस रविरेषा म्हणून संबोधतां येणार नाहीं. रवि-उंचवट्याची समग्र



आकृति ७३



आकृति ७४

माहिती आपण मागें एका स्वतंत्र प्रकरणांत घेतलीच आहे. त्या गुण-धर्मांना पोषक अशा गोष्टींचें दिग्दर्शन ही रेषा करीत असते.

ही रेषा स्वतंत्र, अखंडित व इतर रेषांच्या स्वरूपाशीं जुळणारी असावी. इतर मोठ्या वा छोट्या रेषांशीं हिचा संबंध जितका न येईल तितका चांगला. अशी एकसंधी व निर्दोष रेषा ज्या मानानें लांब असेल त्या प्रमाणांत आयुष्य यशस्वी होईल (आकृति ७२).

रविरेषा आयुष्यरेषेंतून वा धनरेषेंतून उगम पावणें अतिशुभ होय. आयुष्यरेषेंतून उगम पावणारी रविरेषा दैवशाली ठरते. यक्षिणीची कांडी फिरावी त्याप्रमाणें असा मनुष्य पुढें येतो. चमत्कारिक घटना घडतात व त्या ह्या माणसाला सतत उपकारक ठरतात. रेल्वे लाईन पसरावी व त्यांवरून तुफान वेगानें निर्वेधपणें गाडी पळत रहावी तद्वत् चढत्या वैभवाचा बिनधोक रस्ता परिस्थिति ह्या माणसापुढें तयार ठेवीत असते व हा दिमाखानें दरएक पाऊल पुढें पुढें टाकीत असतो (आकृति ७४).


धनरेषेंतून रविरेषा निघणें हें उत्तरोत्तर सांपत्तिक अनुकूलता लाभत गेल्यामुळें जीवित सफल होण्याचें द्योतक आहे.

पण ह्या दोन्ही रेषांऐवजीं स्वतंत्र ठिकाणाहून रविरेषा निघत असेल तर मनुष्याची सर्व भिस्त स्वतःच्या कर्तृत्वावर अवलंबून रहाते. घरची परिस्थिति कशीही असो, ह्याला दीर्घ परिश्रमानंतर सर्व गोष्टी प्राप्त होतात. परीस्थितीचें पाठबळ अथवा पैशाचें आमिष ह्याला विशिष्ट दर्जा मिळवून देईलच असें निश्चित म्हणतां येणार नाहीं (आकृति ७२).

रविरेषा चंद्रटेकडीवर उगम पावेल तर अशा मनुष्याची कल्पनाशक्ति फार उत्कृष्ट असते. चित्रकार, साहित्यिक, कवि, नट, शिल्पज्ञ इत्यादि ज्या प्रांतांत असा मनुष्य प्रवेश करील, त्या अनुरोधानें त्याची कल्पना-शक्ति उपयुक्त ठरेल व त्याला लौकिक व संपत्ति प्राप्त होईल (आ.७५).

रविरेषा मंगळाचे प्रदेशांतून निघाली असतां मनुष्य चिकाटी व धीरो-दात्तपणा ह्यांमुळें जीवनांत यशस्वी होतो. कोणत्याही प्रसंगीं न डगमगतां, शांत राहून स्वतःचा तोल सांवरतो. त्याचा कधीं विरस व्हावयाचा नाहीं अथवा हेतु तडीस नेल्याखेरीज तो स्वस्थ पण बसायचा नाहीं (आ.७५).


धनरेषेप्रमाणें रविरेषेसही इतर उंचवट्यांवरून येणाऱ्या अथवा त्यांकडे



आकृति ७५

जाणाऱ्या उपशाखा असतात (आकृति ७५). ह्या शाखा रविरेषेस छेदून पुढें जातील तर अशुभ समजाव्या. त्या रविरेषेंत विलीन झाल्यामुळें फल द्विगुणित होतें. स्त्रीधन, वारसा हक्कानें मिळणारी संपत्ति अकल्पितरीत्या होणारे लाभ इत्यादि गोष्टी चंद्र वा शुक्र-उंचवट्यावरून येणाऱ्या शाखा रविरेषेस मिळतात, त्यांवर निश्चयेंकरून अवलंबून असतात. हा लाभ चिरकाल टिकणारा असेल अथवा तितक्या मोठ्या प्रमाणावर घडून वाया जाणारा नसेल, तर धनरेषा देखील निर्दोष असणें आवश्यक आहे. एरवीं मिळणारें धन अत्यल्प असतें किंवा जसें तें अकल्पित मिळतें तसें आकस्मिक नाहींसें होतें.

रविउंचवट्यापुरतीच ही रेषा सुस्पष्ट व निर्दोष असेल तर मनुष्य ह्या



आकृति ७६

ना त्या कलाविषयांत पुढें येतो. तथापि पुढें येण्याचा काल फार उशीरा आल्यानें आयुष्याच्या उत्तरार्धांत त्याच्या कलाकृतीस थोडी फार मान्यता मिळूं शकते. प्रत्यक्ष कलाकृति घडण्याजोगीं इतर चिन्हें मात्र हातांवर असावीं लागतात. अंगठा सरळ, चौरस वा अर्धवर्तुळाकार अनामिका, किंचित् ढळती मस्तकरेषा, आणि धनरेषेची अनुकूलता एवढ्या गोष्टी प्रत्यक्ष निर्मात्यास अवश्य हव्यात. त्यांऐवजीं पोकळ वा फुगीर हात, निर्बल अंगठा, टोकांचीं बोटें, चंद्रटेकडीकडे बरीच उतरलेली मस्तकरेषा इत्यादि चिन्हें असतील तर कलेची निर्मिति होण्याऐवजीं कलाभिरुचीच अंगीं असलेली फक्त दिसून येईल. अशा मनुष्याचें अंगीं स्वक्षेत्रांतील नैपुण्य, गुणग्राहकता, सद्‌भिरुचि, प्रसन्नवृत्ति व औदार्य दिसून येईल (आकृति ७६).

रविउंचवट्यावर एकीऐवजीं शेजारींशेजारीं तीन–चार पण अपुऱ्या लांबीच्या रेषा असतील तर बरें नाहीं. अशा मनुष्याची तैलबुद्धि खरी, तथापि दरएक विषयांतील अर्धवटपणा त्याच्या ठिकाणीं दिसून येतो. कवित्व, चित्रकला, गायन–वादन, ललित लेखन, फोटोग्राफी हवा तो विषय अशा माणसाला अवगत असावयाचा. परंतु कोणत्याही एका विषयांत तो प्रभुत्व मिळवील किंवा त्यामुळें त्याचा नांवलौकिक होईल असें घडणें सहसा कठीण. इंग्रजींतील म्हणीप्रमाणें Jack of all trades but master of none अशी त्याची अवस्था ठरते (आकृति ७७).



आकृति ७७

बारीक बारीक तुकड्यांनीं सांधलेली रवि-रेषा असून नसून सारखीच. अशा वेळीं यशापयशाचीं आंदोलनें आळीपाळीनें उद्भवतात.

सांखळीची रविरेषा तळहातावर दिसेल तर यशाचा वांटा उचलणारा तिसराच कोणीतरी पदोपदीं मार्गांत निर्माण होतो.

रविरेषेवर असणाऱ्या इतर चिन्हांचीं फळें मागें स्वतंत्र प्रकरणांत दिलीं आहेत त्याप्रमाणेंच जाणावीं. चौकोनाचें चिन्ह असेल तर आणीबाणीच्या किंवा बेअब्रूच्या प्रसंगांतून सुटका, फुली असेल तर हेतूंचा नाश, त्रिकोण असतां बुद्धिवैभवाचा गौरव, नक्षत्रचिन्ह असेल तर बड्याबड्या सुविख्यात लोकांपासून फायदा येणेंप्रमाणें विचार करावा.

कालमानाची गणना धनरेषेप्रमाणेंच खालून वर ह्या रीतीनें करावी. मात्र मस्तकरेषेजवळ पंचवीस वर्षांचा व अन्तःकरणरेषेजवळ पसतीस वर्षांचा काल मानावा. चंद्रउंचवट्यापासून निघणारी रेषा विसावें वर्षापासूनच भाग्योदय दर्शवील; आणि मनगटापासून थेट रविउंचवट्यापर्यंत जाणारी अखंड व निर्दोष रेषा सबंध जीवितच वैभवशाली आणि मानसन्मानयुक्त करील. अभिजात श्रीमंतीचे कुलांत जन्म घेऊन बुद्धि वा कर्तृत्वानें सर्व हयातभर चमकणारीं माणसेंच अशा सदराखालीं येतात असा अनुभव आहे.

प्रकरण २० वें : आरोग्यरेषा

आरोग्यरेषा सर्वांच्या हातावर असतेच असें नाहीं. विशेषत: आरोग्यरेषा आरंभापासून शेवटपर्यंत ज्यांच्या हातावर असते अशा व्यक्ति फार थोड्या. अपूर्ण अथवा दूषित रेषा हातांवर असण्यापेक्षां आरोग्यरेषा हातावर अजिबात नसणें अधिक आरोग्यप्रद असतें असें आढळून येतें.

ही आरोग्यरेषा आयुष्यरेषेच्या आंत अगर बाहेर कुठेंतरी उगम पावून ऊर्ध्व गतीनें वर बुधाचे उंचवट्याकडे जाते. त्यामुळें हिला बुधरेषा ह्या नांवानें संबोधण्याचाही प्रघात आहे. त्याचप्रमाणें चंद्रउंचवट्यावरून बुधउंचवट्याकडे धनुष्याप्रमाणें बांक घेऊन अवतीर्ण होणारी अंतर्ज्ञानरेषा आरोग्यरेषेच्या मार्गावरच असते. त्याकारणानें अंतर्ज्ञान रेषा यदाकदाचित् अपूर्ण स्वरूपांत कुठें असली तर आरोग्यरेषेच्या नांवाखालीं तिच्याकडे दुर्लक्ष्य होण्याचाही संभव असतो हें ध्यानांत ठेवावें (आकृति २ पान ६).

आरोग्यरेषा, बुधरेषा व अंतर्ज्ञानरेषा ह्या तिन्ही रेषांचा संबंध चंद्र, मंगळ व बुध ह्या तीन उंचवट्यांशीं निकट येत असल्यानें, त्यांना नांवें वेगवेगळीं असलीं तरी फलादेशांत ह्या तीन उंचवट्यांच्या गुणधर्मांचा थोडाफार समावेश होणें म्हणूनच अपरिहार्य आहे. वस्तुत: आरोग्यरेषेवर शरीरप्रकृति, आजार, गंडांतरें ह्यांचाच विचार व्हावयास हवा. पण व्यापार, धडाडी, अंत:स्फूर्ति इत्यादि गोष्टी देखील विशिष्ट व्यक्तीच्या हातावरील आरोग्यरेषेवरून समजतात त्यांतील इंगित हेंच आहे.

आरोग्यरेषा ही आयुष्यरेषेचे बाहेर, मनगटाचे मधोमध निघून निर्दोषपणें बुधउंचवट्यापर्यंत वर जावी. ही रेषा जबर उत्साह, चांगली बुद्धिमत्ता, आणि उत्तम स्मरणशक्ति दर्शविते. व्यक्तीचें आरोग्य तिच्या प्रगतींत अशा वेळीं सहसा व्यत्यय आणीत नाहीं.

विशेषत: आरोग्यरेषा ही आयुष्यरेषा, मस्तकरेषा व अन्त:करणरेषा ह्यांप्रमाणेंच निर्दोष असणें हें निकोप प्रकृतीचें चिन्ह होय.

आरोग्यरेषा जर आयुष्यरेषेंतून अथवा शुक्रटेकडीवरून निघेल तर
अशुभ होय. आरोग्यरेषेचा संबंध आयुष्यरेषेशीं कोणत्याही रीतीनें सहसा
न यावा. कारण हा संबंध आयुष्यरेषेच्या शेवटीं पण आरोग्यरेषेच्या
सुरवातीस येतो ही गोष्ट दिसून आल्यानंतर आरोग्याचें सर्वसाधारण मान
संबंध हयातीभर विवंचनेचें ठरतें. प्रकृति नाजूक असते. लिव्हर, पांथरी
अथवा आंतड्याचा विकार उद्‌भवतो व त्याचा तपास दुखणें विकोपाला
जाईपर्यंत लागत नाहीं (आकृति ७८).

पायरी–पायरीची आरोग्यरेषा असेल तर आंतड्याच्या दुखण्याबद्दल
फारच सावधगिरी बाळगली पाहिजे (आकृति ७९).

सांखळीची आरोग्यरेषा पोटदुखीचा विकार व लिव्हरपासून त्रास
दर्शविते. रेषा नागमोडी वळणाची असेल, तर वर्तन धरसोडीचें असतें व
अशा माणसास फुप्फुसाचा विकार असतो. ह्या रेषेवर यवासारखें चिन्ह
असेल तर त्या कालापुरती प्रकृती अस्वस्थ बनते. दुखणें पोटदुखीचेंच
असेल असें नाहीं. कदाचित् श्वासनलिका, घसा अथवा छाती ह्या भागां-
तही तक्रार असण्याचा संभव असतो. तळहातावरील इतर चिन्हें व
विशेषतः बोटांचीं नखें ह्यांचे साहाय्यानें दुखण्याचें निदान बरोबर समजतें.



आकृति ७८




आकृति ७९

आरोग्यरेषा ठिकठिकाणीं तुटलेली असेल तर पोटांत कांहीं ना कांहीं
तक्रार सदैव चालू रहाते. अति रुंद व उथळ रेषा अपचनाचा विकार


दर्शविते. अशा माणसानें आहार नित्य बेताचा ठेवावा. आरोग्यरेषेवर काळ्या वा तांबड्या रंगाचे ठिपके असतील, तर पित्तदोषामुळें त्याकाळीं प्रकृति बिघडण्याचा संभव असतो. अशा ठिपक्यांनें मनुष्याच्या स्वभावांतही सामान्यतः कांहींतरी गोम आढळून येते. असा ठिपका जितका वरच्या बाजूस बुधउंचवस्थानजीक दिसेल तितका मनुष्यस्वभाव गुंतागुंतीचा व कपटयुक्त ठरेल. आरोग्यरेषा आडव्या रेषांनीं वारंवार खंडित होणें देखील प्रकृतिस्वास्थ्याचे दृष्टीनें अत्यंत अशुभ आहे.

थोडक्यांत आरोग्यरेषा संपूर्ण अथवा अंशतः असणें हें आरोग्याला उत्पन्न होणाऱ्या विकृतींचें निदान ठरविण्यास उपयुक्त असें साधन आहे. तळहातावर ज्या ठिकाणीं आरोग्यरेषा निर्दोष वा दूषित स्थितींत दिसेल त्या त्या सुमारास प्रकृति नीट राहील वा खालावेल. आरोग्यरेषा ज्या ज्या ठिकाणीं बिघडली असेल त्या त्या ठिकाणीं चौकोन, त्रिकोण अथवा समांतर अन्य रेषा असेल किंवा बिघडलेल्या स्थलानंतर पुढची रेषा स्पष्ट व निर्दोष स्थितींत असेल अथवा आयुष्यांतील त्या विशिष्ट कालाच्या निदर्शक ठिकाणीं आयुष्यरेषा व अन्तःकरणरेषा बलवान् असतील, तर दुखणें कितीही त्रासदायक, जिकिरीचें आलें तरी त्यांतून व्यक्ति सुखरूपपणें पार पडते.

आरोग्यरेषा अन्तःकरणरेषा व मस्तकरेषा ह्यांचे मधोमध मंगळ-उंच-



आकृति ८०



आकृति ८१

वस्थापुरतीच दिसेल तर मनुष्यास डोकें-दुखीची पीडा संभवते. हा रेषेचा तुकडा रक्तवर्ण अथवा पिवळा अगर एकदम पांढरा फटफटीत असेल तर अनुक्रमें ज्वर, भ्रमिष्टपणा अथवा वेड लागण्याचीही भीति असते. अशा वेळीं अंगठा व मस्तकरेषा हीं नीट पहावीत.

आरोग्यरेषा संपते त्या ठिकाणीं बुध-उंचवट्यावर नक्षत्राचिन्ह असणें भाग्याचें होय (आकृति ७८). ज्या धंद्यांत वा विषयांत व्यक्ति पदार्पण करील त्यांत नांवलौकिक व पैसा तिला मिळेल. पण नक्षत्राचिन्हां-ऐवजीं जर जाळी (आकृति ८०) फुली, तीळ अथवा चार-पांच वक्ररेषा समांतर दिसतील, तर मनुष्य विश्वासघातकी, पाताळयंत्री, लफंगा, हातचलाखी करणारा, आत्मघातकी व अयशस्वी ठरण्याचा हटकून संभव असतो.

—

प्रकरण २१ वें : विवाह-रेषा

करांगुलीखालीं बुध-उंचवट्यावर, हाताच्या कडेला ज्या दोन वा तीन बारीक पण आडव्या रेषा असतात त्यांवरून स्त्रीसुखाचा बोध होतो. (आकृति ८१). स्त्रीसुख मग तें विवाहित स्त्रीपासून कीं विवाहबाह्य अन्य रीतीनें मिळेल हें मात्र निश्चित सांगतां येणें कठीण. शेंकडा नव्वद लोक बहुधा विवाहाचा अवलंब करीत असल्यानें, ह्या रेषांना विवाहरेषा म्हणण्याचा प्रघात असावा. तथापि ह्या रेषा वैषयिक प्रेमाच्या निदर्शक असून त्याच्या पूर्ततेसाठीं मदत करणाऱ्या होत. अशा माणसाचे ठिकाणीं प्रणयपूर्तीसाठीं आवश्यक तितकी शारीरिक व मानसिक सिद्धता जरूर त्या क्षणापुरती का होईना पण निसर्गतःच असते. तेव्हां ही शारीरिक व मान-सिक गरज तो लग्न करून अथवा लग्न न करतांही भागवितो हें उघड आहे. ह्या रेषा बहुधा दोन अथवा त्यापेक्षां अधिक असलेल्या आढळून येतात. त्यामुळें जितकी रेषांची संख्या अधिक तितक्या वेळां पुनर्लग्न


व पुन्हां नवा संसार अशी विपरीत समजूत बऱ्याच ठिकाणीं झालेली दिसून येते. पण ही व्युत्पत्ति अगदीं चुकीची आहे. कारण ह्या रेषा वैषयिक वासना दर्शवतात असें म्हटल्यानंतर, रेषा दोन, तीन वा चार असणें हें मनोविकार ताब्यांत न रहाण्याचें व ढिलेपणाचें द्योतक ठरेल. अशी व्यक्ति, स्थळ, काल वा ऐपत हीं अनुकूल असतील त्या प्रमाणांत मनसोक्त आचरण ठेवील; किंवा अंगठा, मस्तकरेषा व शुक्र-उंचवटा हीं बलवान् असतील तर त्या व्यक्तीला वासना काबूंत ठेवण्यासाठीं अतिशय कुचंबणा सोसावी लागेल. विवाहदर्शक रेषा दोन अथवा अधिक असतील तर सर्वसाधारणरीत्या मनुष्याचें वैषयिक प्रेम उत्कट, व्यावहारिक सहानुभूतियुक्त, प्रेमळ व निष्कपट असूं शकतें. अर्थात् सामान्य व्यक्तीस ह्या सर्व गुणांची आवश्यकता असल्यानें, बहुधा दरएक व्यक्तीचे हातावर दोन वा तीन रेषा आढळून याव्यात हें साहजिक आहे.

अन्तःकरणरेषा व करांगुलीचा पायथा ह्यांचे मधोमध जर ही रेषा असेल, तर वयाच्या २५ वें वर्षीं लग्नयोग संभवतो. त्यापेक्षां खालीं म्हणजे अन्तःकरणरेषेस नजीक असतां पंचविसीच्या आंत आणि वरच्या बाजूस बुध-उंचवट्याकडे ही रेषा अधिक आकर्षिली गेली असेल, तर पंचविशीनंतर विवाह घडून येतो.

ह्या विवाहदर्शक रेषा बुध-उंचवट्यावर आकृति ८१ त दाखविल्या-



आकृति ८२



आकृति ८३



आकृति ८४

प्रमाणें आडव्या, सरळ, समांतर व निर्दोष असाव्यात. रेषा सरळ असण्या-ऐवजीं जर तिचें टोंक खालच्या बाजूकडे वळेल तर वैवाहिक सौख्य मना-प्रमाणें लाभणार नाहीं. पति–पत्नींत वारंवार खटके उडतील; त्यांची मतें परस्परांस पोषक नसतील. हीच खालच्या बाजूकडे वळलेली रेषा अन्तःकरणरेषेस छेदील तर (आकृति ८२) पति-पत्नी एकमेकांपासून विभक्त रहातील. त्यांच्यांत प्रेम निर्माण होणें कदापि अशक्य. त्याचप्रमाणें विवाहरेषेवर यवासारखें चिन्ह असतांही (आकृति ८३) पति-पत्नी एकत्र नांदत नाहींत असा अनुभव आहे. मात्र यवचिन्ह संपल्यानंतर (चिन्ह लहान असतां) त्यांची पुनः दिलजमाई होण्याची शक्यता असते.

विवाहरेषा जर वरच्या बाजूस करांगुलीकडे वळेल तर (आकृति ८४) अशा व्यक्तीचा विवाह बव्हंशीं होत नाहीं.

सर्वसाधारणपणें विवाहरेषा बुधउंचवट्यापुरती लांबीची असलेली



आकृति ८५



आकृति ८६

आढळून येते. पण बुधउंचवटा ओलांडून ती रवि-उंचवट्यास स्पर्श करील तर नामांकित व लौकिकवान् घराण्यांतील व्यक्तीशीं लग्नसंबंध जमून येतो. विवाहरेषा रविरेषेंत येऊन मिळणें तर अतिभाग्याचें आहे (आकृति ८५). त्यायोगें लग्नामुळें व्यक्तीची परिस्थिति चोहों बाजूनें एकदम सुधारते आणि व्यक्तीची उत्तरोत्तर भरभराट होते; तथापि रविरेषा

व विवाहरेषा एकत्र मिळणाऱ्या व्यक्तीची अभिरुचि क्वचित् हीन असण्याचा संभव असतो असें दिसून येतें.

विवाहरेषा संपण्यापूर्वी जर दुभागली गेली असेल (आकृति ८६) तर पति-पत्नींत आमरण तेढ निर्माण होण्याची भीति असते.

तळहातावर बाकीच्या रेषांपेक्षां विवाहरेषा अधिक उठावदार असेल तर स्त्रीसंबंधाविषयींचे विचार अक्षय टिकून रहातात. मन चंचल व अस्वस्थ बनतें आणि कोणत्याच कार्याकडे एकाग्रतेनें लक्ष्य लागणें अशक्य ठरते. उलटपक्षीं इतर रेषांचे मानानें विवाहरेषा बारीक व अस्पष्ट असेल, तर अशी व्यक्ति विवाहाबद्दल वा स्त्रीसुखाबद्दल पूर्ण उदासीन असते. यदाकदाचित् विवाह झाला तरी तत्संबंधीचीं कर्तव्यें त्या व्यक्तीच्याकडून पाळलीं जातीलच असें सांगतां येणार नाहीं. ज्या व्यक्तीबरोबर विवाह घडून येईल ती दुसरी व्यक्ति चाणाक्ष व समाधानी वृत्तीची असेल, तरच संसार नीट व्हावयाचा. एरवीं पति-पत्नींना एका घरांत राहून देखील परस्परांची दखल आठ-आठ दहा-दहा दिवस घ्यावीशी वाटणार नाहीं. एक आपल्या कार्यांत दक्ष तर दुसऱ्याची वर्तणूक मनःपूतं समाचरेत् अशा स्वरूपाची असें दृश्य दिसून येतें.

तसेंच विवाहरेषा निघतांना उगमस्थानीं अतिठळक व बुध-उंचवट्या-कडे आल्यानंतर पुढें बारीक होत गेलेली अशा स्वरूपाची असेल तर वैषयिक सुखाबद्दल प्रारंभीं वाटणारा अनिवार उल्हास कालांतरानें कमी कमी होत जातो. हीच स्थिति उलटपक्षीं दिसून येईल. म्हणजे विवाहरेषा सुरवातीस अस्पष्ट व नंतर पुढें बुधउंचवट्यावर उठावदारपणें दिसेल तर जसजसें वय वाढेल तसतसें अंगीं असणारें स्त्रैणपणाचें प्रमाण उत्तरोत्तर वाढेल व अखेर 'बुड्ढी घोडी आणि लाल लगाम' अशांतली गत होईल.

विवाहरेषा प्रारंभीं दुभागली जाऊन नंतर पुनः एक झालेली दिसून आली तर विवाह लांबणीवर पडण्याचें द्योतक समजावें. कांहीं ना कांहीं व्यत्यय येईल व दरवेळीं ठरवलेलें लग्न आकस्मिकपणें स्थगित होईल अथवा ह्या ना त्या कारणानें लग्न कायमचें फिसकटेल.

विवाहरेषेच्या खालच्या बाजूस बारीक बारीक लोंबत्या रेषा असतील व त्या खालीं जाऊन जर अन्तःकरणरेषेस स्पर्श करतील, तर अशा व्यक्तींवर प्रेम-पाशांत सांपडून निराश होण्याचे प्रसंग वारंवार ओढवतात (आकृति ८७).



आकृति ८७


शुक्र-उंचवट्यावरून तिरपी येणारी रेषा जर विवाहरेषेस छेदील अथवा विवाहरेषा अधोमुख बनून अन्तःकरण-रेषेस छेदील, किंवा विवाह-रेषेवर सुस्पष्ट फुली अथवा नक्षत्रचिन्ह दिसून येईल तर लग्नांतील जोडीदार अकालीं गमावण्याचा प्रसंग ओढवतो असा अनुभव आहे (आकृति ३५ पान ८७).

—

प्रकरण २२ वें : दुय्यमरेषा

१ संतानरेषा (आकृति ८८)

संतानदर्शक रेषा तळहातावर वेगवेगळ्या तीन ठिकाणीं असूं शकतात. हीं तीन ठिकाणें येणेंप्रमाणें.



आकृति ८८

(१) बुध-उंचवट्यावर विवाहरेषेच्या वरच्या बाजूस असणाऱ्या बारीक बारीक ऊर्ध्वरेषा.

(२) अन्तःकरणरेषा संपते त्या ठिकाणीं खालच्या बाजूस लोंबत्या असणाऱ्या बारीक बारीक रेषा.

(३) शुक्रउंचवट्यावर अंगठ्याचे मुळाशीं तळहाताच्या कंगोऱ्यावर असणाऱ्या ऊर्ध्वरेषा.

वरील कोणत्याही ठिकाणीं संतानदर्शक एकही रेषा नसेल तर संततिसुखाची उणीव भासते. मात्र उभयतां पतिपत्नींच्या तळहातांवर जर संततिदर्शक रेषा नसतील तर निःसंतान स्थिति प्राप्त होते व फक्त पतीच्या किंवा फक्त पत्नीच्या तळहातावर संतानरेषा नसतील तर एकास संतातिसुख भरपूर लाभेल व दुसऱ्यास झालेल्या संततीपासून उपसर्ग होईल, संततीबरोबर पटणार नाहीं किंवा संतानसुख लाभण्यापूर्वी अकालीं मृत्यु येईल.

ह्या रेषा कांहीं बारीक व आंखूड आणि कांहीं ठळक व लांब अशा असतात. पैकीं पहिल्या प्रकारच्या रेषा कन्या-संततिदर्शक व दुसऱ्या तऱ्हेच्या रेषा पुत्रसंततीच्या द्योतक होत. ह्या सर्व रेषा मोजून एकंदर अपत्यांची संख्या ठरविणें अशक्य आहे. कारण ह्या रेषा उभयतां पति-पत्नींच्या तळहातांवर संख्येनें सारख्या भरतीलच असें आढळून येणें कठीण आणि ह्या रेषांपैकीं कांहीं रेषा इतक्या अस्पष्ट व इतर रेषांत गुरफटलेल्या असतात कीं, त्यामुळें रेषांच्या अस्तित्वावरून फक्त कोणाही व्यक्तीच्या ठायीं संततीचा संभव आहे किंवा नाहीं, एवढेंच फक्त निश्चित सांगतां येतें.

ह्या संतानदर्शक रेषांचा आरंभ वा शेवट इतर अन्य रेषांनीं दूषित झाल्यास, संतति अल्पजीवी ठरण्याचा संभव असतो. तसेंच ह्या रेषा उथळ, पांढऱ्या, निळसर किंवा पीत वर्णाच्या असणेंही अशुभ होय.

ह्या रेषांचा आरंभ तळहाताच्या बाहेरील भागावर होईल, तर संतति अल्पवयांत व जलद जलद होते. उलट बुध-शुक्र वा मंगळ ह्या ग्रहांच्या उंचवट्यावर व हाताच्या ऊर्ध्वभागीं जर ह्या रेषा दिसून येतील, तर संतति उशीरा व वयाची पूर्ण वाढ झाल्यानंतर होते.

---

२ शुक्रकंकण (आकृति ८८)

बोटांच्या मूळाशीं असणारा बौद्धिक उंचवट्याचा प्रदेश व्यापणारी ही अर्धचंद्राकृति रेषा आहे. ही रेषा तर्जनी व मध्यमा ह्यांमधून निघते व अनामिका आणि करांगुली ह्या दोहोंमध्यें थांबते. तळहातावर असणारीं इतर चिन्हें पाहून व अतिसावधगिरीनें ह्या रेषेचें फल वर्तविणें आवश्यक आहे. कारण शुक्रकंकण तळहातावर असेल, तर व्यक्ति अत्यंत भावनाप्रधान असते. अशा व्यक्तीचें जिणें कल्पनामय असतें. स्वभाव हळवा असतो. डोक्यांत एवढ्या तेवढ्या गोष्टीनें काहूर उठतें. वासना, आकांक्षा प्रबळ असतात. ह्यामुळें शुक्रकंकण अखंड असेल व इतर चिन्हें शुभ असतील तर व्यक्ति तैलबुद्धीची, कल्पक व मान्यता पावणारी असते. उलटपक्षीं शुक्रकंकण अर्धवट, दूषित आणि शुक्रउंचवटा, अंगठा व मस्तकरेषा ही बिघडलेली असतील तर व्यक्ति बाहेरख्याली, लंपट, विषयाधीन असते. अशा व्यक्तीच्या ठायीं निश्चयाचा अभाव असतो. मानसिक धैर्य दुबळें ठरतें व हिस्टेरिया, फेफरें येणें अथवा फिट्स् येणें अशासारखें दुखणें जडणेंहि अशा व्यक्तीचे बाबतींत हटकून संभवतें.

---

३ अन्तर्ज्ञानरेषा (आकृति ८८)

चंद्र व बुध हे दोन उंचवटे जोडणारी रेषा ती अंतर्ज्ञानरेषा होय. वस्तुतः ही रेषा बुध-उंचवट्याकडे ऊर्ध्वगतीनें जाणारी रेषा असल्यानें बुधरेषा होय; तथापि आरोग्यरेषाही बुध-उंचवट्याकडे जाते व अंतर्ज्ञान-रेषा आणि आरोग्यरेषा ह्या दोहोंचा मार्ग एकच असल्यानें हिला अंतर्ज्ञानरेषा म्हणण्याचा परिपाठ आहे. बुधरेषा तिरपी पण सरळ असते व अंतर्ज्ञान रेषा मात्र अर्धवर्तुळाकार असते. दोन रेषांमधील हा फरक महत्त्वाचा आहे.

चंद्रउंचवटा व बुधउंचवटा ह्या दोहोंच्या गुणधर्मांनुसार अंतर्ज्ञान-रेषा फलें उत्पन्न करते. कल्पकता, लहर, छांदिष्टपणा, औत्सुक्य, एकांत-

प्रियता व एकाग्रवृत्ति ही चंद्र-उंचवट्यापासून आणि तैलबुद्धि, समय-
सूचकता, दुटप्पी वृत्ति, अचूक धोरण ह्या गोष्टी बुधउंचवट्यापासून
उचलल्याकारणानें ह्या सर्व गुणावगुणांची थोड्याफार मिश्रणाची छटा अंत-
र्ज्ञानरेषा तळहातावर असणाऱ्या व्यक्तीच्या ठायीं दृष्टीस पडते. सदरहू व्यक्ति
शिक्षित असो वा नसो, ह्या व्यक्तीच्या ठिकाणीं अंतर्ज्ञानरेषेमुळें एक-
प्रकारची अंतःशक्ति निसर्गतःच निर्माण होते. त्या शक्तीच्या प्रेरणेनुसार
व्यक्तीनें इतर कोणत्याही मनुष्यासंबंधीं वा परिस्थितीबाबत केलेले अंदाज
अचूक ठरतात. मात्र ह्या नैसर्गिक देणगीची जाणीव त्या व्यक्तीस देखील
असतेच असें नव्हे. त्यामुळें लोक अशा अंदाजाकडे दुर्लक्ष करतात.
कचित् ही व्यक्ति इतरेजनांच्या उपहासासही प्राप्त होते. तथापि काला-
तरानें व्यक्तीचा प्रामाणिकपणा व अचूक निदान प्रत्ययास येतें. इतकें
झालें तरी ह्या अंदाजाचा उगम वा निदानपद्धतीचा पाया मुळांत कुठें
असतो अथवा अमुकतमुक मत व्यक्ति कोणत्या कारणांमुळें प्रसृत करते
ह्याचा तलास खुद्द व्यक्तीला अगर इतरांना कदापि लागत नाहीं, हें
विशेष होय. मनुष्यस्वभावाचा अंदाज अगाऊ होणें, भविष्यकाळांतील
कांहीं प्रसंग चित्तचक्षूंसमोर अगाऊ उभे रहाणें, भावी घटनेबाबत 'आंतील
आवाजाचा' इषारा योग्य वेळीं मिळणें इत्यादि असामान्यत्वामुळें ह्या
रेषेस अंतर्ज्ञानरेषा असें अन्वर्थक नांव प्राप्त झालें आहे. अंतर्ज्ञानरेषा
निर्दोष व अखंडित असणारी व्यक्ति लाखांत एक असणें देखील असंभ-
वनीय आहे. ही रेषा तळहातावर असणारी व्यक्ति विद्वान्, सुप्रतिष्ठित
लोकमान्य, सत्ताधीश असणें हें त्यापेक्षांही दुर्घट असल्याकारणानें, अंत-
र्ज्ञानरेषा निर्मळ स्वरूपांत प्रत्यक्ष पहावयास मिळणें अत्यंत दुर्मिळ
आहे. अर्धवट रेषा अर्धशिक्षित, सामान्य व गांवढळ इसमाचे हातावर
असू शकते. तथापि समाजांत असे लोक उपेक्षित ठरत असल्यानें, त्यांचा
ठावठिकाणा लागणें अथवा त्यांच्या ठायीं असणाऱ्या थोड्याफार प्रेरणा-
शक्तीचा सदुपयोग होणें सर्वथा अशक्य आहे.

———

४ शनीचें कडें

मधल्या बोटाचे खालीं अर्धवर्तुळाकार असणारी रेषा शनीचें कडें ह्या गांवानें ओळखली जाते (आकृति ८८). ह्या रेषेमुळें शनीचा उंचवटा व धनरेषा हीं दोन्ही विभागलीं जातात. शनीच्या उंचवट्याचे व प्रारब्धरेषेचें महत्त्व किती आहे हें आतां वेगळें सांगावयाची आवश्यकता नाहीं. स्वभावांतील समतोलपणा, जीवितांतील स्थैर्य, प्रसंगानुरूप कणखर-पणा, सहनशक्ति इत्यादि गोष्टी शनिउंचवटा बलवान् व निर्दोष असेल तरच संभवतात असें आपण मागील प्रकरणांत नुकतेंच वाचलें आहे. अर्थात् शनीचें कडें ज्या हातावर दृग्गोचर होईल त्याचे बाबतींत उपरोक्त फलें असंभवनीय ठरतील ही गोष्ट उघड आहे. ज्याच्या तळहातावर हें कडें असेल असा मनुष्य दुबळा, निराशावादी व त्राणहीन बनतो. आयु-ष्यांतील धकाधकीचे प्रसंग सहन करण्याइतकी रग त्याच्या अंगीं जन्मतःच नसते. एवढ्या तेवढ्या कारणानें मनोभंग होणें, उत्साह मावळणें, आशा खुंटणें इत्यादि प्रकार हटकून दिसून येतात. नौकरी वा उद्योगधंदा वारंवार बदलण्याची क्रियाही अशा मनुष्यास पदोपदीं करणें भाग पडतें. त्याचा जम कुठेंच बसत नाहीं. त्यामुळें आयुष्य शेवटीं अपेशी ठरतें. अशा माणसाची मस्तकरेषा चंद्र-उंचवट्यापर्यंत उतरती असेल, अंगठा निर्बल असेल, मंगळउंचवटा पुष्ट नसेल आणि आयुष्यरेषा किंवा आरोग्यरेषा खंडित असेल, तर बहुधा आत्महत्या करण्यापर्यंत मजल जाते. दुबळेपणापायीं वैतागानें अथवा दारुण निराशेनें आत्महत्या करणाऱ्या बहुतेक व्यक्तींच्या हातांवर हें शनीचें कडें वर सांगितलेल्या इतर अशुभ लक्षणांसह असतें असें आढळून आलें आहे. समाधानाची गोष्ट एवढीच कीं, हें कडें फार थोड्या व्यक्तींच्या तळहातांवर संपूर्णपणें पहावयास सांपडतें.

५ गुरुवलय

(आकृति ८८)

गुरूचे उंचवट्यावर व तर्जनीचे पायथ्याशीं असणारी अर्धचंद्राकृति रेषा गुरुवलय ह्या नांवानें संबोधली जाते. हें गुरुवलय ज्याच्या हातावर असतें, त्याच्या हातावर बहुधा बारीक बारीक पुष्कळ रेषा आढळून येतात. निमुळत्या किंवा टोंकदार हातावर पुष्कळ रेषा असून, जर हें गुरुवलय असेल, तर व्यक्तीच्या काल्पनिक व सुखासीन जीवनांत क्रियाशून्यतेची भर आधिक पडते. हात चौकोनी किंवा अर्धचंद्राकृति असेल तर, तसेंच हातावर रेषा शक्यतों कमी आणि इतर बौद्धिक चिन्हें दिसून येतील, तर गुरुवलय शुभफलें निर्माण करतें. ह्या वलयामुळें मनुष्यास गूढविद्या जाणण्याची उत्कट इच्छा उत्पन्न होते. आध्यात्मिक शास्त्रें, ज्योतिषविद्या, हस्तसामुद्रिकशास्त्र, रमलविद्या, मानसशास्त्र, जारण–मारण, जादू–टोणा, जंतर–मंतर इत्यादि बऱ्यावाईट विषयांचा छंद, व्यक्तीस इतर चिन्हें ज्या प्रमाणांत सुस्पष्ट असतील त्या मानानें जडतो. मंगळाचे मैदानावर अशा वेळीं जर स्वतंत्र फुलीचें चिन्ह थेट शनीचे बोटाखालीं असेल, तर वर छंद म्हणून सांगितलेल्या विषयांचें रूपांतर धंद्यांत होईल व चरितार्थाचें तें एक साधन ठरेल. ह्या गुरुवलयामुळें व्यक्तीस नव्या नव्या वस्तूंबद्दल तात्पुरता जिव्हाळा अनिवार वाटतो. मन मोहसुलभ असतें. कोणत्याही व्यक्तींची वा गोष्टींची छाप तत्काल पडते; आणि म्हणूनच निमुळत्या किंवा टोंकदार हातापेक्षां चौरस किंवा अर्धवर्तुळाकार हातावर गुरुवलय असणें चांगलें असें म्हणावेंसें वाटतें.

---

६ मंगळरेषा

(आकृति ८८)

आयुष्यरेषेच्या आंतील बाजूस शुक्र-उंचवट्यावर व आयुष्यरेषेस समांतर असणारी रेषा मंगळाची होय. ही रेषा मंगळ-उंचवट्याचें प्राधान्य दर्शवितें. क्वचित् स्थळीं आयुष्यरेषा दूषित अथवा अपुरी असेल तर मंगळरेषा तिला संरक्षक होते. आयुष्यरेषा व आरोग्यरेषा उत्तम असून जर मंगळरेषा संपूर्ण व स्पष्ट असेल तर व्यक्तीचें शक्तिसामर्थ्य व मनोधैर्य,

अफाट असतें. अशा वेळीं वर असणारे बुद्धिप्रधान उंचवटे, मस्तकरेषा व अंगठ्याचें दुसरें पेरें हीं सबळ असणें हितावह आहे. कारण व्यक्ति बुद्धिमान्, कर्तव्यदक्ष व सारासार विचार करणारी असेल तर उपरोक्त सामर्थ्याचा आसुरी उपयोग होण्याची भीति पुष्कळ कमी असते. उलट-पक्षीं चंद्र-शुक्र-उंचवटे अधिक बलवान्, मस्तकरेषा ढळती, अंगठ्याचें दुसरें पेरें अगदींच लहान, शुक्र-उंचवट्यावर जाळी इत्यादि लक्षणें उन्मत्त वृत्तीस पोषक ठरतात आणि व्यक्तीच्या अंगीं असणारें सामर्थ्य अनर्थ-कारक ठरतें. तशांत ह्या व्यक्तीला पुरेसा कामधंदा नसला तर मग विचा-रावयासच नको. "आधींच मर्कट तशांतहि मद्य प्याला" ह्या उक्ती-प्रमाणें अंगांत असणारी रग भलत्या—सलत्या कामीं खर्ची पडेल ह्यांत शंका नाहीं. गोरगरिबांना नाहक छळणें, इतरांच्या न्याय्य हक्कावर जब-रीनें आक्रमण करणें, दरएक बाबतींत 'हम करेंसो कायदा' हें तत्त्व अमलांत आणणें इत्यादि प्रकार दृष्टीस पडतो. ही रेषा पाहिल्या मंगळ-उंचवट्यावरील ऊर्ध्वरेषा होय. त्यामुळें आरोग्याबाबत कणखरपणा, वर्तन निर्भीड, बोलणें सडेतोड, आकांक्षा चढेलपणाची आणि एकंदर सर्व-साधारण जीवित धसमुसळेपणाचें असा प्रकार दिसून येतो. मंगळाची रेषा हातावर असणें सांपत्तिक दृष्ट्याही आवश्यक आहे. कारण आयुष्यरेषेस ज्या विभागापुरती ही समांतर दिसते, त्या कालांत नुसत्या शरीरप्रकृतीचें संरक्षण न करतां, पैशाच्या विवंचनेंतून ही रेषा पुष्कळशा प्रमाणांत मुक्त करते. ही रेषा ज्याच्या हातावर संपूर्ण व अखंड असते त्यांना हयातींत आजोबा, वडील, चुलते, मामा, वडील बंधु निदान स्नेही किंवा श्वशुर ह्यांतून कोणा ना कोणाचा आधार पाठीशीं सतत असतो. त्यामुळें अधून-मधून गरजेच्या वेळीं, अनपेक्षितपणें अथवा शब्द टाकतांच पैशाची मदत ह्या लोकांना हवी तेव्हां मिळूं शकते. एकंदरींत मंगळरेषा उपयुक्त खरी, तथापि हातावर इतर लक्षणें मात्र शुभसूचक हवींत.

७ प्रवासरेषा (आकृति ८८)

चंद्र-उंचवट्यावर असणाऱ्या ऊर्ध्वरेषा प्रवासरेषा होत. ह्या रेषा मनगटाचे मुळाशीं असणाऱ्या मणिबंधरेषांतून निघून वर येतात. चंद्र-उंचवट्याच्या माहितींत प्रवास, निसर्गप्रेम, चांचल्य, अस्वस्थता इत्यादि गोष्टी आपण वाचल्या आहेत. त्या उंचवट्यावर असणाऱ्या ह्या ऊर्ध्वरेषा प्रवासाच्या निदर्शक असणें सहाजिकच होय. चंद्र-उंचवटा बलवान् असेल व त्यावर ह्या रेषा (एक अथवा अधिक) निर्दोष आढळतील, तर व्यक्ति एका स्थानीं फार दिवस टिकून रहाणें बहुधा अशक्य. सर्वसाधारणपणें अशा माणसाला नौकरी मिळते ती अथवा तो जो उद्योगधंदा पत्करतो तो अशाच स्वरूपाचा असतो कीं, वारंवार त्याला एका गांवाहून दुसऱ्या गांवीं स्थलांतर करणें भाग पडतें. असा माणूस प्रवासाची एकही संधि वाया दवडीत नाहीं. अर्थात् प्रवासरेषा आंखूड किंवा जवळजवळ तीन-चार एकत्रित असतील, तर प्रवास मर्यादित आणि किरकोळ स्वरूपाचे घडतात. लांब रेषा देशांतल्या देशांत पण दूरवरचे प्रवास दिग्दर्शित करतात व त्यायोगें फायदा संभवतो. जलप्रवास, परदेशगमन व त्याद्वारें यश, लाभ आणि लौकिक व्हावयास केवळ हातावर प्रवासरेषा असून भागत नाहीं. वर असणाऱ्या बुद्धिनिष्ठ उंचवट्यांचें प्राधान्य, प्रभावी धनरेषा, रवि-उंचवट्यावर सुस्पष्ट त्रिकोण चिन्ह आणि चंद्र-उंचवटा आकर्षक एवढ्या गोष्टी असतील व प्रवासरेषा अजिबात नसेल, तरीही दूरदूरचे भाग्यवर्धक प्रवास आकस्मिकरीत्या घडतात असा अनुभव आहे. प्रवासरेषा बिघडलेल्या असतील, त्यांच्यावर यव, फुली, आडवा छेद, तीळ, वण इत्यादि दुश्चिन्हें आढळून येतील तर प्रवासांत व्यत्यय, नुकसान, अपघात, अपयश, मानहानि इत्यादि होईल असें समजावें.

---

८ आकाशगंगा (आकृति ८८)

ही रेषा मनगटाचे मुळांतून चंद्र-उंचवट्याच्या खालच्या बिंदूपासून निघते व आरोग्यरेषेबरोबर वर जाऊन तळहातावर मध्यभागीं कोठेंतरी थांबते. अंतर्ज्ञान-रेषा व आरोग्यरेषा ह्या दोहोंतून ही आकाशगंगा रेषा ओळखण्याची रीति अशी. अंतर्ज्ञानरेषा अर्धवर्तुळाकार असते व तिच्यामुळें चंद्र व बुध-उंचवटे जोडले जातात. आरोग्यरेषा आयुष्यरेषेच्या आंत वा बाहेर चंद्र-उंचवट्याच्या मध्यबिंदूचे वर कोठेंतरी उगम पावते व तीही बुध-उंचवटा गांठते. पण आकाशगंगा मात्र बहुधा चंद्र-उंचवट्यापुरतीच पण तिरपी असते. आकाशगंगा चंद्र-उंचवट्यावर अवतीर्ण झाल्यानें त्या उंचवट्यांचीं फलें अर्थात् बिघडतात. व्यक्ति चंचल, स्त्रैण, विकारवश व अस्वस्थ स्वभावाची बनते. आरोग्यरेषा निर्दोष असून तिच्याशीं ही रेषा स्वतंत्र व समांतर दिसेल तर शरीरप्रकृति दणकट आणि उत्साह अपूर्व असतो. तथापि हात मऊ, गुबगुबीत, शुक्र—उंचवटा अतिफुगीर व त्यांवर जाळीचें चिन्ह, अन्तःकरण रेषा लांबच लांब व शाखान्वित आणि अंगठा बारीक असेल, तर सारें सामर्थ्य आणि उत्साह अकारणीं खर्ची पडतो. असा मनुष्य खाण्यापिण्याचे निर्बंध सहसा पाळीत नाहीं. विषयसुखाच्या पूर्तीसाठीं हवी ती किंमत अथवा आवश्यक तितकें धाडस तो सहज पत्करील. मात्र इतर सर्व लक्षणें शुभ असून जर ही रेषा हातावर दृष्टीस पडेल तर व्यक्ति संयमी असते. मन अस्वस्थ बनतें, मोहाचा क्षण साक्षात् प्राप्त झाला अथवा अभक्ष्यभक्षण आणि अपेय पानाची संधि वारंवार फुकट चालून आली, तरी त्या सर्वांवर अशी व्यक्ति नैतिक बलानें अंतिम विजय मिळवते व अखेरपर्यंत तोल सांवरते हें लक्षांत ठेवावें.

—

९ मणिबंध–रेषा

मनगटाचे मुळाशीं शेजारीं शेजारीं व परस्पर समांतर असणाऱ्या ह्या तीन रेषा होत. ह्या रेषा एका टोंकापासून दुसऱ्या टोंकापर्यंत आडव्या पसरलेल्या असतात. आपलें प्रस्तुतचें हस्तसामुद्रिकशास्त्र मणिबंध–रेषां-जवळ संपूर्ण होतें. प्रारंभीं दिलेल्या श्लोकांत कराग्रे वसते लक्ष्मीः अशी सुरवात आणि करमूले तु गोविंदः असा शेवट आहे. म्हणजे आपण बोटांच्या अग्रांपासून माहिती घेण्यास सुरवात केली. तळहाताचे सर्व विभाग यथा-वकाश पहातां पहातां आतां प्रस्तुत विषय ज्या ठिकाणीं संपूर्ण होतो, त्या मणिबंध–रेषांजवळ आपण आलों आहों.

बोटांच्या अग्रांतून चेतना–शक्ति आपणास प्राप्त होते. ही प्रवाही शक्ति विद्युत्वाहक नियमाप्रमाणें मणिबंधरेषांजवळ येऊन थांबते. तळ-हातावर असणाऱ्या ऊर्ध्वरेषा बलवान्, सुस्पष्ट व निर्दोष रीतीनें उगम पावणें न पावणें हें ह्या मणिबंध–रेषांच्या निर्दोष स्थितीवर अवलंबून असतें. जर ह्या तिन्ही रेषा अखंड, एकसंधी व बलवान् असतील तरच धनरेषा, रविरेषा, आरोग्यरेषा, बुधरेषा इत्यादि रेषा हातावर निर्माण होतील. बोटांच्या अग्रांतून देहांत संचारणारा प्रवाह आयुष्यरेषा, मस्तक-रेषा व अन्तःकरणरेषा ह्या तीन प्रमुख रेषा उत्पन्न करतो आणि नंतर मेंदूपर्यंत जाऊन पुनः परतणाऱ्या प्रवाहओघामुळें हातावर ऊर्ध्वरेषा निर्माण होतात असें आपण प्रारंभींच पाहिलें आहे. तळहातास बोटांच्या अग्रांना जेवढें महत्त्व आहे तितकेंच महत्त्व, त्यामुळें तळ-हाताची खालची सीमा ह्या मणिबंध–रेषा दर्शवीत असल्यानें, त्यांना प्राप्त झालें आहे. मनुष्याचें पूर्वार्जित कर्म, त्याची धर्मपरायणता, पाप-पुण्यासंबंधीं त्याच्या कल्पना, परमेश्वराबद्दल असणारी त्याची भावना, त्याच्या आयुष्याची अंदाजें सरासरी आणि त्याचें सर्वसाधारण आरोग्य इत्यादि गोष्टींचा विचार करतांना प्रायः मणिबंध–रेषांचा आधार उपयोगी पडतो. प्रवासरेषा मणिबंध–रेषांतून उगम पावतात. दारावर येणारे हस्तसामुद्रिक ज्योतिषी हात पाहून प्रथमदर्शनीं जर कोणती गोष्ट सांगत असतील तर यात्रेनिमित्त खूप प्रवास घडेल, परमेश्वराचा साक्षात्कार होईल, ईश्वरोपासना

घडेल हीं होय. ह्या भविष्यकथनाचें मूळ मणिबंध–रेषांतून निघणाऱ्या ऊर्ध्वरेषेंतच आहे. ह्या तिन्ही रेषा एकसंधी, सरळ व निर्दोष असलेल्या सहसा आढळून येत नाहींत. विशेषतः जेथून तळहाताची सुरवात होते त्या प्रारंभींच्या एकदोन रेषा बऱ्हंशीं यवाकार किंवा फुल्याफुल्यांनीं युक्त अशा असतात. त्यानंतरच्या एक अथवा दोन रेषा मात्र क्वचित् संपूर्ण व अखंडित असलेल्या दृष्टीस पडतात. ह्या रेषांच्या भिन्न भिन्न स्वरूपांवर वेगवेगळें फल सांगण्याइतक्या ह्या सुस्पष्ट व स्वतंत्र असत नाहींत. त्यामुळें ह्या रेषांचा विचार सर्वसाधारणरीत्या करणें आणि ह्यांचें अस्तित्व न विसरणें, एवढेंच तूर्त आवश्यक आहे.

प्रकरण २३ वें : उजवा व डावा हात

आतांपर्यंतच्या विवेचनावरून करदर्शनशास्त्रांतील बहुतेक तत्त्वांचें परिशिलन वाचकांनीं आपापल्यापरीं केलेंच असेल. हीं तत्त्वें डाव्या व उजव्या हातांस सारखींच लागू होतात. डाव्या–उजव्या हातांसंबंधीं खालील गोष्टी लक्ष्यांत ठेवाव्यात.

उजवा हात स्वयंकर्तृत्व दर्शवितो तर डाव्या हातावरून पूर्वार्जित कर्मांचा आणि वाडवडिलार्जित व वंशपरंपरेनें स्वतःत अंतर्भूत होणाऱ्या गुणावगुणांचा बोध होतो.

स्त्रियांचा, विशेषतः लग्न, संसार व मुलेंबाळें ह्यांत आपल्या आर्यसंस्कृतीनुरूप रममाण होणाऱ्या स्त्रियांचा डावा हात पहाण्यांतील आशय हाच कीं, अशा स्त्रियांचें जीवित परावलंबी असतें. पतीच्या आवडीनिवडीनुरूप त्यांना आयुष्य कंठावयाचें असतें. बारीक–सारीक गोष्टी वगळल्या तर कोणतेंही महत्त्वाचें कार्य केवळ स्वेच्छेनें हवें तेव्हां करतां येईल असें त्यांच्या बाबतींत म्हणतां येत नाहीं. म्हणून त्यांचें स्वातंत्र्यप्रेम, स्वयंभू कर्तृत्व, बुद्धिमत्ता हीं कितीही स्पृहणीय असलीं म्हणजेच उजवा हात

जरी अप्रातिम असला, तरी त्यांच्या डाव्या हातावरील रेषा व चिन्हें (त्यांचें प्रारब्ध) नीट असल्याची ग्वाही ज्या वेळीं देतील, तेव्हांच त्याचें महत्त्व. म्हणून उजव्या हातापेक्षांही डावा हात स्त्रियांचे बाबतींत अधिक निर्दोष हवा. ह्याचा अर्थ उजवा हात पहावयाचा नाहीं अथवा तो कमी महत्त्वाचा आहे असा मात्र नव्हे. उजवा हात बलवान् असून डावा हातही निर्दोष असेल तर अर्थात् 'अधिकस्य अधिकं फलम्' ह्या न्यायानें दुधांत साखर पडली असें समजावें. उलट डावा हात अत्यंत बिघडलेला व उजवा हात बलवान् दिसेल, तेव्हां ती स्त्री स्वातंत्र्याची पुरस्कर्ती, स्वयंसिद्ध तत्त्वाची, कर्तृत्ववान् व सभाधीट असते. दुसऱ्याची ताबेदारी ती सहसा पत्करणार नाहीं. स्वतःचा स्वाभिमान जरा देखील दुखवला गेलेला तिला खपणार नाहीं. वेळप्रसंगीं ती उपास–तापास–वनवास काढील. शक्य असल्यास नौकरीही करील; पण चरितार्थासाठीं दुसऱ्या कोणा अन्य माणसाचा आश्रय ती साफ झिडकारील हें निश्चित समजावें.

अर्थात् लग्न न करतां–अथवा लग्नानंतरही आर्थिक स्वातंत्र्याचा पुरस्कार करणाऱ्या व तें तत्त्व प्रत्यक्ष व्यवहारांत अवलंबणाऱ्या ज्या स्त्रिया, त्यांचा उजवा हात विशेषेंकरून पहावा हें ओघानेंच आलें.

पुरुषांचे बाबतींतही हाच नियम स्वीकारणें अगत्याचें आहे. केवळ पुरुष म्हणून प्रत्येकाच्या उजव्या हातासच महत्त्व देऊन, डावा हात विचारांत न घेतला, तर वर्तविलेलीं सरसकट अनुमानें चुकीचीं ठरतील हें निःसंशय. उजव्या हातापेक्षां डावा हात निर्दोष असेल, तर उपरोक्त तत्त्वानुसार अशा मनुष्याचें पूर्वार्जित कर्म मोठ्या योग्यतेचें ठरेल. सुदैवानें त्याला दरएक बाबतींत यश मिळेल. आयुष्यांत कोणत्याही गोष्टीच्या प्रीत्यर्थ फारशी जिकीर त्याला करावी लागणार नाहीं हें उघड आहे. तथापि डावा हात अत्यंत बिघडलेला आणि उजवा हातच त्या मानानें अधिक फलप्रद अशी वस्तुस्थिति आपणांपैकीं बहुतेकांची असलेली दिसून येते. त्यामुळें कितीही धडपड केली, रात्रंदिवस अविश्रांत परिश्रम केले तरी यावें तसें यश येत नाहीं, इष्ट हेतु साध्य होत नाहीं, क्वचित् आकांक्षा विफल होतात, किंबहुना मारुती करावयास जावें तर वानर

व्हावें अशांतला दैवदुर्विलसित प्रसंग पदोपदीं उद्‌भवतो. सांप्रत आपल्या पांढरपेशा समाजांत असे रंजले व गांजलेले दुर्दैवी लोकच सर्वत्र आढळून येत असल्यानें, अशा लोकांच्या डाव्या हातावर दुश्चिन्हांचें प्रमाण अधिक पहावयास सांपडेल हें काय वेगळें सांगावयास हवें?

मात्र डावा हात उजव्या हातास प्रत्येक बारीक–सारीक बाबतींतही पूरक आहे. हातावरील रेषा व चिन्हें पहातांना तर ही गोष्ट साक्षात् पटण्यासारखी आहे. ज्या गोष्टी उजव्या हातावर दूषित, बलहीन अथवा अनर्थकारक दिसून येतील, त्या गोष्टी डाव्या हातावरूनही तशा दिसून आल्या, तरच त्या प्रत्यक्ष घडण्याचा संभव असतो हें पक्कें लक्षांत ठेवावें. कोणताही महत्त्वाचा निर्णय घ्यावयाचा झाल्यास उजव्या हाताइतकेंच प्राधान्य डाव्या हातास देणें अवश्य आहे. उजव्या हातावर पुष्कळशा रेषा अथवा चिन्हें अशीं अपूर्ण स्थितींत असतात कीं, त्याच रेषा व चिन्हें जर डाव्या हातावर पाहिलीं तर त्या ठिकाणीं तीं संपूर्ण स्थितींत असलेलीं दिसून येतात. याचा अर्थ उजव्या हातावर यदाकदाचित् तीं यथावकाश परिपूर्ण होतील असा तरी होतो एक, अथवा जरी उजव्या हातावर तीं अपूर्ण असलीं तरी त्यांपासून सर्वतोपरी नाश व्हावा इतका, म्हणजे आपण सकृद्दर्शनीं समजतों एवढा कल्पनातीत अनर्थ गुदरणारा नसतो. ज्याअर्थीं डाव्या हातावर समाधानकारक स्थिति दृष्टीस पडते, त्याअर्थीं प्रारब्ध अशा वेळेपुरतें तरी पाठिंराखें ठरतें, असाच अनुभव सर्वत्र येतो.

उदाहरणार्थ, आयुष्यरेषा उजव्या हातावर अपूर्ण स्थितींत असेल आणि डाव्या हातावर ती संपूर्ण व निर्दोष दिसून येईल, तर जसजसें वय वाढत जाईल तसतशी उजव्या हातावर ती उत्तरोत्तर अधिकाधिक प्रगट तरी होत जाईल किंवा ती प्रगट न झाली, तर डाव्या हातावर ती ज्याअर्थीं निर्दोष आणि संपूर्णपणें आहे, त्याअर्थीं उजव्या हातावर ती ज्या ठिकाणीं अकस्मात् थांबलेली दिसेल, त्या वर्षीं आयुष्यच संपेल असें कदापि घडणार नाहीं. आयुष्य नंतरही प्रदीर्घ लाभेल. फक्त आधींची धडाडी, उत्साह, आरोग्य व तडफ हीं नंतर त्याच प्रमाणांत टिकणार नाहींत इतकेंच.

जी गोष्ट आयुष्यरेषेची तीच इतर कोणत्याही रेषेची अथवा चिन्हाची मानावी.

उजव्या हातावर मस्तकरेषा सरळ व निर्दोष स्थितींत पूर्ण बलवान् असूं शकेल, त्याच वेळीं डाव्या हातावर ती चंद्र-टेकडीवर येऊन थांबणारी, नागमोडी आकाराची अतएव निर्बल असल्याचें दिसून येईल. ह्याचा अर्थ प्रत्येक गोष्ट आपण जागरूकतेनें, नीट विचारपूर्वक व सावध राहून करावयास हवी. गाफील राहून अथवा महत्त्व न ओळखतां आचरलेली कृति अंगाशीं आलीच म्हणून समजावें. बुद्धिप्रधान आचरण करीत असतांना तिथें आपलें प्राक्तन नीट नाहीं, त्यांत आपणास हटकून फटका बसणार, असें सदैव ध्यानांत धरूनच चालावयास हवें.

त्याचप्रमाणें धनरेषा उजव्या हातावर मध्यंतरीं ८–१० वर्षांच्या कालापुरती बिघडलेली असून, डाव्या हातावर जर त्याच टप्प्यापुरती उठावदार दिसेल, तर उद्योगधंदा अथवा प्रत्यक्ष नौकरी ह्यापासून जरी पुरेसें द्रव्य न मिळालें, किंबहुना उद्योगाचे बाबतींत केवढी जरी स्थित्यंतरें घडून आलीं, तरी दोन वेळां भागल्या जातील, एवढी तरतूद कशीबशी होईल; कदाचित् स्वतःचा आधीं सांठविलेला पैसा गांठीं असेल किंवा ह्या ना त्या स्वरूपांत प्रारब्धेंकरून कोणीतरी तावत्काल संरक्षण करील हें निश्चित समजावें.

अशा रीतीनें उजवा–डावा हात हे दोन्ही पाहून, त्यांतील फेरफार लक्षांत घेऊन नंतर अभिप्राय व्यक्त करावा.

एखादी व्यक्ति डावखोरी असते. तसेच पुरुषांतही एखाद–दुसरा मनुष्य सर्वस्वीं पराधीन असूं शकतो. स्वतःचा चारितार्थ स्वतः चालविण्याइतकी पात्रता त्याच्या ठिकाणीं जात्याच नसते. बाप, भाऊ, चुलता, मामा एवढेंच नव्हें तर क्वचित् सासरा अथवा त्याची स्वतःची पत्नी उद्योगधंदा पत्करून त्याचें पालनपोषण करीत असते. ह्या दोन्ही प्रकारच्या पुरुषांच्या डाव्या हातास उजव्या हातापेक्षां अधिक महत्त्व देणें जरूर आहे.

बहुधा डाव्या हातावरील रेषा व चिन्हें आमरण न बदलणारीं अशीं असतात. पूर्वजन्मीं केलेल्या पाप–पुण्यानुसार जें संचित जन्मतःच आपण

आपल्याबरोबर घेऊन येतों त्याचेंच नांव प्रारब्ध. ह्या प्रारब्धाची नोंद डाव्या हातावर असल्यानें, जें एकदां पूर्वीच सिद्ध झालें आहे त्यांत नंतर बदल न व्हावा हें साहजिकच होय. उजव्या हातावरील रेषा आणि चिन्हें मात्र चालू प्राप्त परिस्थितींत प्रारब्धाची अनुकूलप्रतिकूलता जमेस न धरतां, व्यक्ति त्यांतलें त्यांत ज्या गुणावगुणांची जोपासना निश्चयपूर्वक करील त्याचा बोध दर्शवितात. त्यामुळें फेरबदल होत असतो तो उजव्या हातावरील रेषा आणि चिन्हें ह्यांतच होतो.

तथापि कांहीं माणसें अशीं आढळतात कीं, त्यांच्या उजव्या व डाव्या हातांवरील रेषांत यत्किंचितही फरक नसतो. त्याचप्रमाणें कांहीं माणसें अशीं आढळून येतात कीं, त्यांच्या दोन्ही तळहातांवर मिळून जेमतेम पांच अगर सहा प्रमुख रेषा ठळठळीत असतात व बाकीचा तळहाताचा भाग स्वच्छ असतो. उपरोक्त दोन्ही उदाहरणांतील लोकांच्या तळहातांवरील रेषांत अथवा चिन्हांत सहसा बदल होत नाहीं हें लक्षांत ठेवावें. त्यांचें जीवित जें एकदां ठरतें तें सुसूत्र, फारसें स्थित्यंतर न घडतां अथवा अधेंमधेंच त्यांच्या जीवितांत म्हणावा तसा फेरबदल न होतां व्यतीत होतें. ह्या लोकांच्या भवितव्यासंबंधीं व्यक्त केलेला अंदाज सहसा चुकत नाहीं.

एवंच प्रश्न उत्पन्न होतो तो ज्या लोकांच्या दोन्ही हातांवर रेषांचें भरगच्च जाळें असावें तसें असतें किंवा ज्यांच्या उजव्या व डाव्या तळहातांवरील रेषा व चिन्हें ह्यांत अत्यंत तफावत असलेली दिसून येते त्यावेळीं.

हातांवर रेषा व चिन्हें ह्यांची खूप रेलचेल असणें बरें नव्हें. असे लोक अत्यंत हळव्या मनाचे, भीरु, भावनाप्रधान व चंचलवृत्तीचे असतात. पुरुषांपेक्षां स्त्रियांत ह्या वृत्तींचीं बीजें अधिक खोलवर असतात. अर्थात् स्त्रियांच्या तळहातांवर असंख्य रेषाच रेषा गर्दीनें दिसल्यास त्यांत नवल नाहीं.

रेषा व चिन्हें ह्यांनीं परिप्लुत असणारा हात पहाणें व त्यांवरील भवितव्य अचूक वर्तविणें हीच गोष्ट अतिशय अवघड असते. ह्या हातां-

वरील सूक्ष्माकृति व बारीक रेषा वारंवार बदलतात. तसेंच कोणतीही रेषा अथवा कोणतेंही चिन्ह हातावर अमूकच एका विशिष्ट इराद्यानें अवतीर्ण झालें आहे, असें मनाशीं निश्चित ठरवतां येत नाहीं. त्यामुळें आपलें सारें कौशल्य अशा ठिकाणीं जरी एकवटलें तरी चटकन अभिप्राय व्यक्त करावासा वाटत नाहीं. शेवटीं मोघम अथवा गुळमुळीत-पणा नाइलाजास्तव पत्करून वेळ मारून न्यावी लागते.

सारांश, दरएक व्यक्तीचा डावा व उजवा असे दोन्हीं हात पहाणें अवश्य आहे. त्यांवरील शुभाशुभ फलांची बेरीज-वजाबाकी करूनच इष्ट उत्तर काढावें लागतें. ह्या रीति विसरून मुळींच भागणार नाहीं. रीतीचा अवलंब न केला व मेळ घालून कसेंबसें उत्तर काढतां आलें तरी एकवेळ चालेल, पण रीति माहीत नसतांना हवीतेवढी आंकडेमोड करून येईल तें कांहींतरी उत्तर ठोकून दिलें, तर तें हटकून चुकीचें ठरेल हें सांगावयास नकोच.

—

प्रकरण २४ वें : समारोप

प्राथमिक ह्या दृष्टीनें सांगावयाची होती ती सर्व माहिती आतांपर्यंत क्रमशः सांगितली. हा ग्रंथ वाचून तावडतोब हस्तसामुद्रिकतज्ज्ञ होण्याची कोणी अपेक्षा केली तर अर्थात् त्याच्या पदरीं निराशाच पडेल.

त्याचप्रमाणें ह्या पुस्तकांतील दरएक नवें तत्त्व वाचतांना स्वतःचा हात जो कोणी सतत पुढें धरील, त्याला स्वतःसंबंधीं उत्पन्न होणारे अगणित प्रश्न एकसमयावच्छेदेंकरून सोडवतां येतील असेंही नव्हें.

केवळ हस्तसामुद्रिकशास्त्राची ही तऱ्हा नसून आपण कोणतीही नवी विद्या अथवा नवें शास्त्र घ्या, त्या सर्वांतील मेख हीच आहे.

विश्वविद्यालयीन चार चार वर्षे उच्च व अप्रतिहत शिक्षण लोक घेतात. एवढेंच नव्हें तर अवघड अवघड परीक्षा देऊन यशाचें अंतिम टोंक कित्येक गांठतात.

कोणी डॉक्टर, कोणी वकील, कोणी बॅरिस्टर, कोणी एंजिनिअर येणेंप्रमाणें डिग्री मिळवतो.

तथापि हेच लोक प्रत्यक्ष व्यवहारांत उतरतात व जेव्हां पदोपदीं ठेंचा खातात, त्यावेळीं प्रत्येकास पुस्तकी ज्ञान हें किती कोतें, अपूर्ण व अत्यंत मर्यादित स्वरूपाचें आहे हें नंतर समजतें. पुस्तकी ज्ञानाचें मानानें कोणत्याही विषयांत स्वतः संशोधन करून, परिश्रमपूर्वक मिळविलेला साक्षात् अनुभव, हाच अंतीं दरएकास हात देतो असा अनुभव आहे.

वकील, डॉक्टर्स, बॅरिस्टर्स अगर रँग्लर्स आपणाकडे कांहीं थोडेथोडके नाहींत.

पण त्यांत रँग्लर परांजपे, बॅरिस्टर जयकर, डॉ. भडकमकर एवढ्याच मंडळींनीं इतरांपेक्षां विशेषत्वानें सतत उज्ज्वल यश संपादित रहावें ह्यांतील मर्म दुसरें कोणतें असेल बरें !

सारांश, पुस्तकी ज्ञान कितीही आवश्यक असलें तरी तें अत्यंत मर्यादित असणार हें उघड आहे. प्रस्तुत विषयाचेंच पहा ना. व्यक्ति तितक्या

प्रकृति ही उक्ति ह्या विषयास लावूं म्हटलें तर व्यक्तीच्या दुप्पट (प्रत्येकास दोन हात आहेत) प्रकृति वाढल्या, व त्या प्रत्येक हाताचें यथातथ्य वर्णन, दुनियेंतील सर्व लोकसंख्या एकत्र जमवून उत्पन्न होणारा प्रत्येक कागदाचा तुकडा कांटेकोर रीतीनें उपयोगांत आणला तरी शेवटीं अपूर्ण राहील हें निश्चित. तेव्हां पुस्तकें हीं फक्त इष्ट विषयासंबंधीं अभिरुचि उत्पन्न करून, निव्वळ सर्वसाधारण ज्ञान सुलभ रीतीनें करून देतात. बाकीचा कितीतरी टप्पा ज्याचा त्यानें मनःपूर्वक यथाशक्ति परिश्रम करून गांठावयाचा असतो हें ह्या ठिकाणीं विसरू नये.

* * *

कोणताही विषय घ्या. तत्संबंधीं सकारण वा निष्कारण नाकें मुरडणारे टीकाकार जियें तिथें आहेत. नव्हें ते संख्येनें जितके अधिक असतील तेवढे उपकारकच होत. मात्र टीकाकार प्रामाणिक, पढिक व लायक असावा.

प्रस्तुत हस्तसामुद्रिक विषयाची वेळींअवेळीं हेटाळणी करणारे, ह्या शास्त्रासंबंधीं हवेंतसें अद्वातद्वा बोलणारे टीकाकार तर इतर कोणत्याही विषयांत लुडबुड करीत नसतील एवढे संख्येनें अमूप सांपडतील. दुर्दैव (अथवा सुदैव समजलें तरी चालेल) हेंच कीं, ह्या विषयासंबंधीं अधिकृत अशा सुप्रसिद्ध ग्रंथकारांच्या चार ओळीही न वाचतां हे टीकाकार एकदम भरतें यावें तद्वत् मनसोक्त तुटून पडतात. अशी परिस्थिति असल्यानें अध्ययन, मनन, संशोधन, स्वानुभव व नंतर शेवटीं प्रचीति ही दिव्य ज्ञानाची सोपानपरंपरा ह्यांपैकीं एकही टीकाकार चुकून स्वतः पत्करीत नाहीं. उलट ज्ञानार्जनाची हौस म्हणून जो कोणी स्वखुषीनें ह्या विषयांत पडेल, त्याला माणसांतून उठवण्याइतका खटाटोप हे उपद्व्यापी टीकाकार करीत असतात, तेव्हां ह्याला काय म्हणावें ?

'वादे वादे जायते तत्त्वबोधः' ह्या तत्त्वाप्रमाणें टीकाकार जर प्रामाणिक व ज्ञानपिपासु असेल, तर विषयाचे दृष्टीनें ती गोष्ट उपकारकच ठरेल. उभयतांनाही त्यापासून ज्ञानार्जनाचा फायदाच होईल. पण ज्यानें ह्या विषयाचा श्रीगसुद्धां पाहिला नाहीं अथवा कोणत्याही विद्येची अंतिम

मर्यादा ज्याला सारख्या प्रमाणांत मान्य नाहीं, अशा टीकाकारास खुशाल बडबडूं द्यावें हेंच उत्तम.

कायदा, वैद्यकीय, शिक्षण, शेती इत्यादि विषयांप्रमाणें ज्योतिष व सामुद्रिक हे विषय जोंपर्यंत राजमान्य झाले नाहींत तोंवर असेंच चालावयचें.

कारण सामुद्रिकाविद्याच फक्त फसवते आणि उपरोक्त बाकीचे सर्व विषय मात्र प्रत्येक व्यक्तीस शेंकडा शंभर टक्के इष्टफल देऊं शकतात असें कोणीही सुज्ञ मनुष्य म्हणणार नाहीं.

डॉक्टरचें अनुमान तंतोतंत संभाळून व न झेंपणारीं बिलें भरतां भरतां कित्येक रोगी प्रत्यहीं दगावतात.

वकिलाची अशिलाच्या निरपराधीपणाबद्दल पूर्ण खात्री असतां आणि अशिलानें पैशाच्या पिशवीची नाडी काढून टाकून, ती व्यवहार म्हणून वकिलाच्या खिशांत रिती केली असतांही, कायद्याच्या कलमांचे अर्थ उलट-सुलट होतात आणि कानाशिलांत मारावी तसें हिरमुसलें तोंड घेऊन अशील निमूट बसतें.

शेतीसंबंधीं तसेंच औषधासंबंधीं अनेक शास्त्रज्ञ अहर्निश लांबच लांब विद्वत्ताप्रचुर बाता ठोकीत असतांही पिकांची रोगराई कमी होत नाहीं, अगर मनुष्यमात्राची व्याधि टळत नाहीं.

इंजेक्शन्स लागूं न झाल्याकारणानें अद्याप ते योजणाऱ्या डॉक्टरावर अथवा निर्माण करणाऱ्या कारखान्यावर कोणी फिर्याद केल्याचें ऐकिवांत नाहीं. एवढेंच नव्हें तर त्यापायीं व्यर्थ झालेला खर्च नुकसानभरपाई म्हणून जर कोणीं मागितला, तर मागणाराची रवानगी थेट येरवड्यास होईल.

मात्र एकही पैसा खर्च न करतां, सामुद्रिकाच्या घरीं आपण होऊन जाऊन, त्याचा तास अर्धा तास वेळ घेऊन, त्यानें प्रगट केलेल्या दहापांच प्रामाणिक गोष्टींपैकीं एखादी जरी चुकली, तरी त्याचें व सामुद्रिक विषयाचें नांव सपाट्यासरशीं बद्‌दू करणारे तेच हे लोक पुढें स्वतःला टीकाकार म्हणवून घेण्यांत धन्यता मानतात. चूक झाली तर त्यांत विषयच थोतांड

असें नसून वर्तवणाराचें ज्ञान कदाचित् अपुरें असेल एवढें तारतम्य ज्ञानहि त्यांना नंतर सुचत नाहीं.

या दृष्टीनें महत्त्वाचा खुलासा एवढाच करावासा वाटतो कीं, हातावरून जन्मतारीख, जन्मवेळ, जन्मलग्नकुंडली, भावी फलितासंबंधीं दिलेले इषारे इत्यादि अचूक सांगणारे संत, महंत, ज्ञानी, ज्योतिषी, सामुद्रिक कितीतरी प्रत्यक्ष होऊन गेले आहेत. वस्तुस्थिति अशी असतांना हस्तसामुद्रिक विषय झपाट्यासरशीं झूट आहे असें म्हणणारा ' उचलली जीभ व लावली टाळ्याला ' असा प्रयोग वारंवार करील व कंटाळा आला कीं गप्प बसेल. त्यानें ह्यापेक्षां अधिक काय करायचें !

झाडांनाही जीव असतो. त्यांना सुखदुःख असतें. तीं रडतात व हसतातही असा शोध सुप्रसिद्ध डॉ. जगदीशचंद्र बोस यांनीं लावला आहे. त्यांच्या ह्या शोधान्वयें त्यांची त्रिखंडांत कीर्ति झाली. दुनियेंतील प्रत्येक विचारवंताला आश्चर्याचा धक्का बसला.

वनस्पतिशास्त्रांत झाडांचीं पानें, फळांचे छेद, फांदीचे सुटे भाग इत्यादि पाहून त्या त्या विशिष्ट झाडाचा इतिहास लिहून काढतां येतो.

डॉक्टरी विद्येंतही मृत मनुष्याच्या सांगाड्यांतून कोणत्याही भागाचा हाडाचा एक तुकडा घेऊन, मृताच्या हयातींतील शारीरिक गुणावगुणांचा पुष्कळसा बोध होतो.

कदाचित् उद्यां आपल्याच ह्या भरतखंडांत एखादा शिकंदर बोस निर्माण होईल व दगडधोंड्यांनाही जीव असून, त्यांनाही मानवांप्रमाणें सुखदुःखें भोगावीं लागतात असें प्रस्थापित करील.

तथापि जिवंत असणाऱ्या माणसाचा त्याच्या रक्तमांसानें सांधलेला व गूढ प्रकारच्या रेषा-चिन्हांनीं परिप्लुत असणारा हात, व्यक्तिवैशिष्ट्य सुखदुःखें, जोपासलेल्या आवडी-निवडी, उराशीं बाळगलेल्या आशा-आकांक्षानिदर्शक आहे असें जर कोणीं सोदाहरण पटवून दिलें, तरी जे नरपुंगव आपली अर्थशून्य तुतारी थांबवीत नाहींत, त्यांचे बाबतींत मी शेवटीं एवढेंच म्हणेन कीं, दुर्जनं प्रथमं वंदे !

करणरेषा अर्थात् दुय्यम प्रतीची ठरली आणि पाहिल्या प्रतीचें महत्त्व बुद्धिप्रद उंचवट्यावर अपवादादाखल आदर्श म्हणून प्राप्त झालेल्या ह्या अनन्यसाधारण मस्तकरेषेस प्राप्त झालें. मी स्वतः तर ह्या अभिनव रेषेला अंतर्ज्ञानरेषा असेंच म्हणेन व शब्दशः हें नामाभिधान सार्थच ठरेल.

रोग कितीही जुनापुराणा, अपूर्व किंवा मिश्रस्वरूपाचा असला तरी दहापांच मिनिटांच्या तपासणींत त्याचें निदान केवळ स्पर्शज्ञानाचे योगें दादासाहेब अचूक करतात. एवढेंच नव्हें तर ऑपरेशन करूनहि जी व्याधि बरी होणें दुरापास्त, अशा कैक रोग्यांना निव्वळ औषधी उपायांनीं त्यांनीं पुनर्जन्म दिलेला आहे. ही गोष्ट लक्षांत घेतली म्हणजे बुध व गुरु ह्या दोन बुद्धीच्या सीमा व परिसीमा जोडणारी व अन्तःकरणरेषेचें महत्त्व हिरावून घेऊन बुद्धिप्रधान असणारे चारी उंचवटे सांधणारी रेषा ही अन्तर्ज्ञानरेषाच होय हें सिद्ध होतें.

वस्तुतः जिला अंतर्ज्ञानरेषा असें संबोधण्यांत येतें, ती रेषा अर्धवर्तुळाकृति असते व ती चंद्र आणि बुध ह्या दोन ग्रहांचे उंचवटे जोडते (आकृति ८८). तथापि अशा तऱ्हेची अंतर्ज्ञानरेषा ज्या व्यक्तीचे हातावर असेल, ती व्यक्ति फार तर अचूक सल्लामसलत देऊं शकेल; अथवा त्या व्यक्तीनें प्रगट केलेले अंदाज हटकून सत्य ठरतील. मानासिक शक्तीचे बलावर सामान्य माणसापेक्षां भविष्यकालांतील कांहीं घडामोडींचीं दृश्यें अगाऊ दिसणें हें त्या व्यक्तीला शक्य ठरेल. पण दादासाहेबांच्या हातावरील रेषा गुरु-उंचवट्यावर उगम पावून वाटेंत शनि व रवि–उंचवटे आक्रमण करीत शेवटीं बुध–उंचवट्यावर विराम पावते. हे चारी बुद्धिजन्य उंचवटे परस्परांना जोडण्याचें कार्य ह्या अन्तर्ज्ञानरेषेनें सांधलें आहे. ह्या देवदत्त देणगीमुळें दादासाहेबांच्या बोटांच्या अग्रांजवळ एकप्रकारची दिव्यज्ञानशक्ति वसत असावी व त्यांच्या हाताचा स्पर्श होतांच त्यांना रोगनिदान व्हावें आणि रोग्याच्या असाध्य उपाधीस आराम पडत असावा, असें विधान केलें तर तें समर्पक ठरेल.

अन्तःकरणरेषेस गौणत्व आल्यानें दादासाहेबांच्या जीवनांत दिसून

येणारी तफावत अपूर्व आहे. दादासाहेबांचें खासगी आयुष्य त्यांच्या घरीं आठ—पंधरा दिवस राहून त्यांच्या अगदीं निकट सान्निध्यांत घालवणारांनाच नव्हें तर त्यांच्या भेटीचा आशय मनांत धरून चार चार, आठ आठ घंटे त्यांच्या दारांत ठाण मांडून बसलेल्या कोणाही तिऱ्हाइतास पटण्याइतकें साधें व सहजसुलभ आहे. त्यांच्या वागण्यांत अगर आचार-विचारांत आंतबाहेर असा कांहींएक प्रकार नाहीं. दादासाहेब स्वगृहीं किती वेळ असतात, बायकामुलांचें प्रेमळ सान्निध्य त्यांना केव्हां लाभतें, घरांतील विचार—पूस, बाजार—हाट करावयास त्यांना कितपत अवसर मिळतो इत्यादि कितीतरी प्रश्न, सतत पंधरा पंधरा दिवस हेलपाटे घालूनही त्यांची गांठ न पडणाऱ्या असंख्य गरजवंतांपुढें उभे रहातात.

तळहातावर एकच मस्तकरेषा असून शेवटाजवळ ती जर दुशाखी बनेल तर मनुष्याची बुद्धि हरहुन्नरी असते व एकाच वेळीं तो एकापेक्षां अधिक उद्योगांत स्वतःला गुरफटून घेतो असा सर्वसाधारण नियम आहे. दादासाहेबांच्या हातावर तर प्रारंभापासून शेवटपर्यंत दोन वेगवेगळ्या मस्तकरेषा आहेत. एवढेंच नव्हे तर धनरेषा, रविरेषा आणि बुधरेषा ह्या प्रत्येकीं दोनदोन, तीनतीन आहेत. तेव्हां त्यांनीं स्वतःभोंवतीं एवढा प्रचंड खटाटोप उभारावा ह्यांत आश्चर्य नाहीं.

अष्टपैलू विद्वत्ता अंगीं यावयास मस्तकरेषा त्याचप्रमाणें धन-रवि-बुध ह्या रेषा ज्या प्रमाणांत उपकारक ठरल्या, तद्वतच मिश्र स्वरूपाचा हात हेंही एक कारण आहे. अधिक रेषांमुळें व्यवसायांत वैपुल्य व विविधता आली. उलट प्रारंभीं वर्णन केल्याप्रमाणें मिश्र स्वरूपाचा हात असल्यानें, प्रत्यक्ष व्यक्तिगत संबंध ज्यांशीं पोंचूं नये असे कितीतरी आगंतुक विषयहि केवळ उपजत हौस म्हणून अंगाशीं चिकटले. दादासाहेब सुप्रसिद्ध डॉक्टर आहेत. औषधें-साखर-कागद ह्यांच्या कारखान्यांशीं त्यांचा असणारा निकट संबंधहि सर्वमान्य आहे. तथापि एवढ्यानेंच न भागतां राजकारण, शेती, शिक्षण-संस्था, अध्यापन, क्रमिक पुस्तकें, रंगभूमि, नाट्य, संगीत इत्यादि विषयांशीं प्रसंगवशात् संबंध आला व या अंगोपांगांसाठींहि त्यांनीं आजवर कमी झीज सोसली नाहीं !

धनरेषा दोन आहेत म्हणून वेगवेगळ्या व्यवसायक्षेत्रांत पैसे मिळाले. रविरेषा तीन असल्याकारणानें एम्. ए. आणि एम्. डी. अशा दोन्ही टोंकांकडील सन्मान्य पदव्या मिळून विद्या पूर्ण झाली. शिवाय डॉक्टरी धंद्यांत लोकप्रियता, निर्मळ यश, उद्योगधंदे व कारखानदारी ह्यांत महत्त्वपूर्ण स्थान व कार्यसिद्धि, संस्थानिकांशीं संबंध-स्नेह-दृढविश्वास, व शेवटीं खुद्द गव्हर्मेंटकडून शिफारस, मान्यता, अधिकाराचा हुद्दा इत्यादि सर्व सन्मान्य पदें व लौकिक पदरीं पडला. आणि रोग-निदानज्ञान, चिकित्सा-पद्धति, संशोधनात्मक अव्वल दर्जाचें कार्य, सर्वसंग्रही वृत्ति, पेटंट औषधें व त्यांचे कारखाने, आयुर्वेद रसशाळा, प्रतिदिवशीं रोग्यांना दिलीं जाणारीं प्रिस्क्रिप्शन्स हें सर्व बुध-उंचवट्यावरील रेषाधिक्याचें फळ होय.

बुध-उंचवट्यावर करांगुलीखालीं उभ्या तीन रेषा परस्परांशीं समांतर असणें हें उपजत रोगविज्ञानशास्त्राची व औषधी-योजनासंबंधींच्या ज्ञानाची आवड दर्शविणारें चिन्ह आहे. हें चिन्ह जर हातावर असेल तर मेडिकल स्कूलचें, मेडिकल कॉलेजचें अथवा आयुर्वेदविद्यालयीन शिक्षण व्हावयासच हवें असें नाहीं. स्वाभाविकरीत्याच आवड असल्यामुळें, अशी व्यक्ति फावल्या वेळीं हव्या त्या प्रकारें, मिळेल तेथून माहिती घेऊन, ग्रंथवाचनानें व थोड्याफार प्रायोगिक अनुभवाच्या जोरावर मारूनमुटकून वैद्यबुवा बनते असा अनुभव आहे. कदाचित् भावी आयुष्यांत मुख्य उद्योगधंदा वेगळा असेल व औषधव्यवसायाचा हा घरगुती उद्योग निरपेक्षपणें अधूनमधून प्रसंगोपात्त राहील ही गोष्ट वेगळी. आपल्या देशांत प्राचीन कालापासून वंशपरंपरेनें पदवी अगर मानमान्यता ह्यांची आडकाठी न येतां, हा वैद्यकीय धंदा चालत आला आहे; आणि त्यांत अद्ययावत् साधनांनीं परिवेष्टित व डॉक्टरी कोर्सच्या लांबच लांब पदव्या नांवामागें चिकटविलेल्या कोणाही विद्वानापेक्षां अधिक कार्य करून यश संपादन केलेले धन्वंतरीही कांहीं कमी चमकून गेले नाहींत ! काल-परवां रजिस्टर्ड मेडिकल प्रॅक्टिशनर म्हणून गव्हर्मेंटनें मान्यता दिलेले सर्व वैद्य वा हकीम ह्याच सदराखालील होत. अतएव मूलतःच दादासाहेबांच्या हातावर स्वयंभू ज्ञान-शक्तिदर्शक उपरिनिर्दिष्ट चिन्ह असलेलें, त्यांत

एम्. डी. पर्यंतचें शिक्षण सुखेनैव पदरीं पडून सुरवातीचा प्रमुख धंदा डॉक्टरीचाच वांट्यास आल्यानें, ह्या व्यवसायांत ते आद्वितीय न ठरतील तरच आश्चर्य असें उलट कां म्हणूं नये !

तळहातावरील सात ग्रहांच्या उंचवट्यांपैकीं जो अधिक बलवान् असेल, त्याच्या गुणधर्मांप्रमाणें कोणत्याहि व्यक्तीच्या जिवनांतील भावी उद्योगधंदा ठरत असतो. क्वचित् असेंही पहावयास सांपडतें कीं, दोन उंचवटे पूर्ण बलवान् व आणखी दोन उंचवट्यांची स्थितिहि त्याचे बरोबरीनें शुभफलप्रद अथवा स्थित्यंतरदर्शक. अशा वेळीं व्यक्ति एका क्षणीं दोन भिन्न भिन्न कार्यें तर करतेच, पण शिवाय आणखी दोन विषयांशीं तिचे हितसंबंध निगडित असूं शकतात. दादासाहेबांच्या बाबतींत एकच ग्रहउंचवटा वगळल्यास, उरलेले सहा उंचवटे एकापेक्षां एक अशा प्रतींचे बलवान् आहेत. शिवाय त्यांचें परस्पर साहचर्य अतिउत्कट व सुस्पष्ट असल्याचें दिसून येतें. त्यामुळें कोणत्याही क्षणीं एक–दोन–तीन अगर अधिक विषयांत एकामागोमाग त्यांचें कार्य अविरत चालू असलेलें आपण विस्मयानें पाहात असतों; आणि त्या व्यापांत असलेले दादासाहेब मात्र आणखी एखाददुसरा नवा उद्योग अभिनव स्वरूपांत नित्य अमलांत आणीत असतात. हातावरील दरएक उंचवट्यावरून किमान दोन विद्या व नऊ कला जाणतां येतात. ह्या ठोकळ हिशेबानें दादासाहेबांच्या हातावर सहा ग्रहांचे उंचवटे एकापेक्षां दुसरा अधिक प्रमाणांत बलवान् अशा स्वरूपाचे आहेत. तेव्हां ज्ञात असणाऱ्या चौदा विद्या व चौसष्ट कला ह्यांतून बऱ्याचशा कलावस्तुविषयांतील मर्म दादादाहेबांना अभिप्रेत असावें अगर चार-पांच विद्या मनांत आणतील तर त्यांना सहजासहजीं अवगत व्हाव्या हें उघड आहे. म्हणूनच अमूक एक विषय असा नाहीं, कीं ज्यांत दादासहिबांची मति कुंठित व्हावी. सव्यसाची धनंजयाप्रमाणें नित्य नव्या नव्या क्षेत्रांवर लक्ष्य वेधून, त्यांतील मर्मस्थलांचें शरसंधान एकसमयावच्छेदें-करून अचूक रीतीनें साधणाऱ्या त्यांच्या हातोटीची नक्कल देखील इतरांना करतां येणें सर्वथैव अशक्य तें ह्यासाठींच.

सर्वांत शेवटचा व सारांशपूर्ण महत्त्वाचा मुद्दा असा. हातावरील सर्व

प्रमुख रेषा गुरु–उंचवट्याशीं अत्यंत निगडित आहेत. विशेषतः धनरेषा तर गुरु–उंचवट्यावरच अंतीं विराम पावते. ह्या गुरु-उंचवटा-प्राधान्यतेमुळेंच दादासाहेबांचें चारित्र्य लोकोत्तर ठरलें आहे. गुरु-उंचवटा-प्रभावामुळें प्रपंचांत राहून दादासाहेबांनीं परमेश्वरभक्ति कधींही सोडली नाहीं. गृहस्थाश्रमाची जबाबदार भूमिका अत्यंत चोख रीतीनें वठवूनही परमार्थ साधण्याचा एकही क्षण त्यांनीं वाया जाऊं दिला नाहीं. एकीकडे लौकिकांत दादासाहेब प्रथितयश, नामवंत, कार्यधुरंधर, लोकनायक म्हणून वावरत असतांना, दुसरीकडे भक्तिमार्गांत त्यांचें चित्त देवपूजा, नामस्मरण, भजन, कीर्तन, पुरश्चरण, क्षेत्रयात्रा इत्यादि स्थानीं विलक्षण जखडलें जावें हें दुसरें कशाचें द्योतक असेल बरें ! ज्यांना भक्तिमार्गांतील त्यांची तादात्म्यवृत्ति माहीत आहे, त्यांना तर दादासाहेब नुसतेच अलौकिक नव्हे तर साक्षात् संतपुरुष आहेत असें वाटावें हें स्वाभाविकच होय ! ही सर्व किमया गुरु-उंचवटा व त्या ठिकाणीं प्रमुख रेषांना लाभलेलें सान्निध्य ह्यामुळें घडून आलेली आहे. मोठेपणा, पैसा, श्रीमंती, वैभव, सत्ता अगर अधिकार ह्यांपासून अलिप्त रहाण्याचें जों जों कटाक्षतेनें टाळावें तों तों ह्या सर्व गोष्टी चमत्कृतिजनक रीतीनें कायमच्या त्यांच्या मागें लागतात; कोणतीहि क्रिया इतरांप्रमाणें सामान्य, सर्वसाधारण असली तरी दरएक कृतींतून प्रतिक्षणीं लौकिक प्रसृत होत असतो. थोडक्यांत ‘ नाथांच्या घरची उलटी खूण ’ म्हणतात त्याप्रमाणें केवळ परमेश्वरी हेतूनें सामान्यांतूनच असामान्यत्व जन्म पावतें व दादासाहेबांसारखे महाभाग दिव्यांशतेपायीं महर्षि म्हणून लाभतात ह्यांत शंका नाहीं.

प्रदीर्घ आयुरारोग्य, चिरंतन सुयश देऊन परमेश्वर दादासाहेबांना उत्तरोत्तर त्यांच्या एकूणएक स्वीकृत कार्यीं साहाय्य करो अशी मनःपूर्वक प्रार्थना करून, मी वाचकांची तूर्त रजा घेतों.

समाप्त.